म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल.वा.
दा. क्र. ८७८३

# पदर

: लेखक :

कृ. ज. दिवेकर

IRBK-0108783

...शक
...वानदास हिरजी
केशव नाईक चाळ, गिरगांव, मुंबई ४.

किंमत ३॥। रुपये

# पदर

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 70048
विभाग वा.वा.
क्रमांक 2296
नों. दि.

: लेखक :

कृ. ज. दिवेकर

हिरजी मोनजी

प्रकाशक
भगवानदास हिरजी
केशव नाईक चाळ, गिरगांव, मुंबई ४.

किंमत ३॥। रुपये

प्रकाशक :

**भगवानदास हिरजी**
केशव नाईकाची चाल,
कांदेवाडी, मुंबई ४

: : :

प्रथमावृत्ती : १ फेब्रुवारी १९६१

: : :

सर्व हक्क लेखकाधीन

: : :

मुद्रक :

**जीवन मुद्रणालय,**
५७१, बुधवार पेठ,
पुणें २.

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. ८७८३ नों दि ..............
वि. वा. वा. ... क्र. ..................

तीर्थरूप वडिलांचे चरणीं—

आदरपूर्वक

अर्पण

★

IRBK-0108783
IRBK-0108783

## —X अंतरंग X—


| | | |
|---|---|---|
| १ | पदर | ५ |
| २ | मात | २० |
| ३ | भागी | ३३ |
| ४ | फोटो | ४५ |
| ५ | स्वप्न | ६६ |
| ६ | कुणाचं कांहीं, तर कुणाचं कांहीं ! | ८९ |
| ७ | वैराग्य | १०० |
| ८ | कुठें हो असतील आक्का आतां ? | ११२ |
| ९ | घोटाळा | १३५ |
| १० | बढती | १४८ |


---


या संग्रहांतील कथा अनुक्रमें ' वीणा ', ( ऑगस्ट ५९ ), ' वसुधा ' ( ऑक्टोबर ५८ ), ' प्रसाद ' ( जून ६० ), ' अलका ' ( दिवाळी ६० ), ' शशी ' ( जुलै ५९ ), ' वीणा ' ( ऑगस्ट ५८ ), ' यशवन्त ' ( मे ५९ ), ' वीणा ' ( ऑक्टोबर ५८ ), ' विवेक ' ( विजयादशमी ६० ), आणि ' वीणा ' ( ऑक्टोबर ६० ) या नियतकालिकांतून प्रथम प्रसिद्ध झाल्या.


---


**याच लेखकाची**

: प्रकाशित कादंबरी :

**' याला जीवन ऐसें नांव '**

मनोरंजन प्रकाशन : मुंबई ७

: आगामी कादंबरी :

**' उषास्वप्न '**

लाखाणी बुक डेपो, मुंबई ४

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

## १ .... पदर

कधी नव्हे ती बेबी आज पहांटेसच दचकून जागी झाली. कायसें स्वप्न तिला पडत होतें. कोणी एक राजपुत्र तिच्या स्वप्नांत आला होता व तिला हातानें खुणावीत आपल्यापाशीं येण्यास सांगत होता. या पाणीदार डोळ्यांच्या व हसऱ्या चेहेऱ्याच्या राजपुत्राकडे बेबी निरखून पहात उभी होती. हा राजपुत्र तिच्या मनांत भरला होता. म्हणून त्यानें बोलविलें तशी तिचें मन भुरकन् उडून त्याच्या सन्निध कधींच गेलें होतें पण संकोचामुळें तिचं पाऊल जागचं हलत नव्हतें. पण मग तो राजपुत्रच तिच्या रोखानें हळुहळू येऊं लागला. आतां मात्र बेबी दचकली, भांबावली व धूम पळालीच ! धावतां धांवतां तिचें मन मग स्वप्नसृष्टींतून सत्यसृष्टींत येऊन जागें झालें. बेबीनें डोळे उघडून पाहिलें तों खिडकींतून पहांटेचा धूसर प्रकाश आंत येत होता. लिमलेटची गोळी चघळावी तसें तिचें मन स्वप्नांतल्या राजपुत्राची आठवण पुन्हा पुन्हा चघळत होतें. कॉटवर उठून बसल्याबसल्या बेबीनें हातांत हात गुफून डोक्यावर नेले. जांभई देऊन अंगावरील पांघरुण व अंगांतील आळस उडवून लावला. उगीचच डोकें जड झाल्यासारखें तिला वाटत होतें. हाताच्या तळव्यानें कपाळ दाबून धरताना तिला त्या स्वप्नांतल्या राजपुत्राचा राग येऊं लागला होता. त्यानें तिच्या साखरझोपेचें कसें खोबरें करून टाकलें होतें !

पलीकडच्या स्वयंपाकघरांतून आईचा वावर सुरू झाल्याचा आवाज

बेबीच्या कानीं आला. पलंगावरून उतरून ती स्वयंपाकघरांत आली व उभी राहिली. नुकताच नळ आला होता व तिची आई भांडी भरून घेत होती. 'ए आई, आई ग !' बेबी पुटपुटली. तशी धांवतच आई तिच्यापाशीं आली. 'काय ग बेबी ? जागी का झालीस झोपेंतून ?' 'हं' बेबीच्या गळ्यांतून अस्फुट स्वर बाहेर आला व तिनें आईच्या गळ्याला मिठीच मारली. 'हें ग काय बेबी ? आतां लहान कां तूं ?' असें म्हणत तिच्या आईनं तिला पलंगापाशीं आणलें व तिला झोंपवून ती म्हणाली, 'पड पाहूं बेबी तू. अजून उजाडलेंहि नाहीं. मी आहें तिकडे. नीज उगी !' 'झोंप नाहीं ग येत आई' बेबी म्हणाली. 'येईल आत्तां. तूं पड अशी.' असें म्हणत तिच्या आईनें पायालगतची दुलई बेबीच्या अंगावर पसरली व तिचें तोंड कुरवाळून व पाठीवर थोपटून ती परत स्वयंपाकघरांत गेली.

आई आंत गेल्यावर मघां पळून गेलेल्या निद्रेनें पुन्हां बेबीला आपल्या अंकावर ओढून घेतलें. किती वेळ तरी ती गाढ झोपेंत होती. आठ वाजले तशी तिची आई तिच्यापाशीं आली व तिच्या अंगावरील दुलई दूर करीत म्हणाली 'उठा, बेबीताई, आतां पुरे झाली साखरझोंप.' 'अं ? काय आई?' म्हणत बेबी जागी झाली व 'उठतें' म्हणून पुन्हां अंथरुणांत शिरली. पण इतक्यांत तिची ताईही तेथें आली. 'बेबी ऊठ ग' म्हणत तिनें बेबीच्या बकोटीला धरून तिला उठवलें. रोजचा क्रम असा कीं, ताईनें असें उठवल्यावर बेबी मोठ्यानें आरडाओरडा करायची. 'ताईटली, सापिटली' इ. नामाभिधानांनीं ताईची साग्रसंगीत पाद्यपूजा करायची. शक्य झालें तर दोन तीन धपाटेहि ताईच्या पाठींत ठेवून द्यायची व ताईकडून त्याची सव्याज परतफेड करून घ्यायची ! दुलई उडवून द्यायची, उशी फेकायची, गादी लाथाडायची व थोडक्यांत म्हणजे त्या खोलीला नुकत्याच झालेल्या झटापटीच्या स्थळाचें स्वरूप प्राप्त करून द्यायची ! या साऱ्या प्रसंगाला तोंड देण्याच्या तयारीनेंच तर तिच्या ताईनें आज सुद्धां बेबीचे हात धरून तिला उठवलें होतें. व रोज रामप्रहरीं घडणाऱ्या बेबीच्या कसरतीच्या खेळांची ती वाट पहात होती. पण आज बेबीच्या ताईचा अंदाज शभर टक्के चुकला ! तिनें उठवलें, तशी बेबी निमूटपणें उठली. नाहीं तिनें ताईवर हात उगारला, कीं नाहीं उशा उडविल्या. न बोलतां ती उठली. क्षणमात्र तिनें ताईकडे

पाहिलें व मग निमूटपणें तीं तोंड धुण्याकरतां स्वयंपाकघराकडे वळली !

तिची ताई या प्रकरणानें सर्दच झाली. तिनें खिडकीबाहेर पाहिलें. रोजच्याप्रमाणें सूर्य पूर्वेलाच उगवला होता. मग बेबीनें आपला दैनंदिन धांगडधिंगा कसा नाहीं केला ? ताईला मुळीं ही गोष्ट पटेच ना ! पण गोष्ट खरी होती हें मान्य करण्यावांचून तिला गत्यंतर नव्हतें. 'बेबीला झालंय् तरी काय ?' असें पुटपुटत तीसुद्धां चहासाठीं स्वयंपाकघराकडे निघाली.

ती स्वयंपाकघरांत आली त्यावेळीं स्वच्छपैकीं तोंडबिंड धुवून बेबी शांतपणें अगोदरच चहा पीत बसलेली तिला दिसली. असे दृश्य ताईनें यापूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. चहा घेतां घेतां ती अजूनहि बेबीकडे पहात होती. चहापान इतकें शांततेनें बेबीनें कधीं कुठें पार पाडलें होतें ? वादळापूर्वीचीं तर ही शांतता नाहीं ना, अशीसुद्धां शंका ताईला आली. चहा पितांना बेबीनें रोज तो सांडायचा, कप अथवा बशी किंवा दोन्हीहि न चुकतां फोडायची, असा तर नेहेमींचा नियम होता बेबीचा पण आज तर बेबी सावकाश घुटके घेत चहा पीत होती. तिच्याकडे पहातांना अनवधानानें ताईच्याच हातून कप-बशी पडली, फुटली व चहाची गंगा वाहूं लागली. 'ताई, अग जरा ध्यान ठेवावं चहा घेतांना. सदा काय हा धसमुसळेपणा !' मोठेपणाचा आव आणून बेबी बोलली तेव्हां तर ताई शरमेनं पार उतरून गेली. तिच्या आईलाहि बेबीच्या बोलण्याचं नवल वाटलें. हो, सहाजिकच आहे ! कारण बेबीनें चहा सांडल्यावर तिची आई तिला नेमका ह्याच शब्दांचा अहेर करायची ना ! आज ह्याच अहेर बेबीनें जशाचा तसा परत केला होता, इतकेंच !

बेबीची ताई चहा घेऊन आपल्या खोलींत आली तरीसुद्धां तिचा बेबी-वरील राग अजून नाकाच्या शेंड्यावरच होता. कंगवा घेऊन केंस विंचरत असतां ती बेबीबद्दलच विचार करीत होती. बेबीनें आज तिला अगदीं खजील केलें होतें यांत शंका नव्हती. केसांचे सुंदर पेड विणल्यावर तिच्या ताईनें कंगवा खणांत ठेवला. आज मुळीं ती बेबीचे केंस विंचरणारच नव्हती. तिच्याशीं नुसती बोलणारसुद्धां नव्हती. खरें म्हणजे बेबीला तोंड दाखवायला तिला अगदीं लाज वाटत होती.

'ताई, आंत येऊ का ग ?' दारापलीकडून कोणीसें विचारलें. चमकून ताईनें दाराकडे पाहिलें. आवाज तर बेबीचा होता, पण शब्द बेबीचे कसे

असतील ? ताईच्या खोलींत येण्यासाठीं बेबीला परवानगी मागायची गरज पडेल का ? ' येऊं नकोस ' म्हटलें आणि बेबीला यायचें असेलें कीं, हवी तशी येणारी बेबी ! आणि आज ती ताईची परवानगी मागत होती. ' येऊं द्यावी पोरीला ' असा विचार ताईच्या मनांत आला पण तो क्षणमात्र सुद्धां टिकला नाहीं. आपला मूळचा मंजुळ आवाज अत्यंत कर्कश करीत ताईनें ओरडून म्हटलें, ' कांहीं येऊं नकोस. मोठी आली विचारणारी. चालती हो बघूं. '

' फार नाहीं ग ताई. एकच मिनिट ' असें म्हणत बेबी आंत तरं आली. तिच्या एकंदर चालण्या–बोलण्याकडे व आविर्भाकडे पाहून ताई चपापलीच कीं ! किती विनयशीलपणें बेबी आली होती. किती मर्यादेनें बोलत होती. एरवींचा अमर्याद वात्रटपणा गेला होता तरी कुठें बेबीचा ? किती हूड बेबीचा स्वभाव ! दिवसभर नुसती धांगडधिंगा करीत असायची ! क्षणभर स्वस्थ बसलेली बेबी अजून कुणाच्या पहाण्यांत नव्हती ! तर मग बेबीला आज झालें होतें तरी काय ? ही बोलते आहे ती बेबीच ना ? ताईचा मूळीं विश्वासच बसेना. उभ्या उभ्या ती आपली बेबीकडे बघत राहिली.

' ताई ग, आज माझी वेणी मीच घातली आहे. जमल्ये का बघ तरी ' बेबी बोलत होती आणि ताई आपली ऐकत होती. बेबी पाठमोरी तिच्याकडे वळली. नागिणीसारख्या दोन काळ्याभोर वेण्या बेबीच्या पाठीवर लोंबत होत्या. निळ्या रंगाच्या फुलांच्या रिबिनी नीटपणें गुंफल्या होत्या. ' बराय् ना ग् ?' मान मुरडून बेबी विचारत होती. ' कुणी घातली वेणी ?' ताईनें उलट विचारलें. ' मी नि काय ! बरी आल्ये का ?' उत्सुकतेनें बेबीनें ताईच्या तोंडाकडें पाहिलें. ताईच्या चेहऱ्यावरचे विचारांचे रंग बदलले. ' छी ! काय पण सांग ?' ताई चक्क खोटें बोलली ! ' आली मोठी शहाणी शिकवायला ताईटली ' असें तरी आतां बेबीनें म्हणावें कीं नाहीं ? पण छे ! बेबी बोलली तें दुसरेंच. ' कुठें चुकली तें सांग तरी ताई ! मी आतांपासून माझी मीच वेणी घालीत जाईन. तुझा सकाळचा अभ्यासाचा वेळ कशाला फुकट घालवायचा ? मॅट्रिकला अभ्यास किती असतो !' ' बरं बरं !' ताई खेंकसली, ' तूं आधीं काळं कर पाहूं प्रथम !'

खोलीबाहेर पडणाऱ्या बेबीकडे पाहून ताईनें ओठ चावला. कार्टीनें आज तिचा अभ्यास काढला होता ! आईनें अथवा बाबांनीं अभ्यासाचा

विषय काढलेला ताईला आवडत नसे आणि आज बेबी तिच्या मॅट्रिकच्या अभ्यासाची काळजी घेत होती ! 'कसचं काय ! पोरगी दिवसेंदिवस शेफारत चालली आहे !' ताई स्वतःशींच म्हणाली.

चांगली तासभर ताई वाचीत बसली होती. पण एक अक्षर कांहीं तिच्या धड ध्यानांत राहिलें नाहीं. राहून राहून बेबीचा विचार काय तो तिच्या डोक्यांत घोळत होता. शेवटीं कंटाळून भूगोलाचें पुस्तक तिनें जमिनीवर आपटलें व आंघोळीला जाण्यासाठीं ती बाथरूमकडे निघाली. तोंच बेबीचे बोल तिच्या कानीं आले—

'...एखाद्या डोंगरावर बसावें, समोर अनंत क्षितिज असावें, आपल्या मनाला ही सारी सृष्टि विशाल पाळण्यांत घालून नाचवीत आहे असें वाटतें. या अनंत सृष्टींत मी वाढत आहें. अनंत होत आहें असें वाटतें...'

तर मग हें सारें बेबी वाचीत होती ! दरवाज्याजवळ थबकून ताईनें आंत पाहिलें. दार लोटलेलें होतें पण त्या छोट्या फटींतून सुभाष-वाचन वाचीत असतांना बेबी दृष्टीस पडत होती. खरोखरीच दृष्ट पडावी इतकी सुन्दर, बेबी आज दिसत होती. आकाशी रंगाचा परकर व निळ्या फुलांचें पोलकें घातलेली बेबी नुकत्याच उमललेल्या कळीप्रमाणें दिसत होती. वेणींत तिनें कुठलीं फुलें माळलीं होतीं तें कांहीं ताईला दिसत नव्हतें पण बटमोगऱ्याचा मंद सुगंध खोलीभर दरवळलेला होता. त्यावरून फुलें न दिसतांहि फुलांचें अस्तित्व समजत होतें. खुर्चीत बसल्या बसल्या हनुवटीवर हात ठेवून व कोपरें टेबलावर टेकवून आपल्याच नादांत बेबी वाचीत होती. एकाद्या सुंदर चित्राकडे तल्लीनतेनें पहावें तद्वत् श्वास रोखून ताई फटींतून पहातच राहिली. बेबीच्या मोकळ्या गळ्यांतून सानेगुरुजींचे शब्द साकार होत होते—

'...अशा रीतीनें अनेक अनुभव घ्यावे, जीवन अनुभवानें समृद्ध करावें, सृष्टीच्या सान्निध्यांतील अनुभव, मानवी जीवनांतील अनुभव शेतकरी व्हा, कामगार व्हा. बघा तें जीवन, आणि वादळांत फिरायला जा. उंच डोंगर चढा. दऱ्यांत उतरा. सागरांत डुंबा. लाटांत उभे रहा. सर्वांगाचे डोळे नि कान करून पहा, ऐका...'

अन् खरेंच सर्वांगाचे डोळे व कान करून ताई उभी राहून ऐकत होती. बघत होती. बेबीचा एक नवाच अवतार तिला आज दिसत होता.

थोडा वेळ थांबल्यावर ताई स्नानास निघाली.

बेबीची आंघोळ कधींच आटोपलेली दिसत होती. ताई बाथरूममध्यें शिरली तेव्हां ती आश्चर्यानें थक्कच झाली. स्नानगृहांतल्या वस्तु जिथल्या तिथें होत्या. रोज बेबीच्या स्नान–सोहळ्यानंतर घंगाळ तपेलें दोन दिशांना कलंडलेलीं असत तर आज या दोनहि वस्तू कोपऱ्यांत व्यवस्थित ठेवलेल्या दिसत होत्या. बंब वाहून जाऊन इतस्ततः राख व कोळसे उडालेले दिसायचे तर आज बंबांत योग्य ती भर घालून थोडें जळणहि घालण्यांत आलेलें दिसत होतें. सोडून टाकलेलें परकर--पोलकें पोतेऱ्याप्रमाणें एरवीं लोळत असायचें पण आज मात्र तें धुण्यासाठीं बाजूच्या बादलीत काळजीपूर्वक ठेवलेलें आढळून आलें. थोडक्यांत म्हणजे आज बाथरूमचा उकिरडा झालेला नसल्यामुळें ताईची आंघोळ सुरळीत पार पडली. रोजच्याप्रमाणें बाथरूमच्या बंद दारावर बेबीच्या धडक्या पडल्या नाहींत. कीं दार उघडून तिनें ताईच्या टॉवेलशीं ओढाताण केली नाहीं ! टॉवेलनें तोंड खसखसून पुशीत बेबीची ताई आपल्या खोलीकडे निघाली. बेबीच्या खोलीशीं आल्यावर फिरून तिनें फटींतून सहज आंत पाहिलें. मघाचें पुस्तक टेबलावरच होतें पण आतां मात्र बेबी खुर्चीच्या पाठीवर रेलून बसली होती व समोरच्या खिडकींतून बाहेरच्या बाजूला एकाग्रतेनें पहात होती —

सकाळचे नऊ वाजून गेलेले असल्यामुळें रस्त्यावर रहदारी सुरू झालेली होती. झकपक पोषाख केलेले तरुण व रंगीबेरंगी साड्या नेसलेल्या मुली धांवपळीनें इकडें तिकडे हिंडत होत्या. सकाळ संध्याकाळ रोज हाच देखावा बेबीला या खिडकींतून दिसत असे. पण रोज जें तिला त्यांत दिसत नसे तें आज दिसत होतें. अर्थात् तें सारें कांहीं तिला नीट समजत नव्हतें. पण आपणाला हें समजत नाहीं हें तरी तिला आज प्रथमच समजत होतें ! ती तें सारें पहात होतीहि आणि नव्हतीहि. पण तें सारें कळत न कळत तिच्या मनःपटलावर नोंदलें जात होतें. फोनोग्राफच्या तबकडीवर जशा निद्रिस्त शब्दांची नोंद असते तशी मनाच्या कंगोऱ्यांवर अनुभवांचें रेखाटन होत असतें. संवेदनांच्या पिना या कंगोऱ्यावरून सरकूं लागल्या कीं, मग त्या नोंदलेल्या अनुभवांचा आविष्कार सुरू होतो ! आपल्याच विचारांत दंग होऊन गेलेल्या बेबीला दारांत ताई उभी असल्याचें लक्षांत आलें नाहीं. ताई आली आणि

अनुक्रम ११ विभाग वाचनालय

सरळ बेबीच्या मागें उभी राहिली. अजूनहि बेबीचें तिच्याकडे लक्ष गेलें नव्हतें. 'ही पोरगी कसलें एवढें चिंतन करीत आहे' याचा विचार करीत ताईनें तिच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवले. बेबीवरील तिचा राग आतां गेला होता व बहिणीच्या नात्याचें निव्वळ प्रेम काय तें आतां उरलें होतें.

'बेबे, कसला विचार करतेस ग ?' ताईनें विचारलें. पडल्या पडल्या आणखी मान उलटी वांकवून बेबीनें ताईच्या तोंडाकडें पाहिलें. ताईनें तिचें तोंड आपल्या दोन्ही हातांत पकडलें व तिच्या टप्पोऱ्या डोळ्यांत पहात विचारलें, 'बेबे, बरं नाहीं का वाटत तुला ? काय होतंय् ? आज तूं अशी अबोल आणि शांत कशी ? ताप बिप नाहीं ना ?' ताईनें उजवा हात बेबीच्या गळ्याला लावून पाहिला. नुकतेंच स्नान केलें असल्यामुळें बेबीला ताईचा हात अगदीं थंडगार लागला. 'हाय्' असें म्हणत तिनें ताईचा हात दूर केला व मग खुर्चीतून उठत ती म्हणाली, 'चल ताई, शाळेची वेळ होत आली ना ? तुला अजून कपडे करायचेत !'

ताईबरोबर ती तिच्या खोलींत आली व कॉटवर गप्पशी बसून राहिली. ताईनें कपाटांतून आपली गुलाबी साडी काढली व ती ती नेसूं लागली. पुन्हां पुन्हां पुढें मागें बघत ताई साडी नेसली मग ती आरशासमोर उभी राहिली. मूळच्या गुलाबी गालांवर तिनें स्नो चोपडला. पावडरचें फूल फिरविलें, कंगव्यानें केस फिरवून सारखे केले, डोळे चोळून भिवईवरून हात फिरविला, तो थोडा वर नेऊन केसांच्या फुग्यांवरून कानशिलांपाशीं आणला. नंतर हातरुमालावर सेंटचे थेंब टाकून तिनें तो आपल्या तोंडावरून फिरविला. बेबी हें सारें प्रसाधन लक्षपूर्वक बघत होती. यापूर्वीं तिनें ताईला हें सारें करतांना पाहिलें होतें पण तेव्हां तिला ते सारें अर्थशून्य वाटलें होतें. आतांहि हें सारें बघत असतां तिला त्याचा अर्थ कळला नाहीं, परंतु कसला का असेना पण त्याला कांहीं अर्थ आहे इतपत मात्र तिला कळलें !

पण बेबीच्या निरीक्षणाचा ताईनें निराळाच अर्थ घेतला. तिला वाटलें कीं बेबीलासुद्धां आपल्यासारखें अत्तर पाहिजे आहे. म्हणून अत्तराची बाटली घेऊन ती कॉटपाशीं आली व बेबीला म्हणाली, 'बेबी, तुला पाहिजे अत्तर ?'

'नको मला—पण तूं तें कशाला लावलंस तें सांग ! आपला दादाहि अत्तर वापरतो, नाहीं ? कां ग लावतां तुम्ही अत्तरं ?' बेबीच्या प्रश्नावर

सयुक्तिक उत्तर ताईला सुचेना. ‘ कशाला म्हणजे काय बेबी ? अग, वास नाहीं का चांगला येत !’

‘ कुणाला ग ?’ डोळे मिचकावीत बेबीनें विचारलें.

‘ आपल्यालाच ! दुसऱ्या कुणाला ? हं. इतर लोकांनासुद्धां येतो म्हणा !’

‘ इतरांसाठीं आपण कशाला अत्तर लावायचं ? पावडर लावायची ? स्नो लावायचा ?’

‘ तें नाहीं कळायचं तुला बेबी,’ म्हणत ताईनें विषय बदलला व आपल्या वह्या, पुस्तकें ती काढूं लागली.

बेबी तिथून उठली ती दादाच्या खोलींत आली. कॉलेजांत शिकणाऱ्या तिच्या दादाची खोली मोठी छानदार होती. बेबीला ती फार आवडायची. ती आंत आली तेव्हां आरशापुढें उभा राहून दादा गालांवरून तुरटीची कांडी फिरवीत होता. बेबी समोर येऊन उभी राहिली व दादाच्या तोंडाकडे पाहूं लागली तिच्याकडे लक्ष गेल्यावर दादा हंसला. प्रेमळपणें त्यानें विचारलें, ‘ काय बेबीराजे, आज काय विशेष ? एवढा नट्टापट्टा कुणी केला ?’

‘ दादा,’ त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून बेबीनें विचारलें, ‘ दादा, हें काय रे करतोयस् ?’

‘ हें ना ? अग, दाढी केली तेव्हां ब्लेडनें कापलं बघ गालावर ! त्यावर हें औषध आहे. ओय, काय झोंबतंय् !’

‘ कापतं तर मग कशाला रे दाढी करावी ?’

‘ मग काय साधूसारखी वाढवूं कीं काय ?’

‘ तसं नाहीं रे, पण अगदीं इतकी कापेपर्यंत !’

‘ तुला नाहीं तें कळायचं बेबी. तूं अजून ‘ बेबी ’ आहेस !’ आपल्या कोटीवर खूष होऊन दादा हंसला व मग टॉवेल खांद्यावर टाकीत व बेबीला पाठीवर थोपटीत तो अंघोळीला निघाला.

बेबी दिवाणखान्यांत आली तेव्हां तिचे बाबा सकाळचें दैनिक वाचीत होते. आपल्या वर्तमानपत्रापलीकडे कांहीं जग आहे याची त्याना या घटकेला आठवण नव्हती. त्यांच्या समोरच्याच बैठ्या कपाटावरचा रेडिओ बेबीनें सुरू केला. ‘—सजणा पहांट झाली’ गाणें सुरू झालें तशी बाबांनीं

तोंडासमोरचें वृत्तपत्र बंद केलें. ‘कोण, बेबी कीं काय? केव्हां उठलीस? आज काय विशेष?’

‘वा वा बाबा, आजपासून मी अशीच लवकर उठणार, लवकर आंघोळ करणार व मग अभ्यास करणार.’

‘केलास! छान छान! पण बेबी, तेवढा तो रेडिओ बंद कर पाहूं बाळ.’

चटकन् उठून बेबीनें कळ फिरविली व रेडिओ बंद केला. बाबांना कांहींसें आश्चर्य वाटलें. कारण नेमकी आपण जी गोष्ट सांगतों त्याच्या विरुद्ध करण्याचा बेबीचा स्वभाव होता. त्यामुळें एखादी गोष्ट हवी असल्यास ‘नको करूंस’ व नको असल्यास ‘बेबी तेवढं कर ग’ असें सांगायचा त्यांचा प्रघात होता. आतां त्यांनीं रेडिओ बंद करायला सांगितला कारण त्यांना तो खरें म्हणजे मोठा करायला हवा होता. पण त्यांनीं ‘बंद’ चा हुकूम दिला व बेबीनें तो तात्काळ पाळला. आपलें आवडतें गाणें हुकलें म्हणून बाबांना थोडा रागच आला बेबीचा. फिरून त्यांनीं समोरच्या दैनिकांत डोकें खुपसलें.

बेबी स्वयंपाकघरांत आली त्यावेळीं तिच्या आईच्या मनांत आलें कीं, बेबीला सांगावें जरा पाटपाणी घे म्हणून. परंतु यापूर्वीं तिनें तसें सांगून पाहिलें होतें आणि बेबीनें तें कांहीं ऐकलें नव्हतें. मग आज तरी सांगण्यांत काय अर्थ होता! तिनें मुळीं बेबीकडे पाहिलेंसुद्धां नाहीं. थोडा वेळ बेबी आईकडे पहात उभी राहिली. मग तिला काय वाटलें कोण जाणे, तिनें आपले पाट मांडायला सुरुवात केली. स्टेनलेस स्टीलचीं चकचकीत ताटें टॉवेलाला लख्ख पुसून तिनें पाटांसमोर ठेवलीं. मांडणीवरील मिठाचा सट, चटणीचें भांडें, कोशिंबीरीचें पातेलें न पाडतां काढून तिनें ते ते पदार्थ पानांत वाढले व मग आईकडे पहात म्हटलें, ‘आई ग, जेवायला हांक मारूं का सर्वांना? दहा वाजायला आले.’

तिच्या आईनें बेबीकडे पाहिलें. परकराचें टोंक बोटांत धरून व एक हात कमरेवर टेकून विस्फारलेल्या भिवयांनीं ती आईकडे पहात होती. तिच्याकडे पाहून आईला कौतुकाचा एकदम उमाळा आला. सर्वांत धाकटी म्हणून अगोदरच बेबीवर तिची फार माया होती. त्यांतून आज तिनें किती व्यवस्थेनें पाटपाणी घेतलें होतें! ‘बेबी, इकडे ये ग जरा?’ तिची आई

म्हणाली. आई कां बोलावते, हें कांहीं बेबीच्या ध्यानांत येईना. चुलीपाशीं पाटावर बसलेल्या आईपाशीं ती आली तेव्हां तशाच खरकटया हातांनीं तिनें तिला जवळ ओढलें व तिच्या गालाचा तिनें पापा घेतला.

परंतु तेवढयानेंच बेबी फुरंगटून गेली. 'हें ग काय आई? पापा घ्यायला का मी आतां कुक्कुलें बाळ आहें ? मला वाटलं कशाला बोलावलंस!'

बेबीची आई हंसली व प्रेमळपणें म्हणाली, 'बेबे, अग तूं कितीहि मोठी झालीस तरी मला तूं लहानच. जा, पानें मांडल्येत म्हणावं सर्वांना.

सारींजणं जेवायला बसलीं तशी बेबीची आई म्हणाली, 'कळलं का? आज जेवणाची सारी मांडामांड आपल्या बेबीनें केली आहे बरं का.' बेबीला अगदीं गुदगुल्या झाल्यासारखं वाटलं. ताईकडे अभिमानानें पहात ती हंसली. ताईनें एकवार तिच्याकडे पाहून डोळे वटारले व म्हटलें,

'आज बेबी अगदीं शहाण्यासारखी वागते, नाहीं आई?'

'आणि आई, आज ती वेडयासारखे प्रश्नसुद्धां विचारीत सुटलेय् सकाळपासून. मला विचारलन् मी दाढी कां करतों म्हणून...' दादा म्हणाला.

दादाकडे पाहून बाबा हंसले. 'तेवढं मात्र बेबीनं बरोबर विचारलं. अरे, काय ही तुमची दाढीची हौस! दिवसांतून चारदां तूं घोटून घोटून दाढी करतोस अन् मी मात्र चार दिवसांतून एकदांहि नियमित दाढी करीत नाहीं.'

थोडी अतिशयोक्ति सोडली तर बाबांचें म्हणणें कांहीं खोटें नव्हतें हें दादाला पटलें. दाढीच्या व कपडयांच्या बाबतींत तो फार चिकित्सा करी चानछोकी आपणांस का करावी लागते ही गोष्ट बेबीला तसेंच बाबांना सांगण्यासारखी नव्हती, रुचण्यासारखी तर मुळींच नव्हती!

जेवण झाल्यावर बाबा कचेरींत निघून गेले. ताईहि शाळेंत गेली. बेबी आपल्या खोलींत आली. गळयांत अडकविण्याची आपली पिशवी तिनें काढली. कधीं नव्हे ती तिनें उलटी केली. कागदाचे कपटे, सुतांचे तुकडे इतस्ततः विखुरले 'म्हणजे, या पुस्तकांसोबत हा सारा केरकचराहि मी नियमित शाळेंत वाहून नेत होतें कीं काय? छी:' असें पुटपुटत बेबीनें पिशवी स्वच्छ झटकली. उद्यां ती धुवायला टाकली पाहिजे, असा निश्चयहि तिनें मनोमन केला. मग तिनें घाईघाईनें वह्या व पुस्तकें पिशवींत सारलीं.

आज शनिवार असल्यामुळें शाळा अर्धा दिवस भरणार होती. इतक्यांत तिला कंपास पेटीची आठवण झाली. काल दादानें कांहीं कामाकरितां ती मागून नेली होती. आज भूमितीचा तास असल्यामुळें कंपासपेटीशिवाय चालण्यासारखें नव्हतें.

दादाच्या खोलींत जेव्हां ती आली त्यावेळीं कॉटवर चक्क लोळत पडलेला दादा तिला दिसला. अलीकडे दादाचें कॉलेजांतील अभ्यासाकडे लक्ष नसतें हें तिला माहीत होतें. तिचे बाबाच तर दादाला असें नेहमीं म्हणत म्हणून तें तिच्या लक्षांत होतें. दादा निजला होता तेथें येऊन बेबीनें विचारलें, ' काय रे दादा, आज कॉलेजला दांडी वाटतं ?'

'अं ?' म्हणत दादा दचकून उठला व बाईचें रंगीत चित्र असलेले पुस्तक त्यानें घाईघाईने उशीखालीं लपविलें. बेबीच्या नजरेंतून वेष्टनावरील तें भडक चित्र निसटलें नाहीं. तिचे डोळे चुरचुरले. पण चर्या शक्य तितकी निर्विकार ठेवून तिनें दादापाशीं कंपासाची मागणी केली.

'घे कीं त्या कपाटांतली,' दादा पडल्या पडल्या खेंकसला. खरें म्हणजे वाचनांत व्यत्यय आणल्याबद्दल त्याला बेबीचा राग आला होता. कपाटांतून कंपासपेटी घेऊन बेबी परत आपल्या खोलींत आली. पिशवी खांद्यावर अडकवून तिनें एकवार आरशांत पाहिलें. कपाळावर असलेल्या केसांच्या दोन बटा तिनें मागें सारल्या. पण फिरून त्या पुढें झेपावल्याच ! बेबी स्वयंपाकघरांत आली. 'आई, जातें ग शाळेंत' ती म्हणाली. 'जा ग बाई. पण आज अर्धा दिवस सुट्टी आहे ना ? परत ये मग लवकर. संध्याकाळीं आपल्याला सुलभाताईंकडे डोहाळे जेवणाला जायचंय.' 'बरं ग ऽ' म्हणत बेबीनें पायांत चपला सरकावल्या व ती रस्त्यावर आली.

खालीं मान घालून बेबी चालत होती. पलीकडच्या बंगल्यांत रहाणाऱ्या आपल्या वर्गमैत्रिणीला नेहमींप्रमाणें हांक मारायला ती विसरली. पाठीमागून धावत येऊन कोणी तरी पाठीत धपका घातला तशी बेबीनें वळून पाहिलें. धांपा टाकीत आलेली मीना आतां हंसत होती.

'हें ग काय मिनिटले, केवढ्यांदा मारतेस ?'

'हो तर ! जशी कांहीं मेणाची बाहुली आहेस नाहीं ? अन काल खेळतांना तूं ग मला केवढ्यांदा ढकललेंस ! बघ अजूनसुद्धां कोपराला

खरचटलेलं दिसतंय.' असें म्हणत मीनानें आपलें उजवें कोपर वेबीपुढें तोंडासमोर धरलें. एक काळसर पुसट ठिपका तेथें दिसत होता खराच ! मग बेबी काय बोलणार ? मीनाबरोबर मुकाट्याने पावलें टाकल्याशिवाय तिला गत्यंतर नव्हतें.

दोघी शाळेंत पोंचल्या. बेबी अजूनहि आपल्या विचारांत गुंग होती. ती एवढी कसल्या विचारांत आहे याचा विचार अर्थातच मीनाला करणें भागच होतें ! वर्गांत बाई शिरल्या तशी सर्व मुली एकसाथ उभ्या राहिल्या. अजूनहि आपल्याच नादांत बसलेल्या बेबीला हाताला धरून मीनानें उभें केलें. बाई बसल्या. मुली बसल्या. हजेरी सुरू झाला. 'हजर बाई ! हजर बाई !!' चा गोंगाट सुरू लाला. 'उषा पुरुषोत्तम पोतनीस' बाई ओरडल्या. पण बेबीचें लक्ष होतें कुठें ? मीनानें तेवढ्यांत तिला कोपरानें ढोसलें तेव्हां कुठें भानावर आली. 'हजर बाई !' आंवढा गिळीत बेबी पुटपुटली. मास्तरीण-बाईंनीं चष्म्याच्या भिंगावरून तिच्याकडे पाहिलें. वर्गांतील साऱ्या मुलींत उठून दिसणारी उषा हजर होती ! बाईचें नामस्मरण पुन्हां सुरू झालें— 'विजया गणेश कुलकर्णी——'

शाळा सुटली तशी चिमण्या उडाल्या. पोरी पसार झाल्या. मीनानें बेबीच्या गळ्यांतली पिशवी ओढली व आर्जस्वी स्वरांत विचारलें.

'बेबी, आज खेळायला येशील का कुंदाकडे ? केवढं मोठं अंगण आहे त्यांच्या घरापुढें. लपाछपीला किती मजा येईल ! येशील ?'

'छे ग मीने' तिची सूचना उडवून लावीत बेबी म्हणाली, 'आज मी आपली सरळ घरीं जाणाराय्. रोज रोज काय तें खेळणं ! आपण...'

आणखीहि कांहीं बेबी बोलत होती बहुधा. पण मीनाचं लक्ष तिच्या बोलण्याकडे होतें कुठें ? बेबीच का हें बोलतेय्, या संभ्रमानें ती आपली तिच्या हालणाऱ्या ओंठाकडे पहात राहिली वर्गांत देखील बेबी आज अबोल झाली होती रोज वर्ग डोक्यावर घेणारी बेबी आज शाळेंत आली नव्हती जणूं ! विचारलेल्या व न विचारलेल्या प्रश्नांना पुढें पुढें करून उत्तरें देणारी बेबी आज बाईंना आढळली नव्हती. शाळा सुटेपर्यंत एखाद्या पुरलेल्या पुतळ्याप्रमाणें ती आपल्या जागेला चिकटून बसली होती. शाळा सुटल्यावर खेळण्यासाठीं हुंदाडणारी बेबी आज मीनाला म्हणत होती, 'मीना, मी नाहीं

बाई अशी रोज रोज खेळायला येणार...' यावर मग अर्थातच मीनाहि चिडली. म्हणाली, 'बरं बरं आजीबाई, नका हं येऊं खेळायला. आमचं अडलंय खेट्टर !' व पलीकडून चाललेल्या कुंदा आणि कंपनीच्या गर्दीत ती सामील झाली.

बेबी मग एकटीच निघाली व सरळ घरीं आली. आईनें खायला दिलें तें तिने संपविलें व चहा घेतल्यावर ती सरळ आपल्या खोलींत कॉटवर पडून राहिली. पण पडल्या पडल्या अगदीं करमेना तेव्हां उठून आली. ताई अजून शाळेंतून आली नव्हती. तिनें तिचें कपड्यांचें कपाट उघडलें. आंत तऱ्हेतऱ्हेच्या रंगीबेरंगी लुगड्यांचे सम्मेलन भरलेलें होतें. व्यवस्थित घड्या घातलेलीं किती तरी पोलकीं तिथें होतीं. त्या रेशमी वस्त्रांतून हात फिरवितांना बेबीच्या हाताला गुदगुल्या होत होत्या. अगदीं अलीकडे तिच्या ताईनें डाळिंबी रंगाचा एक भारीपैकीं मखमली ब्लाऊझ शिवला होता. बेबीनें सहज तो बाहेर ओढला तों काय, एक निळसर रंगाचें पाकीट त्यांतून टपकन् खालीं पडलें. विस्मयानें बेबीनें तें उचललें. त्या उघड्या पाकीटात गुलाबी कागदाची एक घडी होती. बेबीनें ती घडी बाहेर काढली तशी निशिगंधाच्या अत्तराचा सुगंधी भपकारा बेबीच्या नाकांत शिरला. सहजच बेबीनें ती चिठी उलगडली. पण कां कोण जाणे, उगाचच आपल्या हाताला कंप सुटल्याचा भास तिला झाला. ताईला उद्देशून कोणीसें पत्र लिहिलें होतें. बेबीचे टपोरे डोळे त्यावरून फिरूं लागले--

'प्रिय सुनदा,

कधीं नव्हे तें पत्र लिहिण्याचें धाडस करीत आहें त्याबद्दल राग मानूं नये. परवांचे दिवशीं क्रिकेटच्या सामन्याचे वेळीं तुझी माझी प्रथम भेट झाली. पण तेव्हां मला तुझ्याशीं फारसें बोलायला मिळालें नाहीं. म्हणून मोकळेपणीं चार गोष्टी लिहीत आहें मी आहे एक आपला मैदानावरील खेळाडू, कवि नव्हे. तेव्हां पत्रांतील दोषांकडे दुर्लक्ष करशीलच......'

घरांत गाण्याची लकेर घुमली तशी बेबी भानावर आली. ताई शाळेंतून घरीं आली आहे व तीच तें भावगीत म्हणत आहे हें लक्षांत येतांच तिच्या घशाला कोरड पडली. तिच्या अपरोक्ष ही चिठी वाचतांना ताईनें पाहिलें तर ? छे ! नुसत्या विचारासरशीं बेबीनें घाईनें तो गुलाबी कागद

पाकीटांत सरकावला व पाकिट त्या मखमली ब्लाउझच्या घडीखालीं ठवून तिनें कपाट बंद केलें. इतक्यांत तिची ताई खोलींत शिरली. बेबीला तेथें पाहून तिला आश्चर्य वाटलें. ‘ काय ग बेबी, काय करत होतीस ? ’

‘ कुठें काय ? ’ असें म्हणत बेबी तिच्या कॉटवर धापा टाकीत बसली. तितक्यांत तिच्या ताईला कसलीशी आठवण झाली म्हणून ती चटकन् आपल्या कपडयाच्या कपाटाशीं आली व दार उघडून तिनें आंत हात घातला. हवी ती वस्तु जेथल्या तेथें असल्याचें तिच्या हाताला समजल्यावर तिचा जीव भांडयांत पडला. कांहींशा समाधानानें मग बेबीकडे वळून ती म्हणाली ‘ काय ग, कांहीं काम नव्हतें तर येथें येऊन करत काय होतीस ? ’

‘ कुठें काय ? अग माझी कंपासची पेटी सांपडत नव्हती, म्हणून म्हटलं तुझ्या खोलींत पडल्ये कीं काय ? ’

‘ हत् वेडे. अग, इतकं लक्षांत नाहीं तुझ्या ? काल नाहीं का तूं ती दादाला दिलीस...’

‘ हां हां ’ स्वतःच्या प्रसंगावधानावर खूष होऊन बेबी हंसतच उठली व तिच्या खोलींत येऊन कॉटवर लोळत पडली. मघांशी पाहिलेल्या ताईच्या गुलाबी कोडयाबद्दलच अद्याप ती विचार करीत होती. पण तिला तें उलगडत मात्र नव्हतें !

चार वाजतां सारा जामानिमा आटोपून ताई व आईबरोबर ती सुलभाताईकडे डोहाळेजेवणाच्या समारंभाला निघाली. गडद अस्मानी रंगाची पांच वारी साडी ताईनें बेबीला नेसवली होती. फिकट गुलाबी रंगाचा ब्लाऊज बेबीच्या अंगांत होता. एक पदरी सोन्याची सांखळी तिच्या गौर कोंवळया मानेवर रुळत होती. कानांत दोन खडे होते. केसांचे दोन जाडसर पेड एकमेकांत गुंफवून त्यावर मोगऱ्याची वेणी माळली होती. ताई बेबीवर आज इतकी कां खूष झाली होती कोण जाणे ! बेबी नको नको म्हणत असता तिनें स्वतःच बेबीचा जामानिमा पार पाडला होता. रस्त्यांतून जात असतांना आपल्यापेक्षां बेबीकडेच लोकांचे डोळे लागून राहिले आहेत, ही गोष्ट ताईच्या लक्षांत यत होती. सुलभाताईकडे सुद्धां बेबीचें सर्वांनीं कोडकौतुक केलें. स्त्रियांच्या त्या घोळक्यांत बेबी साऱ्यांच्या नजरेंत भरत होती.

‘ पोरीची आज दृष्ट काढायला पाहिजे बाई. ’ परत येतांना आई ताईला

म्हणाली. ताईनें बेबीकडे पाहिलें. तों ती आपल्याच तालांत जपून पावलें टाकीत होती. आज प्रथमच तिनें साडी नेसली होती असें नव्हे. यापूर्वी किती तरी वेळां ताईनें तिला हौसेनें साडी नेसविली होती. नवल इतकेंच कीं, आज साडी बेबीला खरोखरीच शोभत होती. चालतांना माठ्या मर्यादशीलपणें बेबीची मान जमिनीसरशी होती. कितीतरी लोकांच्या नजरा आपणाकडे आहेत हें न पाहातांहि बेबीला दिसत होतें. मार्गांत ती ताईशीं कांहीं बोलली नाहीं. घरीं आल्यावर ती आपल्या खोलींत आली. आंत शिरतांच खोलीचें दार तिनें लोटून घेतलें व कपडे बदलण्यासाठीं ती कपाटासमोरच्या पांच फुटी आरशासमोर उभी राहिली--

आरशांत मंद स्मित करीत उभ्या असलेल्या बेबीवर खऱ्या बेबीचा विश्वास बसतां बसेना ! हें आपलें प्रतिबिंब काय, या शंकेनें तिनें हातानें खाणाखुणा करून पाहिल्या व स्वतःशींच ती हसली. दर्पणांतील तिच्या प्रतिकृतीनेंहि आपल्या मोत्यासारख्या शुभ्र दंतपंक्तींची हालचाल केली. आतां मात्र खऱ्या बेबीचा आरशांतल्या बेबीवर विश्वास बसला. आरशांतील आपल्या प्रतिबिंबाकडे पाहतां पाहतां बेबीनें एकदम आपली मान हलविली. लख्खकन् तिच्या मनाच्या आकाशांत कांहींसें चमकलें व त्याच क्षणीं दुपारीं ताईच्या कपाटांत आढळलेल्या गुलाबी कोड्याचें गुलाबी उत्तर तिला सांपडलें साऱ्याचाच उलगडा आतां तिला झाला होता. सगळें कांहीं आतां तिच्या नीटपणें ध्यानांत आलें होतें. आणि हें सर्व समजलें. तशी तिला पहांटें स्वप्नांत दिसलेल्या त्या राजपुत्राची आठवण झाली. त्याच्या आठवणीनें तिचे पाय भुईला खिळल्यासारखे झाले. डोळ्यांतील लज्जेच्या ज्योती थरथरल्या व ओठांच्या पाकळ्या विलग होऊन त्यांतून एकच एक अस्फुट शब्द बाहेर निसटला--' इश्श ! '

--आणि हें सारें साहाजिकच होतें ! कारण यापूर्वीं जरी बेबी कितीदां तरी साडी नेसली असली तरी त्या साडीला पदर मात्र आजच फुटला होता ना !

० ० ०

## २ .... मात

चर्चगेट स्टेशनवरचा तो तिकिट तपासनीस विशेष रसिक असावा ! एरवीं स्टेशनांत प्रवेश करणाऱ्या साऱ्या प्रवशांचीं तिकिटें अथवा पासेस् प्रत्येकास हटकून मुद्दाम तपासून पाहण्याची वास्तविक जरूरी नव्हती व रोजचा तसा प्रघातहि फार करून नव्हता. तर मग आज तो साऱ्या प्रवाशांची कसून तपासणी करीत होता ती एवढी कशासाठीं ? त्याचें कारण, त्या रेल्वे-नोकराचें वय पाहून व त्याच्या वयाला साजेल अशी त्याची स्त्री-प्रवाशांवरील नजर पाहून कोणालाहि समजण्यासारखें व दिसण्यासारख होतें चर्चगेटहून संध्याकाळची बोरिवली लोकल सुटण्याच्या अगदीं तयारींत असल्यामुळें प्रत्येक उतारूला स्टेशनांत शिरण्याची घाई झाली होती. अशा वेळीं प्रत्येकास त्या मनस्वी कर्तव्यदक्ष तिकिट तपासनिसाचा राग येणें स्वाभाविक होतें. उतारूंच्या रांगेंतील त्या तरुण मुलीसहि हा प्रकार रुचलेला दिसत नव्हता. तिच्या मूळच्याच आरक्त गालांवर गुलाबी वर्णाची प्रसाधनभूषा झालेली होतीच. तशांत आतां रोषामुळें तिचे गाल अगदीं पिकलेल्या टोमॅटोप्रमाणें लालबुंद झाले. आणि त्यांकडेच त्या तिकिट तपासनिसाची कर्तव्यदक्ष नजर किती वेळची लागून राहिली होती. तिचा नंबर लागून रहाटांतून ती आंत शिरते तों त्यानें हातांतला चिमटा वाजविला व रेल्वेंतील नोकरीमुळें पूर्वींपेक्षां फारच घोगरा झालेला आपला स्वर शक्य तितका मृदू करून म्हटलें, ' तिकिट प्लीज ! '

त्या तरुणीनें चर्येवर नापसंती दर्शवीत आपल्या ब्लाउझच्या गळ्यांतून आंत हात घातला. तिच्या या हालचालीकडे तिकिट तपासनिसाचें लक्ष होतेंच. त्याला तो प्रसंग काव्यमय वाटला असावा, कारण तिनें पास काढण्यासाठीं गळ्यांतून हात खुपसला तर त्यानें आपली मनःस्थिती लपविण्यासाठीं पांढऱ्या कोटाच्या खिशांत आपला काळसर हात खुपसला. डाव्या हातांतील आपला बटवा नाचवीत पकडलेला पास त्याच्या तोंडासमोर धरला. त्यावरची ' कलावती एस्. मेहता ' हीं अक्षरें तो धड वाचतोय तोंच तों तरुणी मानेला व पर्सला झटका देत स्टेशनांत शिरली व शिटी देणाऱ्या बोरिवली लोकलकडे धांवली. नाइलानें मग त्या तिकिट तपासनिसानें दुसऱ्या उतारूच्या तोंडासमोर हातांतला चिमटा वाजविला व तें कंटाळवाणें काम कर्तव्यदक्षपणें पूर्ववत् सुरू केलें.

कलावती जेमतेम ' लेडीज फर्स्ट ' पर्यंत आली अन् गाडी सुटली. पण सहज लीलेनें तिनें डब्यांत उडी मारली व कपाळावरील आलेला घाम आपल्या चतकोर हातरुलानें टिपला.

चालती गाडी पकडली असल्यामुळें तिच्या उरोभागाचें स्पंदन जोरानें होत होतें. म्हणून आपला डावा पंजा तिनें छातीवर घट्ट दाबून धरला व कोठें बसावें हें पहाण्यासाठीं सोइस्करपणें सर्वत्र दृष्टिक्षेप टाकला.

डाव्या उजव्या अंगाला खिडकीपाशीं एक महाराष्ट्रीय तरुण मुलगी बसलेली तिला दिसली व मग तिच्याच शेजारीं बसणें कलावतीनें पसंत केलें. गुजराथी पद्धतीनें नेसलेल्या चंदेरी साडीचा झुळझुळीत पदर तिनें डोईवरून ओढून घेतला व उजव्या हातांतील सुवर्णाचीं कंकणं डाव्या हाताच्या बोटांनीं फिरवीत तिनें आपल्या सहप्रवासिनीकडे एकवार पाहिलें. त्या महाराष्ट्रीय तरुण मुलीनें चौकडीची रेशमी साडी परिधान केली होती व रुंद गळ्याच्या व कोपरापर्यंतच्या बाह्यांचा आसमानी रंगाचा भारीपैकीं ब्लाऊझ चढविला होता. ती मुलगी दिसायलाहि गोरीपान व सतेज मुद्रेची असून तिच्या डोळ्यांत तिची बुद्धिमत्ता अजमावतां येत होती. ब्लाऊज घट्ट बसल्यामुळें कदाचित् असेल, पण पुन्हां पुन्हां आपल्या सडपातळ नाजुक बोटांनीं ती आपल्या उजव्या वक्षभागावरील पदर सावरीत होती. तिची ती हालचाल कलावतीला फारच आकर्षक वाटली. क्षणार्ध ती त्याकडे टक लावून बघत

बसली व मग तिच्या बाजूला आणखी सरकून तिनें आपल्या हातांतील मखमली बटवा त्या मुलीच्या पर्सपाशीं ठेवला.

फर्लांग दीड फर्लांग अंतरावर असलेल्या स्टेशनांवर गाडी मिनिट अर्ध मिनिट थबकत होती. जुनी गर्दी टाकून व नवीन गर्दी उदरांत सांठवून कर्कश भोंगा देत आखीव रुळांच्या चकचकीत रेषांवरून वेगानें सरकत होती. ग्रँटरोड मागें टाकून गाडी पुढें निघाली तरीसुद्धां कलावती एस. मेहताची खिडकीजवळची महाराष्ट्रीय मैत्रीण अजून खिडकीबाहेरच पहात होती. तिचें लक्ष आपणाकडे कितपत आहे हें पहाण्यासाठीं मिस् मेहतानें आपला डावा हात तिच्या पाठीमागच्या बाकावरील पट्टींतून थेट खिडकीच्या गजापर्यंत नेला व गज घट्ट पकडून आपल्या कवेंत घेतल्यासारखी ती तिला अगदीं चिकटून बसली. तिच्या वेणींतील सोनचाफ्याच्या फुलांच्या सुवासानें असेल अथवा सुवर्णाहून पिवळ्या वर्णाच्या तरण्याताठ्या शरीरसौरभामुळें असेल, कलावतीचें मन अगदीं मोहरून गेलें. हिला चांगली कुशींत घेऊन कुस्करावी अशी विलक्षण प्रबळ इच्छा कलावतीच्या मनांत उद्भवली.

पण तसें तिनें केलें नाहीं! उलट तिच्यापासून ती दूर सरकली. गजावरचा हात तिनें सोडवून घेतला व तोंडानें जांभई देत चुटकी वाजवून ती दूर होते तोंच दादर स्टेशन आलें.

'तुम्हांला येथेंच उतरायचंय् ना?' कलावतीनें आपल्या मैत्रिणीला विचारलें. तिच्या प्रश्नानें त्या मुलीची तंद्री मोडली वाटत! कारण एकदम भानावर येऊन तिनें डब्याबाहेर पडणाऱ्या बायकांच्या गर्दीकडे व मग कलावतीकडे पाहिलें व हंसून म्हटलें, 'नाहीं बाई! गोरेगांवपर्यंत तुमच्याबरोबर मी प्रवास करीन म्हणतें.'

'सॉरी! पण मी खारपर्यंत अपली सोबत करूं शकतें' असें म्हणून कलावतीनें मान फिरवली व मग बोरिवली लोकलहि भोंगा वाजवून पुढें निघाली.

माहीमनंतर त्या महाराष्ट्रीय मुलीची फिरून तंद्री लागल्याचें दिसलें. कारण तिनें पुन्हां पूर्वींचीच पोझ घेऊन खिडकीबाहेरल्या निसर्गसौंदर्याचें मनःपूत पान करण्यास सुरुवात केली. खारपर्यंत गाडी दुडदुड करीत आली तरी आपली ती कवि प्रकृतीची मुलगी बाह्य जगांतच मशगुल होऊन गेलेली

होती. गाडींतलें जग जणूं तिचें नव्हतेंच. कलावती जणूं तिच्या शेजारीं बसली नव्हतीच !

परंतु कलावतीला आतां उतरायचें होतें. एकवार तिनें आपल्या मैत्रिणीकडे चोरट्या नजरेनें पण लक्षपूर्वक पाहिलें व मग लगवगीनें बाजूची पर्स उचलून ती दाराच्या दिशेनें निघाली.

बारीकसा धसका देऊन गाडी फलाटाला लागली. तशी त्या महाराष्ट्रीय मुलीनें आपली कृपादृष्टी आपल्या शेजारीं वळवली अन् पहाते तों मघाची तिची मैत्रिण आपल्या स्वतःच्या पर्सऐवजीं तिचीच पर्स घेऊन नुकतीच गाडींतून उतरली होती. ' अहो, अहो बाई, माझी पिशवी नेली कीं तुम्ही ! ' असें म्हणत ती तरुणी दाराशीं धांवली तोंच विशेष कांहींच घडलें नव्हतें अशा बेफिकीरपणें ' बोरीवली स्लो ' खार सोडून पुढें धांवूं लागली. त्या मुलीनें खार स्थानकाचें मागें पळणारें फलाट न्याहाळलें ती मुलगी चर्चगेटकडे जाणाऱ्या गाडींत चपळाईनें चढत होती. त्या मुलीच्या सारा प्रकार आतां कुठें लक्षांत आला. म्हणजे तिच्या त्या सहप्रवासिनीनें तिची पर्स चोरली होती म्हणायची ! गाडींतील लाल साखळी ओढण्याचा विचार त्या मुलीला सुचला पण धाड धाड् करीत गाडी आतां सुसाट गतीनें धडधडत धांवत होती. एक निःश्वास टाकून तीं मुलगी परतली व आपल्या जागेवरची त्या गुजराथी मुलीची मखमली पिशवी तपासून पाहूं लागली. त्या आठ आणे किंमतीच्या बनावट बटव्याचें तोंड उघडून तिनें पाहिलें. आंत कागदाचा साधा कपटाहि नव्हता.

माटुंगा रोड स्थानकाच्या फलटावर गाडी विसावली आणि लेडीज फर्स्टमधून कलावती एस् मेहता. सावकाशीनें खालीं उतरली. इकडे तिकडे कुठेंहि न बघतां ती स्टेशनबाहेर पडली व स्टेशनरोडनें वेगानें पावलें टाकूं लागली. बरेंच चालून गेल्यावर ती झपाट्यानें उजव्या बाजूच्या गल्लींत शिरली. कसलासा घाण दर्प साऱ्या गल्लींत भरून राहिला होता. नाकावर रुमाल धरीत कलावती ती गल्ली पार करून दक्षिण दिशेनें पुढें निघाली. मग पुन्हां उजव्या गल्लींत शिरून डाव्या बोळंकडींत आली. तेथेंच कोपऱ्यावर एक कळकट काळया रंगाची मोडकळीस आलेली लाकडी इमारत होती. दोन जिनें चढून कलावती वर आली. अगदीं टोकाकडच्या खोलींतील गोदरेज कुलुपाला

आपल्याजवळची किल्ली चालवून तिनें तें कडींतून दूर केलें व आंत शिरतांच दार घट्ट बंद करून घेतलें !

एका खणाची ती खोली दर्शनी कितीहि जुनाट दिसली तरी आंतून व्यवस्थित सजविलेली होती. उजव्या अंगाला लोखंडी कॉट असून वर शुभ्र बिछायत अंथरली होती. कलावतीनें दार बंद करून घेतल्यावर हातांतील पर्स कोपऱ्यांत भिरकावली व टेबलावरील गोल्डफ्लेकचें पाकीट उघडून मजेनें धूम्रपान करण्यास सुरुवात केली. धुराचा एक दीर्घ झुरका मारल्यावर तिचा सारा थकवा कुठल्या कुठें उडाला. कॉटवर धाड्कन अंग ढकलून देत तिनें एक लोळण घेतली व मग स्वतःशीच हंसत म्हटलें, ' बहोत अच्छा, राजू ! आज तो तुमने कमाल कीं ! '

आणि राजूनें खरोखरीच कमाल केली होती. गुजराथी तरुणीचें त्याचें सोंग किती बेमालूम वठलें होतें ! महाराष्ट्रीय मुली मोठ्या हुशार म्हणवतात, चिकित्सक समजतात पण आज तर तिच्याहि डोळ्यांत राजूनें धूळ फेकली ! मघांचा सारा प्रसंस त्याला डोळे मिटल्यावर एकाद्या चित्रपटासारखा दिसूं लागला. त्यानें आज खरोखरीच अप्रतिम कौशल्यानें त्या मुलीची पर्स हस्तगत केली होती. सफाईनें पाकीट उडविण्याची राजूची ती कांहीं पहिली वेळ नव्हती. त्याची ती कला होती आणि व्यवसायहि होता. त्याच्या उपजीविकेचें तें एकमेव साधन होतें.

सर्वस्वीं निराधार होऊन तीन वर्षांपूर्वी राजू मुंबईस आला होता. कोणीसें त्याला सांगितलें होतें कीं, मुंबईला ' एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज ' या नांवाची नोकऱ्या वाटणारी एक धर्मार्थ संस्था आहे म्हणून ! अनेक हेलपाटे मारून तो या संस्थेचा सभासद झाला, पण दोन वर्षांत ना नोकरी ना चाकरी. राजू दोन वर्षे मुम्बईत वणवण हिंडला. किरकोळ अंगमेहनतीचीं कामें करून चण्याफुटाण्यांवर जगला. वाळला. अन् एके दिवशीं असाच कंटाळून दमून तो गाडींतून प्रवास करीत असतां त्याचा खिसा कापला गेला व एकुलत्या एक रुपयाच्या नोटीला त्याला मुकावें लागलें. त्या रात्रीं तो उपाशीच निजला. सकाळीं पोलिसानें हटकल्यावर फुटपाथवरून उठला. भुकेमुळें खपाटीस गेलेलें त्याचें पोट आंतून सारखें ढवळत होतें. जड झालेलीं

पावलें टाकीत तो असाच गर्दींतून चालला होता. एक ऐटबाज तरुणहि त्याच्या शेजारून चालला होता सिगारेटचं पाकीट काढण्यासाठीं त्या तरुणानें पँटच्या खिशांत हात घातला. पाकीट काढतांना त्याचें पैशाचें तपकिरी रंगाचें पाकीट किंचित् बाहेर डोकावलें.राजूच्या भुकेल्या नजरेला त्या पाकिटानें कसलीशी खूण केली. एकुलती एक सिगारेट तोंडांत अडकवून त्या तरुणानें रिकामें खोकडें दूर झुगारून दिलें व मग सिगारेट शिलगावून धुराचा लोट अंतराळांत सोडून त्या तरुणानें पाऊल उचललें !

पण त्याच वेळीं राजूच्या हातांनीं आपलें काम बजावलें. त्या तरुणाचें तें जाडजूड पाकीट खिशांत सरकावून राजू गर्दींत घुसला व मग पहातां-पहातां नाहींसा झाला.

त्या दिवसापासून राजूनें हाच बिनभांडवली धंदा सुरू केला. दोन दिवसांत त्यानें चार कुळें गांठून आठशें रुपयांची रक्कम उभी केली. आपल्या अंगांतील या कौशल्याचा हा अजब चमत्कार पाहून स्वत: राजूहि दिपून गेला.

गेल्या दोन वर्षांत राजूचा उत्तमच जम बसला होता. महा खटपटीनें त्याला गेल्याच महिन्यांत माटुंगा रोडला ही खोली मिळाली होती. अकरा रुपयांच्या भाड्याची ही खोली त्याला इतकी उपयुक्त ठरली कीं तिच्या पायगुणानें त्याला एकदांहि बिनभाड्याच्या खोलींत जाण्याची आपत्ती आली नाहीं.

अंगापिंडानें नाजुक पण गौरवर्णाचा असल्यानें राजू स्त्रीपार्ट उत्तम करी. मिस् कलावती एस. मेहता या खोट्या नांवाचा चर्चगेट ते विरार-पर्यंतचा फर्स्ट क्लासचा पास राजूनें नुकताच काढला होता. त्याच पासावर त्याला आजचा बोनस मिळाला होता !

त्या पर्सची आठवण होतांच पलंगावरून राजू चटकन् उठला. आरशा-समोर उभें राहून त्यानें आपला स्त्रीवेष उतरविला. कोपऱ्यांतील मोरीवर जाऊन तोंड स्वच्छ धुतलें. आपले नेहमीचे साध शुभ्र कपडे परिधान केल्या-वर त्याला हलकें फुलकें वाटलें. 'बाबूजी संभालके–' ही कवाली शिटीवर म्हणत तो खोलीतल्या पलिकडल्या बाजूला गेला. कापडी पडदा सोडून बन-विलेले तें त्याचें स्वयंपाकघर होतें. स्टो पेटवून त्यानें उत्तम चहा बनविला.

मनसोक्त चहापान झाल्यावर तो पुन्हां बाहेरच्या बाजूस आला व कांहीं वेळापूर्वीं कोपऱ्यांत भिरकावलेली पर्स उचलून घेऊन टेबलासमोरच्या खुर्चीवर बसला.

बटव्याच्या गळ्याभोंवतालचा नाजुक रेशमी गोफ सरकवतांच साऱ्या बाजूनीं बटव्याकें तोंड उघडलें गेलें. राजूनें आंत पाहिलें. तऱ्हेतऱ्हेच्या वस्तूंचें आंत संमेलन भरलेलें होतें. जादूगारानें पोतडींतून एक एक वस्तू काढावी त्याप्रमाणें तो एक एक जिन्नस बटव्यांतून काढूं लागला व क्षणभर डोळ्यांसमोर निरखून पाहिल्यावर हंसून टेबलावर ठेवूं लागला. आजच्या कमाईचा त्याला विशेष आनंद वाटत होता. कारण आज केवळ हातचलाखीवर त्याला आपलें काम उरकतां आलें होतें. तसें पाहिलं तर आजसुद्धां तो मोहिमेवर सशस्त्रच गेला होता. पितळेच्या छोट्या पट्टींत बेमालुम दडविलेलें 'ब्लू जिलेट 'चें अति तीक्ष्ण पातें हेंच तें त्याचें एकमेव हत्यार. चार खिसे अथवा पर्स उडविल्यावर तो खबरदारीनें नवीन पातें वापरीत असे. दोनदां एका अंगानें व दोनदां दुसऱ्या अंगानें काम दिल्यावर त्या तीक्ष्ण शस्त्राला फिरून काम नसे. पण आज तर त्याला शस्त्रक्रिया करण्याची वेळच आली नाहीं. पर्सची नुसती अदलाबदल करून तो यशस्वी झाला होता. आपली आठ आण किंमतीची रिकामी बनावट पिशवी ठेवून त्यानें त्याचे मोबदल्यांत ही पिशवी आणली होती. त्याला अरेबियन नाइटस्‌मधील एका गोष्टीची आठवण झाली... तेथें कोणी एक जुने दिवे घेऊन त्यांच्या मोबदल्यांत नवीन दिवे देत असे म्हणे; येथें तर आपण हलक्या पिशव्या देऊन जड जड पिशव्या त्या मोबदल्यांत आणीत आहोंत...

आपल्या या कल्पनेवर खूष होऊन राजू हंसला व बटव्यांत हात घालून त्यानें पैशाचें पाकीट बाहेर काढलें. चर्चगेट ते अंधेरी या फर्स्टक्लासच्या पासावर त्या मुलीचें नांव होतें— अलका एच. डोके ! छे बुवा ! ती मुलगी आणि तिचें नांव किती गोड आहे. पण आडनांव ? तिचें हें असें आडनांव ठेवणारा पुराणपुरुष अगदीं बिनडोक असावा. त्या मुलीच्या सन्निकट स्पर्शाची त्याला आठवण झाली. अलिकडे मुलींच्या बाबतींत असलें काम उरकतांना आपलें चित्त स्थिर रहात नाहीं ही गोष्ट आज पुन्हां त्याच्या प्रत्ययास आली होती. पण आज तरी तिच्या सहवासांत तो बावचळला

नव्हता. तिच्या रूपसंपत्तीपेक्षां धनसंपत्तीचेंच अधिक आकर्षण त्याला आज वाटलें होतें व तेंच योग्य होतें !

त्यानें पाकिट खोललें. आज एकतीस तारीख होती तरी पाकिटांत शंभराची एक व पांचाच्या सहा नोटा होत्या. इतरहि किरकोळ रक्कम होती. एकशेंतिसाचा तो ऐवज पहातांच राजू हबकूनच गेला. पगाराचा दिवस उद्यांचा होता. त्याचा तो उपयोगहि चोख करणार होता. पण आज एवढे पसे त्या पोरीकडे कोठून आले ? ती मुलगी एखाद्या बॅकेंत तर नोकरीला नव्हती ? म्हणून आज एकतीसलाच पगार घेऊन जात होती ? 'मंथ-एंड'ला अशी अवाढव्य रक्कम त्याला कधींच गवसली नव्हती. इतर सज्जनांच्या बाबतींत महिनाअखेरीस जी परिस्थिती असे तीच त्याच्याहि मिळकतीच्या बाबतींत होती. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहांत हस्तगत केलेल्या पाकिटातून दोनचार रुपयांचा खुर्दा निघतां निघतां मारामार आणि आज तर ही पोरगी त्याच्या यशावर एकशेंतीस रुपयांचा मंदील बांधीत होती !

राजूनें त्या नोटा टेबलावर पसरल्या व डोळे विस्फारून त्यांच्याकडे तो बघत बसला. हळू हळू एक निराळाच विचार चोरपावलानें त्याच्या चित्ताच्या कोपऱ्यांत येऊन उभा राहिला. व त्याच्या एकंदर भावनांना भलतीच दिशा दाखवूं लागला. त्या निष्पाप अल्लड बालिकेच्या कष्टाचें तें पारितोषिक त्याच्यासमोर होतें ! तें असें हिरावून घेण्याचा आपल्याला काय बरें अधिकार ? हें धन घेऊन आपण त्या अश्राप मुलीच्या शिव्याशापांचे धनी होणार त्याचें काय ? या विचारतरंगांनीं त्याच्या अंतःकरणांत पश्चात्तापाचीं वादळें उठवलीं. आपण त्यांत अडकणार असें राजूला वाटलें पण त्याच क्षणीं त्यानें स्वतःला सावरलें. केसांच्या मऊ मऊ झुलपांत त्यानें आपलीं बोटें खुपसलीं व खसखसा डोकें खाजवलें. तो भलताच विचार त्यानें घाईनें मनावेगळा केला. दया व प्रामाणिकपणा या गोष्टी आपल्या धंद्याचे पाय मागें ओढणाऱ्या व आपल्याला गोत्यांत आणणाऱ्या आहेत हें त्याला समजत होतें. आपल्या विरघळलेल्या मनाचा कांटा त्यानें पुन्हां शंभर अंशावर आणून ठेवला. होय! इतकें मन घट्ट केल्याखेरीज त्याला आपला व्यवसाय चालवितां येणार नव्हता. ती मुलगी थोडीच त्याचा पोटाचा प्रश्न सोडविणार होती ?

सराईतपणें त्यानें नोटा काळजीपूर्वक पुन्हां पाकिटांत ठेवल्या. पाकिटांत आणखी कांहींच नव्हतें. त्या बटव्यांतहि कांहींच राहिलें नसणार या समजुतीनें त्यानें तो उलटा करून झटकला अन् त्याच वेळीं त्या बटव्याच्या तळाशीं लपून बसलेली एक चुरगळलेली कागदाची घडी टप्कन् टेबलावर पडली. उत्सुकतेनें राजूनें तें पत्र उलगडलें व घाईघाईनें तो पत्रांतील मजकुरावरून नजर फिरवूं लागला. त्या पत्रांत लिहिलें होतें--

'प्रिय अलका,

माझें अचानक मिळणारें पत्र वाचून तुला फार फार आश्चर्य वाटेल परंतु अत्यंत निकडीचें खाजगी काम निघालें म्हणून मुद्दाम तुला लिहीत आहें. तुला पत्र लिहायला म्हणून मीं बसलें आहें खरी. पण या लेखणींतून एक एक शब्द उतरतांना माझ्या हृदयाला ज्या वेदना होत आहेत त्या शब्दांनीं सांगणें केवळ अशक्य आहे. तूं माझी जिवाभावाची मैत्रिण म्हणून तुझ्या माझ्यांत जो अकृत्रिम स्नेह आहे त्याच्याच आधारानें मला तुला एक विनवणी करायची आहे. तशी गोष्ट लिहितांना या क्षणीं माझा हात कांपत आहे, पण अलके, अगदीं नाइलाज म्हणून तुझ्यापाशीं ही मागणी करायची !

तुझ्याकडून दोन दिवसांत मला शंभर रुपये मिळायला हवेत ! इकडे आमच्या वेणगांवला माझी आई तापानें अगदीं हल्लक होऊन पडली आहे. या खेडेगांवात धड डॉक्टरसुद्धां नाहीं. पण कर्जतचे एक डॉक्टर मी काल मुद्दाम बोलावून आणले व त्यांचें औषध सुरू केलें. त्यांनीं कांहीं इंजेक्शनें लिहून दिलीं आहेत आणि तीं दिलीं तरच आईची कांहीं आशा करतां येणार आहे. नाहींतर...! अलके, या जगांत आईशिवाय मला कोणाचाहि आधार नाहीं ही गोष्ट तुला माहीतच आहे. दुर्दैवानें एवढे पैसे खर्चण्याचीसुद्धां आमच्यांत ताकद नाहीं. तूं नि मी लहानपणापासून बरोबर वाढलों, खेळलों, लहानाच्या मोठ्या झालों. दोन वर्षांपूर्वीं आपण बरोबरच मॅट्रिक पास झालों. तुला महाराष्ट्र बँकेत नोकरी मिळाली त्याचबरोबर तुझें कॉलेजचें शिक्षणहि सुरू झालें. मला मात्र आईच्या दुखण्यामुळें गेल्या वर्षभरांत माझें गांव सोडून कांहीं करतां आलें नाहीं. पण उद्यां माझी आई बरी होईल व मग मीहि नोकरी मिळवून तुझ्या जोडीनें कॉलेजांत येईन. पण अलकाताई, या साऱ्या काल्पनिक गोष्टी ! या क्षणीं मात्र जें सत्य आहे तें कल्पनेहून भयंकर

आहे परंतु त्याला तोंड दिलेंच पाहिजे अन् म्हणूनच असली लाजिरवाणीं विनंती मला करावी लागत आहे. दुःखांत सुख इतकेंच कीं ही विनंति मीं तुला, एखाद्या सख्ख्या, पाठच्या बहिणीहून प्रिय असलेल्या माझ्या अलकेपाशीं करीत आहें. जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुझं ऋण फेडल्यावांचून मी रहाणार नाहीं. यापेक्षां जास्त काय सांगूं ! हातीं पैसे आल्यावर तत्काळ मदत कर. माझा शब्द खालीं पडणार नाहीं अशीं आशा बाळगणारी—

—तुझीच, शांता.'

राजूनें पत्र वाचलें. पुन्हां वाचलें. व पुन्हां एकदां वाचलें. हें तो काय वाचत होता ? कांहीं घटकांपूर्वीं त्यानें कोणाची चोरी केली होती ? त्याचे परिणाम तरी काय होणार होते ? आणि या साऱ्या आपत्तीला जबाबदार कोण रहाणार होतें ? राजू ? होय ! त्याच्याशिवाय दुसरें कोण जबाबदार होतें ? अलकेची पर्स त्यानें चोरली नसती तर तिनें शांताला खचित मदत केली असती. अजूनसुद्धां कदाचित् ती मदत करील, पण त्याचें काय सांगावें? तिच्यापाशीं पैसे तर हवेत. आडापाशीं पाणी असेल तर पोहरे भरून तो देणार ! छे ! छे ! पैशांच्या अभावीं शांताची आई दगावली तर तिच्या मृत्यूचा कलंक आपल्याच या हातांना लागणार आहे ! तरीच ती पोरगी चर्चगेटपासून खिडकीबाहेर पहात बसली होती. आपल्या प्रिय मैत्रिणीविषयीं तर ती विचार करीत नव्हती ना ?

आतां काळोख पसरूं लागला होता. त्या काळोखाच्या पार्श्वभूमीवर हे असले दुःखमय विचार राजूच्या मनांत हिंदकळूं लागले तशी त्याच्या पोटांत ढवळून आलें. जेवायची वेळ होऊन गेली तरी त्याला कांहीं जेवणाची वांछा उरली नव्हती. तांब्याभर पाणी पोटांत ढकलून तो दिवा न लावतां तसाच काळोखांत कॉटवर आडवा झाला !

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळचे सुमारास एक गुजराती तरुण मुलगी चर्चगेटचे बाहेरचे बाजूस कोणाची तरी वाट बघत उभी होती. ५-५० चीं बोरिवली स्लो निघायला अजून अवकाश होता तरीं साडेपांच वाजल्यापासून गेटपाशीं चुळबुळ करीत उभ्या असलेल्या कलावती एस. मेहताला कालच्या रसिक तिकिट तपासनिसानें ओळखलें. 'माझी आपणाला कांहीं मदत होऊं

शकेल का ?' असें विचारण्याचें त्या तिकिट तपासनिसाच्या फार मनांत होतें दोनदां तसें विचारण्यासाठीं त्यानें खाकरण्याची नांदी करून पाहिली होती. परंतु तिच्या गंभीर, विचारशील चर्येकडे पाहिल्यावर आपलें नाटक सुरू होण्यापूर्वीच तें पडेल याबद्दल त्याची खात्री पटली होती, मख्खपणें तिच्य कडे पहात तो कर्तव्यदक्ष प्राणी एकीकडे आपलें काम करीतच होता.

घड्याळाचा लांब हात आतां वर चढूं लागला होता. पांच वाजून पंचेचाळीस मिनिटांनीं कलावती जिची वाट पहात होती ती व्यक्ति दुरून येतांना दिसली. अलकेला पहातांच ती तिच्या दिशेनं धावली व जवळ जात म्हणाली 'Excuse me, dear काल चुकून तुझा बटवा मी घेऊन गेलें. अदलाबदल झाली घाईंत. पण हरकत नाहीं. मीं आज आणलाय् तो, बघ, नीट बघून घे !'

अलकेनें तो बटवा घेतला तशी आनंदानें तिच्या सुंदर दंतपक्ती हालल्या. 'बरं झालं बाई. कालच माझा पगार झाला होता. पैशाचीहि मला फार जरूर होती. थँक्स् हं !'

'No mention please. माझं कर्तव्यच मी केलं. तुमचं कर्तव्य तुम्हीं करा. कलावतीनें सूचक शब्दांत तिला शांताची आठवण करून दिली.

पण यावर एकदम आठवल्यासारखें करून अलका म्हणाली, 'अरेच्या! विसरलेंच कीं मी. ही तुमची पर्स परत करायची आहे मला. कर्तव्याची बरी आठवण करून दिलीत !'

'अच्छा ! थँक्यू !' असें म्हणून कलावतीनें घाईनें आपला बटवा तिच्या हातून घेतला व ती लोखंडी रहाटांतून आंत शिरली. हा प्रकार आऽवासून पहाणाऱ्या त्या तिकिट तपासनिसानें चिमटा वाजविला व उगाच अघळपघळ हंसून 'तिकिट प्लीज ?' म्हटलं.

'नॉन्सेन्स !' असें म्हणून कलावती तशीच पुढें सरकली. त्या कोडग्या रेल्वे नोकराचा तिला अनोनात संताप आला होता, 'बोरिवली स्लो' सुरू झाली तरीसुद्धां कलावतीचें डोकें शांत झालें नव्हतें !

माटुंगा रोडला उतरून कलावती तिच्या विन्हाडीं आली व राजू बनली. एक मोठें कर्तव्य केल्याचा आनंद त्याला झाला होता. अलकेचें पाकीट त्यानें जसेंच्या तसें परत केलें होतें. वास्तविक तसें करतांना त्यानें मोठाच

धोका पत्करला होता. वेळ भरली असती तर कदाचित् त्याच्या हातांत हातकड्या पकडल्या असत्या. चर्चगेट स्टेशनावरील त्या तिकीट मास्तराची ती नजर त्याला आठवत होती व पुन्हां पुन्हां त्या माणसाचा त्याला राग येत होता.

वेष पालटल्यावर राजूनें मघां टेबलावर ठेवलेला तो बटवा उचलला व रागानें कोपऱ्यांत भिरकावून दिला. कोपऱ्यांत पडतां पडतां त्या बटव्याचा गोफ सुटला. एक कागदाचा बोळा त्याच्या तोंडांतून बाहेर फेकला गेला.

विस्मयानें राजूनें तो बोळा उलगडला. आंत त्यालाच उद्देशून लिहिलें होतें--

'पर्स परत आणून दिल्याबद्दल आभारी आहें. माझ्या साध्या युक्तीला तूं बळी पडलीस याबद्दल मात्र मला तुझी कींव वाटते. शांता नांवाची माझीं कोणीहि मैत्रीण अस्तित्वांत नाहीं. तें सारें पत्र बनावट होतें. तुला फसवण्याचा सांपळा होता. तूं त्यांत अडकलीस व माझे सारे पैसे आपणहून परत आणून दिलेस. तूं असें करशील याबद्दल माझी खात्रीच आहे. म्हणून ही चिठ्ठी बटव्यांत लिहून ठेवीत आहें.

नोकरीला लागल्यापासून माझ्या पर्समध्यें पैसे असत व त्यांची काळजी घेण्यासाठीं मी सतत दक्ष असें. तरीसुद्धां कोणीहि पर्स लांबवली तरी ती परत मिळविण्यासाठीं त्या चोराच्या सदसद्‌विवेक बुद्धीला स्पर्श करून जागे करण्याची व जमल्यास माझी पर्स परत हस्तगत करण्याची हीं युक्ति मीं योजून ठेवली होती. ती इतकी यशस्वी होईल याची मात्र खात्री नव्हती. पण काल एका मुलीनें माझी पर्स लांबवल्याचें माझ्या लक्षांत आलें तेव्हांच माझ्या युक्तीला तूं बळी पडशील याची मला खात्री पटली. असो. जगांत शेराला सव्वाशेर भेटतो, इतका धडा जरी तूं या प्रसंगानें शिकलीस तरी पुष्कळ झालें ! कळावें. लो. अ. ही. वि.

--तुझी, अलका डोके.'

कपाळाला हात लावायची वेळ आतां मात्र राजूवर आली. त्याच्यावर अशा प्रकारची कुरघोडी कोणीं केलीं नव्हती. त्या पोरीच्या कौशल्यानें तो थक्क होऊन गेला. काल त्याला त्या मुलीचें आडनांव विसंगत वाटतें होतें. पण तिनें

जी त्याच्यावर कडी केली होती त्यामुळें तिच्या आडनांवाचीं कांहींशीं संगतीं त्याला लागली होती. तिचें पत्र त्यानें व्यवस्थितपणें ठेबलाच्या खणांत ठेवलें. आपला पराभव त्यानें मान्य केला होता. त्यांतल्या त्यांत त्याला एका गोष्टीचा आनंद वाटत होता---त्या डोकेबाज पोरींला मिस्. कलावती एस्. मेहताचें खरें स्वरूप कळलें नव्हतें. आणि हा आनंद कांहीं थोडा नव्हता.

० ० ०

अनुक्रम ३००७४
विभाग ......
क्रमांक २२९१
नों. दि.

## ३ .... भागी

मध्यान्ह उलटून रणरणतीं उन्हें उतरूं लागलीं तरी वरसईकरांच्या त्या चौसोपी दगडी वाड्यांतले भांडणाचे आवाज सारखे चढत राहिले. आबा वरसईकर वारल्याला पुरता महिनाहि उलटला नव्हता, परंतु एवढ्यांतच त्यांच्या मुलांनीं घरादाराची व शेतीवाडीची वांटणी करण्यासाठीं जीव पांखडले होते. बापाला मसणवटींत पोहचवून शिदूकाका व दिगूकाका परत घरीं आले मात्र, त्या क्षणापासून आपल्या वडिलोपार्जित इस्टेटीवर दोघेहि हक्काची भाषा बोलूं लागले. आबांच्या मृत्यूनंतर पहिले कांहीं दिवस त्या दोघांमधील झगड्यांचें स्वरूप सौम्य होतें पण दिवसगत होऊं लागली तसे कुरबुरीचें रूपांतर धुसफुशींत, धुसफुशीचें भांडणांत व भांडणाचें हमरातुमरीवर जाऊन अखेर खडाजंगींत त्याचें पर्यवसान होण्यास आवकाश लागला नाहीं...

आबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांनीं अशा प्रकारें भांडावें याबद्दल सारा गांव अचंबा करीत राहिला होता. आबा जिवंत होते तेव्हां हे दोघे पाठचे भाऊ केवढ्या गुण्यागोविंदानें नांदत होते ! 'शिदू व दिगू म्हणजे राम-लक्ष्मणाची जोडी आहे,' असें सारा गांव गौरवून म्हणत होता. अन् तें म्हणणें सार्थहि होतें. एक पंक्तीस असल्याशिवाय दुसरा पाटावर बसून घांस तोंडांत टाकीत नसे. सदैव हे दोघे बंधु बरोबरच हिंडायचे, साथीनेंच काम करायचे. आबांचें भातशेतीचें उत्पन्न अमाप होतें. दारीं दहाबारा दुभतीं

जनावरें, पांचसहा बैलगाड्या व पंचवीस एक गडीमाणासांचा रावता अहोरात्र असे. वडगांवचे आबा वरसईकर आजूबाजूच्या पन्नास खेड्यांत महशूर होते, पण त्याहिपेक्षां नांवाजली जात होतीं त्याचीं हीं दोन मुलें. याचें कारण म्हणजे आबांप्रमाणें त्यांचीं मुलें मनानें कद्रु नव्हतीं हें एक व दुसरें म्हणजे त्या दोन भावांत परस्परांमध्यें नांदणारें अजोड सख्य. शिदूशिवाय दिगूचें नांव घेणें वा दिगूशिवाय शिदूचा उल्लेख करणें ही गोष्ट केवळ अशक्य होती !

तसें या दोघा भावांत वयाचें अंतर केवळ दहापांच क्षणांचें होतें. शिदू व दिगू हे होते जुळे भाऊ. शिदूला दिगूचा थोरला भाऊ म्हणायचें हें आपलें उगीच. अगदीं त्याच्या पाठीवर पाय लावूनच दिगूचाहि तावडतोब जन्म, झाला होता. परंतु जन्मापासून या दोन भावांत जें अभूतपूर्व प्रेम निर्माण झालें ते दिनप्रतिदिन सारखें वाढूं लागलें. या दोघांच्या वयाच्या अठराव्या वर्षीच आबांनीं त्यांना एकदमच बोहोल्यावर उभें केलें व त्या दोघांचे पहातां पहातां चाराचे आठ हात झाले.

आतां लग्नानंतर या दोन भावांनीं, कमींत कमी त्यांच्या बायकांनीं तरी परस्परांशीं भांडावें कीं नाहीं ? पण या नवीनच एकत्र आलेल्या जावाजावांत्हि जगावेगळी जवळीक निर्माण झाली. या दोन भावांचें प्रथम प्रथम खूप पटलें, तरी लग्नानंतर हळूहळू बिनसणार, या कल्पनेनें आबांनीं आपल्या दोनहि पोरांना एके दिवशीं जवळ बोलावून घेतलें व ते म्हणाले, 'शिदू, दिगू, तुम्हांला एक गोष्ट सांगायची आहे. या घटकेपर्यंत तुम्हीं भाऊ आश्चर्यकारक आपुलकीनें परस्परांशीं वागलांत. तुमच्या नवपरिणीत बायकांत, माझ्या सुनांतहि अकृत्रिम स्नेहाचें नातें जडलेलें दिसतें आहे. परंतु आतां यापुढें तुम्हीं दोघांनीं स्वतंत्रपणें आपापले संसार थाटावे हेंच बरें. या वाड्याखेरीज आपलें दुसरें घर बाजारपेठेंत आहे. दिगू, तूं तेथें आपला संसार थाट. दूर राहिल्यानें जवळीक वाढत असते पोरांनों—'

'पण आबा, आम्हीं दोघे हल्लीं एकत्र रहातों म्हणून आमच्यांत थोडाच दुजाभाव निर्माण झाला आहे ? आम्हांला आई नाहीं. ती असती तर तिलाहि आम्हीं विभक्त होण्याची कल्पना रुचली नसती—'

'नाहीं तर काय ?' दिगूच्या बोलण्याला पाठिंबा देत शिदू उत्तरला. 'आबा, हे भलतेच विचार तुम्हीं मनांत येऊन तरी कसे देतां ? आम्हां दोघांतील सख्य संपून वितुष्ट वाढावें असें तर तुम्हांस वाटत नाहीं !'

शिदूच्या या भाषणावर आबा भयंकर संतापले. एकदम उसळून ते म्हणाले, 'शिद्या, काय भकतोहेस लेका ? देवानें जीभ दिली ती वाटेल तशी वापरण्यासाठीं नव्हे. मी तुमचा बाप आहें, बारा जग्मांचा वैरी नाही. तुम्हीं वेगळें व्हावें, यांतसुद्धां तुमचें भलेंच मी पहात आहें. आपल्या घरांत माणसें फार आहेत. तुमची आजी व आजोबा तर मृत्युशय्येवर पडल्यासारखी अर्धांगानें आजारी आहेत. आत्तांत तुमचे संसार सुरू झाले आहेत. चार दिवस तुमच्या बायका गुण्यागोविंदानें नांदतील, पण भांड्याशेजारीं भांडें ठेवलें कीं त्यांचा नाद होणारच ! त्यापेक्षां घरांतील चार भांडींकुंडीं घेऊन दिगू तूं आपलें स्वतंत्रपणें वेगळ्या घरांत राहवयास जावें हेंच बरें ! तुम्हीं दोघे जन्मांत कधीं परस्परांशीं भांडणार नाहीं हें कबूल. पण उद्यां पोरेंबाळें झाल्यावर तुमच्या बायका बघा घुसपुस करूं लागतील कीं नाहीं–'

परंतु बापाची ही कल्पना मुलांना मुळींच मानवली नाहीं. आपआपल्या बायकांपाशीं प्रत्येकानें आबांची कल्पना सांगितली. तेव्हां नवऱ्यांच्या तोंडावर त्यांनीं सासऱ्याला वेड्यांत काढलें. पुढें एक वर्षाच्या अंतरानें दिगूला व शिदूला कन्यारत्न झालें, पण तरीहि आबांच्या मुलांमध्यें आणि सुनांमध्यें विरोधाच्या एका शब्दाचीहि चुकून कधीं देवघेव झाली नाहीं.

आयुष्याची घडी सरली नि आबा वरसईकरांचें देहावसान झालें आबा गेले तेव्हां शिदू व दिगू कांहीं लहान नव्हते. त्यांच्या मुलीच आतां अनुक्रमें पांच व सहा वर्षांच्या झाल्या होत्या–परंतु बापाच्या मृत्यूचा परिणाम शिदू व दिगूवर जबरदस्त झाला यांत शंका नाहीं. बापाच्या मृत्यूच्या क्षणीं दोघेहि त्याच्याजवळ होते. आबांनीं त्यांना आपल्याजवळ बसवून सांगितलें, 'पोरांनों मी आतां चाललों. आपल्या वाडवडिलापासून माझ्या हातीं आलेलं उत्पन्न मी प्राणापलीकडे जतन केलं. फारसं वाढवलं नाहीं. परंतु गमावलं मात्र अजिबात नाहीं. आपल्या स्थावर जंगम मालमत्तेचीं कागद-पत्रें तुमच्या डोळ्यांपुढून गेलेलीच आहेत. परंतु घरांतील वडिलोपर्जित रोकड, सोनेंनाणें व दागदागिने यांची कल्पना मी कधीं तुम्हांला दिली नव्हती. दिगू

त्या समोरच्या भिंतींतील फडताळांत एक लोखंडी सन्दूक आहे ती काढून घे बघूं--

आबांनीं उशाखालीं हात घालून दिलेल्या चावीनें दिगूनें तें कपाट खोललें व आंतील छोटी पेटी आबांपाशीं आणून ठेवली. मोठ्या कष्टानें आबांनीं आपल्या जानव्याची किल्ली सोडविली व ती दिगूजवळ देत त्यांनीं तिजोरी उघडण्यास मानेनेंच खूण केली.

दुसऱ्याच क्षणीं त्या पोलादी पेटींतील हिऱ्यामोत्यांचें जडजवाहिर व सुवर्णाचे बहुमोल अलंकार शिदूच्या डोळ्यांसमोर चमकूं लागले. कित्येक हजारांचा तो ऐवज पाहिल्यावर त्या दोघांचेहि डोळे विस्फारले. आपल्या बापापाशीं हा खजिना आहे, याचीसुद्धां या क्षणापर्यंत त्या दोघांना कल्पना नव्हती. त्या दोघांच्या लग्नाच्या वेळीं सुनांच्या अंगावर कित्येक तोळ्यांचे दागिने त्यांच्या वडिलांनीं घातले होतेच. त्याशिवाय अजूनहि आपल्या बापापाशीं एवढी चमकती धनदौलत असेल याची त्या दोघांना पुसटशीहि कल्पना नव्हती. विस्फारलेल्या डोळ्यांनीं दोघेहि आपले त्या किमती नगांकडे बघतच राहिले !

'हें सारें मी तुमच्या स्वाधीन करून जात आहें पोरांनों,' आंवढा गिळीत आबा म्हणाले, 'पिढ्यांपिढ्यापासून चालत आलेली ही लक्ष्मी आहे. हिला कधीं हात लावायचा नाहीं. लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं दिवाळींत केवळ एकदांच ही पेटी उघडायची व मनोभावें पूजा केल्यावर तशीच सांभाळून ठेवायची. ही लक्ष्मी जोंवर घरांत आहे तोंवर तुम्हां दोघांना जन्मांत कधीं कशाची ददात पडायची नाहीं. ही किल्ली संभाळा--'

आबांनीं समोर टाकलेल्या त्या छोट्या पितळी किल्लीकडे दोघांहि भावांचा एकदमच हात गेला. अजाणतेपणींच दोघांचेहि हात त्या किल्लीपाशीं परस्परांच्या हातांशीं अचानक भिडले. किल्लीचा कबजा घेण्यासाठीं आपण घाई केली, हें लक्षांत आल्यावर दोघींनीहि मनांत अपराधी भाव चमकले व खजिल होऊन चटकन दोघांच्याहि आपआपले हात मागें घेतले.

क्षणमात्र घडलेली ही हालचाल आबांच्या सरत्या नजरेंतून निसटली नाहीं. त्या अखेरच्या क्षणीं आबांच्या मनानें त्या घटनेचा अर्थ काय लावला कोण जाणे ! परंतु या जगाचा अखेरचा निरोप घेऊन नेहमींसाठीं डोळे

मिटून घेतल्यावरसुद्धां त्यांच्या डोळ्यांच्या खांचांत आसवांचीं तळी तुडुंब भरलेलीं होतीं.

बाप मेलेला पाहून या दोघां जाणत्या मुलांनीं जो शोक आरंभिला तो पाहून जमलेल्या गांवाचें काळीज फाटून गेलें. दुःखानें हीं पोरें वेडावून जातील कीं काय अशीहि शंका उभ्या गांवाला वाटली. परंतु आबांना चितेवर चढवून गांवांतील लोक माघारी आले तेव्हां त्यांनीं पाहिलें कीं, शिदूनें व दिगूनेंहि आपलें मन आवरलें आहे; निःशब्दपणें दोघेहि मुकाट्यानें परतत आहेत ! बापाच्या मृत्यूनंतर पोरांना जबाबदारीची जाणीव आली आहे, असाच अर्थ गांवानें लावला !

...त्या दोघांना आणखीहि कित्येक गोष्टींची जाण आली असल्याचा पडताळा गांवाला हळूहळू येऊं लागला. आबा वरसईकरांच्या वाड्यांतून उण्या अधिक शब्दांची देवाण–घेवाण झालेली गांवानें यापूर्वी कधींच ऐकली नव्हती. परंतु आबांच्या मृत्यूनंतर भांडणांचे आवाज त्या चौसोपी वाड्याच्या दगडी भिंतींतूनहि गांवाच्या कानावर येऊं लागले. काय प्रकार आहे तो बघण्यासाठीं गांवांतील पांचसहा प्रतिष्ठित वयस्कर मंडळी एके दिवशीं त्या वाड्यांत शिरली, तेव्हां आबांच्या त्या जुळ्या पोरांत एकच खडाजंगी उठल्याचें अभूतपूर्व दृश्य त्यांच्या नजरेस पडलें !

लहानपणापासून जे दोघे बंधु परस्पराशीं कमालीच्या एकोप्यानें वागले तेच आतां मोठेपणीं असे हमरीतुमरीवर आलेले पाहून गांवांतील मंडळींस अतीव आश्चर्य वाटलें. त्यांच्या बायकाहि आतां त्या भांडणांत सामील झाल्या होत्या. शोभा व प्रभा या दोन मुली मात्र 'काका, काका' करीत सारख्या रडत होत्या. परंतु कुणाकडेच लक्ष न देतां दोघेहि भाऊ इस्टेटीच्या वांटणीची भाषा जोरजोरांत मांडीत होते. आलेल्या मंडळींनीं प्रथम रडणाऱ्या मुलींना उगी केलें त्यांच्या आयांना भांडणें करण्यासाठीं स्वयंपाकघरात पाठवून दिलें व शिदू व दिगूकडे वळून मंडळी म्हणाली,

'शिदूकाका, दिगूकाका, हा काय प्रकार चालवलाय् तुम्हीं ? कशासाठीं इतकीं भांडणं चालवलींत ? आबा गेल्याला आजचा बारावा दिवस ! घरांतील धर्मकृत्यं पार पाडण्याऐवजीं तुम्हीं हें मांडलंय् तरी काय ?'

परंतु त्यांना पुढें बोलूं न देतां शिदूकाका उत्तरले, 'हें पहा गांवकरी, वयानें व मानानें तुम्ही मोठे आहांत. तुम्हांस बोलण्याचा माझा अधिकार नाहीं. परंतु इतकें मात्र बजावतों कीं, आमच्या या घरगुती गोष्टी आहेत. आपण त्यांत मधें पडूं नका, समजलं ?'

शिदूकाकांच्या बोलण्यावर त्या समंजस माणसांना काय समजायचें तें समजून चुकलें. अधिक कांहीं सांगण्यांत अर्थ नाहीं हें उमजूनहि त्या दोघांना मंडळींनीं खूप हितोपदेश केला. परंतु त्यांचें सारें बोलणें अळवावरील पाण्या-सारखें व्यर्थ सांडून गेलें. त्या दोघां भावंडांत वैरभावाची भिंत चांगलीच भक्कम उभी राहिल्याचें सर्वांनीं ओळखलें होतें !

त्या गोष्टीची सत्यताहि गांवाला ताबडतोब पटली. एके दिवशीं बैल-गाड्यांवर सामान चढवून दिगूचा संसार घराबाहेर पडला. बाजारपेठेंतील आबांचें तें दुसरें मोठें घर झाडून-सारवून साफ करण्यांत आलें. दिगूकाका, त्याची बायको व पांच वर्षांची छोटी प्रभा त्या घरांत राहूं लागली.

परंतु वांटणी अद्याप पूर्ण झाली नव्हती. दररोज सकाळचे दिगूकाका शिदूकाकांच्या वाड्यावर जायचे व तेथें इस्टेटीच्या वांटणीसंबंधांत जोर-जोरांत भांडायचे. मुळांत दोघे बंधु शांत, सुस्वभावी होते. परंतु अलीकडे दोघांचींहि डोकीं गरम झालीं होतीं. पैशानें माणसाची बुद्धि फिरते म्हणतात हेंच खरें ! आबा होते तोंपर्यंत पैशाअडक्याचा सारा व्यवहार तेच बघत. शेतीवाडीच्या कामावर वाघासारखें घसरून पडावें, लागेल तितकें खावें प्यावें, हिंडावें, फिरावें व आराम करावा इतकें साधें सरळ आयुष्य आबा असतांना ते दोघे उपभोगीत होते. परंतु आबा गेल्यावर पैशाअडक्याचा प्रश्न निर्माण झाला. देण्याघेण्याचे व्यवहार कुणी पहायचे हा सवाल उभा राहिला व या अडचणींवर दोघांनाहि पटेल असें समर्पक उत्तर कांहीं कुणाला गवसत नव्हतें. पैशाअडक्याचे व्यवहार मी बघणार, असा प्रत्येकाचा हट्ट पडला. 'तुला त्यांतलें काय कळणार ?' अशी आपल्यापरीनें वाजवी शंका प्रत्येकानें पुढें मांडली. अर्थात् मग सारे प्रश्न अनुत्तरींत राहिले. त्याशिवाय भिंतींतल्या फडताळांत ठेवलेली पोलादी संदूक हाहि एक ज्वलंत प्रश्न होता. पेटींतील तें अमौलिक जडजवाहिर व दागदागिने पाहून दोघांहि बंधूंचे डोळे खाड्कन

उघडले. दौलतीच्या लोभाखातर बंधूहि शत्रू बनतात, या सत्यतेचा फिरून एकवार पडताळा आला !

आणि त्या दिवशीं उगवतीस धरून निघालेले दिगूकाका उन्हें खालीं उतरल्यावर घरीं परत येऊं लागले, तेव्हां भुकेचा आगडोंब त्यांच्या पोटांत भडकला होता. सकाळीं सातपासून ते दुपारचें चार वाजेपर्यंत शिदूकाकांशीं त्यांनीं वादविवाद व हुज्जत घालून यशस्वी वाटाघाटी पुऱ्या केल्या होत्या ! आबांच्या सर्व जिनगानीची सविस्तर यादी करून दिगूकाका आपल्या मताप्रमाणें व मनाप्रमाणें वांटणी करण्यांत विजयी ठरले होते. पार साऱ्या शेतीवाडीची, गुराबैलांची, गाडीऔतांची, इतकेंच काय पण अर्धांगानें अंथरुणास खिळलेल्या म्हाताऱ्या आजोबा–आजींचीहि व्यवस्थित फाळणी करण्यांत आली होती. ‘ घरांतील इतर सगेसोयरे मी सांभाळीन, आजाला व आजीला मात्र तूं आसरा दे, ’ असें शिदूकाका म्हणाले होते. तेव्हां उसळून दिगूकाका ओरडले होते, ‘ हें नाहीं जमणार शिद्या तुझं माझं. चार सगेसोयरे तूं सांभाळणार त्यांत म्हातारा म्हातारीला सांभाळ कीं ! तुझ्याच बापाचीं आईबापें आहेत तीं–’

‘ नि तुझीं तीं रे कोण आहेत ? तुझा व माझा बाप एकच नव्हे का ? ’

शिदूकाकांच्या या ताशेऱ्यावर दिगूकाकांना योग्य तें उत्तर सुचलें नव्हतें. तेव्हां थोडी पड खाऊन त्यांनीं समारोप केला होता, ‘ हें बघ शिदू, आतां तूं ऐकतच नाहींस तर म्हाताऱ्याला मी घेऊन जाईन. म्हातारीला बरीक तूं ठेवून घे ! –’

शिदूकाकांना हें म्हणणें पटलें होतें. म्हाताऱ्यापेक्षां म्हातारीला घरीं ठेवणें थोडें अधिक सोयीचें होतें. आजी कांहीं एवढी थकली नव्हती. अर्धांगानें तीहि निजूनच होती पण आजोबाइतकी लोळागोळा झाली नव्हती. म्हटलं तर आजोबापेक्षां आजीचा त्रास कमी होता.

अर्थात् आजोबांची निवड करण्यांत दिगूकाकांच्या अंतर्यामींचा विचार शिदूकाकांना उमजला नव्हता. म्हातारा आधींच फार थकला होता. जरा त्याच्याकडे दुर्लक्ष केलें तर एके दिवशीं तो विनासायास चचला असता. म्हातारीचें तसें नव्हतें. तिचा स्वतःचा जीव जाण्याआधीं इतरांचा तिनें फार जीव खाल्ला असता. परंतु दिगूकाकांचा हा कावा शिदूकाकांना ओळखतां न

आल्यामुळ त्यांनीं या वाटाघाटीस हरकत घेतली नव्हती, तर संमती देऊन टाकली होती !

आंतल्या खोलींत अंथरुणावर पडल्या पडल्या म्हातारा म्हातारीनें आपलीहि वांटणी करण्यांत आल्याचें जेव्हां ऐकलें तेव्हां संतापानें व दुःखानें त्यांनीं एकच आकांत केला. पण अद्याप पैशाअडक्याच्या व मालमत्तेच्या वांटण्या व्हायच्या असल्यामुळें शिदूकाकांना व दिगूकाकांना त्या म्हाताऱ्या जिवांच्या रडण्याभेकण्याकडे लक्ष पुरवतां आलें नाहीं !

अखेरीस चार वाजण्याच्या सुमारास सर्व गोष्टींचें व्यवस्थित वांटप झालें. शिदूकाकाच्या वांटणीस आलेल्या व दिगूकाकांच्या जमेस पडलेल्या बारीकसारीक सर्व सामानाची यादी तयार करण्यांत आली. अगदीं सुतळीच्या तोड्यापासून ते घरांतील कागदाच्या रद्दीपर्यंत सहीसही वांटप झालें. आतां दिगूकाला घराकडे निघाले होते, तेव्हां वांटणीच्या कच्च्या कराराचे कागद त्यांच्या खिशांत होते. उद्यां सरकार दरबारीं त्यांवर सहीशिक्का पडणार होता.

'अग ए, पान वाढ बघूं.' असें म्हणत दिगूकाका घरांत शिरले व अंगांतला सद्रा काढून खुंटीवर फेकून दिल्यावर हातपाय धुऊन ते पाटावर बसले. सर्व अन्नाच्या गारगोट्या झाल्या होत्या. नवऱ्याला वाढतां वाढतां त्यांच्या बायकोनें भीत भीत विचारलें, 'मग काय पडल्या का पार वाटा-घाटी ? काय काय मिळणार आपल्याला ?'

भयंकर भूक लागलेल्या दिगूकाकांना बायकोच्या या प्रश्नानें एकदम संताप आला. परंतु महाकष्टानें तो आवरून ते एवढेंच म्हणाले, 'आतां आधीं मला चार घांस खाऊं दे! . जें काय आपल्या वांट्यास आलं आहे तें चारदोन दिवसांत प्रत्यक्ष दिसेलच. तेथपावेतों तुला कांही धाड भरत नाहीं कीं मी कांहीं मरत नाहीं—'

नवऱ्याच्या या खुलाशावर तोंडांत मारल्यागत त्यांची बायको गप्प बसली. जेवण झाल्यावर आंचवून नवरा उठून जाईपर्यंत ती एक अक्षरहि कांही बोलली नाहीं.

पंचाला हात पुसून ढेकर देत दिगूकाका मागील दारीं आले व पाहा-तात तो परसांतल्या तुळशीवृंदावनापाशीं त्यांची पुतणी पाठमोरी उभी होती.

शिदूकाकांची शोभा इकडे कशी काय आली, याबद्दल दिगूकाकांना फार आश्चर्य वाटलें. तिला ते हांक मारणार होते, पण इतक्यांत कोठीच्या खोलीं-तून त्यांची मुलगी प्रभा बाहेर आली. तिच्या हातांत लाकडाचीं बोळकीं होतीं. उजव्या बाजूस कट्टयाला टेकून उभ्या असलेल्या आपल्या वडिलांकडे तिचें लक्षच गेलें नाहीं. धांवतच ती परसांत शिरली व शोभाच्या नांवानें हांका मारीत ओरडली, 'ए शोभे, आणली ग मी माझी भातुकली. तूं काय काय आणलयस् ?'

'प्रभे, अग हळ. दिगूकाका ऐकतील ना ! मघाशींच ते घरीं आले आहेत—'

'मग आले तर आले. त्यांची काय मला भीति आहे ? आईला विचा-रून आणते आहे मी भातुकली. हा बघ गूळ, पोहे, दुधीपाकाच्या वड्या ! तूं ग काय आणलंयस् शोभे. दाखव ना—'

कट्टयापाशीं उभे असलेले दिगूकाका मुलींना दिसत नव्हते पण त्यांना मात्र मुलींच्या सर्व हालचाली दिसत होत्या, ऐकूं येत होत्या. पांच–सहा वर्षांच्या या दोनहि निष्पाप मुली डोळयांत भराव्या इतक्या गोंडस दिसत होत्या. दोघींनींहि फुलाफुलांचे फ्रॉक घातले होते. खांद्यावर केसांचे पेड सोडले होते. त्यांची मुलगी प्रभा तर आनंदानें निर्भर होऊन सारखी बडबडत होती. शोभा मात्र वडिलकीच्या नात्यानें तिला थोडें दटावीत होती. घरांत रोज झडणाऱ्या भांडणांच्या फैरी तिच्या कानांवर येत असल्यामुळें घरचें वातावरण बिघडलें आहे, इतकी गोष्ट तिच्या बालमनास समजत होती. तें वातावरण निवळून टाकण्याची शक्ति आपल्या कोवळ्या हातांत नाहीं, याचीहि तिला जाणीव होती. काय घडतंय तें केवळ उघड्या डोळयांनीं पहाण्याशिवाय अन्य मार्ग नाहीं या खात्रीनें ती कांहींशी विचार-मग्न व अबोल झाली होती. तिची मूळची सतेज मुद्रा काळजीनें काळवंडून गेली असल्याचा भास दिगूकाकांना झाला. तिला हांक मारून जवळ बोलवावें या विचारांत ते होते तोंच त्यांची मुलगी प्रभा म्हणाली.

'ए शोभे, मांड की गं आपला सारा खेळ येथें. आपल्या बाहुला–बाहुलीचं आज लग्न आहे हा बघ मी बाहुला आणला आहे. तुझी बाहुली कुठें आहे ग ?'

'ही घे. पण प्रभे एक लक्षांत ठेव. अगदीं हळूं बोलायचं. आरडा गलका करायचा नाहीं. आधींच मी न विचारतां इकडे आलें आहें. गेल्या आठ दहा दिवसांत आपण भेटलोंहि नाहीं ग ?'

'हो ग ! पण आज आपण खूप खूप वेळ खेळूं या.' इतक्यांत कांहींशी शंका मनांत येऊन धास्तावून प्रभानें हलकेंच विचारलें. 'पण काय ग, शिदू-काकांना कळलं तर ओरडणार नाहींत ना तुला ?'

तिच्या प्रश्नावर शोभानें तोंड फिरविलें व स्वगत बोलल्याप्रमाणें ती पुटपुटली, 'नुसतें ओरडणार ? चांगलें झोडपून काढतील उभें आडवें ते मला ! पण सोशीन मी सारं ! तुम्हीं मोठ्यांनीं हवें तर भांडा पण आम्हीं लहानांनीं काय म्हणून भांडावें ?'

'नाहीं तर काय !' तिच्या म्हणण्याला पुस्ती जोडीत प्रभा ओठ चावीत म्हणाली, 'आपल्या दोघांचे वडील अगदीं वाईट आहेत नाहीं ? ओरडतात काय, भांडतात काय, मारामारीहि करायचे एकादे वेळीं. त्यांचा काय नेम सांगायचा ? नाहीं का ग ?'

पण यावर ओठ मुडपून घेत शोभानें आपल्या उजव्या हाताचें आंगठ्या जवळचें बोट तोंडावर ठेवलें व 'शू ऽऽऽ' करून तिला गप्प बसण्याची खूण केली. आपल्याकडे पुतणीचें लक्ष गेलें कीं काय, या शंकेनें दिगूकाकांनीं जागच्या जागींच चाळवाचाळव केली व कट्टयाच्या आड वांकून ते उभे राहिले.

अंमळशानें त्यांनीं वर पाहिलें तों दोघीहि जणी अंगणांतील वृंदावना-जवळ खेळ मांडीत होत्या. जाणकाराची भूमिका घेऊन शोभा व्यवस्थेनें चूलबोळकीं मांडीत होती व प्रभा तिला कसले ना कसले सारखे प्रश्न विचा-रीत होती.

'मोठीं माणसें भांडतात कां ग ?' तिनें शोभाला विचारलें.

'काय कीं ! पण प्रभे, आपल्याला काय करायचंय त्यांच्याशीं ? आपण आपले रोज भेटत जाऊं. खेळत जाऊं. मला आई जो जो खाऊ देईल तो मी सगळाच्या सगळा इकडे आणीन. तुलाहि मिळणारा खाऊ तूं सांठवून ठेवा-यचास. आपण भागी करीत जाऊं हं ! चालेल ?'

'न चालायला ग काय झालंय शोभा ? किनई, आई मला कधीं कधीं पैसेसुद्धां देते, तेहि मी तुझ्याजवळ देईन. तुला देते का ग आई पैसे ?'

'आई देत नाहीं. बाबा देतात; पण आई म्हणते, 'मुलांना लहानपणीं पैसे देऊं नयेत. वाईट संवय लागते!' मला बाई कळतच नाहीं आईच बोलणं! वाईट काय संवय लागायची! परवां मला बाबांनीं एक आणा दिला होता. मी तो आमच्या शाळेजवळ उभा रहाणाऱ्या आंधळ्या म्हाताऱ्याच्या वाटींत टाकला. 'आण्याचें काय केलेंस ?' असें आईनें विचारल्यावर सांगितलें, 'चॉकलेटं घेतली म्हणून--' आणि यावर दोघीहि मुली इतक्या वेळ हंसत राहिल्या कीं, खेळाचें त्यांना भान राहिलें नाहीं.

पण मग शोभाच म्हणाली, 'प्रभे, जेवणावळीचं सर्व तयार केलं बघ मी. जिलब्या, साखरभात, चटणी, कोशिंबर, लाडू अगदीं सगळं सगळं! आतां बाहुला बाहुलीचं लग्न उरकून घेऊं. मग जेवण झाल्यावर मी जाईन. बापरे, उन्हं गेलीं सुद्धां! किती ग वाजले असतील ?'

प्रभा गोंधळली पण मग आठवून म्हणाली, 'सकाळीं दहा वाजले होते. आतां फार तर बारा वाजले असतील--'

शोभा हंसली. चल, शहाणी कुठची! सहा वाजतील आतां. आटप ग लवकर. तुझा बाहुला तयार आहे ना ? माझी बाहुली अगदीं रेड्डी--'

'माझाहि रेड्डा--' तिच्या इंग्रजी शब्दाची नक्कल करीत प्रभा उत्तरली. पण मग शोभा हसली तेव्हां 'सारेंच चुकलें' या भावनेनें प्रभा ओशाळली.

त्यानंतर बाहुला बाहुलीचें थाटानें लग्न झालें. जेवणावळीचा कार्यक्रम झाला. वरात निघाली व अखेर खेळ आवरून शोभा जायला निघाली. तिचा हात पकडून प्रभानें विचारलें,

'शोभे, उद्यां येशील ना ?' मी वाट पाहीन बघ. येतांना तुला मिळालेला खाऊ घेऊन ये. माझाहि खाऊ मी जमवून ठेवीन अगदीं इवलाहि खाणार नाहीं. आपली भागी हं--'

'बरं गं प्रभे! उद्यां नक्की येतें! मग जाऊं?' असें म्हणत शोभानें तिचा निरोप घेतला. तिला पोहचविण्यासाठीं प्रभाहि तिच्या मागोमाग निघाली. बाजूच्या बोळांतून दोघीहि मुली धांवतच बाहेर पडल्या.

त्या गेल्या तरी कट्ट्याशीं ओठंबून असलेले दिगकाका खूप वेळ विचार करीत तेथेंच उभे राहिले, 'तुझी नि माझी भागी हं!' हे मुलींचे शब्द सारखे त्यांच्या कानांत घुमत होते. त्यांना एकदम शिदूची आठवण झाली. लहानपणापासून त्याच्या समवेत कंठलेल्या काळाचा लांबच लांब पट्टा त्यांच्या दृष्टीसमोर उभा ठाकला. आणि काळाच्या त्या दीर्घ पट्ट्यावरील जागोजागीं उभे असलेल्या आठवणींच्या मैलांचे दगड त्यांच्या दृष्टीसमोर उभे राहिले सूर्य कलला, क्षितिजाखालीं उतरला, अंधार पसरूं लागला तरी दिगूकाका तसेच विचार करीत उभे राहिले.

नंतर ते आंतल्या खोलींत आले. त्यांचा आतां ठाम निश्चय झाला होता. दुपारीं काढून ठेवलेल्या सदऱ्याच्या खिशांतील वांटणीच्या कच्च्या कराराचा कागद काढून त्यांनीं त्याचे तुकडे तुकडे केले व ते बाजूच्या खिडकींतून टाकून दिल्यावर पायांत चपलाहि न सरकवतां शिदूकाकांच्या चौसोपी दगडी वाड्याच्या दिशेनें त्यानीं धांव मारली!

● ० ०

## ४ .... फोटो

' फोच्यो ऽ ऽ फोच्यो ऽ ऽ ऽ' अशी उंच खणखणीत आवाजांतली आरोळी दुपारच्या पडलेल्या वातावरणांत सर्वत्र घुमतांच स्वयंपाकघरांत पाटाला पाठ टेकवून पेंगणाऱ्या रमाबाई जाग्या झाल्या व धांदलीनें स्वयंपाकघरांतून माजघरांत व मग माजघरांतून ओसरीवर आल्या. तेथून त्यांनीं आपले दोन्ही हात भुवयांवर टेकवले व हातांच्या दुर्बिणींतून समोरच्या रस्त्याकडे किलकिले डोळे करून नजर लावली. रमाबाई अगदीं योग्य वेळीं तेथें येऊन हजर झाल्या होत्या. कारण त्या तेथें यायला व ' फोच्यो ऽ फोच्यो ऽ ऽ ' अशी आरोळी देणारा तो परदेशी मनुष्य त्यांच्या घरासमोरून जावयास एकच गांठ पडली. रमाबाईंनीं हातांची दुर्बिण डोळ्यांवर नीट सावरून बघितलें तों त्या फोटो काढणाऱ्या इसमाचा रोजचाच ठराविक ' अवतार ' त्यांच्या दृष्टीस पडला. करड्या रंगाचे जाडजूड बूट त्याच्या पायांत होते. गुढघ्याच्या किंचित् खालीं ओघळलेली काळ्या रंगाची हलकी रेशमी पँट त्यानें घातली होती. अंगांत पिवळ्या रंगाचा तोकडा जाकिन व डोळ्यांवर काळ्या भिंगांचा चष्मा त्यानें चढविला होता. त्याशिवाय त्याच्या डाव्या बगलेंत तिकाटणें, उजव्या खांद्याला लांब बंदाची चौकोनी पिशवी व डोक्यावर काळ्या फडक्यांत गुंडाळलेली कॅमेऱ्याची मोठी पेटी होती. खरें म्हणजे त्याला हांक मारण्यासाठीं रमबाई तेथें आल्या होत्या. परंतु आपण तेथें कां आलों याची त्यांना आठवण होईपर्यंत तो परदेशी चेहऱ्याचा फोटो काढणारा माणूस

वरच्या आळीच्या दिशेनें तडक चाललेला त्यांना दिसला. ओटीवरून रमाबाई अंगणांत आल्या व तेथून धांवत त्या रस्त्यावर आल्या. पण तेवढ्यांत त्यांना आणखी आठवलें कीं, जिचा फोटो काढावयाचा ती सुंद्री कांहीं यावेळीं घरांत नाहीं. गंगाभागिर्थी यमुनाबाईबरोबर ती खालीं वैद्यांकडे पापड लाटण्यास गेलेली आहे. बरें, तिला बोलावून आणतां येईल. परंतु आपले यजमान घरांत नसतांना हा फोटो काढण्याचा उपद्व्याप आपणाला जमण्यासारखा नाहीं. इतकें सगळें एकदमच आठवल्यामुळें, त्या परदेशी फोटोग्राफरला आपण बरी हांक मारली नाहीं, म्हणून रमाबाईंना समाधान वाटलें. पुनश्च रस्त्यावरून त्या अंगणांत, अंगणांतून ओसरीवर, ओसरीवरून माजघरांत व तेथून नंतर स्वयंपाकघरांत गेल्या व होती- तशी पाटाला पाठ टेकवून आपले यजमान कधीं येतात याची वाट बघत बसल्या.

थोड्यांच वेळांत ओटीवर वहाणा करकरल्या. गणेशपंत आले आहेत यापेक्षां ते बरोबर कोणती बातमी घेऊन आले आहेत याचेंच औत्सुक्य रमाबाईंना अधिक वाटत होतें. वदप गांवच्या इनामदारांकडे सुंद्रीची पत्रिका पंधरवाड्यापूर्वीं त्यांनीं पाठविली होती. ती जुळते कीं नाहीं हें विचारण्या-साठींच गणेशपंत मुद्दाम इनामदारांकडे जाऊन आले होते. गेलीं तीन वर्षें ज्या सुंद्रीच्या लग्नाचें मुळींच कुठें जमत नव्हतें तिची इनामदारांसारख्या वड्या घराशीं सोयरीक जुळणें किती अशक्य आहे हें रमाबाईंना चक्क दिसत होतेंच. तथापि मुलीच्या आईची काय अथवा बापाची काय मुलीच्या लग्ना-संबंधींची आशा फार वेडी असते. निश्चित जुळेल असें वाटत असून तेथें न जुळल्याचे अनेकवार अनुभव घेऊनहि, जिथें जुळणार नाहीं याची खात्री आहे अशा स्थळींदेखील, न जाणो जुळेल अशी आशा मुलीचे आईवडील बाळगून असतात. इनामदार काय म्हणतात, हें ऐकण्याबद्दल रमाबाई म्हणून फार उत्सुक होत्या—न जाणो...

पण गणेशपंताच्या उतरल्या चर्येकडे त्यांनी पाहिलें तेव्हां त्या काय तें समजून चुकल्या. तेवढ्यांत त्यांना अशीहि शंका आली कीं आपल्या नवऱ्याचें तोंड उतरलें आहे याचें कारण तो पांच सहा मैल अंतर भरदुपारच्या उन्हांत पायीं तुडवीत आला आहे हेंच असेल. लागलीच पुन्हां रमाबाईंना असेंहि वाटलें कीं, इनामदारांकडे पत्रिका जुळल्याची आनंददायक बातमी नवऱ्याला

कळली असती तर पांचच नव्हे तर पन्नास मैल अंतर त्यानें रणरणत्या उन्हांतून पायीं तुडविलें असतें तरी त्याचें त्यास कांहींच वाटलें नसतें. तर मग गणेशपंतांची मुद्रा पडलेली दिसत आहे याचें कारण इनामदारांकडे मिळालेला नकार हेंच असावें काय ? हो, तेंच असणार !

गणेशपंतानीं हात पाय धुतले. स्वयंपाकघरांत येऊन ते पाटावर बसले. रमाबाईनीं ताट वाढून त्यांच्यापुढें सरकावलें. गणेशपंतांना फार भूक लागलेली दिसत होती. ताटाभोवतीं पाणी फिरवतांच त्यानीं अन्नावर हात मारला. जेवण झाल्यावर त्यांनीं तृप्तीची ढेकर दिली व हात धुऊन ते धोतराला पुशीत ते ओसरीवर आले. त्यांचें आटोपतांच रमाबाईनींहि भराभर दोन घास खाऊन घेतले व झांकापांक केल्यावर त्या माजघरांतील उंबऱ्याजवळ येऊन उभ्या राहिल्या.

त्यांनीं पाहिलें तों गणेशपंत विडा चघळीत लोडाला टेकून आडवारले होते. अजूनहि त्यांची मुद्रा चिंताक्रान्तच दिसत होती. इनामदारांच्या मुला-बरोबर सुंद्रीची पत्रिका जुळली नाहीं हें आतां अगदीं स्पष्ट होत होतें.

आपली बायको दारांत उभी आहे हें ध्यानीं येतांच गणेशपंत थोडेसे सांवरून बसले व रमाबाईंना म्हणाले, ' उभी कां, बस कीं तूं. इनादारांकडे मी जाऊन आलों–'

रमाबाई उंबरठ्याच्या खालीं भिंतीला टेकून बसल्या व पुटपुटल्या ' सुंद्रीची पत्रिका जुळलेली दिसत नाहीं. '

' तुला कुणी सांगितलें ? '

' तुम्हीं तोंडानें सांगितलें नाहीं परंतु तुमच्या तोंडावरून मी काय तें ओळखलें. '

' विद्वान आहांत. ' गणेशपंत हंसले. ' ' पत्रिका उत्तम पटते आहे– अगदीं छत्तीस गुण जुळताहेत–'

' काय म्हणतां ? ' रमाबाईनीं एकदम आनंदून विचारलें. ' तर मग एवढी आनंदाची बातमी ऐकूनहि तुम्ही इतके गळफटून कां गेले आहांत ? '

' त्याचं असं आहे–'

' काय ? हुंडा जास्त मागताहेत का ते ? आपण देऊन टाकूं–'

' नाहीं–'

'मग दागिने, करणी इत्यादिबद्दल त्यांचा आग्रह आहे का? आपण तो पुरवून टाकूं–'

'नव्हे–'

'मुलाचा हट्ट, मानपान वगैरेबद्दल त्यांचें कांहीं म्हणणें आहे कां? आमची तयारी आहे म्हणावं–'

'अग अट घातली आहे मुलानें–'

'काय ती ? '

गणेशपंतांनीं घसा साफ केला व ते म्हणाले, 'मुलीबद्दल अट आहे. अशी तशी मुलगी त्याला नको आहे–'

'पण सुंद्री तब्येतीनं, अंगापिंडानें छान आहे–' रमाबाईंनीं हमी दिली.

'तसं नव्हे–'

'ती गृहकृत्यदक्ष आहे. माझ्याच हाताखालीं मीं तयार केली आहे तिला—'

'तसंहि नव्हे–'

'कामाचा उरक दांडगा आहे–'

'जरुरी नाहीं–'

'हौशी आहे. मुलाबाळांची आवड आहे–'

'तो नंतरचा प्रश्न आहे–'

'स्वभावानं सावित्रीसारखी आहे–'

'हें सगळं खरं आहे. परंतु वर्णानें ती काळी आहे. एकंदर रूपानें साधारण आहे–खरं म्हणजे असाधारण आहे. '

बापरे ! म्हणजे सुंद्रीचा 'वीक पाइंट' कीं काय म्हणतात तोच हेरला म्हणायचा इनामदारांनीं ! आणि या विचारासरशी रमाबाई अत्यंत अस्वस्थ झाल्या. त्यांची कन्या नांवापुरतीच सुंदरी होती. एरवीं तिच्यांत सौंदर्याचें व्यवच्छेदक लक्षण कोठलेंहि नव्हतें, ही गोष्ट रमाबाईसुद्धां नाकारूं शकत नव्हत्या. ती सुंदर कां नाहीं याचेंहि उत्तर रमाबाईंना ठाऊक होतें. आपण स्वतः जर पांच मिनिटें आरशासमोर उभ्या राहिलों तर लागलीच आपल्या मुलीच्या 'वीक पाइंट'चें जन्मरहस्य आपल्या ध्यानांत येईल, याची रमाबाईंना खात्री होती. हातच्या कांकणाला आरसा थोडाच लागतो ?

मनांतील विचारांचें गाठोडें बांधून रमाबाईनीं तें थोड्या वेळापुरतें बाजूला ठेवलें व नंतर आपल्या यजमानांकडे कळून त्या म्हणाल्या, 'पण लग्नाचा व सौंदर्याचा संबंध काय हेंच माझ्या ध्यानांत येत नाहीं ! शरीर-संबंधाचा अंतिम उद्देश संतति-प्राप्ति हाच असतांना...'

'अहो, हल्लीं तो उद्देश गौण ठरलेला आहे.' आपल्या बायकोला मध्येंच थांबवीत गणेशपंत घाईघाईनें म्हणाले. ते स्वतः भिक्षुक होते. प्रसंगविशेषीं देवळांत पुराणें व प्रवचनें देखील ते सांगत असत. त्याचें पाहून—ऐकून—रमाबाईसुद्धां बोलण्याच्या ओघांत कधीं कधीं प्रवचन सुरू करीत. आतांहि तीच शंका आल्यामुळें गणेशपंतानीं त्वरेनें त्यांना आवरलें होतें.

रमाबाईंच्या अर्थातच हें लक्षांत आलें नाहीं. त्यांनीं पुन्हां विचारलें 'परंतु इनामदारांच्या मुलाला सुंदर मुलगी पाहिजे म्हणजे कशी पाहिजे ?'

गणेशपंतांनीं समोरच्या भिंतीवरील तसबिरी न्याहाळल्या. त्यांत दमयंती नळराजाकडून येणाऱ्या संदेशाची वाट बघत सज्जाजवळ उभी आहे व तिची दासी तिला धीर देत आहे, असें एक रविवर्म्याचें चित्र होतें. त्या चित्राकडे बोट करून गणेशपंत म्हणाले, 'त्या चित्रांतील स्त्रीसारखी बायको इनामदारांच्या मुलाला करायची आहे.'

'रमाबाईनीं चित्राकडे निरखून पाहिलें व आनंदून त्या म्हणाल्या, 'तर मग निश्चित जमलं समजा इनामदारांच्या मुलाशीं. आपली सुंद्री खात्रीनें या स्त्रीपेक्षां अधिक सुस्वरूप आहे—'

'कुठल्या ?' गणेशपंतांनीं आश्चर्यानें विचारलें.

आणि नंतर रमाबाईनीं तसबिरींतील ज्या स्त्रीकडे बोट दाखविलें तें पाहून गणेशपंतांनीं कपाळाला हात लावला. 'अग, ती नव्हे ती दुसरी. तूं बोट दाखवते आहेस त्या दासीकडे कीं जी, दमयंतीच्या बालपणीं तिची दाई असेल—'

रमाबाई वरमल्या. चित्रांतील दमयंतीसारखी काय पण तिच्या प्रौढ दासीइतकीहि आपली सुंद्री सुंदर नाहीं हेंहि त्यांनीं मनोमन कबूल केलें.

'मग काय, जमणार नाहीं, असंच धरून चालायचं ?' आवाज पाडून रमाबाईनीं विचारलें.

'छे, छे !' गणेशपंत ताठ बसून रहात म्हणाले, 'मुलीच्या पक्षानें

धीर गाळून कधींच बसायचें नसतें. अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न करून बघायचा असतो. मुलाचं लग्न दुसऱ्याच कुठल्या मुलीबरोबर ठरलें, प्रत्यक्ष लग्न लागायची वेळ आली, मंगलाष्टकं सुरू झालीं, इतकेंच काय पण वधुवरांनीं परस्परांच्या गळयांत माळा घातल्या तरीसुद्धां सप्तपदी व लाजाहोम होईपर्यंत इतर मुलींच्या बापांनीं त्या मुलाच्या स्थळाबद्दलची आशा सोडायची नसते, माहीत आहे ? '

रमाबाईंना हें खरंच माहीत नव्हतें म्हणून त्यांनीं मान डोलावत 'बरें' म्हटलें.

'तेव्हां सांगत होतों हें कीं आपण इनामदारांच्या मुलाबद्दलची आशा सोडायची नाहीं. खटपट करीत रहायचें–'

'मग सुंद्रीला दाखवायचा कार्यक्रम करायचा म्हणतां ? करूं या. त्यांत काय हरकत आहे ? गेलीं तीन वर्षं पन्नास वेळां दाखविलीच आहे. आणखी एकदां—'

गणेशपंतांनीं आपला चेहरा कावेबाज केला. हलक्या स्वरांत ते म्हणाले, 'अशी घाई कांहीं नाहीं करायची. मी आज इनामदारांच्या घरीं गेलों होतों. तेथें नीट निरीक्षण करून आलों. खुद्द इनामदार व इनामदारीणबाई यांना आपली मुलगी पसंत पडण्यासारखी आहे. तीं दोघं तर मुलाच्या चेंगटपणाला कंटाळून गेलीं आहेत. देखणी मुलगी पाहिजे म्हणून आपल्या मुलानें लग्नासारखी गोष्ट सारखी पुढें पुढें ढकलावी, या प्रकाराचा त्याच्या आईबापांना अगदीं वीट आला आहे. कशीहि असली तरी मुलगी असली पाहिजे एवढीच त्यांची आतां अट बाकी आहे. काळी सावळी का असेना पण घट्टीकट्टी व सरळमार्गी असावी हीच त्यांची आपेक्षा आहे. आपल्या घराण्यांतील सनातन धार्मिकपणा व संतति–संपन्नता पाहून इनामदार दांपत्य खूष होऊन गेलें. घोडं आतां अडलं आहे तें मुलापुढें–'

गणेशपंत थांबलेले पाहून रमाबाईंनीं उत्सुकतेनें पुढे विचारलें, 'हो ना ! त्याचीच तर खरी अडचण आहे—'

'पण त्यांतूनहि आपण मार्ग काढूं या.' गणेशपंतांनीं आपल्या पत्नीला दिलासा दिला. 'इनामदारांचा मुलगा आज घरींच होता. त्याची मी परीक्षा

करून आलों. मुलगा एरवी झकास आहे पण तसं डोक्यानं बावळटच कार्टं आहे. शहरांत राहून व थोडसं शिक्षण घेऊन शौकीनपणाचा आव आणतो आहे झालं. त्याला मुलगी पाहिजे आहे नटीसारखी–'

'हात मेल्या ! जळ्ळं तुझं लक्षण तें' रमाबाई खवळून सात्त्विक संतापानें ओरडल्या, 'माझी सुंद्री नाहीं हो तशी. म्हणे नटी पाहिजे.'

गणेशपंतांना रमाबाईंनीं केलेला हा आरडाओरडा आवडला नसावा. आवाज चढवून ते म्हणाले, 'पण तूं कशाला वैताग करून घेतोस ? त्याला मुलगी कशी हवी आहे तें सांगितलं. सुंद्रीचा जरा नट्टापट्टा करवून फोटो काढून घेऊं व देऊं तो पाठवून इनामदारांच्या मुलाकडे. पाहूं या काय म्हणतोय तें–'

गणेशपंतांनीं 'फोटो' हा शब्द उच्चारतांच रमाबाईंना एकदम मघाशीं वरच्या आळीकडे गेलेल्या त्या परदेशी फोटोग्राफरची आठवण झाली. उतावळीपणानें त्या म्हणाल्या, 'पण मग आजच सुंद्रीचा फोटो कां काढूं नये ? चांगला फोटोग्राफर गांवांत आला आहे—'

गणेशपंतांनीं बायकोच्या अज्ञानाची कींव केली, 'तो सिंधी फोटोग्राफर ना ? अग त्याच्याकडून फोटो काढून घेण्यांत काय अर्थ आहे ? आपली सुंद्री जशी आहे, तसाच तिचा तो फोटो काढील–कदाचित् तिला बिघडवूनहि टाकील. कुणीं सांगावें ?'

रमाबाईंच्या चर्येवरून आश्चर्य सरकून गेलें. फोटो म्हणजे हुबेहुब चित्र म्हणायचें मग हा सिंधी फोटोग्राफर काय नि दुसरा काय ? सारखाच!

पण तेवढ्यांत त्यांच्या यजमानांनीं खुलासा केला, 'तुझ्या लक्षांत आलं नाहीं मी काय म्हणतों तें. अग हल्लींच्या काळीं हुबेहुब फोटो काढणारा तो चांगला फोटोग्राफर, असें म्हणत नाहींत–'

'म्हणजे ?' रमाबाईंच्या कांहींच लक्षांत येत नव्हतें.

अस्सलासारखी नक्कल तर काय कुठलाहि फोटोग्राफर करील. पण जें नाहीं तें चित्रांत जो आणून दाखवील तोच खरा कसबी छायाचित्रकार–'

गणेशपंतांच्या बोलण्याचें रमाबाईंना नवल वाटलें आश्चर्यानें त्यांनीं विचारलें, 'पण हें कसें शक्य आहे ? सुन्द्रीच्या नाकावर म्हैस बसलेली असतांना फोटोग्राफरला थोडेंच तें नाक चाफेकळीसारखें रेखीव करतां येईल ?'

'अलबत ! ' हंसून गणेशपंत आत्मविश्वासानें म्हणाले, 'तीच तर कला आहे ! गॅरेन्टीड काळ्या वर्णाचा फोटोंत केतकीसारखा गौरवर्ण दाखविणें, तोंडाबाहेर आलेले दांत फोटोंत आंत सारणें, मूळच्या बेढबपणाला फोटोंत नीटसपणा प्राप्त करून देऊन साजिरं गोजिरं रूप देणें यांतच फोटोग्राफरचें कौशल्य असतें व म्हणूनच हें सगळं करण्यासाठीं सुन्द्रीला आपण चांगल्या स्टुडिओंत घेऊन जाऊं–'

'पण तेथें पैसे फार पडतील. '

'हं ! तें बारीक खरंच आहे ! पैशाचा प्रश्न आहे खरा–'

आपलें एवढें म्हणणें तरी यजमानांना पटलें म्हणून रमाबाईंना बरेंच समाधान वाटलें. घाईघाईनें त्या पुढें म्हणाल्या, 'नाहीतरी दाराशीं चालत तो फोटोग्राफर आपणहून आलाच आहे, तुम्हीं यायच्या आधीं थोडाच वेळ तो आपल्या घरावरून वरच्या कुणब्याळींत गेला आहे. रंग्या सोनाराच्या थोरल्या लेकाचं गेल्या आठवड्यांत लगीन झालं तेव्हां तेथें कदाचित् गिऱ्हाइकं मिळालीं असावींत त्याला. परततांना तो पुन्हां आपल्याच घरावरून जाईल. तेव्हां सुंद्रीच्या फोटोबद्दल त्याला निदान विचारायला काय हरकत आहे ? '

'तुझं म्हणणं बरोबर आहे.' पुष्कळ महिन्यांनंतर गणेशपंतांनीं आपल्या अर्धांगीचें म्हणणें मान्य केलें. अर्थात् रमाबाईंना तर तो आपला मोठाच गौरव वाटला. लज्जेनं तोंड आरक्त होण्याचं आतां कांहीं त्यांचं वय राहिलं नव्हतं. तथापि या प्रसंगीं त्यांच्याहि गालावर अरुणोदय झाल्याचा आभास गणेशपंतांना झाला.

फोटो काढण्याचें निश्चित झालें तरी नायिका जाग्यावर हवी म्हणून गणेशपंतांनीं रमाबाईंना सुंद्रीला बोलावून आणण्यास वैद्यांकडे पाठविलें. पण त्या घाईत गणेशपंतांचें एक राहून गेलें. कुमारी सुंदरी हीस कोणत्या कामासाठीं घरीं बोलावण्यांत येत आहे याची वाच्यता न करण्याचा संदेश रमाबाईंना देण्यास ते विसरले. स्वतःहून तेवढें दूरदर्शित्व दाखविण्याइतका धूर्तपणा सौ. रमाबाईंत नसल्यामुळें वैद्यांच्या घरीं गेल्यावर त्या तेथें पाटावर बसल्या व आणखी थोड्या वेळानें सौभाग्यकांक्षिणी सुंदरीच्या फोटोचा कार्यक्रम त्यांनीं जाहीर करून टाकला.

मग काय ? तेथें जमलेल्या समस्त स्त्रियांनीं हातीं घेतलेला पापडांचा कार्यक्रम तडकाफडकीं स्थगित गेला. हातांतील लाटणीं त्यांनीं बाजूस फेंकून दिलीं. समोरचें पोळपाट दूर सरकावलें व रमाबाईंच्या भोंवतीं एकच गिल्ला करून त्यांनीं सौभाग्यवती होऊं पहाणाऱ्या सुंदरीच्या फोटोसंबंधीं परोपरीनें पन्नास तरी प्रश्न विचारले. त्या भडिमारामुळें रमाबाईंचा चेहरा मात्र फोटो काढण्यासारखा झाला. फोटोच्या गोष्टीचा गौप्यस्फोट आपण केला नसता तर बरें झालें असतें असें आतां रमाबाईंना वाटूं लागलें होतें. परंतु त्यांच्या तोंडीं तिळ भिजता तर स्त्रीच्या जन्माला त्या येत्या ना !

फोटो आतांच काढावयाचा आहे व तोसुद्धां आजच गांवांत आलेल्या त्या सिंधी फोटोग्राफरकडून, इतकी माहिती रमाबाईंकडून मिळतांच तेथें जमलेल्या भगिनींपैकीं प्रत्येकीनें वैद्यांकडे थोड्याच वेळानें होणाऱ्या चहावर पाणी सोडलें व ओचे पदर सावरीत सर्वजणी धांवतच आपापल्या घरीं निघून गेल्या.

त्या गेल्यावर सौ. रमाबाई व सौ. कां. सुंदरी बरोबरच घरीं परतल्या. आपलें लग्न होवो न होवो पण आज आतां आपला फोटो काढणार आहेत. या कल्पनेमुळें सुंदरीचें कृष्णवदन आनदानें फुलून गेलें. तिला जरी सध्या तेविसावें वर्ष सुरू होतें तरी आपलें वय अचानक दहा वर्षांनीं कमी झाल्यासारखें तिला वाटूं लागून तेरा वर्षांच्या अल्लड बालिकेप्रमाणें रस्त्यांतून चालतां चालतां तो सैरभैर धाऊं लागली. धांवतच तिनें घर गांठलें व ओसरीवर येरझाऱ्या घालणाऱ्या गणेशपंतांच्या गळ्यांत एकदम हात टाकून तिनें लाडिकपणें विचारलें, ‘ बाबा, बाबा, माझा फोटो काढणार ना ? कधीं काढणार, कसा काढणार, कोण काढणार ? ’

आनंदानें निर्भर झाल्यामुळें सुंद्रीला जरी दहा वर्षांनीं लहान झाल्यासारखें वाटत होतें. तरी तिच्या वडिलांना मात्र तिचा हा कायाकल्प माहीत नव्हता. लग्नाला ‘ ओव्हर ड्यू ’ झालेली बापाच्या गळ्यांतील ही धोंड हाच त्यांचा सुंदरीबद्दलचा समज असल्यामुळें तिनें अशा अल्लडपणानें आपल्याशीं वागावें, याचा त्यांना राग आला. तिला दूर ढकलीत ते ओरडले, ‘ अग, अग ! गाढवे, अशा उड्या कशाला मारतेस ? फोटो कां कधीं पाहिला नव्हतास तूं ? ’

सौ. कां. सुंद्रीचें तोंड कांहींसें उतरलें. फणकारून ती म्हणाली, ' हें हो काय बाबा, मी फोटो अनेकदां पाहिले आहेत. पण ते सर्व दुसऱ्यांचे. माझा फोटो आज पहिल्यानेंच तर निघत आहे–'

' बरं, बरं ! जरा आंत जा. तोंडबिंब नीट धुऊन व नीटनेटके कपडे करून मग बाहेर ये. बघ, एखाद्या नटीसारखी दिसली पाहिजेस तूं. कळलं ?'

' हो, हो ! दिसेन, दिसेन–' असें गुणगुणत सुंद्री टाळ्या वाजवीतच आंत गेली व ' बेअक्कल कार्टी ' असें म्हणत गणेशपंतांनीं कपाळाला हात लावला.

सुमारें चार वाजून गेले तरी अद्याप फोटोग्राफर वरच्या आळीकडून कां परतत नाहीं हें त्यांच्या लक्षांत येईना. गणेशपताचें घर ब्राह्मण आळींतील सर्वांत शेवटचें घर होतें. व तेथून वरची कुणब्यांची आळी अवघ्या एका हांकेवर होती. तो फोटोग्राफर तेथें काय करीत आहे हें पाहून यावें असा विचार करीत ते ओसरी उतरून अंगणांत आले व पुढें रस्त्यावर दृष्टी जातांच एखाद्या पुतळ्याप्रमाणें ते जागच्याजागींच स्तब्ध उभे राहिले.

त्यांनीं पाहिलें तों रमाबाई फाटकांतून आंत शिरत होत्या व त्यांच्या-मागोमाग खालच्या आळींतील प्रत्येक घरांतील सर्व स्त्री–पुरुष मंडळी जमावानें गणेशपंतांच्या घराच्या दिशेनें येत होती. पांच पंचवीस स्त्रिया, दहा वीस मुलें–बाळें व वीस एक मंडळी एकमेकांशीं कसलीतरी हास्यरसोपन्न चर्चा करीत गणेशपंतच्या अंगणांत शिरत होती. गणेशपंतांना तेथें उभे असलेले पाहून त्यांतील कांहीं मंडळी पुढें आली व त्या सर्वांनीं एकदमच विचारलें, ' गणेशभटजी, अहो गणेशभट, पोरीचा फोटो काढतां ना ? मग फोटोग्राफर कुठें आहे ? '

तेवढ्यांत तेथें आलेल्या शेंबड्या पोरानें आपली शंका विचारून घेतली, ' त्या फोटोवाल्याजवळ कॅमेरा आहे ? '

तिसऱ्यानें त्या पोरट्याला दूर ढकललें व तो ओरडला, ' गाढवा, न्हाव्याजवळ वस्तरा आहे काय ! ' असाच तुझा प्रश्न झाला हा–'

त्यावर सर्वजण खो खो करून हसले व मग आपापसांत फोटोग्राफर दिसत कां नाहीं, म्हणून चर्चा करूं लागले.

एकजण म्हणाला, ' अरे फोटोग्राफर घरांत जाऊन फोटो काढीत असेल.

अनुक्रम 30
क्रमांक २२९८

चला. आपण आंत जाऊं–'

तें त्याचें वाक्य ऐकतांच गणेशपंत घाईघाईनें पुढें झाले व म्हणाले, ' हें पहा, फोटोग्राफर एवढ्यांतच वरच्या आळीला गेलाय्. तो परत यायला अवकाश लागेल. झालंच तर फोटो काढून झाला कीं तुम्हांला आम्हीं तो दाखवूंच कीं ! '

पण गांवांतले लोक इतके मख्ख कीं कोणाच्याहि हें जणूं गांवींहि नव्हतें, कीं आपल्याला घरोघरीं जाण्याची ही सूचना आहे म्हणून–!

पण तेवढ्यांत वरच्या आळींतून 'फोच्चो ऽऽ फोच्चो ऽऽऽ' असे खणखणीत स्वर खालच्या आळींत येऊन उतरूं लागले. आणि त्यामागोमाग डोक्यावर काळें ओझें घेतलेला, तोकड्या विजारीचा, आंखूड जाकिटाचा तो पोरगेलासा फोटोग्राफर बगलेंतील तिकाटणें सांवरीत खालच्या आळींकडे येतांना दिसूं लागला. त्याला पाहतांच जमलेल्या मंडळींतील चार बघे त्याच्या दिशेनें धांवले. त्यांना तसे धांवत येतांना पाहून तो छायाचित्रकार थबकला. थोड्या अंतरावर गोळा झालेला जमाव बघून ग्रुप फोटो काढण्याचें कंत्राट आपल्याला मिळणार, याबद्दल त्याची खात्री झाली. पण तेढ्यांत याचा हिरमोडहि झाला. कारण आतां जवळ जवळ साडेपांच वाजायला आले होते, त्यामुळें उन्हें फारच पुसट झालीं होतीं व त्याशिवाय वातावरणांत काळोखी भरून सर्वत्र मळभ दाटून राहिलें होतें. फोटो काढण्याला ही वेळ मुळींच योग्य नव्हती.

ते चार बघे नजिक येतांच त्यांनीं छायाचित्रकाराला घेरून टाकलें व त्यांच्यावरोबर येण्याचा आग्रह केला. त्यांतील एकानें त्याच्या खाकेंतील तिकाटणें आपल्या हातीं घेतलें. दुसऱ्यानें त्याच्या डोक्यावरचा कॅमेरा आपल्या ताब्यांत घेतला. तिसरा तर फारच लगट करून खांद्यावर अडकविलेली त्याची पिशवी ओढून काढूं लागला. छायाचित्रकाराला ही घसट मात्र आवडली नसावी. नाखुषीचा स्वर काढून तो उद्‌गारला, ' अरे यार, ये क्या करते हो ? "

फोटोग्राफर गणेशपंतांच्या अंगणांत येतांच सर्वचजण त्याच्याजवळ गोळा झाले व त्याच्या कॅमेऱ्यावरील काळें आवरण बाजूस करून आंतील यंत्रसामुग्री न्याहाळूं लागले.

या सलगीनें तो फोटोग्राफर पुन्हां भडकला, 'अरे भाई, हात मत लगाव. ये क्या खिलौना है! हट जाव सब–"

त्याच्या या दणक्यानें सर्व मंडळी एकदम गप्प झाली. ती संधी साधून गणेशपंत पुढें झाले व म्हणाले, 'एक फोटो काढायचे तुम्ही किती घेतां?'

'सबका फोटो निकालना है?' फोटोग्राफरनें विचारलें.

त्याचें बोलणें मुळींच न समजल्यामुळें गणेशपंतांनीं जोरजोरानें मान हलविली, 'काय म्हणतोस तें कांहीं कळत नाहीं बाबा–'

फोटोग्राफरनें डोकें खाजविलें. 'हम पूछता है, समद्यांचा फोटो निकलवायचा का?'

'आपल्या फोटोबद्दल फोटोग्राफरनें उल्लेख केलेला पाहून जमावांतील प्रत्येकजण एकदम हरखून गेला. पण त्यांतील जे जाणिते होते ते फोटोग्राफरच्या वाक्यानें कावरेबावरे झाले. आपल्या फोटोचा उल्लेख म्हणजे आपल्याच खिशाला चाट, हें लक्षांत येऊन ते त्याच्या म्हणण्याला विरोध करण्यास सज्ज झाले.

पण तेवढ्यांत गणेशपंतच पुढें होऊन म्हणाले, 'आमच्या लाडकीचा फोटो काढावयाचा आहे काय घेणार?"

'किधर है वो लडकी?' फोटोग्राफरनें विचारपूर्वक विचारलें.

'वो तो आम्हीं पिछे दाखवता है. किती लेएगा बोला?'

पण उत्तर देण्याऐवजीं फोटोग्राफर आकाशाकडे पाहूं लागला. तो प्रभूची प्रार्थना करीत असावा असें वाटून जमावांतील धारूअण्णांनीं विचारलें,

'तुम ख्रिस्ती आहे?'

'नहीं!'

'मग सिंधी?'

'अरे यार, हम हिंदी है! देख यह रहाँ हूँ की फोटो अच्छा निकलेगा या नहीं?'

'निकलेगा! निकलेगा!!' लोकांनींच तज्ज्ञांचा आव आणून सल्ला दिला. 'पैसा किती घेणार सांगा–'

काय बोलावें हेंच फोटोग्राफच्या लक्षांत येईना. जवळ जवळ सहाचा सुमार होत आल्यामुळें व हवेंतील काळोखी फारच वाढल्यामुळें फोटो निघणें शक्य नाहीं, हें त्याला कळून चुकलें होतें. तसें स्पष्ट सांगून परत निघावें, असा विचार तो करत आहे, इतक्यांत एकाएकी त्याला एक कल्पना सुचली. आपल्या गळ्यांतील पिशवी त्यानें चपापली व पुढें होऊन त्यानें म्हटलें, ‘ लाओ लडकीको. कभी हम उसकी छबी निकालता है ! ’

‘ छबी नाहीं, सुंद्रीचा फोटो काढायचा आहे, ’ घाईघाईनें गणेशपंत म्हणाले, आपल्या मुलीला ‘ छबी ’ म्हणून हांक मारल्याबद्दल त्यांना थोडा संताप आला होता.

‘ अच्छा, अच्छा ! किदर है वो सुंदरी ? बतावो–’

‘ पण पैसे किती घेणार ? ’

‘ पाँच रुपया–’

‘ बापरे ! छे, हें जमायचें नाहीं बुवा. ’ गणेशपंत उत्तरले.

हें जर जमणार नसलें तर मग आपण येथें जमलों कां ? असाच तेथें जमा झालेल्या मंडळींना प्रश्न पडला. हा सौदा कांहींहि झालें तरी जमलाच पाहिजे म्हणून हिंदी भाषा थोडीफार जाणणारे पुढें झाले व त्या फोटो-ग्राफरशीं बराच वेळ हुज्जत घातल्यावर तीन रुपयांस फोटो काढण्याचा सौदा त्यांनीं ठरवून टाकला.

पांच रुपयांचा सौदा तीन रुपयांवर तुटल्याचें पाहून गणेशपंतांना समाधान वाटलें. हा सौदा जमावातील ज्या मंडळींनीं जमवून दिला त्यांच्याबद्दलची कृतज्ञताहि त्यांच्या मुद्रेवर चमकून गेली. पण तेवढ्यांत कांहींसें आठवून ते म्हणाले, ‘ फोटो अच्छावाला निघाला पाहिजे. एकदम झकास—’

फोटोग्राफर हंसला. ‘ तुम देखते रेहेना भाई. फोटोग्राफ अच्छा नहीं निकलेगा तो मेरा नाम बदल दुंगा––’

बघे मंडळींतील एक हिंदी जाणणारा तेवढ्यांत पुढें घुसला. जर या फोटोग्राफरनें फोटो बिघडवला तर नांव बदलण्याचे वेळीं यांचें मूळ नांव लक्षांत असावें, अशी मख्खी त्याच्या मेंदूंत शिरली होती. म्हणून त्यानें ताबडतोब विचारलें, ‘ मगर फोटोग्राफर भाई, तेरा नाम क्या ? ’

'फली मिस्त्री---'

'बरं फली, पण फोटो तेवढा चांगला काढ हं. नाहींतर सगळेंच मुसळ केरांत—'

'अच्छा अच्छा' म्हणत फली मिस्त्रीनें आजूबाजूला उभ्या असलेल्या गांवकऱ्यांना कॅमेऱ्यापासून थोडें दूर सरकायला सांगितलें. नंतर झटकन बाजूला पडलेलें तिकाटणें फांकवून तें जमिनीवर नीट उभें केलें. त्याच्यावर कॅमेरा ठेवून त्यावरून काळें फडकें गुंडाळलें व गळ्यांतील पिशवीचें ढापण दूर सारून त्यानें आंत हात घालून त्यांतील अनेक छायाचित्रें बाहेर काढलीं.

तीं चित्रें दृष्टीस पडतांच बाजूला उभा असलेचा लोकांचा लोंढा एकदम पुढें सरकला व 'पाहूं, पाहूं' म्हणूं लागला. फलीनें आपला चेहरा कठोर केला व तो धारदार आवाजांत म्हणाला. 'तुम सब लोक पीछे हट जाव. हमने अभी कॅमेरा लगा दिया है, तुम बीचमें आकर सब कुछ बिगाड देगा. खामोस होकर आपनी आपनी जागहपर बैठ जाना. मैं 'पोझ' के वास्ते ये फोटो देख रहा हूँ! समझे ?'

कोणालाहि त्याचें म्हणणें मुळींच समजलें नाहीं. आपण पुढें होण्यांत शहाणपणा नाहीं एवढें मात्र सर्वांच्या ध्यानांत आलें.

फली मिस्त्रीनें पिशवींतून जीं विविध छायाचित्रें काढलीं होतीं तीं एकजात सिनेमा नटयांची चित्रें होतीं. या खेडेगांवांतील मुलीला अनुरूप असें एखादें छायाचित्र त्यांत दिसतें का, हें तो शोधक नजरेनं पाहूं लागला. नर्गिस निम्मीचें येथें काम नव्हतें. मधुबाला–वनमाला येथें चालण्यासारख्या नव्हत्या. निलोफर–नादीरा येथें कुचकामी ठरल्या असत्या. पद्मिनी–रागीणी येथें चालल्या नसत्या. मीना–वैजयंतीचें तर नांवहि घेणें योग्य दिसलें नसतें. निरुपा–अनिता येथें टिकणें शक्य नव्हतें. शकिला–वहिदांचा येथें प्रश्न उद्भवत नव्हता. सिहा–शामाचा तर गणेशपंतांच्या कन्येच्या संदर्भात नुसता उल्लेख करणेंहि निष्फळ होतें. तीं सारीं छायाचित्रें वरखालीं करतां करतां फली निराश होण्याच्या बेतांत होता. इतक्यांत ललिता–नलिनी–शशीकला यांचे फोटो त्याच्या दृष्टीस पडले. नंतर उषाकिरणचाहि फोटो त्याच्या हातीं लागला. मग मात्र फलीच्या चर्येवर एकदम हास्य विलसलें. डोक्यावरून

किंचित् पदर ओढून घेऊन अस्सल महाराष्ट्रीय पेहरावांत उषाकिरण उभी होती. किंचित् अधोमुख होऊन उजव्या हाताचें आंगठ्याजवळचें बोट तिनें हनुवटीवर टेकवलें होतें ! 'बस्स, हो गया काम' असें उद्गारून फलीनें बाकीचीं छायाचित्रें भराभर पिशवींत कोंबलीं व चापल्यानें त्यानें उषाकिरणचें छायाचित्र कॅमेऱ्यावर काळ्या कापडांत लपवून ठेवलें.

मग एकदम धांदल उडाल्यासारखें करून फलीनें घाईगर्दीनें कॅमेऱ्याची उघडमीट केली. उगीच तिकाटण्यांभोंवतीं गर्रकन् चार दोन फेऱ्या मारल्या व मग हातानें टाळी वाजवून तो म्हणाला, 'भटजी महाराज, जल्दी बुलाव लडकीको––'

खरं म्हणजे सुंद्री आंत माजघरांमध्यें केव्हांची तय्यार होऊन उभी होती. परंतु फोटोग्राफरची तयारी होईपर्यंत तिला त्या गर्दीसमोर बाहेर येण्याचें धैर्य होत नव्हतें. गणेशपंतांनीं तिला हांक मारतांच बाहेर अंगणांत उभ्या असलेल्या सर्वांच्याच नजरा गणेशभटजींच्या दरवाज्याजवळ खिळून राहिल्या. सुंद्रीची 'एंट्री' कधीं होते याची मार्गप्रतीक्षा सर्वजण करूं लागले.

झपाट्यानें पसरलेल्या काळोखी वातावरणांत सुंद्रीची त्याच रंगाची आकृति चटकन् नजरेंतहि येत नव्हती. त्यांतच तिला रंगसंगती कशी साधावी याचें ज्ञान नसल्यामुळें तिनें त्यांतल्या त्यांत जी काळ्या रंगाची एकुलती एक थोडी धड साडी होती तीच तिनें नेसली होती. तिची कृष्णकाया त्या कृष्ण वस्त्रांत पार गडप होऊन गेलेली असल्यामुळें संपूर्ण काळ्या कपड्याची एक काळी आकृतीच अंधारांतून पुढें सरकत असल्याचा सर्वत्रांना भास झाला.

'तें 'ध्यान' दृष्टीस पडतांच फलीचे हातपाय काष्ठवत् ताठ झाले. कॅमेऱ्यांत दडविलेल्या उषाकिरणच्या छायाचित्राकडे त्यानें एकदां पाहिलें व समोर उभ्या असलेल्या 'काळोखी' कडे पुन्हां पाहिलें व 'ये नहीं हो सकता' असें म्हणत तो मटकन् खालींच बसला.'

चार चौघांनीं त्याला धरून उभें केल्यावर त्यानें सरळ सांगितलें, कीं या लडकीचा फोटो आपण कांहीं काढणार नाहीं ! हो तिच्या नांवावर उषाकिरणचा फोटो खपवायला थोडें तरी साम्य असण्याची आवश्यकता होती !

परंतु सर्वांनीं फलीची परोपरीनें समजूत घातली व फोटो काढण्यास त्यास प्रवृत्त केलें. फलीनेंहि मग धाडस करण्याचें ठरविलें. हुकमी आवाजांत त्यानें फर्माविलें कीं, या लडकीचें उत्तम छायाचित्र निघावें अशी इच्छा असल्यास तो सांगेल त्याप्रमाणें मुलीला पोशाखांत फेरबदल करावे लागतील.

त्यांचें म्हणणें मान्य करण्यांत आल्यावर उषाकिरणनें जशी पांढऱ्या रंगाची साडी नेसली होती त्याच रंगाची साडी नेसून येण्यास त्यानें सुंद्रीला फर्माविलें. तिच्याजवळ पांढऱ्या रंगाची सुती साडी होती परंतु ती घड नव्हती परंतु गणेशपंतानीं आग्रह केल्यावर तिनें काळी साडी बदलून पांढरी साडी धारण केली. उषाकिरणच्या गळ्यांत कांहीं अलंकार शोभत होते म्हणून चार दोन नग सुंदरीनेंहि गळ्यांत अडकावावेत असा आग्रह फलीनें धरला. ट्रंका वळकट्या उपसून रमाबाईंनीं गळसरी, चप्पलहार सुंद्रीच्या गळ्यांत घाईघाईनें अडकविला. सुंदरीच्या नाकांत जुन्या पद्धतीप्रमाणें नथ होती, पण उषाकिरण्या छायाचित्रांत तशी ती नसल्यामुळें फलीनें ती काढून टाकावयास लावलें. असे किरकोळ फेरबद्दल करून झाल्यावर सुंद्रीला त्यानें किंचित् मान वांकवून उभें रहाण्यास सांगितलें. हाताचें आंगठ्याजवळचें बोट हनुवटीवर धरण्यास सांगितलें व किंचित् स्मित करण्यास सुचविलें.

पण तसें सांगण्यांत आपण मोठीच गलती केल्याचें फलीच्या लक्षांत लागलीच लक्षांत आलें. कारण सुंद्रीनें, त्यानें सूचना करतांच जें विलक्षण हास्य केलें तें पाहून फलीची अक्षरशः दांतखिळी बसण्याची वेळ आली. नंतर चार दोनदां उगीच इकडे तिकडे धांवपळ करून, खालीं वर वाकून मान उंचावून, मुरडून, 'पोझ' अशी घेण्यास, तशी घेण्यास सांगून फलीनें कॅमेऱ्याजवळील कोळ्या कापडांत डोकें खुपसलें. व बराच वेळ आंत खडबड खडबड केल्यावर 'रेडी ? असें विचारून नंतर 'खट्ट' असा आवाज काढला.

नंतर फलीनें तशीच चपळाई करून एका बाटलींतून कसलेंसें द्रव मिश्रण काढून पत्र्याच्या पात्रांत ओतलें. आणखी दोन बाटल्यांतून दुसरींच कांहीं द्रव्यें बाहेर काढलीं व झटकन् कॅमेऱ्याच्या काळ्या कापडाआड दडविलेलें उषाकिरणचें छायाचित्र त्या तऱ्हेतऱ्हेच्या पाण्यांतून अनेकदां बुचकळून काढलें. खिशांतून रंगीत टॉवेल काढून त्यानें आपले हात पुसले. व अत्यंत काळजीपूर्वक उषाकिरणच्या ओल्या छायाचित्राची एक कड दोन बोटांच्या

चिमटींत पकडून त्यानें तो फोटो हंसतच गणेशपंतांच्या हातांत दिला.

'पाहूं, पाहूं' म्हणत सर्वजण गणेशपंतांच्या भोंवतीं जमले व गर्दीच्या खांद्यावरून आपापलें डोकें उंचावून सुंद्रीच्या (?) चित्राकडे लक्षपूर्वक बघूं लागले. साडेसहाचा सुमार झालेला असल्यामुळें चित्र नीट दिसत नव्हतें, म्हणून फाणस आणण्यांत आला, कंदिलाच्या प्रकाशांत जो फोटो सर्वांच्या दृष्टीस पडला त्यानें प्रत्येकाचे डोळे दिपून गेले. फोटोग्राफरनें दाखविलेल्या कलेनें सर्वजण अक्षरशः चाट पडले. सुंद्रीच्या रूपाबद्दल आजपावेतों गांवांत उगीचच हेटाळणी होत होती. पण तें तिचें छायाचित्र पाहून सर्वांना पटलें कीं, आपली पहाण्यांतच कांहीं चूक होत होती! कदाचित् आपल्या डोळ्यांच्या बाहुल्याहि उलट्या झालेल्या असतील, अशी प्रत्येकाला साधार शंका आली. रमाबाईंना तर चित्रांतली सुंद्री पाहून आपल्या कन्येला कुठें ठेवूं व कुठें नको असें होऊन गेलें. सुंद्री तर तो फोटो दृष्टीस पडतांच हबकूनच गेली. 'अय्या, हा माझा फोटो, आई? किती छान आहे!' असे सुंदर सहजोद्गार तिच्या तोंडून बाहेर पडले.

या वेळपर्यंत फली मिस्त्रीचें जाकीट घामानें डबडबून गेलें होतें. आपली लबाडी उघडकीस आली तर गांवच्या लोकांचा मार खावा लागेल या शंकेनें तो घाबराघुबरा झाला होता. अत्यंत त्वरेनें त्यानें आपल्या सामानाची बांधाबांध केली व तिकाटणें खाकोटीस मारून तो भीत भीत गणेशपंतांजवळ] आला.

पण फलीच्या रूपानें परमेश्वरच आपल्याला पावला अशी गणेशपंतांच्या श्रद्धाळू मनाची भावना झाली होती. ते धांवत घरांत गेले व एक एक रुपयांच्या तीन नोटा फलीच्या हातांत देत गहिंवरून म्हणाले, 'फळीसाहेब तुम्हीं काम अगदीं बेमालूम केलें आहे. हे तुमचे पैसे घ्या--'

फलीनें घाईनें त्या नोटा हस्तगत केल्या व परत निघण्यापूर्वी खडा टाकून बघण्यासाठीं तो हळूच पुटपुटला, 'भटजी महाराज, छबी तो तुमारे पसंद आई है, मगर तुमने हमको दो रुपीया कमती दिया. पांच रुपया मंगता था–'

'गणेशपंत, द्यावेत त्याला पांच रुपये. त्याची कला आहे. कष्ट आहेत' धारूअण्णा मध्येंच म्हणाले.

फली मिस्त्रींनें त्यावेळीं पन्नास रुपये मागितले असते तरी कदाचित् गणेशपंतांनीं ते देऊन टाकले असते. त्याची दोन रुपयाची मागणी ते थोडीच नाकारणार ? आणखी दोन रुपये खिशांत सरकविल्यावर मग मात्र फली क्षणमात्र तेथें थांबला नाहीं. झपाझप पावलें टाकीत तो खालच्या आळीच्या दिशेनें अदृश्य झाला. काळ्याकुट्ट अंधारांतून त्याचे दोनच शब्द दूरून ऐकूं आले--' फो च्चो ऽऽ फो च्चो ऽऽऽ'

आणखी दोन दिवसांनी सुंद्रीचें तें चित्र वदपच्या इनामदारांच्या मुलाचे हातांत पडतांच त्यानें बसल्या जागेवरून चार फूट उंच उडी मारली. अशी मुलगी आपल्याला सांगून येईल याची त्याला स्वप्नांतसुद्धां कल्पना करतां येत नव्हती. ओ हो ! बाळाराव इनामदार त्या चित्राकडे नुसते एक-टक बघत बसले...काय डोळे, काय चेहरा, काय भाव, काय आविर्भाव ! वहाव्वा, बांधा कसा, कसा वर्ण छे, छे, असली मुलगी माझ्यासारख्याला कसली सांगून यायला...

बाळाराव धांवतच आंत गेले व वडिलांना म्हणले, 'तात्या, मला गणेशपंतांचीच मुलगी सांगून आलेली आहे ना ?'

'हो. कां ?' इनामदारांनीं विस्मयानें विचारलें.

'तर मग माझी पसंती कळवा त्यांना. मुहूर्तहि लवकरांतला लवकर धरा—'

आपला मुलगा एकाएकीं लग्नाचें बाशिंग बांधून उभा असल्याचें पाहून इनामदारांना मोठेंच नवल वाटलें. त्यापेक्षां त्यांना आधिक आनंदहि झाला. जो मुलगा वयाची पंचविशी उलटून गेली तरी अद्याप असाच कोरडा राहिला होता तो अचानक लग्नास तयार, नव्हे उतावीळ झालेला बघून त्यांना हायसें वाटलें.

'पण तूं ती मुलगी पाहिलीस का !' इनामदारांनीं चौकशी केली.

'पाहिली कीं—'

'कधीं रे ? नि आम्हांला नाहीं कळविलेंस ?'

'त्यांत काय कळवायचंय ? आजच माझ्या हातीं आली ती. तुम्हीं पहाल तर थक्क व्हाल--'

'पण मुलगी कुठें आहे?' आंतून इनामदारीणबाई बाहेर येत म्हणाल्या.

'माझ्या खिशांत आहे ती आई--'

आपल्या पुत्राला वेडबीड तर नाहीं ना लागलें या शंकेनें इनामदारांनीं मुलाला नजरेनें चाचपून पाहिलें. पण तेवढ्यांत त्यांच्या मुलानें खिशांतून सुंद्रीचें चित्र बाहेर काढलें व तें तीर्थरूपांच्या हातांत देत तो म्हणाला, 'पहा तिची छबी. कशी आहे मुलगी सांगा--'

इनामदारांची व इनामदारीणबाईंची वयपरत्वें दृष्टी फारच मंद झाली होती. हातांतील गुळगुळीत फोटोंत कसली तरी आकृति आहे इतकेंच त्यांना दिसलें. तथापि बराच वेळ निरीक्षण केल्यासारखें करून इनामदार म्हणाले, 'वा.! मुलगी फक्कड आहे. तूं कधीं पाहून येतोस?'

'तात्या, आतां पहायची बघायची बात नाहीं. तुम्हीं त्या गणेशपंतांकडे जा व काय तें ताबडतोब ठरवून टाका. हुंड्यासाठीं अडवूं नका. दागिन्यांचा हट्ट धरूं नका. करणीचें कांहीं विचारूं नका. सरळ जा व मुहुर्त ठरवून या–'

दुसऱ्या दिवशीं उजाडतांच बैलगाडींत बसून इनामदार दांपत्य गणेशपंतांच्या घरीं निघालें. सकाळीं नवाचे सुमारास तीं दोघें गांवांत शिरलीं तेव्हां वैद्य सावकार त्यांना प्रथम दिसले. गाडी थांबवून त्यांनीं चार दोन इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. व नंतर आपल्या येण्याचें प्रयोजन सांगितलें. सुंद्रीचा उल्लेख करतांच वैद्य सावकारांनीं तिच्या रूपाची जी प्रशंसा केली त्यानें इनामदारांना फारच बरें वाटलें. वाटेंत त्यांना गांवातील इतरहि माणसें भेटत गेलीं परंतु त्या प्रत्येकानें सुंदरीच्या सौंदर्याचेंच केवळ वर्णन त्यांना ऐकविलें. तिच्या फोटोवरून साऱ्याच गांवाला मनोमन हें पटलें होतें, कीं सौंदर्यशास्त्रांतलें आपल्याला कांहीं एक कळत नाहीं! जी सुन्द्री फोटोंत इतकी रूपवान दिसते ते खरोखरी कुरूप कशी असूं शकेल? आपल्या डोळ्यांतच कांहीं खोड असावी. दृष्टींतच कांहीं दोष असावा.

पंधरा दिवसांचे आंत मुहूर्त निश्चित झाला. आजुबाजूच्या दहा खेड्यांतील मंडळी वदपला जमा झाली इमानदारांच्या एकुलत्या एक मुलाचें लग्न म्हणजे काय साधी गोष्ट होती? घटिका बुडाल्यावर लग्न लागलें. अक्षदा पडल्या. अंतरपाट दूर झाला. बाळारावनें मोठ्या उत्सुकतेनें

वधूच्या गळयांत पुष्पहार घातला व तिच्या मुंडावळीआड दडलेल्या मुख-चंद्राकडे चोरटी नजर टाकली. अर्थात् त्या घाईगर्दीत त्याला धड कांहींच दिसूं शकलें नाहीं.

विवाहाचे इतर विधी हळूंहळूं पार पडूं लागले. सुन्द्रीला नीट न्याहाळण्याची संधी जसजशी बाळारावाला मिळूं लागली तसतशी त्याची चुटपट वाढूं लागली. त्यानें जें छायाचित्र पाहिलें व ही जी त्याची वधू म्हणून आतां मिरवत होती त्या दोघींत बराच फरक असल्याचें त्याला वाटूं लागलें. तो बराच खट्टूहि झाला. पण तेथें समारंभांत काय बोलणार ?

आणखी आश्चर्य बाळरावाला याचें वाटत होतें कीं, उपस्थितांपैकीं कुणीहि या मुलीला नांवें ठेवीत नव्हतें. गणेशपंतांच्या गांवचीं झाडून सारीं माणसें आलीं होतीं. तीं तर सुन्द्रीच्या रूपागुणाचें गाणें एकसुरांत अव्याहत गात होतीं. बाकी जी मंडळी तेथें जमली होती ती बहुतेक सर्व इनामदारांचीं आश्रित माणसें होतीं. स्वःत इनामदादांनीं पाहून पसंत केलेली व त्यांच्या चोखंदळ मुलाच्या मनांत भरलेली मुलगी असुन्दर असूंच कशी शकेल, अशी त्या सर्वांची भावना. झालंच तर इनामदारांची सून रूपानें साधारण म्हणणें त्या आश्रितांना परवडण्यासारखें नव्हतें. मग तीहि मंडळी एकदिलानें इनामदारांच्या सुनेचे गोडवे गाऊं लागलीं.

आपल्या नवपरिणीत पत्नीच्या रूपाची ही स्तुती बाळारावांच्या सारखी कानावर पडत होती व त्यांना स्वतःला सारखा अचंबा वाटत होता. त्यांना तर आपली बायको अतिसामान्य, नव्हे फारच कुरूपहि वाटत होती. परंतु जमलेलीं शेंकडों माणसें तिच्या देखणेपणाची वहाव्वा करीत असतांना त्यानीं तरी तिला कशी नांवें ठेवावीं ? बरें, जिचें छायाचित्र इतकें उत्कृष्ठ होतें ती सुन्दर नाहीं, असें होणारच नाहीं ! तिच्याकडे बघतांना आपलीच नजर उगीच चळत असणार, असें बाळारावांना हळूंहळूं पटूं लागलें. जिला जग चांगलें म्हणतें ती वाईट असणें शक्यच नाहीं, असाहि विश्वास त्यांना हळूंहळूं वाटूं लागला. त्यांनीं हेंहि मनांतल्या मनांत कबूल केलें कीं ज्या अर्थीं सारेजण तिच्या देखणेपणाची वारंवार तारीफ करतात, त्या अर्थीं ती खरोखरच सुन्दरी आहे. रूपवान आहेच. आपल्याला ती तशी दिसत नाहीं याचें

कारण आपल्यांत दृष्टिदोष आहे. आपल्या डोळ्यांच्या बाहुल्या निश्चित उलट्या बसविलेल्या असतील. त्याचा काय नेम ?

त्यानंतर भराभर दिवसांमागून दिवस गेले बाळाराव–सुन्दरीचा संसार सुरळीत सुरू झाला. वर्षाचे आंत इनामदारांच्या सुनेला पुत्ररत्न प्राप्त झालें. इनामदारांच्या व आपल्याहि नातवाचें तोंड पाहून, पेढे खाऊन गणेशपंत आपल्या गावीं परतत होते. सुन्द्रीचें संसारसुख पाहून मनांतल्या मनांत त्यांना सारखे आनंदाचे कढ येत होते. भराभर रस्ता काटून ते त्यांच्या गांवाच्या वेशीजवळ आले व गांवांत शिरणार तोंच त्यांच्या मागून कांहीं अंतरावरून शब्द ऐकू आले—' फोच्यो ऽ ऽ फोच्यो ऽ ऽ ऽ '

ती आरोळी ऐकतांच गणेशपंत सद्‌गदित होऊन जागच्या जागीं उभे राहिले. या फोटोग्राफरच्या रूपानें प्रत्यक्ष परमेश्वरच त्यांना पावला होता, अशी त्यांची अजूनहि श्रद्धा होती. कित्येक वर्षें, त्यांच्या ज्या मुलीचें लग्न जुळत नव्हतें, तिचें प्रत्यक्ष इनामदारांच्या मुलाशीं लग्न झालें होतें. संसार सुखांत चालला होता. आज तर नातवाचें बारसें जेऊन ते परत येत होते. गेलें वर्षभर जो फोटोग्राफर त्यांच्या दृष्टीस पडला नव्हता तो आज पुन्हा त्यांना दर्शन देत होता. तो फोटोग्राफर नव्हता, मूर्तिमंत ईश्वरच होता... फली मिस्त्री डोक्यावरील कॅमेऱ्याचें ओझें सांभाळीत, बगलेंतील तिकाटणें मागेंपुढें हालवीत समीप आलेला पहातांच गणेशपंतांनीं त्याला मोठमोठ्यांदा हाका मारल्या. ' अहो, फोटोग्राफर साहेब, अहो फोटोग्राफर...'

पण त्यांच्या हांका ऐकून फली मिस्त्री माघारीं वळला व जीव घेऊन पळत सुटला. गणेशपंत त्या फोटोग्राफरमागून, छे, त्यांच्या परमेश्वरामागून बऱ्याच लांबवर धांवत गेले परंतु तो गेला तो गेलाच. मात्र खूप दूर अंतरावरून त्याचे ते ठराविक शब्द ऐकूं आल्याचा त्यांना भास झाला, ' फोच्यो ऽ ऽ फोच्यो ऽ ऽ

० ० ०

# ५ .... स्वप्न

'अहो ऽऽ, अहो ऽऽऽ' नांव न घेतां नुसते माझ्या नांवानें ओरडत व हातवारे करीत असलेल्या त्या म्हाताऱ्याकडे मी नुसता वेड्यासारखा पहात उभा राहिलों! हा म्हातारा मला काय म्हणून बोलावीस आहे याचा कांहींच अदाज लागेना. माझी त्याची ओळख म्हणावी तर ती मुळींच नव्हती. यापूर्वीं त्याला मी नुसतें पाहिलेंसुद्धां नव्हतें. अन् तरीसुद्धां हा आपला माझ्या नांवानें मोठमोठ्यांदा शंख करीतच होता. त्याच्या या कृतीचें पहिल्यांदा मला नवल वाटलें व नंतर त्याचा रागहि आला. त्याच्या ओरडण्याकडे सरळ दुर्लक्ष करून मी तसाच वेगानें पुढें निघालों; इतक्यांत धापा टाकीत कोणीतरी आलें. 'अहो थांबा कीं! किती वेळचा हांका घालीत होतों तुम्हांला! आणि तुम्ही तर क्षणभर थांबायला तयार नाहीं! वा, वा!' माझ्या तोंडासमोर दिवे ओवाळल्याचा अभिनय करीत तो म्हातारा मोठमोठ्यांदा पुढें बोलूं लागला, 'पहा हो लोकानों, यांना मी इतक्यांदा हांका मारल्या. पण नुसतें, काय म्हणून विचारण्याचा सभ्यपणा यांनीं मला दाखविला नाहीं! याचें हें चुकलें कीं नाहीं सांगा! बरें, यांची न् माझी काय आजची का ओळख आहे? अन् तरीसुद्धां हे आपले मला टाळूं पहात होते! यांनीं बरें केलें का सांगा!'

'म्हातारबुवा' मी ओरडलों, पण पुढें काय बोलावें तें मला सुचेना. रस्त्यावरचीं पन्नास माणसें आमच्या भोंवतीं फेरा धरल्यासारखीं उभीं

राहिली होतीं. त्या सर्वांच्या चर्या त्या म्हाताऱ्याला अनुकूल अशाच दिसत होत्या. मी फार उर्मट व आढचताखोर माणूस असावा, अशा प्रकारचा भाव त्यांच्या नजरेंत स्पष्टपणें उमटलेला मला दिसला. त्यांचा हा गैरसमज दूर करणें आवश्यक होतें. 'पहा हो ?' मी म्हणालों. पण त्या म्हाताऱ्यानें मला पुढें बोलूंच दिलें नाहीं. आपला काळा कुळकुळीत पंजा त्यानें एकदम माझ्या तोंडावर दाबून धरला व दुसऱ्या हातानें माझा उजवा खांदा गच्च पकडून तो आपला मला विरूद्ध दिशेनें नेऊं लागला.

त्या म्हाताऱ्याला दूर झुगारून देण्याचें माझ्या मनांत आलें परंतु त्यानें माझा उजवा खांदा फार जोरानें धरून ठेवला होता हें एक, व लोकांना तो मला अशा प्रकारें नेत असतांना बिलकुल आश्चर्य न वाटतां सारें कांहीं बरोबरच घडत असल्याचें ठामपणें पटत असल्यामुळें, त्यांनीं त्याला विरोध तर केला नाहींच, उलट त्याला व मला जाऊं देण्यासाठीं मुद्दाम गर्दीतून मार्ग करून दिला; याहि कारणामुळें मी आपला निमूटपणें त्याच्याबरोबर जाऊं लागलों. गर्दीतून पांच पन्नास कदम चालून गल्यावर मी एकदम माझा हात सोडवून घेतला व म्हाताऱ्यास रागानें विचारलें, 'काय रे काय चावटपणा चालवला आहेस तूं ? माझा हात धरून मला कशाला बरोबर चालविलें आहेस ? उरलेले चार दांत घशांत घालून घ्यायचे आहेत काय ?'

'साहेब', काकुळतीच्या स्वरांत तो म्हातारा पुटपुटला. गहिंवरून गेल्यामुळें त्याच्या तोंडून धड शब्दसुद्धां फुटत नव्हता. त्याच्या काळ्याकुट्ट तोंडावर अंधारी दाटून आली, ती मला सायंकाळच्या काळोख्या संधिप्रकाशांतहि स्पष्टपणें दिसली. 'साहेब, असे रागावूं नका हो !' रडत रडत म्हातारा पुढें म्हणाला; 'आतां तर त्याच्या चेहऱ्याकडे बघवत नव्हतें. मूळचाच विद्रुप चेहरा आतां अगदीं वेडावांकडा झाला होता. साधारण काण्या डोळ्यांचा असलेला तो म्हातारा मोठमोठ्यांदा स्फुंदत होता व त्यामुळें त्याच्या डोळ्यांतून वाहणारें पाणी भराभर खालीं ओघळत होतें. त्याच्या नाकांतून व ओठांतूनहि आतां पाणी पाझरूं लागलें. डाव्या हाताच्या उलटचा मनगटानें त्यानें तें एकवार खसकन् निपटून काढलें व तो म्हणाला, 'साहेब, मी तुम्हांला हांका मारल्या, तुमची माझी ओळख नसतांनासुद्धां तुम्हांला

बोलावलें म्हणून तुम्ही प्रथम मला जोड्यांनीं मारा. त्याशिवाय माझें समाधान होणार नाहीं—'

आतां या म्हाताऱ्यापुढें करावें काय? माझ्या मनाला मोठा प्रश्न पडला. त्याचा खरं म्हणजे मला फार राग आला होता. पण त्या म्हाताऱ्याच्या डोळ्यांतील ते अश्रू पाहिले आणि त्याच क्षणीं माझें भावनाविवश मन हललें. त्याच्यावरील राग त्या अश्रूंत बुडून पार वितळून गेला. एवढें म्हातारा सांगतोय् तरी काय, अशी उलट जिज्ञासा मला वाटली. आतां तो अन् मी रस्त्याच्या एका अंगाला होतों. अंधार पडायला सुरवात झाली होती. रस्त्यावरील गर्दीहि कमी होऊं लागली होती. तेव्हां या म्हाताऱ्याचे मनोरथ चटकन् समजून घ्यावेत, शक्य असल्यास पुरे करावेत व मग घरीं परतावें असें माझ्या मनानें घेतलें व त्याबरोबर मी त्या म्हाताऱ्याला मऊ आवाजात विचारलें, 'म्हातारबुवा, तुम्हांला मला काय सांगायचें आहे? कशाला हांक मारली? तुम्हांला कांहीं मदत हवी काय?' बोलतां बोलतां मी खिशांत हात घातला व दोन आण्यांचें नाणें बाहेर काढलें. आजच माझा पगार झाला होता आणि त्यामुळें एरवीं कोणास दानधर्म न करणारा मी दोन आणे त्या म्हाताऱ्याला देण्यास तयार झालों होतों!

पण त्या म्हाताऱ्यानें मला चांगलेंच चकित केलें. 'साहेब,' तो म्हणाला, 'मला भीक मागायची नाहीं तुमच्यापाशी. अन्, तुम्हांला मला कसलीतरी भीक घालायची इच्छाच असेल तर एकच भीक घाला—माझें म्हणणें काय तें ऐकून घ्या. घेणार ना? एकढी दया करणार ना?'

'बरं चल, काय सांगतोस? घेतों ऐकून तुझं! पण काय तें लवकर सांग! घरीं माझे आईवडील वाट बघत बसले असतील. आतां चांगलाच काळोख पडूं लागला आहे. बोल, काय तें चटकन् बोल.'

'ऐका तर साहेब,' म्हातारा म्हणाला व मजबरोबर चालूं लागला. आतां तो दिशा बदलून माझ्या घराच्याच दिशेनें चालूं लागल्यामुळें मी त्याचे बरोबर झपझप पावलें टाकूं लागलों. म्हाताऱ्यानेंहि आपल्या कळकट धोतरानें आपलें भिजून चिंब झालेलें तोंड पुसून कोरडें केलें व मग माझ्या समवेत चालूं लागल्यावर तो म्हणाला, 'साहेब, तुम्हांला मी अशासाठीं हांक मारली—' बोलतांना म्हातारा अचानक कां थांबला हें पहाण्यासाठीं मी

त्याच्याकडे थबकून बघितलें. म्हातारा आपल्या कनवटीपाशीं हातानें कांहीं तरी सोडविण्यासाठीं खटपट करीत होता. पहातां पहातां म्हाताऱ्यानें कमरेची पुरचुंडी काढून हातांत घेतली व माझा उजवा पंजा पकडून त्यावर ती उपडी केली.

'किण् किण्' असा नाद झाला व माझ्या उघडया तळहातावर पिवळ्याजर्द सुवर्णाचा हार चमकूं लागला. चार पदरी सांखळ्यांचा तो हार फार जड व कलाकुसरीचा होता. त्या तशा अंधारांतहि तो चम्चम् चमकूं लागला.

म्हाताऱ्याच्या त्या कृतीनें तर मला धक्काच बसला! फाटक्या कपडयांच्या त्या म्हाताऱ्यापाशीं असला भारीपैकीं नग असावा, याचें मला फारच आश्चर्य वाटलें. म्हाताऱ्यानें खास तो कोठून चोरून आणला असावा असा मी तर्क केला व कांपऱ्या आवाजांत म्हाताऱ्यास म्हटलें, 'म्हातारबुवा, हा तुमचा अलंकार मला नको. ज्या कुणाचा तो आणला असाल त्याला परत नेऊन द्या कसा—'

आपले हात एकदम मागें घेत त्या म्हाताऱ्यानें चमकून माझ्याकडे पाहिलें. त्याचे चकणे डोळे रोषानें चमकले व एक पाऊल मागें सरून तो मोठ्या आवाजांत म्हणाला, 'मला काय तुम्हीं चोर समजतां साहेब? चोरून आणला असता तर हा दागिना मी आपणाला कशाला दाखविला असता? तुम्हांला हा विकत देण्यापेक्षां सोनाराकडे गेलों नसतों काय!'

'काय म्हणतां काय म्हातारबुवा?' मला वारंवार धक्के देणाऱ्या त्या महापुरुषाकडे निरखून पहात मी विचारलें, 'अन् त्यासाठीं मला तुम्हीं हांक मारलीत? मला नको हा हार. मी आपला जातों–'

'थांबा साहेब,' कांहींशा हुकमतीच्या स्वरांत म्हतारा उद्गारला, 'मी काय सांगतों तें ऐकून घेण्याचें आपण मला वचन दिलें आहे या म्हाताऱ्या अश्रूंची आपणास कांहीं किंमत नसेल तरच मला असे लाथाडून आपण चालूं लागाल—'

पुढें टाकलेले माझे पाय जागच्या जागीं जमिनीला खिळून राहिले. एकंदर ज्या ज्या गोष्टी घडत होत्या, त्या पाहून मी आतां खरोखरच भांबावून गेलों होतों. अजून कामावरून परत आल्यावर मी घरींसुद्धां गेलों नव्हतों,

घरचीं सगळीं माणसें माझी किती वाट पहात असतील, या आशंकेनें मी अस्वस्थ झालों व मग निश्चयानें पाऊल पुढें टाकलें!

'साहेब,' त्या म्हाताऱ्यानें जणूं माझा पिच्छाच पुरविला होता. 'हा हार आपण विकत घेतला पाहिजे. हा चोरीचा माल नाहीं. माझ्या आईचा दागिना आहे. एकेकाळीं मी फार श्रीमंत होतों पण दुर्दैवानें आतां भिकेस लागलों. सगळं सगळं गमावलं, बापाची मोठी थोरली इस्टेट उधळून टाकली. घर फुंकून टाकलें. दागदागिने सावकाराच्या घरांत घातले. या एका अलंकाराखेरीज मी पुरता निष्कांचन आहें. माझ्या आईचा हा सुवर्णालंकर आहे. आपल्या सुनेसाठीं तिनें तो राखून ठेवला होता, पण व्यसनांच्या नादीं लागून मी माझ्या आयुष्याची राख करून घेतली. आतां कांहीं माझें लग्न होणार नाहीं. त्याची इच्छाहि मला नाहीं; पण मातेची इच्छा थोडीफार तरी पुरी करावी या हेतूनें मी हा हार आपणांस देत आहें. आपण द्याल ती किंमत मी स्वीकारीन. कांहींहि दिलें तरी चालेल, पण तुमच्या बायकोच्या गळयांत हा अलंकार चमकला पाहिजे. तिला तो शोभून दिसेल. माझ्या आईला थोडेंफार समाधान वाटेल. तुम्हीं मला धाकटया भावासारखे व तुमची बायको माझ्या आईला धाकटया सुनेसारखी. नाहींतरी या हाराचा मला काय उपयोग? लाखों रुपये मी उधळले त्यांत या हाराचे असे काय पैसे मला येणार व त्यावर चैन ती मी काय करणार? दोन चार हजारांनीं माझ्या व्यसनी जीवनाची कितीशी तृष्णा भागणार? हा अलंकार आपण घ्याच व आपल्या बायकोला वापरायला द्या–'

'म्हातारबुवा, आपली कांहींतरी चूक होत आहे. माझें लग्न झालेलें नाहीं. सध्यां मला कर्तव्यहि नाहीं. तेव्हां आपला हा दागिना मला नको. दुसऱ्या कोणास द्या. तुम्हीं मलाच असा आग्रह कां करावा, याचें नवल वाटतें मला. मला आतां जाऊं देणार कीं नाहीं?'

आपली सारी हकीगत फार कळवळयानें त्या म्हाताऱ्यानें मला सांगितली होती. एकादा साधासुधा माणूस त्यामुळें फसला असता. त्या अलंकाराचाहि मोह त्याला आवरतां आला नसता. पण मी अजून सावध होतों. जगाचे अनेक व्यवहार मी पाहिले होते. त्या अनुभवांनी यावें तितकें

शहाणपण माझ्या गांठीं असल्याचा सार्थ अभिमान मला होता. त्या म्हाताऱ्याचा आतां मला चांगलाच संशय येऊं लागला होता. स्टेशनापासून माझें घर कांहींसें दूरच होतें. एका बाजूच्या विरळ वस्तीच्या भागांतून माझ्या घराकडील रस्ता जात होता. खिशांत आज सव्वादोनशें रुपये होते. त्या म्हाताऱ्याचा कपटी कावा मला समजला. पण त्या म्हाताऱ्यापेक्षां मी अधिक धूर्त आहें याची मला खात्री होती. तो आपली जी हकीगत सांगत होता ती बनावट होती हें मी ओळखलें होतें व मी तें ओळखलें हें त्यानेंहि ओळखलें असावें. त्याच्या जवळील तो अलंकार नकली आहे हें माझ्या लक्षांत आलें आहे, ही गोष्ट त्याच्याहि लक्षांत आली होती. हा मला बनवूं पाहतो, याचा अंदाज मी बांधला व मला बनविणें वाटतें तितकें सुलभ नाहीं असाहि तर्क म्हाताऱ्यानें केला. म्हाताऱ्याचें खरें स्वरूप ध्यानांत आल्यावर मी पुढील हालचाल फार शिताफीनें करण्याचें ठरविलें. अंधार आतां घनघट्ट झालेला होता. रस्त्यावर मिणमिणते दिवे होते, पण माणसें आज मुळींच नव्हतीं. सहजगत्या मी माझ्या डाव्या मनगटाकडे बघितलें. आठ वाजून पस्तीस मिनिटें झालीं होतीं. या म्हाताऱ्यानें बराच वेळ काढला होता. खोटचा गोष्टी सांगून मला गोत्यांत आणण्यासाठीं यानें फार खबरदारीनें पावलें टाकलो होतीं. संकटाच्या शिखरावर मी उभा होतों. पण अजून गाफिल झालों नव्हतों. थोडा काळ अजूनहि मघांचें नाटक चालूं करावें व मग अचानक त्या बदमाशाचा गळा पकडावा असा मी तात्काळ निश्चय केला. त्या म्हाताऱ्यापेक्षां मी अधिक बळकट होतों. त्याला मी तेव्हांच लोळवलें असतें, पण त्याचे साथीदार लपून बसलेले असण्याची शक्यता होती. तो ओरडला असता अथवा मी ओरडलों असतों तरी मी संकटाच्या दरींत कोसळल्यावांचून राहिलों नसतों. सहजगत्या त्या म्हाताऱ्याच्या मुसक्या बांधून मी त्याला बेशुद्ध करणार होतों व मग शिताफीनें पळणार होतों. या बेतास अनुसरून मी संभाषण चालूं ठेवण्याच्या इराद्यानें म्हाताऱ्यास म्हटलें, 'म्हातारबुवा, तेव्हां मी काय म्हटलें ते आपणांस पटलें ना? आपला हा ठेवा मजसारख्या भणंगाला कशाला देतां? दुसऱ्या योग्य व्यक्तीस द्या!'

'तुम्हीच ती योग्य व्यक्ती आहांत,' म्हातारा उचंबळून म्हणाला. त्यावर मनांत मी म्हटलें, 'म्हाताऱ्या, आपल्या कपटाचें सावज बनविण्यास

मीच तुला आज योग्य वाटलों नाहीं का ? पण थांब. अजून थोडा वेळ थांब. म्हणजे कळेल कीं. मोठा मासा छोटचा माशाचा गिळतोय का छोटा मासा थोरल्या माशाचें पोट फाडून बाहेर पडतोय् तो !' पण उघड मात्र मी एवढेंच म्हणालों, 'म्हातारबुवा, मला बायको नाहीं हा महत्त्वाचा मुद्दा आपल्या लक्षांत आला का ?'

'तो मुद्दा फार गौण आहे. जगांत इतर सर्व गोष्टींची वाण पडेल पण बायकांची कधीं पडणार नाहीं. तुझ्यासारख्या राजबिंडचा तरुणाच्या तर कैक देखण्या मुली मागें लागतील. आज नाहीं पण उद्यां तुला बायको येईल अन् मग हा हार तुझ्या उपयोगी पडेल. काढ तर आतां पैसे.'

इतकें म्हणून म्हाताऱ्याने माझा दंड पकडला. मी पण तयारच होतों. थाडकन् मी त्याच्या एक तोंडांत भडकावली व चटकन् त्याची मानगुट पकडली.

पण म्हाताऱ्यानें माझे सर्व अंदाज खोटे ठरविले. मी समजलों होतों त्याहून तो कित्येक पटीनीं चपळ होता. शक्तिमान् तर भलताच होता. आपली मान तर त्यानें कौशल्यानें सोडवून घेतलीच पण उलट माझ्या प्रतिकाराला न जुमानतां कमरेंत खोचलेला लांबचलांब चाकू त्यानें बाहेर काढला व माझ्या डोळचांसमोर धरला. त्या एकांत रस्त्यावर चिटपाखरूंसुद्धां नव्हतें, पण झाडाआडून नुकत्याच उगवलेल्या चंद्रबिंबाचीं किरणें सृष्टीवर पडूं लागलीं होतीं. मानवी डोळचांना जें दिसूं शकत नव्हतें ते सर्वसाक्षी निसर्ग पाहूं शकत होता. डोळचांसमोर त्या तीक्ष्ण शस्त्राचें तें लखलखतें पातें पाहून मी चरकलों. हा राक्षस तो चाकू माझ्या डोळचांत खुपसणार कीं काय, या भयानें मी सताड डोळचांनीं त्या म्हाताऱ्याकडे नजर फाडफाडून पाहू लागलों.

परंतु दुसऱ्याच क्षणीं तोंडांतल्या तोंडांत कांहीं पुटपुटत त्या म्हाताऱ्यानें माझ्या दोन्ही डोळचांत फुंकर घातली व खिशांतून कसलीसी भुकटी काढून मूठभर माझ्या तोंडावर फेकली. आतां त्याचें काम झालें होतें ! काळजीपूर्वक त्यानें चाकूचें पातें बंद केलें व तो पुन्हां जागचे जागीं ठेवला. त्या सोन्याच्या अलंकाराचीहि आतां त्याला गरज नसावी. निष्काळजीपणें त्यानें तो कमरेला खोवला व मग या साऱ्या हालचाली वेडचासारख्या पहात उभ्या असणाऱ्या मजकडे विजयी नजरेनें पाहून तो विरुद्ध दिशेनें चालूं लागला. एकाद्या

आज्ञाधारक कुत्र्यानें आपल्या धन्याच्या मागोमाग चालूं लागावें त्या प्रमाणें तोंडांतून अक्षरहि न काढतां मी त्या म्हाताऱ्याच्या मागून संथपणें चालू लागलों !

✦ ✦ ✦

त्यानंतर मी त्या म्हाताऱ्याबरोबर स्टेशनवर कसा आलों; तेथें आणखी दोघे इसम आम्हांला येऊन कसे मिळाले; आगगाडींत बसून आमचा प्रवास कसा झाला; कलकत्त्याला आम्हीं कसे येऊन पोहोंचलो; मैलोगणतीं प्रवास पायींच कसा केला व अखेरीस एका निर्जन ठिकाणच्या झोपडींत कसे येऊन पोहोंचलों इत्यादि सारी हकीकत माझ्या उघडचा डोळ्यांसमोर घडूनहि कोणत्याहि गोष्टीचा प्रतिकार मी करूं शकलों नाहीं. घडतें आहे तें काय आहे, असेंच घडत गेलें तर काय होणार आहे, व पुढें माझ्यासाठीं दैवानें वाढून तरी काय ठेवलें आहे याची पुसट देखील कल्पना माझ्या मनाला नव्हती. शरीराच्या एकाद्या विशिष्ट भागाला भूल येण्याचें इंजेक्शन दिल्यावर त्या भागावर कांहींहि प्रयोग करावे, तशी माझ्या साऱ्या देहाची व मनाची अवस्था झाली. माझ्या मनावर त्या म्हताऱ्यानें काय जादूटोणा केला तो मला कळला नाहीं, परंतु त्यानें माझ्या मनाचे लगाम आपल्या हातीं घेतले, इतकी गोष्ट मात्र खरी होती, अन् म्हणून तो म्हणेल त्याप्रमाणें निमूटपणें मी वर्तन करीत होतों. परंतु त्या झोंपडींत येऊन पोहोंचल्यावर हळूहळू माझी स्मरणशक्ति परतूं लागल्याचें मला जाणवलें व त्याचवेळीं डोक्यांत एकदम ठणका सुरू झाल्या. एकाद्या मडक्यांतील पाणी खळखळून घुसळावें त्याप्रमाणें माझ्या मस्तकांत विवेक व विवेकशून्यता, सुजाणता व अजाणता, अर्थघनता व अर्थहीनता आणि थोडक्यांत म्हणजे ज्ञान व भूल यांचे प्रचड द्वंद्व सुरू झालें. अतिशय निकरानें, पराकाष्ठेच्या अटीतटीनें या दोन प्रतिस्पर्धी शक्ति आपापसांत झुंजत असाव्यात. कारण त्या अपरंपार वेदनेनें माझी शुद्ध हरपली व तोंडाला फेंस येऊन मी धाडकन् भूमीवर बेशुद्ध पडलों.

आणि त्यानंतर बरोबर तीन दिवसांनीं मी जाणीवेच्या कक्षेंत परत येऊन उभा राहिलों. झोंपेंतून जितक्या सुलभतेनें जाग यावी, नशेंतून अलगद स्मृतींच्या क्षेत्रांत परतावें, त्याप्रमाणें बेहोषींतून मी अचानक शुद्धीवर आलों. आतां पुन्हां माझ्यांतील 'मी' माझ्यांत आला होता. माझें गमावलेलें 'मी-पण' मला फिरून एकवार प्राप्त झालें. त्या मोहांतून सहीसलामत निसट-

त्यावर माझे मन:चक्षू आपोआप उघडले. धुकें वितळल्यावर दिशा स्वच्छ होऊन सर्व कांहीं दिसूं लागावें त्याप्रमाणें अंतर्यामीं मनाचा संज्ञाप्रवाह सुरू झाल्यावर मी आहें तरी कोणत्या परिस्थितींत याबद्दल विचार करूं लागलों. सूर्योदयानंतर प्रकाश पहाण्यासाठीं फुलांनीं आपल्या पाकळया उघडाव्या तद्वतच त्या झोपडींतील प्रकार अवलोकिण्यासाठीं गेले तीन दिवस बंद असलेल्या पापण्यांचीं किवाडें संपूर्ण खोलून मी सर्वत्र शोधक नजर टाकली.

आणि दुसऱ्याच क्षणीं माझ्या जें कांहीं दृष्टीस पडलें त्यानें मी चकित झालों व डोळे विस्फारून पाहूं लागलों. माझ्यापासून थोडयाच अंतरावर एक पाठमोरी प्रौढ स्त्री आपली केशभूषा शृंगारत बसली होती. पंजाबी पद्धतीचा भडक पोषाख जरी तिच्या अंगावर होता तरीसुद्धां बाजूला पड-लेल्या रेशमी काळया ओढणीवरून व त्या स्त्रीच्या एकंदर स्वरूपावरून ती मुसलमान युवती असावी असा मी तर्क केला. पुढयांतल्या विलारी आरश्या-पुढें बसून ती केंसांवरून फणी फिरवत होती. वयानें ती तिशीच्या पुढली दिसत होती, परंतु तिच्या एकंदर बांध्यावरून व डौलावरून ती मुळची फार मोठया खानदानी कुटुंबांतील असावी याबद्दल माझी खात्री पटली. याहि वयांतील तिच्या अभिजात सौंदर्याकडे पाहून ती भर तारुण्यांत कशी दिसत असेल याबद्दल कल्पनेच्या स्वैर भराऱ्या त्या तशाहि अवस्थेंत मी मारूं लागलों.

मनुष्यस्वभाव कसा विचित्र आहे पहा ! खरं म्हणजे केवढया मोठया चमत्कारिक परिस्थितींत मी होतों ! मुंबईच्या माझ्या रहात्या उपनगरांतून इकडे दूर कलकत्त्याला मला मोहिनी विद्येच्या सहाय्यानें आणून टाकलें होतें. एरवीं पुणें आणि मुम्बई यामधील प्रदेशाव्यतिरिक्त मी कुठेंहि केव्हांहि प्रवास केला नव्हता. आपला व्यवसाय बरा कीं आपण बरे असा विचार करणारा मी एक सरळमार्गी मनुष्य या बदमाष लोकांच्या तावडींत सांपडलों होतों. मला इकडे कशाकरिता आणलें व पुढील कार्यक्रम काय आंख-ण्यांत आला आहे याची अंधुकशी कल्पनाहि मला नव्हती. माझ्या घरची मंडळी माझ्यासाठीं जीवाच्या आकांतानें काळजी करत रडत बसली असतील हेंहि मी समजूं शकत होतों. कलकत्ता शहरांतील नेमक्या कोणत्या भागांत मी आहें व या झोंपडींतील ही बया कोण आहे याची मला माहिती नव्हती. तरीही त्या स्त्रीचें तें लावण्य पाहून माझ्या तरुण रक्तांतील नैसर्गिक प्रवृत्ती

उसळून वर आल्या. अगदीं टक लावून मी त्या स्त्रीच्या एकंदर आविर्भावांकडे व अंगाविक्षेपांकडे निरखून बघत बसलों पण माझी समाधी अचानक भंग पावली. एकाएकी मागे वळून त्या स्त्रीनें माझ्याकडे पाहिलें. त्या स्त्रीच्या मनकवडेपणानें मी आश्चर्यचकित झालों. व ती आतां काय करते तें आ वासून पहात बसलों.

त्या स्त्रीचा सतेज गौर चेहरा माझ्या दृष्टीस पडतांच माझी जणूं नजरबंदी झाली. पण इतक्यांत त्या स्त्रीनें खालीं पडलेली आपली काळी ओढणी डोक्यावरून पांघरली. पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रबिंबानें काळ्या मेघपटलात शिरावें असा मला भास झाला. अदृष्य होतां होतां ती चंद्रमुखी माझ्याकडे पाहून कौतुकानें हंसली होती, हेंहि मला तितक्यांतल्या तितक्यांत जाणवल्या-वांचून राहिलें नाहीं !

परंतु माझी ती कल्पना चुकीची असेल कदाचित कारण ती स्त्री सरळ माझ्या खाटेकडे आली व घुंघटांतून मजकडे बघत उपराधिक छद्मीपणानें म्हणाली ‘ अच्छा ! तो तुम अभी होशपर आगये ! ठीक, ठीक ! तो ये ले बदला ! ’ इतकें म्हणून तिनें काडकन् माझ्या गालावर आपल्या पंजानें प्रहार केला. तिच्या त्या कृत्यानें मी थक्कच झालों. फार निराळ्या कल्पना मी या स्त्रीबद्दल केल्या होत्या अन् त्या कल्पनांशीं तिचें तें वर्तन सर्वस्वीं विसंगत होतें. ‘दुष्ट माणसा ! ’ ती स्त्री आतां शुद्ध प्राकृत भाषेंत बोलूं लागली, ‘आमच्या मालीकनां तूं त्या रात्रीं अशीच तोंडांत भडकावली होतीस ना ? त्या त्यांच्या अपमानाचा सूड घेतला मी आतां ! तूं शुद्धीवर आल्यावर तसें करण्यास त्यानींच मला सांगितलें होतें ! ’

‘ तें तूं फार मोठें सत्कृत्य केलेंस ! ’ संतापानें मी ओरडलों व त्या स्त्रीवर धाऊन जाण्यासाठीं खाटेवरून उठण्याचा प्रयत्न करूं लागलों. परंतु जागचा कांहीं मी हलूं शकलों नाहीं. माझे सर्व अवयव कमालीचे अशक्त झाल्याचें माझ्या लक्षांत आलें. अन् हें माहीत असल्यामुळें ती स्त्री पूर्ण बेफिकीरपणानें माझ्या निरर्थक खटाटोपाकडे पहात होती. मीहि तिच्याकडे संतापानें जळणाऱ्या नजरेनें बघत होतों. माझ्या नजरेचा तिच्या मनावर योग्य तो परिणाम होत असावा अशीहि माझी हळूहळू समजूत होऊं लागली.

कारण ती नुसती अविचलपणें मजकडे पहात होती. माझ्यावर तशा प्रकारचा तो ' सूड ' घेतल्यावर ती जें बोलली त्यांतील अगतिकताहि आतां माझ्या लक्षांत आली. हुकुमाची मी ताबेदारीण असल्यामुळें इच्छा नसतांनाहि मला तुझ्याशीं अशा प्रकारचें वर्तन करणें भाग पडत आहे, अशा प्रकारचा संदिग्ध भाव मला तिच्या लपलेल्या चेहऱ्यावर चमकला असल्याचा भास झाला !

पण तो केवळ भासच असावा ! कारण त्या स्त्रीचें स्वरूप फिरून अचानक बदललें. ' मूर्ख मनुष्य ! ' ती त्वेषानें ओरडली. ' तुझ्या कोठल्याहि बोलण्यानें मी फसणारी नाहीं तुझ्या कोवळ्या तरुण वयाकडे व निरागस टवटवीत रूपसंपदेकडे पाहूनहि मी माझ्या कामांत चूक करणार नाहीं. शहाणा असशील तर मुकाटचानें पडून रहा. तूं कोठल्या परिस्थितींत आहेस याची तुला मुळींच कल्पना नाहीं. '

' ती समजून घेण्याची मला जरुरीहि नाहीं. ' बेपर्वाईच्या सुरांत मी म्हटलें, ' त्या सैतानांनी जें काय करायला तुला फर्मावलें आहे तें तूं बेशक करून टाक ! '

' तेंच आतां करतें आहें ! ' इतकें म्हणून तिनें पलीकडच्या खोलींतून एक दोरखंड आणला व माझे हातपाय करकचून जखडायला सुरवात केली. तिला आपलें काम करायला बराच वेळ लागला, कारण मी जरी अतिशय अशक्त झालों होतों तरी तिच्याशीं निकरानें प्रतिकार करायचें सोडलें नाहीं. परंतु बाईमाणूस असूनहि ती अतिशय सुदृढ असावी यांत शंका नाहीं ! तिनें माझे हात बांधले व नंतर पायहि जखडून टाकले. इतकें आटोपल्यावर ती घामानें निथळूं लागली. तोंडावरील तिची ओढणी आतां जाग्यावर नव्हती. त्याबद्दल तिलाहि आतां कांहीं वाटत नव्हतें. क्षणभर माझ्या खाटेपाशीं उभें राहून भावशून्य दृष्टीनें ती माझ्याकडे पहात बसली व मग एकदम भानावर येऊन, ' चांगली अद्दल घडली ! ' असें पुटपुटत पलीकडच्या खुर्चीवर जाऊन खिडकीबाहेर डोळे लावून बसली.

परंतु ती ज्याची वाट पहात बसली होती तो तिचा मालिक थोड्याच वेळांत परत आला. लाथेनेंच त्यानें झोपडीचें दार उघडलें व मग माझ्याकडे नजर टाकतांच तो त्या स्त्रीच्या अंगावर एकदम खेकसला, ' मुमताज, या हरामखोराला तूं नुसत्या दोरीनें बांधून ठेवलेलें आहेस ! आपला नेहमीचा

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

साखळदंड तूं कां नाहीं वापरलास ?'

'मालिक,', मुमताज मृदु आवाजांत बोलूं लागली तसा मी आश्चर्यानें थक्कच झालों. कारण मघाशीं तिचें माझ्याशीं जें संभाषण झालें त्यावेळी करड्या रांकट आवाजांत ती बोलत होती अन् आतां त्या कर्दनकाळ म्हाताऱ्याशीं बोलतांना तिचा स्वर सनईसारखा सुमधूर होता ! ही बाई जर गायला बसली तर स्वरसंगीताची काय बहार उडवून देईल असाहि विचार माझ्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. तिचे मंजुळ आवाजांतील बोल मी लक्षपूर्वक ऐकूं लागलों. 'मालिक', मुमताज पुढें म्हणाली, 'या नीच पोरट्याच्या अंगांत कांहीं त्राण उरलें आहे काय ? अवघ्या मिनिटभरांत मी याला जखडबंद करून टाकला. या शेळपटाला करायचे काय ते साखळदंड ?'

'तें खरं पण काळजी घ्यायला पाहिजे आपल्याला. तीं माणसें आणखीं आठ दिवसांनी इकडे येणार आहेत तोंपर्यंत याला सांभाळलें पाहिजे आपल्याला. आजच तीं माणसें येणार होतीं म्हणून त्यांना आणायला मी स्टेशनावर गेलों होतों, पण त्यांचा पत्ता कुठंय ? बाकी बदमाषांचा भरंवसा तो काय देतां येणार '

'खरं आहे !' त्या म्हाताऱ्याकडे कुचेष्टेनें पहात मी उत्तरलों. माझें मध्येंच झालेलें बोलणें ऐकून म्हातारा एकदम दचकला. मग लागलीच संतापानें तो नुसता खवळून गेला. थरथर कांपत तो माझ्या दिशेनें धांवून आला व माझ्या अंगावर हात टाकणार तोंच त्वरेनें मुमताजनें म्हाताऱ्याच्या दिशेनें धांव घेतली व त्याचे हात पकडून तिनें त्याला मागें खेंचलें.

परंतु मुमताजच्या या कृतीनें म्हातारा अधिकच क्रोधाविष्ट झाला. 'मुमताज–' तो किंचाळला, 'मुकाट्यानें दूर हो ! याला याच क्षणीं जगांतून नाहींसा करतों. माझा हा दुसऱ्यांदा अपमान करीत आहे.'

'मालिक, शांत व्हा डोकें थंड ठेवा. माझें एका, अविचार करूं नका, याला आहे त्या स्थितींत त्या माणसाचे स्वाधीन आपल्याला करायचा आहे. तुम्ही याचा आत्तांच प्राण घेतलात तर आपले सारेच परिश्रम वांया नाहीं का जाणार ? आणि तुमचें हें कृत्य त्या टोळीवाल्यांसहि आवडणार नाहीं. कालच त्यांची तार आली आहे ना, कीं एक माणूस तांतडीनें हवा आहे म्हणून. दूर व्हा अन् हात आवरा !'

आणि त्यानंतर एकाद्या लहान मुलानें सांगितल्याप्रमाणें ऐकावें, त्याप्रमाणे तो म्हातारा हळूहळू दूर झाला. 'मुमताज,' तो धांपा टाकीत म्हणाला, 'पण मी जातांना सांगितल्याप्रमाणें तूं याचा सूड घेतलास का ? चामड्याच्या वादीनें त्याला आडवा उभा फोडून काढलास का ?'

'थेरड्या, या दुष्ट बाईनें माझी चामडी सोलून काढली !' म्हाताऱ्याच्या बोलण्यावर काय उत्तर द्यावें याबद्दल क्षणमात्र थबकलेल्या मुमताजच्या मदतीला मी धांवलों. 'राक्षसा, या बाईच्या हातून मला असली क्रूर शिक्षा देण्याऐवजीं तुझा तो तीक्ष्ण चाकू खुपसून माझा तूं प्राण कां घेत नाहींस? म्हाताऱ्या, असा इकडे ये व डोळे फाडून बघ हिनें माझी काय दुर्दशा केली आहे ती...!' इतकें बोलून मी माझ्या अंगावरील कपडे दूर करण्याची खोटीच खटपट करूं लागलों !

माझ्या अभिनयाला तो म्हातारा फसला व तें पाहून तशाहि परिस्थितींत मला हर्ष झाल्यावांचून राहिला नाहीं.. या म्हाताऱ्याच्या कचाटयांतून सुटूं शकेन असा पूर्ण विश्वास मला आतां वाटूं लागला होता. मुमताजची एकंदर वर्तणूक बघून मी माझ्या भोंवतालच्या तुरुंगाची कच्ची वीट शोधून काढली होती. तिनें माझ्या तोंडांत मारली होती, दोरीनें आवळून बांधलें होतें व माझी निंदाहि केली होती. पण तें सारें खोटें होतें हें मुमताजच्या आतांच्या वागणुकीवरून मी तेव्हांच ताडलें. माझ्याबद्दल मुमताजला विशेष कांहीं वाटलें होतें, यांत मला तिळमात्र संदेह उरला नव्हता. माझ्यावर ती प्रेम करूं लागली आहे हेंहि मी ओळखलें होतें. हिच्या साहाय्यानें त्या म्हाताऱ्याच्या हातावर तुरी देणें कांहीं माझ्यासारख्याला अशक्य नव्हतें ! किंबहुना केवळ माझ्यासारख्यालाच तें शक्य होतें. मी फारसा हिंडलों फिरलों नव्हतों पण मनानें मी अतिशय निर्भय होतों. अशा प्रकारच्या धाडसी कथा मी अनेकदां वाचल्या होत्या. अनेक गोष्टींचें निरीक्षण केलें होतें. संकटें काय असतात हें मी अनुभवलें नव्हतें पण माझ्या मस्तकावर कधीं काळीं तीं कोसळलीं तर त्यानीं न खचण्याइतकी मनाची अविचल अवस्था मी कमवून ठेवली होती. खरें म्हणजे तीं संकटें एकदां अनुभवायला मिळावीं असेंच मला मनापासून वाटत होते. या आपत्तींत सांपडण्यापूर्वी पहिल्या फेरींत मी पराभूत झालों होतों ही गोष्ट नाकबूल करण्यांत काहींच अर्थ नव्हता. आतां दुसऱ्या

फेरींत मात्र मी त्या म्हाताऱ्यावर मात करून विजय संपादन करणार होतों, यांत अणुमात्र शंका नव्हती ! या आत्मविश्वासानें माझें मन तजेलदार झालें व मुमताजच्या बोलण्याकडे मी लक्षपूर्वक कान देऊन उघड्या डोळ्यांनीं तिच्या एकंदर अविर्भावांकडेहि एककट नजरेनें पहात राहिलों.

'मालिक, या हरामखोराकडे आपण मुळींच लक्ष देऊं नका. मी याला माझ्या ताब्यांत घेऊन ठेवला आहे.यापूर्वींचाहि तुम्हांला अनुभव आहेच. सर्वांना कसें मी सरळ केलें हें तुम्हीं पाहिलें आहे ना ? मग या कुत्र्याची काय कथा ! याला तुम्हीं येण्यापूर्वीं मी असा लंबे केला ! असा सोलून काढाला ! यानेंच आत्ता सांगितलें ना ? या नीचाला--!'

तुम्हींच एकजात सारे नीच लोक आहांत. या थेरड्याला तर जिवंत जाळला पाहिजे...!'

परंतु मुमताजनें मला पुढें बोलूं दिलें नाहीं. धावत येऊन तिनें माझें तोंड आडवें उभें फोडून काढलें. माझ्या ओठांतून रक्त झिरपूं लागल्यावर ती दूर झाली. त्यावेळीं आनंदातिशयानें त्या म्हाताऱ्यानें घशांतून चमत्कारिक चीत्कार काढला. 'शाबास मुमताज ! असाच साल्याला वठणीवर आणला पाहिजे.' असें म्हणत त्यानें मुमताजला जवळ ओढून घेतलें व निर्लजपणें तिच्या गुलाबी गालाचे अधाशीपणानें पटापट मुके घेतले.

परंतु मला सर्वाधिक नवल वाटलें तें मुमताजच्या थंडपणाचें. तो म्हातारा जें कांहीं करीत होता त्याला तिचा विरोध बिलकुल नव्हता. तिच्याकडे मी पाहिलें तों तिनें आपले डोळे घट्ट मिटून घेतलेले दिसले. तर काय या म्हाताऱ्याच्या असल्या कृतीनें तिला सुख वाटत होतें ? कां तें सारें सहन होत नाहीं म्हणून अगतिकपणें ती तें सारें सारें सोशीत होती ! तिच्याकडे असा वेड्यासारखा मी पहात होतों तोंच त्या म्हाताऱ्यानें मुमताजला पलीकडल्या खोलींत नेलें व माझ्याकडे ढुंकूनहि न बघतां त्यानें त्या खोलीचें दार धाडकन लावून घेतलें !

✦ ✦ ✦

त्यानंतर माझा त्या झोपडींतील कार्यक्रम ठरल्यासारखा झाला. कांहींहि कार्यक्रम नाहीं, हाच तो कार्यक्रम होता. पण कार्यक्रम नसला तरी कार्यक्रम कांहीं कोणासाठीं थांबून बसत नाहीं. त्या झोपडींत शुद्धीवर आल्यावर चार

दिवस तर हां हां म्हणतां उलटून गेले. खरें म्हणजे मला इकडे आणून टाकल्यावर मला थोडी स्वस्थता मिळायला हवीच होती. नाहीं म्हटलें तरी मला त्या आपत्तीचे चार सहा तडाखे बसलेच होते. मुमताजानें त्या सायंकाळीं म्हाताऱ्यासमक्ष माझें तोंड रक्तबंबाळ केलें तेव्हां तर वेदनानीं माझें हृदय व्याकुळ होऊन गेलें. तिनें खरेंच फार जोरानें तडाखे दिले होते. माझ्यावरील प्रेमामुळेंच तिनें तें कृत्य म्हाताऱ्याला करून दाखविलें, याबद्दल मी निःशंक होतों. त्या म्हाताऱ्याशीं तिनें जी प्रकारणा सुरू केली होती, त्याचा अविश्वास करण्याचें जें कारस्थान तिनें योजलें होतें तें तडीस नेण्याच्या हेतूनेंच तिला तसें नाटक करणें क्रमप्राप्तच होतें. माझ्यावर उपकार करण्याच्या भावनेनेंच तिनें मला शासन केलें होतें. आपल्या प्रेमाचें शिक्कामोर्तबच जणूं तिनें माझ्या गालांवर केलें होतें ! तिचे ओठ जरी माझ्या गालावर टेकवले गेले असते तरीसुद्धां जें प्रेम तिला व्यक्त करतां आलें नसतें तें माझ्या गालावर हातांनीं प्रहार करण्याच्या कृत्यानें तिनें स्पष्ट केलें. प्रेमभावनेच्या या मूलतः विरोधी दिसणाऱ्या कृतीनें मी थक्क होऊन गेलों होतों ! काळोख्या रात्रीं एखाद्या गोड मुग्ध तरुणीचें चुंबन घेण्यांत जें काव्य नव्हतें तें या प्रौढ स्त्रीच्या नाटकी कठोरतेंत होतें ! आपल्या हाताचीं पांचहि बोटें माझ्या गालावर उमटवून जणूं तिनें आपल्या प्रणयभावनेचें चिन्ह गोंदवून ठेवलें होतें. माझ्यावरील तिची ही विरोधी भक्ति पाहून मला अचंबा वाटल्यावांचून राहिला नाही. तिनें केलेल्या उपकाराच्या ओझ्यानें माझें मन तिच्यापुढें विनम्र झालें. तिनें मदत देण्याचें नाकारलें असतें तर त्या सैतानाच्या तावडींतून मुक्त झालों नसतोंच असें कांहीं नव्हतें. माझा आत्मविश्वास इतका जबर होता कीं खरं म्हणजे त्या रहस्यमय तरुणीच्या मदतीची मला आवश्यकतासुद्धां नव्हती. तिच्यासुद्धां त्या म्हाताऱ्यावर मी खचित मात केली असती. पण त्या केवळ कल्पनेंतील गोष्टी होत्या ! त्याचें काय सांगावें, कदाचित मुमताजच्या मदतीविना मी कधीं मोकळा होऊं शकलोंहि नसतों. नुसत्या आत्मविश्वासाच्या बळावर ईप्सितें साध्य होत असतीं तर जगांत कर्तबगारांची उणीव कशाला कधीं पडती ? अन् याच विवेकानें मी त्या तरुणीचा सहाय्यार्थ पुढें केलेला हात स्वीकारला. आपला हात कायमचाच माझ्या हातांत देण्याची तिची इच्छा

होती, हेंहि मी केव्हांच ओळखलें होतें. मला मदत करून त्या म्हाताऱ्याला ठकविण्यांत तिचा दुसरा काहीं हेतू असणें कधींच संभवनीय नव्हतें !

पण तिच्या वर्तनानें माझी मात्र अत्यंत चमत्कारिक परिस्थिती झालेली होती. तिची मदत मी स्वीकारूं शकत नव्हतों. तिचें सौंदर्य निर्विवाद होतें, हें सत्यच होतें. तिचें धाडस अतुलनीय होतें, हें अमान्य करतां येण्यालायक नव्हतें. माझ्यावरील जीवापलीकडच्या प्रेमानें तिनें स्वतःच्या जीवाची मातब्बरी न बाळगतां माझा जीव वांचविण्याचा निश्चय केला होता हेंसुद्धां मीं नाकारूं शकत नव्हतों. आणि हें सारें पटत असूनहि तिला माझें हृदय अर्पण करण्यास कबूल होणें मला केव्हांच शक्य नव्हतें. ती मला जें सहाय्य करीत होती त्याला मी मदत म्हणत होतों, उपकार म्हणत होतों. यामागची माझी भावना हीच होती. तिच्यावर माझें उत्कट प्रेम बसलें असतें तर या सहाय्याकडे मी निराळ्या दृष्टीनें पाहिलें असतें. तसें सहाय्य ती करीत आहे हें पाहून मी म्हटलें असतें कीं ही आपलें कर्तव्य करीत आहे म्हणून ! पण तसें मला वाटत नव्हतें. वाटण्याची लवमात्रदेखील शक्यता नव्हती. पण मला तसें म्हणता आलें असतें तर बरें वाटलें असतें. तिचें प्रेम स्वीकारून त्या मोबदल्यांत माझें प्रेम मी तिला अर्पूं शकलों असतों तर मला अधिक आनंद झाला असता पण दुर्दैवानें नेमकें तसें घडत नव्हतें अन् म्हणूनच माझ्या मनाची मोठी विचित्र अवस्था झालेली होती !

मुमताजचा मालिक सकाळचा बाहेर जायचा. तो झोंपडींत असला कीं ती जशी माझ्याशीं वागायची त्याच्या बरोबर उलट वर्तणूक तो गेल्यावर ती दाखवायची. तो असतांनां ती मला शिव्या द्यायची पण तो गेल्यावर माझी स्तुति करायची. तो असतानां ती मला लाथाडायची पण तो गेल्यावर मला कुरवाळायची. तो असतांनां ती मला कदान्न भक्षिण्यास द्यायची, पण तो गेल्यावर ती मला सुग्रास भोजन करण्याचा आग्रह करायची. तो असतांनां ती माझ्याकडे मारक्या म्हशीसारखी बघायची, तो गेल्यावर हरिणीसारख्या काळ्या भोर टप्पोऱ्या डोळ्यांनीं मला न्याहाळायची; आपल्या दोन डोळ्यांत मला सांठवून ठेवायची.

'मुमताज,' मी म्हणायचों, 'मुमताज, माझ्यावर तूं प्रेम तर करीत नाहींस ना ?'

‘ नाहीं रे, तुझा मी द्वेष करतें. खरंच सांगतें. मला तुझा फार फार संताप येतो. आजपर्यंत कोणावरहि माझें मन बसलें नव्हतें तें तुला पाहून फसलें. आजपर्यंत शेकडों जणांनां गुलाम म्हणून मी सोन्याचा चोरटा व्यापार करणाऱ्या टोळीला विकलें पण तुझ्या बाबतींत मात्र माझ्या कर्तव्याला मी चुकलें. तुला गुलाम बनविण्याऐवजीं मीच तुझी गुलाम बनलें आहें व म्हणूनच मी तुझा फार द्वेष करतें. माझ्या मनाविरुद्ध तूं मला तुझ्यावर प्रेम करावयास भाग पाडीत आहेस म्हणूनच माझा तुझ्यावर अतोनात संताप आहे. रागाऐवजीं अनुराग करण्यास तूं मला, कसें कोण जाणें—पण भाग पाडलें आहेस. म्हणून अत्यंत नावडता असूनहि तूं माझा अत्यंत आवडता झाला आहेस. तुझा गळा कापण्यासाठीं खरं म्हणजे तुला येथें आणलें असतां, तुझ्या गळ्यांत गळा घालून मी बसतें आहें. अन् याच कारणानें मी खरोखर वेडी झालें आहें. वेडी होतें ती शहाणी झालें कीं शहाणी होतें ती वेडी झालें हेंहि मला कळेनासें झालें आहे. तूं सांगशील का मला हें ?’

अशा प्रकारें बोलून मुमताज माझ्या खाटेवर मला खेटून बसायची. माझ्या तोंडवरून हात फिरवायची, कपाळावरील केसांच्या झुलपांशीं खेळायची व चुंबन घेण्यासाठीं मान खालीं वांकवायची—’

‘ मुमताज, ’ अशा वेळीं तिला आवरीत मी म्हणायचा, ‘ इतक्यांत नाहीं मुमताज. उद्यांच आपण येथून पळून जाणार आहोंत. एकदां का मुंबई गांठली कीं मग मी तुझा झालों. मग तुला काय करायचें तें कर. आमच्या धर्मशास्त्राप्रमाणें लग्नापूर्वी असलें कांही करायला सक्त बंदी आहे—’

‘ पण तुझा अन् माझा धर्म वेगळा कोठें आहे ?’

मुमताजच्या बोलण्यावर मी माझे डोळे विस्फारले. म्हटलें, ‘ म्हणजे ? काय म्हणतेस काय मुमताज ?’

‘ खरें तेंच सांगतें, दुसरें काय ? पाकिस्तान होण्यापूर्वी कराचींतील एका खानदानी हिंदू कुटुंबांतील मी मुलगी होतें. पण दंग्यांत माझे आईबाप मारले गेले. बहिणभावंडाची ताटातूट झाली व एका यवनानें माझी अब्रू बरबाद केल्यावर जबरीनें मला बाटविलें. त्या दैत्यापाशीं मी सहा महिने होतें पण मग अचानक हा म्हातारा मला भेटला. त्यानें मला त्या दुष्टाच्या कचाट्यां-

तून सोडविलें व इकडे कलकत्त्यांत आणलें. त्यानंतर वर्षभर त्यानें माझ्याशीं फारच चांगलें वर्तन ठेवलें. मला मुलीप्रमाणें त्यानें वागवलें. पण पुढें पुढें तो बदलला. मीसुद्धां बदललें. परिस्थितीचे अनेक भयानक तडाखे मला बसलेले होते. आपत्तीचे खोल ओरखडे माझ्या हृदयावर उमटले होते. त्यानीं माझें मन पिंजून गेलें होतें. सद्भावना भरडून निघाल्या होत्या. तो माझ्याशीं नवऱ्याप्रमाणें वागूं लागला, पण मी त्याला विरोध केला नाहीं. परदेशांतून आपल्या देशांत सोन्याची चोरटी आयात करणाऱ्या टोळीला गुलाम पुरविण्याचा त्याचा धंदा आहे. खरं म्हणजे हा धंदा अत्यंत किळसवाणा आहे. दुष्टपणाची परिसीमा गांठणारा आहे. माणसाला जनावर बनविणारा आहे. अन् हें कळत असूनहि या म्हाताऱ्याला मी गेलीं दहा बारा वर्षें सर्वप्रकारें मदत करीत आहें. हें सर्व वाईट आहे, हें कळत असूनहि याविरुद्ध मी कधीं बड केलें नाहीं. याचें कारण म्हणज माझ्या या जिवंत शरीरांत जिवंत मन नाहीं. हा कुरूप थेरडा रोज माझ्यावर बलात्कार करतो. त्याला विरोध करण्याची शक्ति मला उरलेली नाहीं. तुला इकडे प्रथम आणलें त्यावेळीं या म्हाताऱ्या सोबत आणखी दोन इसम आलेले तुला आठवत असतील. तेसुद्धां या झोपडींत येऊन आपली भूक भागवून चालते होतात. त्यांच्या त्या अत्याचाराबद्दल मी म्हाताऱ्यास सांगून पाहिलें तो त्यानें आपणच त्यांना तसें करावयास सांगिल्याचें म्हणाला. पण याहि परिस्थितींला मी कधीं विरोध केला नाहीं. कधीं केला असता कीं नसता हेंहि सांगतां येत नाहीं. पण तू येथें आलास व माझ्या अचेतन मनांत चेतना आणि माझ्या अंधाऱ्या जोननांत प्रकाशकिरण फांकले. फाळणीपूर्वी माझ्या लग्नाचा साखरपुडा झाला होता. तूं शुद्धीवर आलास त्यावेळीं बिलोरी आरशापुढें बसून मी केशप्रसाधन करीत होतें. तूं डोळे उघडलेस व अनिमिष नजरेनें माझ्याकडे बघूं लागलास हे मी आरशांतील तुझ्या प्रतिबिंबावरून पाहूं शकलें. अगदीं त्याच क्षणापासून माझें मन पालटलें. पुनर्जन्म झालेल्या माझ्या मनानें तुझ्या पायाकडे धांव घेतली आतां मला तारणें अथवा मारणें तुझ्या हातांत--'

'मुमताज !' तिला जवळ ओढून घेऊन खांद्यावर थोपटीत मी उद्गारलों. तिची कहाणी ऐकून मी द्रवलों होतों. छातीवर डोके टेकून अश्रुपात

करणाऱ्या मुमताजला मी धीर दिला. तिचें पुन्हां पुन्हां सांत्वन केलें व तिचे डोळे माझ्या रुमालानें टिपल्यावर मी तिला म्हटलें, ' मुमताज, घाबरूं नकोस ! मी आतां तुझाच आहें !'

० ० ०

मुंबईच्या दिशेनें गाडी वेगानें दौडूं लागली व आज सकाळपासून घडलेल्या एकंदर घटना माझ्या दृष्टीसमोर एखाद्या चलत् चित्रपटाप्रमाणें एकामागून एक येऊन नाचूं लागल्या...

आज सकाळीं म्हातारा घराबाहेर पडल्यावर मुमताजनें झोंपडीचें दार घट्ट लावून घेतलें होतें. ' चलायचें ना आज ?' तिनें विचारलें. मी होकारार्थी मान हलविली. मग तिनें निमुटपणें सारी बांधबांध केली. माझ्या अंगावर अगदीं सुरवातीला जो कोट होता तो तिनें फडताळांतून काढून दिला, ' तुझा सारा पगार जसाचा तसा खिशांत आहे. ते पैसे सांभाळ !'

मी खिसे चांचपून पाहिले तों सर्व वस्तु जागच्या जागीं होत्या. खाटेंवर बसून मी मुमताजच्या हालचाली पहात होतों. फार अधिरतेनें, फार उत्साहानें ती बांधाबांध करीत होती. त्या दारिद्री झोंपडींत अनेक किंमती वस्तू होत्या. त्या साऱ्या तिनें बॅगेंत कोंबल्या. मग ती माझ्याजवळ आली व हातांतील दागिन्यांची पेटी दाखवत मला म्हणाली, ' हे बघ माझे अलंकार. ज्या मुसलमानानें माझ्याशीं शादी लावली त्यानें हे सारे दागिने माझ्यासाठीं तयार केले. यांतील प्रत्येक नग फार मोलाचा आहे. माझ्यासाठीं त्यानें या साऱ्या वस्तू मुद्दाम बनवून घेतल्या. माझ्यासारखी बायको त्याला मिळाली होती ! तिला अलंकारानीं मढवून टाकून अधिक देखणी करायचा त्याचा इरादा होता ! बिचारा !!'

मुमताज हंसली. मीहि हंसलों. ती पुढें म्हणाली, ' आतां हें सारें तुझें आहे. मीसुद्धां तुझीच आहें. आहे ना ?'

' मुमताज !' मी होकार दिला व तिच्याजवळ सरकून तिला हृदयाशीं धरली. ' मुमताज, तूं माझीच आहेस, पण आतां लवकर आटप. तो थेरडा आज लौकर येणार आहे––'

' खरं आहे !' मुमताज उत्तरली व माझ्यापासून दूर झाली. ती दागिन्यांची पेटी तिनें उघडली व उभ्या उभ्या त्यांतील आंगठी काढून तिनें

बोटावर चढविली. मग ती पेटी बंद करून तिनें बॅगेच्या तळाशीं ती खुपसली.
'आलेंच मी--' असें म्हणत ती आंतल्या खोलींत गेली व तिनें दार लोटून घेतलें.

अमळशानें खोलीचें दार उघडलें. मुमताज बाहेर आली! परंतु तिच्याकडे पाहिल्यावर माझ्या दृष्टीवर माझा स्वतःचाच विश्वास बसेना. नखशिकान्त महाराष्ट्रीय पेहरावांत मुमताज माझ्यासमोर सहास्य मुद्रेनें पहात उभी होती. एका महाराष्ट्रीय हिंदू कुटुंबांतच जन्म झाला असल्याची गोष्ट पूर्वींच तिनें मला सांगितली होती. त्यावरून त्यावेळीं ती कशी दिसत असेल याची बरीचशी कल्पना मला करतां आली!

'चल लवकर!' असें म्हणत मुमताजनें माझा हात पकडला. तिच्या दुसऱ्या हातांतील बॅग मी माझ्या हातीं घेतली व झोपडीचें दार लावून घेतल्यावर आम्हीं बाहेर पडलो!

आगगाडींत माझ्या शेजारीं बसलेल्या मुमताजकडे पाहून मी विचार करीत होतों. कसलातरी विचार करीत मुमताजहि दुसऱ्या बाजूला नजर स्थिर करून बसली होती. आपल्या भावी आयुष्याचीं सुखस्वप्नें कदाचित ती रंगवीत असेल, असें मला वाटलें. अन् त्याच विचारांत एकतानता लागली असल्यामुळें ती अशी अबोलकी झालेली असावी. दुःखाच्याप्रमाणेंच सौख्याच्या परमोच्च क्षणींसुद्धां माणूस अंतर्मुख होतो, हें मला माहीत होतें. एरवीं झोपडी बाहेर पडल्यापासून इतका वेळ अत्यंत उल्हसित मनस्थितींत असलेली मुमताज अशी विचारमग्न दिसण्याचें प्रयोजन तरी काय होते?

फिरून एकवार मी तिच्याकडे निरखून पाहिलें. डाळिंबी रंगाची रेशमी साडी आज ती ल्यायली होती. निळ्या मखमली रंगाचा ब्लाउझ तिच्या अंगांत रुतून बसला होता. महाराष्ट्रीय पद्धतीची केशरचना तिनें केली होती. इतकेंच नव्हे तर आपल्या केशकलापांत गुलाबाचें पूर्ण विकसित पुष्प गुंफावयास व कपाळावर कुंकुम तिलक रेखावयाससुद्धां मुमताज विसरली नव्हती! पण छे, आतां तिला मुमताज तरी कोण म्हणेल! शेजारीं बसलेल्या पुरुषाची मी भाग्यशाली प्रेयसी आहें; अगदीं थोड्या काळानंतर त्याची मी धर्मपत्नी होणार आहें या कल्पनेनें तिच्या चेहऱ्यावरील सारेच भाव जणूं बदलले होते! आतां मी तिच्याकडे बघत नव्हतों तरी ते सारे

भाव माझ्या नजरेसमोर चमकत होते. परंतु ज्या गोष्टीमुळें तिला अपरंपार सुख वाटत होतें नेमक्या त्याच गोष्टीचें मला मनस्वी दुःख होत होतें. कसल्या वेड्या आशा या खुळ्या मुलीनें माझ्यासंबंधीं बांधल्या होत्या ! किती कच्च्या पायावर तिनें कल्पनेचे इमले उभे केले होते ! कोणत्या फोल अपेक्षा तिने माझ्या बाबतींत केल्या होत्या ! आपले हे सारे मनोरथ व्यर्थ ठरणार आहेत हे तिला खरेंच कसें समजत नव्हतें ! अन् साऱ्या गोष्टींच्या स्पष्ट स्पष्ट कल्पना मी तरी तिला कशा देऊं शकणार होतों ? कसं तिला हें समजत नव्हतं कीं मी तिच्याशीं लग्न करणें अशक्य आहे म्हणून ! मी तरी आतां तिला हे कोणत्या तोंडानें सांगावें ? 'सर्वस्वी मी तुझाच आहें मुमताज,' 'तुझ्यावर माझें प्रेम आहे,' हे मी तिला अनंत प्रकारें पटवून दिलें नव्हतें काय ? 'तुझ्याशींच केवळ मुमताज मी लग्न करीन,' असें मी तिला निराळ्या शब्दांनीं सुचविलें नव्हतें काय ? अन् हे सारें सत्य असूनहि मी आतां तिला कसें सांगणार होतों कीं, तुझे मनोरथ अपुरे रहातील, भग्न होतील म्हणून ! तसें सांगितल्यावर मुमताजची कशी दशा होईल ? मी तिला फसविलें अशी तर तिची भावना होणार नाहीं ना ! तशी भावना एकदां झाल्यावर तिच्या काळजाला कशीं घरें पडतील ! छे, छे ! त्यासंबंधींच्या नुसत्या कल्पनेनें माझा जीव व्याकुळ झाला. एकदां वाटलें कीं आपण जें मुमताजला अभिवचन दिलें आहे तें करावें पूर्ण ! हो, त्याला काय हरकत आहे !

पण या गोष्टीला एक सोडून अनेक हरकती होत्या, ही गोष्ट मी नाकारूं शकत नव्हतों. पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे मुमताज माझ्यापेक्षां आठ वर्षांनीं मोठी होती. बाटलेली कां असेना पण जातीनें परकी होती. परिस्थितीनें कां होईना, पण भ्रष्ट झालेली ती एक असहाय्य पतिता होती. कुल-शील, जात-पात. धर्म-अधर्म, वृत्ती-संस्कृति, कशाचें म्हणून कशाचें साधर्म्य तिच्यामाझ्यांत नव्हतें. जें कांहीं होतें तें केवळ वैधर्म्य ! अन् अशा परिस्थितींत मी माझें वचन कसें पाळणार होतों ! भावनेच्या भरांत तसली गोष्ट मी केली असती तर माझे आईबाप काय म्हणाले असते. समाज कसा चवताळून उठला असता ! बरें, या कुणाचीहि पर्वा केली नसती अन् मुमताजला दिलेला शब्द मी कृतींत उतरवला असता तरीसुद्धां मला त्यापासून

कांहीं सुख मिळालें असतें ? मुमताजला तरी त्यापासून कितीसा संतोष होणार होता ? उन्हाच्या तापानें हंसऱ्या फुलांची टवटवी क्षणजीवी ठरावी, त्याप्रमाणें परिस्थितीच्या चटक्यानें आमच्याहि भावनांची माती होणार नव्हती काय ? हो–माती नाहीं तर दुसरें काय ?

शेजारीं बसलेल्या मुमताजकडे मीं मान वळविली व तिचा हात हातांत घेऊन तिला हलकेंच हांक मारली––' मुमताज ! ' परंतु अजूनहि ती आपल्याच विचारांत होती. तिला एवढी अबोल झालेली, इतकी गंभीर झालेली मी पाहिली नव्हती. ' मुमताज ! ' मी फिरून हांक मारली. तशी मान वर करून तिनें मजकडे पाहिलें. तिच्या टप्पोऱ्या काळ्याभोर नेत्रांत अश्रूंचीं तळीं तुडुंब भरलीं होतीं. ते सारे आनंदाश्रु आहेत हें मीं ओळखलें होतें. पण अल्पावकाशांत त्यांचें रूपांतर दुःखाश्रूंत होणार होतें हेहि मला समजत होतें. हा सारा अनर्थ माझ्यामुळें होणार या विचारामुळें मी अत्यंत अस्वस्थ झालों. खिडकीच्या गजांवर डोकें टेकून मीं डोळे मिटले. हळूहळू गाडीचा धडधडाट माझ्या कानांत शिरेनासा झाला. मी कोठें आहें, कोणापाशीं बसलों आहें, नव्हे, मी तरी कोण आहें, याचें कसलेंच देहभान मला उरलें नाहीं. अल्पावकाशांत मी निद्रावश झालों होतों !

✦ ✦ ✦

' मेली ! पडली !! धांवा धावा ! ' गाडींत एकच आक्रोश झाला व त्यासरशीं मी जागा झालों प्रथम मी कोठें आहें, काय झालें आहे, याचा कांहींच उलगडा मला होईना. जोरजोरानें मी डोळे चोळले व मग डब्यांत दृष्टी टाकली. सर्व लोक आपापल्या जागेवरून उठले होते व डब्याजवळच्या दाराजवळ जमून बाहेर डोकावत होते. प्रत्येकाच्या डोक्यावरून आपलीं डोकीं पुढें काढून हे लोक काय बघत आहेत, याचा कांहींच उलगडा मला होईना. पण इतक्यांत त्यांच्यांतील एक माणूस इतरांस जोरजोरानें सांगूं लागला, ' हें पहा, ती अशी सरळ आली व लागलीच तिनें डब्याबाहेर उडी मारली. गेली बिचारी ! मेली ! '

' कोण ? ' किंचाळतच मी उठलों. माझ्या शेजारीं मुमताज बसलेली नाहीं हें माझ्या आतां कुठें लक्षांत आलें होतें ' मुमताज, मुमताज ! ' म्हणत

मी दाराकडे धावलों व दाराजवळच्या माणसांस पार दूर ढकलून दरवाज्या-बाहेर बघूं लागलों. दरवाजाच्या पायफळीवर मी पाऊल टाकलें व अंधारांत डोळे फाडफाडून पहात मी डब्याबाहेर उडी टाकली !

पण मी जरी बेसावध असलों तरी दारापासचे लोक शुद्धीवर होते. मी उडी मारली खरी परंतु त्या लोकांनीं तेवढ्यांत चलाखी करून माझे दोन्ही हात पकडले होते. मला तसेंच फरफटत वर खेचलें होतें, व मग आधार देत माझ्या पूर्वींच्या जागीं आणून बसविलें होतें ! जीविताच्या उंबरठ्यावरून उडी मारून मी मृत्यूच्या सीमारेषेवर पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला होता, परंतु लोकांनीं मला आयत्या वेळेस फिरून जबरदस्तीनें या जीविताच्या परिसरांत आणून टाकलें होतें.

'मुमताज, मुमताज !' म्हणून मी पुष्कळ वेळ रडत बसलों. आयुष्यांत असा ओक्साबोक्शीं मी कधींसुद्धां रडलों–ओरडलों नव्हतों. डब्यांतील सारे लोक माझ्या सांत्वनास धावले पण त्या सार्‍यांना मी दूर सारलें व खिडकीच्या गजांवर डोकें टेकून मी उजवा हात कपाळाला लावला—

अन् त्याच क्षणीं कपाळाला कायसें टोंचलें म्हणून मी माझा हात अश्रूंनीं डबडबलेल्या माझ्या नेत्रांसमोर नजर स्थिर करून मी पाहिलें आणि मी चांगलाच चपापलों !

झोपडींतून मजबरोबर बाहेर पडतांना मुमताजनें जी आंगठी आपल्या बोटावर चढविली होती तीच आतां माझ्या करांगुलीवर चकचकत होती. मी निरखून पाहिलें तों त्या सुवर्णमुद्रिकेच्या चारी बाजूंनीं छोटे छोटे तेजस्वी हिरे जडविले होते व त्या चमकदार रत्नांच्या किरणांमुळें त्यामधील जागेंत कोरलेलीं अक्षरें चमकत होतीं— 'मुमताज !'

• ० ०

## ६ .... कुणाचं कांहीं, तर कुणाचं कांहीं !

चहा पिऊन कँटिनमधून चितोपंत परतले आणि आपल्या टेबलापाशीं येऊन त्यांनीं खुर्ची पुढें ओढली. समोर बसलेल्या मल्लापूर हेडक्लार्ककडे चोरटी नजर टाकून त्यांनीं समोरच्या रजिस्टरांत मान खुपसली, इतक्यांत ऑफिसचा शिपाई टेबलासमोर आल्याचा भास त्यांना झाला.

'कायरे बाजीराव, काय पाहिजे ?'

'मला कशाला काय ? साहेबान्ला तुम्हीं पाहिजे आहांत. कवांचे बोलावत्यात ते तुमास्नी !'

'कोण ?' जवळ जवळ किचाळतच चितोपंत म्हणाले.

नेमके त्याच वेळीं समोरच्या टेबलावरील मल्लापुरांनीं चितोपंतांकडे पाहिलं. घाईघाईनें चेहरा शक्य तितका निरपराधी करीत चितोपंतांनीं त्यांची नजर टाळली व मग एकमद तिसऱ्या पट्टींत स्वर उतरवून त्यांनीं म्हटलं,

'तर साहेबांनीं बोलावलंय् म्हणतोस ? किती वेळ झाला ?'

बाजीरावानें आपल्या डाव्या मनगटावर बांधलेल्या 'पॉकेट-वॉच'कडे पाहिलं व बेपर्वाईच्या स्वरांत म्हटलं.

'काय कीं ! झाली असत्याल तीस चालीस मिनिटं.'

'छे रे ! अरे, मी चहा प्यायला गलों त्याला पुरतीं पांच मिनिटंहि झालीं नसतील.'

'तर काय, माजं घडयाल फास्ट चाललंया म्हन्ता नव्हं का?' बाजीराव गुरगुरला.

बाजीरावशीं आणखी पांच दहा मिनिटें निरर्थक वाद घालण्यापेक्षां साहेबांच्या खोलीकडे तत्परतेनें जाणंच चितोपंतांनीं पसंत केलं. जरा वेळापूर्वी टेबलावर ठेवलेली टोपी त्यांनीं काळजीपूर्वक डोक्यावर ठेवली. अलिकडे साहेबांच्या खोलींत जातांना ते टोपीबद्दल भारीच दक्ष असत कारण आपण डोक्यावर वेडीवाकडी टोपी ठेवली तर साहेबांचं डोकं उठतं ही गोष्ट त्यांच्या पक्की ध्यानांत राहिली होती. टोपी व्यवस्थेनें बसविली तरच आपलं शीर सलामत राहील, एरवीं बिनपाण्याने साहेब आपली शाब्दिक हजामत केल्या-खेरीज रहाणार नाहीं याबद्दल त्यांना खात्री होती. ' टोपी नीट घालत चला ' अशी सूचना साहेबांनीं त्यांना एकदां केली होती, आणि चितोपंत ती अगदीं शिरोधार्य मानीत असत.

साहेबांच्या केबिनवर दार लोटतांना आपल्या हाताला कंप सुटला असल्याचा चितोपंतांना भास झाला. बाकी केबिनचें कांचेचं हलकं दार तें काय ! पण जणू एकाद्या अभेद्य किल्ल्याचा दर्शनी मजबूत दरवाजा उघडावा इतक्या परिश्रमानें त्यांनीं तें लोटलं. अर्थात् या मेहनतीनें आंत शिरले त्या वेळीं ते घामानें ओलेचिंब झाले होते.

' Excuse me, Sir ' असं शक्य तितक्या लाचारीच्या स्वरांत बोलत त्यांनीं या वेळपर्यंत धरणीसरशी असलेली आपली मान वर केली आणि त्याच क्षणीं त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. खोलींत साहेब होते कुठें ? बाकी बाहेरच्या बाजूस साहेबांचा प्यून नव्हता तेव्हांच ही गोष्ट त्यांच्या लक्षांत यावयाची. पण इतकी साधी गोष्ट जर त्या त्यांच्या लक्षांत आली असती तर गेलीं पस्तीस वर्षें ते निव्वळ कारकून एकें कारकून म्हणून ऑफिसांत कधींच राहिले नसते. हा नुकताच आलेला पोरगेलासा तरुण मल्लापूर, अवघ्या चार वर्षांत परीक्षा देऊन हेडक्लार्क म्हणून त्यांच्या डोक्यावर बसला होता. त्याची मर्जी राखण्यासाठीं तीन वर्षांपूर्वी त्याचं जेव्हां लग्न झालं, तेव्हां हलका फुलका नव्हे तर घसघशीत दोन रुपयांचा अहेर त्यांनीं केला होता ना !

साहेब खोलींत नसतांना आपण येथें आलों म्हणून चितोपंतांना कांहीसं चोरट्यासारखं झालं. त्यांनी इकडे तिकडे नजर फिरवून साहेब खरोखरच खोलींत नसल्याची आपली नजर फिरून एकवार खात्री करून घेतली व

सुटकेचा एक नि:श्वास टाकला. इतकीं वर्षें नोकरी झाली परंतु साहेबाच्या खोलींत साहेब नसतांना ते कधींच आले नव्हते. एरवीं साहेब असतांनासुद्धां ते कुठें कधीं चेंबरमध्यें जात असत! आपला तो प्रांत नाहीं हें त्या अनुभवी माणसाला काय ठाऊक नव्हतं! साहेबांचें त्यांच्याशीं काम तें काय असणार! यापूर्वीं किती साहेब आले नि गेले, परंतु फारच क्वचित् कुणी त्यांना खोलींत बोलावून घेतलं असेल! अलिकडे जोशीसाहेब आले होते. ते मात्र मधून मधून त्यांना बोलावून घेत. चितोपंतांचा मोठा मुलगा कॉलेजांत शिकत होता. दुसरा मॅट्रिकला होता. तिसऱ्या मुलीचं लग्न ठरलं होतं. या साऱ्यांबद्दल साहेब आपुलकीनें चौकशी करीत. चितोपंतांना याबद्दल प्रथम आश्चर्य व मग मोठा बहुमान वाटला होता. साहेब आपल्या मुलांबद्दल चौकशी करतो म्हणजे काय चेष्टा आहे! साहेबांविषयीं आदरानें त्यांचं हृदय सद्गदित झालं. 'केवढा थोर माणूस!' त्यांना वाटलं.

इतक्यांत साहेबांच्या टेबलावरचा फोन खणखणला. तशी चितोपंत एकदम भानावर आले. साहेब तर नाहींत, फोन तर वाजतोय! काय करावं त्यांना सुचेना. टेलिफोनची घंटी उतावीळपणें पुन्हां पुन्हां किणकिणत होती-

मोठ्या धैर्यानें चितोपंतांनीं रिसीव्हर उचलला व कांपऱ्या हातानें कानाला लावला. 'हॅलो ऽ' ते भयभीत पुटपुटले.

'हल्लो! डार्लिंग!' पलीकडच्या बाजूनें कोणी गोड आवाजांत म्हणालें तशी चितोपंतांच्या हातांतील रिसीव्हर जवळ जवळ गळूनच पडला. पण मोठ्या कष्टानें त्यांनीं तो सांवरला. या वेळीं त्यांचा हात थरथरा कांपत होता. अशा प्रकारच्या गोड गोड शब्दांनीं उभ्या आयुष्यांत कुणीहि त्यांना संबोधिलं नव्हतं. प्रत्यक्ष त्यांच्या अर्धांगीनेंसुद्धां अशा प्रकारची लाडिक भाषा गेल्या पंचवीस वर्षांच्या संसारी आयुष्यांत कधीं तोंडून काढली नव्हती, ती आतां टेलिफोनमधून कोणी एक स्त्री अत्यंत मधुर आवाजांत त्यांच्या कानांत गुणगुणत होती. 'हल्लो! अरे प्रभाकर, तर मग संध्याकाळीं वाट बघतें. उगीच ऑफिसांत बसूं नको हं फायलींत डोकं खुपसून! माहीत आहे मोठा ऑफिसर आहेस तो. काय रे, पण बोलत नाहींस तो? आँ? फोन कोणी घेतलाय? Yes, who is speaking from the other end?'

'Excuse me Madam, but the officer is not here !'

Then who is speaking ? ' तिनें रागानें दुसऱ्या बाजूनें ओरडून विचारलं तशी चितोपंतांची गाळणच उडाली. इतक्यांत 'Idiot' हें अन् अशीच आणखी कांहीं विशेषणें त्यांच्या कानीं पडलीं तेव्हां तर शरमेनें त्यांचा चेहरा एकदम पडला. कसाबसा टेलिफोन बंद करून त्यांनीं खिशांतून रुमाल बाहेर काढला व घाम पुशीत झाल्या प्रकाराबद्दल ते विचार करूं लागले.

म्हणजे ? साहेबांच्या मिसेस् बोलत होत्या तर ! किती त्यांचं साहेबां-वरचं प्रेम ! चक्क एकेरी नांवानें हांक मारीत होत्या ! म्हणते कशी, ऑफिसर असशील तर ऑफिसमध्यें, मला काय त्याचं ! आतां तिनें आपल्याला शिव्या दिल्या म्हणा, पण मोठ्या लोकांच्या शिव्या ओव्याच समजायच्या आपण ! हो, नाहीं तर साहेबांच्या बायकोशीं आपल्याला बोलायचा योग उभ्या हयातींत कशाला येतो ? साहेबांची बायको म्हणजे काय सटरफटर बाई होती काय ? चांगली देखणी, परदेशी शिक्षण घेतलेली, एका खाजगी कंप-नींत मोठ्या पगारावर नोकरीस असलेली ! नाहीं तर आमच्या सौभाग्यवती ! मोठ्यांचं सारंच मोठं ! बाकी तिच्याशीं बोलायला मिळालं हेंहि कांहीं लहान सहान भाग्य नाहीं ! आतां साहेब आले—

परंतु चितोपंतांच्या विचारांची मालिका येथेंच तुटली, कारण दार ढकलून पी. व्ही. जोशांची स्वारी आंत आली व त्यांच्या मागून त्यांची हँडबॅग घऊन त्यांचा शिपाई आला. बॅग जाग्यावर ठेऊन व सलाम ठोकून चपराशी बाहेर पडला व जोशीसाहेब गादीच्या ऐसपैस खुर्चीवर स्थानापन्न झाले !

'हं, काय म्हणतां कुलकर्णी, काय काम आहे ? '

'नाहीं, म्हणजे थोड्या वेळापूर्वीं आपण मला बोलाविलं...' अडखळत चितोपंत पुटपुटले.

साहेबांनीं जरा आठवल्यासारखं केलं व म्हटलं, 'हां ! हां ! that's for nothing. सहज हांक मारली होती. तुमच्या थोरल्या मुलाचा B. Com-चा रिझल्ट लागला का विचारणार होतों. अन् धाकटा काय, मॅट्रिकला बसलाय नाहीं का ? त्याचं काय झालं ? '

' साहेब, दोघांच्या परीक्षा झालेल्या आहेत. निकालाला अवकाश आहे अजून महिनाभर--'

' अच्छा ! अच्छा ! Alright, Alright ! मग जा तुम्हीं, सहज बोलावलं होतं. '

' पण साहेब, तुमचा फोन—'

' येऊं द्या हो. कुणाचा होता ? '

' मला वाटतं आपल्या मिसेस्‌चा --? '

' जाऊं द्या ! सांगितलंत् ना मी येथें नाहीं म्हणून. ठीक. ठीक. जाऊं शकतां आपण. '

खोलींतून बाहेरच्या मोकळ्या हवेंत आल्यावर चितोपंतांना सुटल्या-सुटल्यासारखं वाटलं. एक निःश्वास टाकून ते लगबगीनें आपल्या खुर्चीवर येऊन बलले. डोक्यावरची टोपी काढून टेबलावर ठेवतांना त्यांनीं हलकेच समोरच्या हेडक्लार्कच्या खुर्चीकडे नजर टाकली. मल्लापूर कामांत गुंतलेले दिसले. हायसं वाटून चितोपंतांनीं खिशांतून तपकिरीची बाटली काढली. त्यांतली थोडी उत्साहवर्धक भुकटी दोन्ही नाकपुड्यांत कोंबली व टेबलावरचें एक लठ्ठसें रजिस्टर पुढें ओढून घेऊन व त्यांत दृष्टि लावून ते एकंदर घडलेल्या प्रकाराबद्दल शांतपणें विचार करूं लागले !

एकाद्या लघुकथेंत शोभेल असाच सारा प्रकार चितोपंतांना वाटला. साहेब नसतांना ते खोलींत गेले काय, फोन आला काय व साहेबांची बायको त्यांच्याशीं बोलली काय ! सारंच विलक्षण, सारंच अजब ! एकाद्या लघुकथेंत हें सारं किती छान शोभलं असतं ! चितोपंतांना पुन्हां एकदा वाटलं. साहेबांच्या बायकोचं तें सर्व लाडिक संभाषण त्यांना फिरून एकवार आठवलं. ते सारे गोड गोड शब्द ती आपल्या कानांत बोलली होती याची आठवण होऊन त्यांना मनांतल्या मनांत गुदगुल्या झाल्या. तें सारं भाषण आपल्याला उद्देशून नव्हतं; भाषणाच्या अखेरीचीं शेलकीं विशेषणं तेवढीं खास आपल्यासाठीं होतीं, ही वस्तुस्थिती ते क्षणमात्र विसरून गेले. तिच्या त्या गोड गोड शब्दांचाच ते पुन्हां पुन्हां रिचार करूं लागले. ते विचार त्यांना फारच सुखदायक वाटत होते. साहेबांची बायको त्यांनीं कधीं पाहिली

नव्हती परंतु जातीनें कारकून असूनहि तिच्याबद्दलची एकंदर कल्पना ते करूं शकत होते. वयानं ती आतां प्रौढ होती. अर्थातच ती कांहींशी स्थूल असणार. भारी पगाराच्या त्या बाईचा एकंदर थाटमाट, रुबाबदिमाख यांचीसुद्धां चितोपंत कल्पना करूं शकत होते. या साऱ्या कल्पनांची एकंदर गोळाबेरीज केल्यावर जी बाई कल्पनेंत त्यांच्यासमोर उभी राहिली ती पाहून चितोपंतांचें भान हरपलें. त्यांना एकदम आठवण झाली कीं, मागें साहेबांची बायको एकदां त्यांच्या ऑफिसांत येऊन गेली होती. परंतु नेमक्या त्याच दिवशीं चितोपंत एका दिवसाच्या किरकोळ रजेवर होते ! त्याच्या बायकोला त्या दिवशीं फेंफरं आलं होतं आणि म्हणून साऱ्या ऑफिसला जी देवता पहायला मिळाली होती ती चितोपंताना पहायला मिळाली नव्हती ! त्या गोष्टीची आठवण झाल्यावर चितोपंतांना आपल्या सहधर्मचारिणीचा अतोनात संताप आला. आता घरीं गेल्यावर दारांत येऊन उभ्या राहिलेल्या आपल्या धर्मपत्नीकडे रागाचा कटाक्ष टाकून आपल्या कोपाचं शमन करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

परंतु घरची आठवण येतांच चितोपंत पुन्हां अस्वस्थ झाले. आज महिन्याची अखेरची तारीख होती. पैशांची मोठी चणचण गृहखात्याला लागली होती. त्यांतून त्यांना आज कुठल्याशा लग्नसमारंभाला जायचं होतं. थोरामोठ्याचं लग्न होतं. तिकडे जायचं तर कांहीं अहेर न्यायला हवा होता. आइस्क्रीम खाऊन तसंच परत येणं बरं दिसणार नव्हतं. म्हणून लग्नालाच नको जाऊं या, असा तोडगा चितोपंतानीं पुष्कळ विचार करून काढला होता, परंतु घरांतील कोणीहि तो मानला नव्हता. सौभाग्यवतीनं नव्हता मानला, मुलांनाहि नव्हता पटला. फार फार आग्रहाचं बोलावणं होतं खरं, पण म्हणून आर्थिक ओढगस्तीचा विचार करायला नको का ? आपलं म्हणणं साध्यासुध्या बाबतींतहि न ऐकणाऱ्या बायकोचा व मुलांचा त्यांना फार फार संताप आला. त्यांचीं मुलं शिकलीं होतीं, मोठीं झालीं होतीं पण चितोपंताच्या आयुष्यभरच्या कमाईचा पार फन्ना उडविला होता त्यांनीं. त्याच्या शाळा-कॉलेजच्या शिक्षणखर्चानें ते हैराण झाले होते. मुलं नसतीं तर बरं झालं असतं, असा वैतागाचा विचार त्यांच्या मनांत येऊन गेला.—

नाहींतर त्यांच्या साहेबाचं पहा. सुंदर सुशिक्षित बायको, गडगंज पैसा,

मोटार, बंगला, टेलिफोन, सुंदर नीटनेटकं फर्निचर, आरामशीर कोचेस, गोद-रेजच्या अलमाऱ्या. अन् मुख्य म्हणजे पोरांबाळांचा त्रास नाहीं ! सारं कसं शांत, कसं आनंददायक ! साहेब खरोखरच सुखी. त्यांचं सुख खरोखरच अमर्याद. वयस्कर पण चिरतरुण असणाऱ्या आपल्या बायकोला बरोबर घ्यावं, आज मेट्रोला तर उद्यां इरॉसला भेट द्यावी. सुटीच्या दिवशीं पाटर्या झोडाव्या, 'ग्रीन्स' मध्यें चक्कर टाकावी, नाहींतर 'ताज' मध्यें भोजन उरकावं ! चैन करून संध्याकाळीं बंगल्यांत यावं. लैला–मजनूसारखं स्वैर, स्वतंत्र जीवन जगावं ! ना पैशाची चिंता, ना पोरांची व्यथा ! सारं जीवन गुळगळीत, आखीव. एखाद्या लांबरुंद राजरस्त्यासारखं ! खरोखर जन्माला यावं आणि असं साहेब व्हावं !

त्यांच्या टेबलासमोर बाजीराव आला नसता तर त्यांची ही तंद्री कदाचित् भंगली नसती.

'आतां पुरी करा ती तपासणी. साडेपांच वाजायला आले. इतरांचीं टेबलं साफ झाली– ' बाजीराव म्हणाला व हेडक्लार्कनीं खूण करून बोलावलं म्हणून तिकडे गेला. चितोपंतांनीं बाजीरावाला मनांतल्या मनांत एक शिवी हांसडली व घड्याळाकडे पाहिलें. खरोखरच पांच पंचवीस झाले होते. आणखी पांचच मिनिटांनीं त्यांचं ऑफिस सुटणार होतं !

चितोपंत जिना उतरून तळमजल्यावर आले त्याच वेळीं लिफ्टमधून साहेब बाहेर पडत होते. त्यांना पहातांच चितोपंतांनीं आदरानें किंचित् मान झुकवून त्यांना अभिवादन केलं. जोशी साहेबहि उगीच गालांतल्या गालांत प्रत्युत्तरादाखल हंसले व दाराबाहेर उभ्या असलेल्या आपल्या गाडींत जाऊन बसले. त्या लालचुटुक लांबलचक गाडीकडे आश्चर्यानें 'आ' वासून पाह-णाऱ्या चितोपंतांना उद्देशून गाडी सुरू केल्यावर हात सहज हलवला. आपल्या या एवढ्याशा कृतीनें चितोपंतांना आपला बहुमान झाला असं वाटेल व ते ती गोष्ट चारजणांत अभिमानानें सांगतील याबद्दल जोशी साहेबांची पूर्ण खात्री होती.

पुढल्या नाक्यापाशीं लाल सिग्नल दिसला म्हणून जोशी साहेबांनीं गाडीचा वेग कमी केला व अमळशानें गाडी पांढऱ्या पट्टीजवळ येऊन उभी राहिल्यावर ते हिरव्या सिग्नलची वाट पाहूं लागले.

प्रथम बायकोच्या ऑफिसमध्यें जाऊन त्यांना तिला गाडींत घ्यायचं होतं. नंतर एखाद्या हॉटेलांत जेवण उरकून कुठल्याशा समारंभाला जायचं होतं आणि शेवटीं खूप उशीरां ते आपल्या बंगल्यांत परत जाणार होते. रात्रीचं त्यांना स्मरण झाल्यावर त्यांचा चेहरा खर्रकन उतरला व आपल्या पत्नीचा त्यांना राग आला. आपल्या पत्नीमुळेंच आपला संसार अपूर्ण राहिला याबद्दल उघड नव्हे, पण मनांतल्या मनांत ते तिच्यावर संतापत. त्यांचा प्रेमविवाह झाल्याला आतां वीस वर्षें उलटून गेलीं होतीं, परंतु अजून-पर्यंत त्यांच्या पत्नीला मूलबाळ कांहीं झालं नव्हतं. एरवीं त्यांना आपल्या बायकोबद्दल अतिशय प्रेम वाटे. तिच्या सौंदर्यावरच नव्हे तर गुणांवरहि त्यांचा जीव जडला होता, पण पूर्ण संसारसुख द्यायला ती असमर्थ ठरली होती. तिला मूलबाळ झालं नव्हतं म्हणून तिचं रूप जिथल्या तिथं व जसंच्या तसं होतं. चाळिशी उलटल्यावरहि ती अजून तरुणच होती. आपल्या पत्नीच्या रूप–गुणांवर अनुरक्त होऊनच त्यांनीं तिच्याशीं लग्न केलं होतं. लग्नापूर्वीं जर धोक्याचा हा लाल दिवा त्यांना दिसला असता तर कदाचित् आयुष्याच्या मार्गावरील सहचारिणी म्हणून तिची निवड त्यांनीं केलीहि नसती.

मागच्या मोटारीनें मोठमोठ्यांदा हॉर्न दिला, तशी जोशीसाहेब आपल्या तंद्रींतून बाहेर आले. समोरचा लाल दिवा विझून हिरवा दिवा चमकत होता. रहादारीचा अडथळा दूर झाल्यामुळें त्यांच्या पुढल्या गाड्या सुरू झाल्या होत्या हें लक्षांत आल्यावर त्यांनीं स्टार्टरवर पाय दाबून गाडी वेगानें सोडली.

'किती रे उशीर केलास ? सहा वाजून गेले. वाट किती पाहायची बाई ! ' मोटर ऑफिसच्या बिल्डिंगपाशीं थांबली तशी त्यांची पत्नी आंत बसत म्हणाली.

'काम फार होतं ग ! ' म्हणत त्यांनीं मोटार चालू केली.

त्यांच्या खांद्याला स्पर्श करीत त्यांची पत्नी म्हणाली, 'कायरे, फोन केला तेव्हां कुठें होतास ? कोणी उचलला होता देव जाणे ! ' परंतु यावर जोशी कांहीं बोलले नाहींत. त्यांची पत्नीहि मग कांहीं बोलली नाहीं. हातांतल्या 'फिल्म–इंडियाची ' घडी उलगडून ती वाचूं लागली.

आपल्या स्वतःच्या मोटारगाडींत स्वतःची रूपवती बायको शेजारीं असूनहि जोशी अस्वस्थच होते. त्यांना खेटून बसलेल्या त्यांच्या बायकोपासून, तिला समजणार नाहीं इतक्या बेतानें ते हळूच दूर सरकले. कांहीं क्षणांपूर्वी ती त्यांना जें बोलली होती, ज्या पद्धतीनें बोलली होती त्याबद्दल त्यांना विलक्षण घृणा होती. एकेरी नांवानें तिनें त्यांना प्रथमच आतां संबोधलं होतं असं नव्हे. लग्न होण्यापूर्वी व नंतर गेलीं वीस वर्षे अव्याहतपणें ती त्यांना तशाच प्रकारें हांक मारीत होती. यापूर्वी त्यांना ती गोष्ट नवलाईची वाटली नव्हती पण आतां मात्र त्यांना ती लागल्यावांचून राहिली नाहीं.

जोशी हे एक मोठे सरकारी ऑफिसर होते. श्रीमंत होते. वरज्यावर्गांत वावरणारे, उठबसें करणारे होते. उच्च, प्रतिष्ठित समाजांत स्त्रिया पुरुषांशीं बरोबरीच्या नात्यानें वागतात. त्यांना एकेरी नांवानें हांक मारतात. किंबहुना तीच गोष्ट अधिक शिष्टसंमत धरली जाते हेंहि त्यांना नव्यानें समजायचं होतं अशांतलाहि भाग नव्हता. झालंच तर त्यांची बायको कांहीं सामान्य गृहस्थाची मुलगी नव्हती. एका सरकारी कॉलेजच्या प्रतिष्ठित प्रिन्सिपालची मुलगी होती. ती हजारांत डोळ्यांत भरेल इतकी देखणी होती. जोशींच्या ती प्रथम प्रेमांत व नंतर लग्न होऊन पदरांत पडली होती ! एका मोठ्या कंपनींत महिना पांचशें रुपये पगार ती मिळवीत होती ! तिनें आपल्या नवऱ्याला यापूर्वी जसें एकेरी नांवानें संबोधलं त्याचप्रमाणें कांहीं वेळापूर्वी संबोधलं यांत तिचं काय चुकलं होतं ? तिच्या दृष्टीनें कांहींच चुकलं नव्हतं म्हणून तर ती शांतपणें तें मासिक आरामांत वाचीत बसली होती

शेजारीं बसलेल्या आपल्या पत्नीकडे जोशींनीं फिरून एकवार पाहिलं व त्यांना एकदम नैराश्याचा झटका आला. छे ! छे ! या पोरीच्या प्रेमाला, रूपाला व रुपयांना भाळून आपण साफ फसलों असं त्यांना अगदीं तीव्रतेनें वाटूं लागलें. काय करायचं तें रूप, तो पैसा ज्यांच्या त्यांच्या भावी आयुष्यांत पै किंमतीइतकाहि उपयोग नव्हता ! काय करायचा तो बंगला, ती गाडी, तो थाटमाट कीं जें सारं त्यांच्या मृत्यूनंतर कोणातरी उपटसुंभाच्या हातांत जायचं होतं ! नको ती श्रीमंती, नको तें सुख ! त्यापेक्षां गरिबी लाखपटीनें

बरी ! आपल्या कचेरींतील ते चितोपंत आपल्यापेक्षां अनंतपट सुखी. थोडी पैशाची चणचण असेल त्यांना. पण 'अहो अहो' करणारी नि आपल्या संस्कृतिबरहुकुम वागणारी त्यांची साधी सरळ पत्नी, आतां त्यांच्या बरोबरीचा होऊं पहाणारा त्यांचा थोरला मुलगा, मॅट्रिकला बसणारा दुसरा मुलगा, विवाहयोग्य झालेली एक मुलगी ! वा ! वा ! वा ! केवढं दुष्प्राप्य संसारसुख चितोपंताच्या वाट्यास आलं होतं ! खरंच, चितोपंताच्या गांठी तसंच बलवत्तर संचित असल्यामुळेंच ते असे सुखी होते. त्यांच्या सुखांत कांहींच कमतरता नव्हती. नाहींतर आमचा हा संसार ? छे ! छे ! ज्यांच्या संसारात मूल नाहीं त्यांचा संसार, त्यांचं सुख नेहमींच अपूर्ण ! चितोपंत गरीब असतील पण खरे सुखी तेच, खरे समाधानी तेच !

गाडी 'अँबॅसेडर' हॉटेलशीं उभी राहिली. दोघेंहि जेवणासाठीं टेबलावर येऊन बसलीं. जेवण आलें तशी त्यांची बायको म्हणाली, 'प्रभाकर, कसला विचार चाललाय एवढा ? आज गप्पसा ?' 'जरा कपाळ दुखतंय, दुसरं कां ऽऽ हीं नाहीं,' तिची नजर टाळून जोशी बोलले. 'आज कामाचं फार प्रेशर पडलेलं दिसतं' ती म्हणाली व समोरच्या डिश्मधील पदार्थाचा छोटासा तुकडा तिनें तोंडांत टाकला.

जेवणानंतर एका मोठ्या डिपार्टमेन्टल स्टोअरसमोर गाडी थांबवून जोशी दांपत्यानें पंचवीस रुपयापर्यंतच्या आहेरासाठीं वस्तु विकत घेतल्या आणि तीं दोघें लग्नसमारंभासाठीं निघून गेलीं.

लग्नाचा फार मोठा थाट उडविण्यांत आला होता. ज्या वधूपक्षाकडून जोशी दांपत्याला बोलावणं आलं होतं, तो वधूपक्ष गर्भश्रीमंत होता. या मुलीचं एका गरीब कुटुंबातल्या मुलाशीं लग्न ठरलं होतं. तो मुलगा यंदाच आय्. ए. एस्.ची परीक्षा पास झाला होता. त्याला पुढें प्रॉस्पेक्टस् उत्तम होते व म्हणूनच त्यांचा एवढ्या मोठ्या गृहस्थांच्या मुलीशीं संबंध जुळून येत होता. जोशी हॉलमध्यें आले त्या वेळीं एका कोचावर नवरामुलगा व नवरीमुलगी बसलेलीं होतीं. आपल्याला मूल नसल्याचं शल्य पुन्हां एकवार त्यांच्या अंत:करणाला टोचलं. मुलीच्या हातांत अहेर दिल्यावर व पानसुपारी घेतल्यावर दोघेंजण पुन्हां आपल्या गाडीपाशीं आलीं. इतक्यांत त्यांचं लक्ष समोरून

सहकुटुंब सहपरिवार येत असलेल्या चितोपंत कुलकर्ण्यांकडे गेलं. त्यांच्या उजव्या अंगास त्यांची जुन्या वळणाची पत्नी उभी होती व पुढें मागें त्यांचा थोरला मुलगा, मुलगी व धाकटा मुलगा एकमेकांशीं हंसत खिदळत येत होतीं. साहेबांशीं येथें बोलावं किंवा कसं याचा विचार करीत चितोपंत उभे होते तोंच साहेबांनीं त्यांच्याकडे पाहून मंदस्मित केलं व ते गाडींत चढले. 'खरा सुखी माणूस!' असं पुटपुटत चितोपंताच्या त्या फुललेल्या संसाराकडे एकवार पाहून त्यांनीं गाडी सुरू केली.

दूरदूर जाणाऱ्या त्या भपकेबाज मोटरकडे चितोपंतांनीं आपल्या बायकोचं लक्ष वेधलें नि तिला म्हटलें, 'आत्ता जे गेले ना ते आमचे ऑफिसर बरं का. फार फार सुखी आहे माणूस. अग, तिकडे कुठं बघतेस? ती बघ,ती गेली मोटर!'

—नेमक्या याच वेळीं पलिकडच्या बाजूनें जाणाऱ्या बसमधून मल्लापूर हा सारा प्रकार पहात होता. आपल्या एकातवासांतील एक कार्यक्रम म्हणून तो नुकताच एक इंग्रजी चित्रपट पाहून 'मदन लॉज' मध्यें परतत होता. या तरतरीत हेडक्लार्क साहेबास तरणीताठी बायको होती, दोन सुंदर मुलं होतीं व मुबलक पैसाहि होता! पण त्यांना या मुंबईंत बिऱ्हाड करण्यास जागा मिळत नव्हती!

० ० ०

## ७ .... वैराग्य

सकाळचे आठ वाजून गेले तरी भगवंतरावांच्या बिऱ्हाडाचें दार बंदच होतें. पण सिताकाकूंना त्याचें फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. कारण आज होता रविवार. शिवाय कालच रात्रीं भगवंतराव सहकुटुंब सहपरिवार एक पौराणिक कथापट पाहून पुण्य संपादून आले होते; तेव्हां इतक्या लवकर ते उठण्याची शक्यता नव्हतीच! नाहींतरी प्रति रविवारीं सकाळीं पुष्कळ उशीरापर्यंत त्यांच्या बिऱ्हाडीं सामसूमच असे. नवरा उशीरा उठत असल्या-मुळें समान हक्क प्राप्त झालेल्या त्यांच्या बायकोनेंहि त्यांचेंच अनुकरण करावें यांत आश्चर्य नव्हतें. परंतु त्यांच्या शेजारीं रहाणाऱ्या सिताबाई होत्या जुन्या चालीच्या, उतार वयास लागलेल्या! अर्थात् त्यांना ही गोष्ट मानव-ण्यासारखी नव्हती; परंतु त्या काय करणार? त्या बंद दाराकडे पाहून निषेधाचा कटाक्ष टाकीत. आतांसुद्धां त्यांनीं हेंच केलें व त्या नेहमींप्रमाणें जिना उतरल्या.

साडेआठ वाजायला आले व खिडकींतून कधींचीं अंगावर आलेलीं उन्हें चटके देऊं लागलीं तशी भगवंतराव जागे झाले. जागृत झाल्यावर सर्व प्रथम कोणता प्रश्न त्यांच्या मनांत उद्‌भवला असेल तर तो म्हणजे, आज वार कोणता हा! कारण त्यांचें हें कधींचेंच ठरून गेलें होतें. जागे झाल्यावर प्रथम ते वाराची आठवण करीत. कधीं तो त्यांच्या लक्षांत नसे व मग पत्नीला त्याबद्दल ते विचारीत. आज मात्र जाग आल्यावर त्यांना वार

नेमका आठवला; कारण केवळ आज रविवार होता म्हणून तर त्यांची पत्नी अजून चक्क घोरत होती ना!

तेवढ्यांत सुमतीबाई जाग्या झाल्या व त्यांनीं आपल्या यजमानांकडे पाहिलें. 'किती वाजले?' घाईनें उठत त्या म्हणाल्या. तिच्याकडे पहात भगवंतराव हंसले. निष्काळजीच्या स्वरांत म्हणाले, 'असतील वाजलें सात! आज कसली घाई? रविवार आहे!'

'अहो साडेआठ वाजून गेले. उठता ना आतां?' त्यांची पत्नी स्वयं-पाकघरांतून बाहेर येत म्हणाली. 'हं!' म्हणत भगवंतराव पुनश्च पांघरुणांत शिरले.

त्यानंतर तोंड वगैरे धुऊन भगवंतरावांनीं दार उघडलें तेव्हां त्यांच्या समोर राहाणाऱ्या सिताबाई पोथी वाचीत होत्या. दाराचा आवाज ऐकून सिताबाईंनीं नजर वर करून एकवार पाहिलें व मग अधिक मोठ्यानें त्या शिवलीलामृत वाचूं लागल्या.

'बाब्या नाहीं ना उठला अजून?' चहा घेतां घेतां भगवंतरावांनीं विचारलें. कप रिकामा करून खालीं ठेवीत त्यांची पत्नी म्हणाली, 'तुमचाच तो लेक आहे. एवढ्यांत कसचा उठतो?'

'अन् तुझा तो कोण ग?' खोचक सुरांत भगवंतराव म्हणाले व आपण फार मार्मिक बोललों, या समाधानानें मोठ्यांदा हंसले. त्यांच्या पत्नीलाहि मग हंसूं आलें पण तें त्यांच्या हंसण्याचें, मार्मिक बोलण्याचें नव्हे!

चहापान आटोपल्यावर भगवंतरावांनीं कोटाच्या खिशांतून 'पांचशें पचांवन्न' सिगारेट काढली. परवांचे दिवशीं त्यांचे स्नेही अनंतराव यांच्या-कडे मुलाच्या बारशाच्या निमित्तानें छोटी चहापार्टी झाली तेव्हां परततांना त्यांनीं दोन 'पांचशें पंचावन्न' बरोबर घेतल्या होत्या. त्यांतील ही एक होती. खास रविवारसाठींच त्यांनीं ती सांभाळून ठेवली होती. अर्थात् काल शनिवारचे दिवशीं त्यांना नेहमींच्या 'पिवळ्या हत्ती'वरच काम भागवावें लागलें होतें!

सिगारेटचे मजेदार झुरके घेत ते आरामखुर्चीत पसरले व ताज्या वर्तमानपत्रावरून नजन फिरवूं लागले. खरं म्हणजे अजून त्यांची झोप पुरी

झालेली नव्हती. काल सिनेमाहून परतायलाच मुळीं साडेबारा वाजून गेले होते अन् त्यानंतर घरीं आल्यावर झोप का अगदीं चटकन येते थोडीच ?

एक जोरदार दम मारल्यावर भगवंतरावांनीं निळीं वलयें तोंडांतून सोडलीं व येणाऱ्या जांभया थोपविण्यासाठीं चुटक्या–वादन सुरूं केलें. 'झोप अपुरी राहिलेली दिसते ?' पुढें उभ्या राहून सुमतीबाई विचारत होत्या. 'तुझ्यामुळें !' त्यांच्याकडे रोखून पहात भगवंतराव उत्तरले. त्यांच्या बोलण्यांतील गूढार्थ सुमतीबाईंच्या लक्षांत आला नाहीं. सरळपणें त्या म्हणाल्या, 'पण मग सिनेमाला जाण्याचा आग्रह कुणी केला ? तरी मी म्हणत होतें–'

'तूं कांहीं म्हणूं नकोस,' तिला मध्येंच अडवीत भगवंतराव म्हणाले, 'नाहीं तरी आज उद्योग काय आहे ? रविवार ना आज ? दुपारीं देऊं ताणून आरामांत. त्यानंतर संध्याकाळीं जाऊं फिरायला. आज अगदीं चैन करायची,' आणखी एक दम मारीत भगवंतराव म्हणाले व पाय लांबवून त्यांनीं आळस दिला.

इतक्यांत दरवाजावर थापा पडल्या व दबक्या आवाजांत कुणीसें ओरडलें, 'भगवंतराव, अहो भगवंतराव, आहांत ना घरीं ? दार उघडा पाहूं !' आरामखुर्चीत अस्ताव्यस्थ पसरलेला आपला देह–भार आवरत भगवंतराव जरा व्यवस्थेनें बसले. त्याच वेळीं सुमतीबाईंनीं दार उघडलें व घामाघूम झालेल्या वीरेश्वरची स्वारी आंत येऊन मटकन बसलीच.

'काय रे वीरा, अरे झालं काय तुला ?' गोंधळून धापा टाकीत जमिनीवर बसलेल्या आपल्या मित्रश्रेष्ठाकडे पहात भगवंतराव म्हणाले.

'अरे काय म्हणून काय विचारतोस ? प्रथम बाहेर पड पाहूं माझ्याबरोबर—'

'नको रे बाबा. आज रविवारचा कुठें नेतोयस् ? अशोक टॉकीजला कालच रात्रीं मी भेट देऊन आलों. आज—'

'अरे लेका, तुला सिनेमाला नेण्यासाठीं मी कधीं धांवत आलों आहें काय ? प्रथम बाहेर चल पाहूं. आपला अनंतराव आटोपलाय् न काय ?'

'काय ?' भगवंतराव जवळ जवळ किंचाळलेच. त्या भयंकर बातमीनें व त्याहिपेक्षां भगवंतरावांच्या किंकाळीनें सुमतीबाई तर मटकन् खालींच बसल्या. तेवढ्यांत आंतल्या खोलींतून बाळाचें रडणें त्यांच्या कानीं पडलें

व लगबगीनें त्यांना आंत धाव घ्यावी लागली.

सुमतीबाई आंत गेल्यावर भगवंतरावांनीं कसेंबसें स्वत:ला सांवरलें, व मग भरल्या गळ्यानें ते म्हणाले, 'अरे काय, म्हणतोस काय वीरा ! अनंतराव गेला म्हणतोस ? अरे परवांचे दिवशीं तर त्याच्या पहिल्या वहिल्या मुलाच्या बारशाचा सोहळा किती थाटांत पार पडला !' हातांतील पांचशें-पंच्चावनचा बोटांना चटका बसला म्हणून घाईघाईनें ती खालीं टाकीत व पायांखालीं रगडीत भगवंतराव पुटपुटले.

'तर मी काय म्हणतोंय भगवंता ? अरे काय जाण्यालायक का होता आपला अनंतराव ? पण बघ कीं ! काल संध्याकाळीं चांगला जेवला, झोपला पण रात्रीं कधीं त्याचें हार्टफेल झालें कोण जाणे ? पहांटेच्या सुमारास त्याची बायको जागी झाली अन् पहाते तों नवऱ्याचें प्रेत शेजारीं !'

'अरेरे !' भगवंतरावांनीं नि:श्वास टाकला ! तसे भगवंतराव म्हणजे पहाडासारखे धीरगंभीर, असा त्यांचा त्यांचे मित्रमंडळींत लौकिक होता; परंतु अनंतरावांचा असा शेवट ऐकून त्यांचा उर खरोखरीच भरून आला. ओल्या झालेल्या डोळ्यांचा कडा धोतराच्या सोग्यानें टिपीत ते तसेच खुर्चींत रेलून बसले व सुन्न मनानें एकंदर प्रकाराबद्दल विचार करूं लागले.

अजूनहि त्यांचा या घटनेवर पुरता विश्वासच बसत नव्हता. अनंतराव तसा स्वभावानें हळवा होता, पण प्रकृतीनें निकोप होता. दोन वर्षांपूर्वी तर त्याचा कुसुमबरोबर प्रेमविवाह झाला होता अन् यंदांच तर त्यांच्या सुखी संसारांत अरविंदाचा प्रवेश झाला होता. अन् अशा भरल्या संसारांतून अनंतराव कसा अचानक निघून गेला ! डोळे मिटल्या मिटल्या त्यांना अनंतरावांच्या किती तरी स्मृति फिरून फिरून आठवत होत्या. अनंतराव अन् ते अगदीं बरोबरीचे. लहानपणापासून एकत्र शिकले. एकत्र वाढले. अर्ध्या फर्लांगावर अनंतरावांचं घर होतं. दररोजची न चुकतां अनंतरावांच्या बिऱ्हाडीं भगवंतरावांची बैठक ठरलेली असे. एकदां अनंतरावांकडे गेले कीं, भगवंतराव चांगले दोन घंटे सहज बसत असत. अनंतराव म्हणजे मोठे आनंदी आणि मिष्कील गृहस्थ. त्यांच्याशीं घटकाभर बोललें, बसलें कीं भगवंतरावांना खूप मोकळं मोकळं वाटे. त्यांच्या मनावरचीं सारीं काळजीचीं जळमटं पार उडून जात. अनंतरावांकडे भगवंतरावांप्रमाणेंच अनेकांची

बैठक असे, पण अनंतरावांची भगवंतरावांवर विशेष मर्जी! बाकी एका काडीवर विडी शिलगवणारे हे दोघे जिवाभावाचे मित्र होते! तर मग वीरेश्वर हें काय सांगत होता? काय, अनंतराव खरंच का हृदयक्रिया बंद पडून वारले? भगवंतरावांचा त्या बातमीवर अजूनहि विश्वास बसत नव्हता. 'वीरेश्वर,' ते ओरडले, 'अरे, अनंतराव खरंच का गेला?'

वीरेश्वर कांहींच बोलला नाहीं. मघाशीं भगवंतरावांनीं दूर सारलेला पेपर तो तन्मयतेनें वाचीत होता. त्या भल्या माणसाकडे भगवंतरावांनीं क्रोधानें धगधगलेला कटाक्ष टाकला. अनंतरावांच्या मित्रत्वाची पाटी गळ्यांत बांधून हिंडणारा हा वीरेश्वर आपल्या मित्राच्या मृत्यूनें हादरला नव्हता! त्याची काटकुळी मानगुड धरून गदगदा हलवावी व त्याला त्याच्या स्थितप्रज्ञतेचा जाब विचारून चांगले कान उपटावे असा विचार भगवंतरावांच्या मनांत आला. पण मोठ्या कष्टानें त्यांनीं आपलें मन आवरलें. मुकाट्यानें ते उठले. खुंटीवरचा अंगरखा त्यांनीं गळ्यांत अडकवला व बायकोला 'जातों' सांगून जड पावलानें ते निघाले अजूनहि रविवारची स्थानिक आवृत्ति वाचीत बसलेल्या वीरेश्वरकडे त्यांनीं ढुंकूनहि पाहिलें नाहीं!

अनंतरावांच्या बिऱ्हाडीं ते पोंचले तों एकच हाहा:कार उडालेला त्यांना दिसला. नवऱ्याच्या प्रेतापाशीं बसून कुसुमताई मोठ्यानें आक्रोश करीत होत्या. हृदयाला घरें पाडणारा आईचा तो रुदन स्वर ऐकून त्यांचें तान्हें मूल विव्हळत होतें. केव्हांचे तें रडत होतें कोण जाणे; कारण आतां त्याच्या घशांतून रडेंहि धड फुटत नव्हतें. नुनता 'घर्' 'घर्' आवाज काय तो त्याच्या कोवळ्या ओठांतून उमटत होता. आजुबाजूला रहाणारे शेजारी चारी बाजूंस उभे होते, पण किंकर्तव्यमूढ होत्साते ते आपले एकमेकांकडे पहात उभे होते. दहावीस बायकाहि अर्थात् होत्याच; पण त्यांची कुजबुज अशा वेळींहि निरंकुशपणें सुरूच होती.

भगवंतरावांना पहातांच ती सारीच गर्दी दुभंगली. बायकांची कुजबुज चिडीचिप झाली. उभ्या असलेल्या पुरुषांचे चेहरे उद्गारवाचक होते ते आतां प्रश्नार्थक झाले. अनंतरावांचे जिवलग मित्र भगवंतराव आले होते, अन् ते कांहींतरी यांतून मार्ग काढणार होते. सगळेजण भगवंतराव काय करतात तें पाहूं लागले. भगवंतराव सरळ जे आले तों त्यांनीं त्या रडणाऱ्या मुलाला

प्रथम उचललें. इतक्या वेळ रडणाऱ्या त्या मुलालाहि आपल्याकडे लक्ष देणारी व्यक्ति दिसल्यामुळें आधार वाटला. त्याची किरकिर त्यामुळें म्हणा अथवा खरोखरी तें मूल रडून रडून दमल्यामुळें म्हणा एकदम थांबली इतकें खरें! मुलाला एकवार थोपटल्यावर भगवंतरावांनीं पलीकडे उभ्या असलेल्या आनंदीबाईंच्या कडेवर त्याला दिलें व मग ते अनंतरावांच्या शवापाशीं येऊन उभे राहिले. अश्रूंचा पूर एकदम भगवतरावांच्या डोळ्यांत तराळून सांचला, पण विलक्षण निर्धारानें त्यांनीं त्याला धैर्याचा बांध घातला. उष्ण अश्रूंचा तो प्रवाह तिथल्या तिथेंच सुकून गेला. भगवंतराव खालीं वांकले व त्यांनीं अनंतरावांना निरखून पाहिलें. जन्मभर जो माणूस सदाचा हंसतमुख राहिला तो आतां मृत्यूनंतहि खरोखर हंसत होता. निद्रिस्त अनंतराव जसे दिसले असते तसेच ते आतांहि दिसत होते. त्यांचे ते भावदर्शी डोळे कोमेजलेल्या कमळांप्रमाणें दिसत होते. रुंद कपाळावरील त्यांचीं नेहमींचीं अवखळ झुलपें काय तीं कांहींशीं संकोचलेलीं दिसत होतीं. त्यांचें तरतरीत नाक शेंड्यापाशीं कांहींसें काळसर झालेलें दिसत होतें. त्यांचें ओष्ठद्वय विलग झालेलें होतें. अन् असें होतें तरीसुद्धां हा माणूस अचेतन आहे, हें सांगूनहि पटणारे नव्हतें! भगवंतरावांनीं त्यांच्या खांद्याला स्पर्श केला, पण दुसऱ्याच क्षणीं त्या निर्जीव थंड स्पर्शामुळें त्यांनीं हात मागें घेतला. नंतर ते कुसमताईकडे वळले. कुसुमताई अजून आपल्याच दुःखांत चूर होत्या. भगवंतरावांचें येणें अजूनहि त्यांच्या ध्यानांत आलें नव्हतें.

'वहिनी,' अर्धस्फुट स्वरांत भगवंतराव पुटपुटले तेव्हां कुठें कुसुमताईंचें त्यांच्याकडे लक्ष गेलें. भगवंतरावांना पाहातांच त्यांना फिरून एकवार दुःखाचा जबरदस्त उमाळा आला. 'भाऊजी, खरंच का हे आम्हांला सोडून गेले?' असें आक्रंदत त्या पुन्हा अनंतरावांच्या प्रेताकडे जाऊं लागल्या, पण भगवंतरावांनीं त्यांना आंवरलें. 'कुसुमवहिनी,' भगवंतराव निग्रहानें म्हणाले, 'कुसुमवहिनी, अगदीं शांत व्हा पाहूं तुम्ही. तुमचें दुःख मी जाणतों, पण आपल्या का कांहीं हातांत होतें? तुम्हीं असं रडून कसं चालेल? अगदीं गप्प बसा. तुम्हींच जर असा धीर सोडला तर तुमच्या अवीनें कोणाकडे पहावें?'

अरे देवा ! कसे रे सोडून गेले हे ? भगवंतराव तुम्हींच सांगा मी आतां करूं तरी काय ? देवा रे, आई ग !'

'शोक आवरला पाहिजे तुम्ही वहिनी,' त्यांना धीर देत भगवंतराव म्हणाले, 'मी तुमच्या सख्ख्या भावासारखा ना ? मग अगदीं रडूं नका. मी आहें तेथपर्यन्त कशाची काळोजी करूं नका. जीवनांत असे चढउतार येतात, वहिनी. धैर्यानें तोंड देण्यांतच माणसाची परीक्षा होत असते...' भगवंतरावांचा स्वर आतां किंचित् चढला होता. आवाजाला धार आली होती. कुसुमताईवरहि त्या शब्दांचा परिणाम झाला. आपलें रडें त्यांनीं आवरलें व चिंब भिजलेल्या पदरानें डोळे टिपले. भगवंतराव मग त्यांच्यापासून दूर झाले. आपल्या बायकोला ताबडतोब बोलावून आणायला त्यांनीं एका बाईला सांगितलें व इतका वेळ हा सारा प्रकार हताशपणें पहात उभ्या असलेल्या पुरुषवर्गाला त्यांनीं खुणावून बाजूला नेलें.

'अण्णासाहेब, पुढली व्यवस्था आपणालाच करायची आहे. कोणा-कोणाला बोलवायचें तें ठरवा व तत्काळ निरोप पाठवा.' भगवंतराव सांगत होते आणि साऱ्यांच्या माना हलत होत्या. 'तुम्हांला माहीतच आहे, आनंत-रावाला कोणीहि जवळचे नातलग नाहींत. कुसुमताईंच्या माहेरीं आंधीं निरोप धाडा. त्यांच्या घरच्या माणसांना ताबडतोब घेऊन या. आतां नुसतें पहाणें पुरे, कांहीं करायला लागा. बोला, माझ्याबरोबर सामान आणायला दुका-नांत कोण येतोय् ?'

'मी येतों भगवंतराव !' घामाघूम झालेला वीरेश्वर धापा टाकीत म्हणाला. इतक्यांत सुमतीबाई आलेल्या भगवंरावांना दिसल्या. त्यांच्या कानाशीं लागून भगवंतरावांनीं बरेंच कांहीं सांगितलें. अण्णासाहेबांनाहि त्यांनीं कांहीं सूचना दिल्या व हा वेळपर्यंत सुमतीबाईकडे डोळे विस्फारून बघत उभ्या असलेल्या गोपाळराव खऱ्यांची कॉलर पकडून ते अंत्यविधीचें सामान आणायला बाजारांत निघून गेले.

साऱ्या वस्तू खरेदी करून भगवंतराव परत आले तेव्हां एकाचा सुमार झाला होता. सामान बाहेर ठेवून ते आंत शिरले तेव्हां स्वयंपाकघरांत कुसुमताईंना धीर देत तिचें सांत्वन करणारी त्यांची पत्नी त्यांना दिसली. कुसुमताईंच्या घरच्या मंडळींना आणायला माणसें रवाना झालीं होतीं.

थोडक्यांत म्हणजे साऱ्या गोष्टी आतां कांहींशा मार्गाला लागल्या होत्या !

'भगवंतराव, तुम्ही थोडा चहा घेतां का ?' अण्णासाहेबांनीं त्यांना बाजूला नेऊन विचारलें, 'तुमच्या पोटांत अन्नाचा कण गेला नाहीं. शिवाय अजून माणसें जमेपर्यंत पुष्कळ वेळ थांबावें लागेल.'

'नको अण्णा. कशाचीहि मला वासना नाहीं. माझा अनंता मला सोडून गेला आहे, खरें म्हणजे मी तरी आतां कां जगावें ?'

अण्णासाहेबांना आश्चर्य वाटलें. थोडया वेळापूर्वी कुसुमताईंना धीर देणारे हेच भगवंतराव काय ? अशा संभ्रमानें त्यांनीं भगवंतरावांकडे पाहिलें. खळाळून वहाणारे अश्रू, भगवंतराव धोतराच्या सोग्याला पुन्हा पुन्हा पुसत होते !

मानवी स्वभावाचीं हीं विविध दर्शनें पाहून अण्णासाहेब स्तिमितच झाले. प्रसंगीं मेणसारखें मन खडकासारखें बनतें, तर कधीं पहाडासारखें मन श्वास मोकलून रडतें हा अनुभव अण्णासाहेबांनीं गेल्या सत्तर वर्षांत कितीदां तरी अनुभवला होता भगवंतरावाबरोबर मग तेसुद्धां येणाऱ्या मंडळींची वाट पहात बसले.

ही सारी मंडळी येईपर्यंत संध्याकाळचे चार वाजले. कुसुमताईंची आई आली होती, वडील आले होते व चुलतेहि आले होते. याहि साऱ्या मंडळींना शोकावेग आवरेना. पुन्हा एकवार सकाळच्या दुःखाची पुनरावृत्ति झाली. परंतु यावेळीं मात्र भगवंतराव दगडासारखे तटस्थ राहिले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा टिपूससुद्धां मुळीं निघाला नाहीं !

ताटी वगैरे बांधून झाल्यावर अनंतरावांना त्यावर ठेवलें व 'श्रीराम श्रीराम' म्हणत भगवंतरावांनीं प्रेताला खांदा दिला. स्मशानांत पोंचल्यावर-सुद्धीं सगळीं कामें भगवंतरावांनीं पार पाडलीं व मग रॉकेल ओतून भडाग्नी दिल्यावर भगवंतराव दूर जाऊन आपल्या प्रिय मित्राच्या धडाडणाऱ्या चितेकडे विषण्णपणें बघत बसले. !

धडाडून चिता जळत होती. वारा सुटलेला असल्यामुळें लालाभडक ज्वाळा आकाशांत उडया घेत होत्या. धुराच्या लोटांत तड्तड् आवाज करीत कापरासारखीं लांकडें जळत होतीं. त्याकडे पहातां पहातां उदासवाण्या विचारांचा भयानक वणवा भगवंतरावांच्या मनांत चोंहोकडे पेटला. खरोखर

जगण्यांत तरी एवढा काय आनंद आहे? त्यांना वाटलें, एकादे दिवशीं देहाची चिता जर अशीच धडाडून पेटायची असेल तर जगण्याची तरी आटापीट करण्यांत स्वारस्य कोणचें? रोजरोज आपण धांवपळ करतों, पैसे कमवितों व आपलें आणि आपल्या बायकोमुलांचें पोट जाळतों, पण शेवटीं आहि सर्वांचें काय व्हायचें असतें? राखच ना?

'फट्ट!' आवाज झाला व प्रेताची कवटी फुटून पांढरें पिवळें रसायन बाहेर पडलें. चहूं अंगांनीं घोंगावत ज्वालेच्या जिव्हा आल्या व तें रसायन चाटून फस्त करून गेल्या. 'कड्कड्' आवाज झाला व रचलेलीं लांकडें खचून ठिणग्यांचा लोळ तडतडत उडाला! भगवन्तरावांनीं पाहिलें तों साऱ्यांचे चेहरे लांबट झाले होते व व विरागी वृत्तीनें हा देखावा सारे पहात होते. सुन्न होऊन भगवंतरावांनीं आपले डोळे मिटून घेतले.

पण तेवढ्यांत ते केवढ्यांदा तरी दचकले; कारण त्यांच्या मिटलेल्या डोळ्यांपुढें दुसरीच एक चिता रचलेली दिसली व त्यावर त्यांच्या प्रिय पत्नीचें शव कोणी ठेवीत होतें! भगवंतरावांच्या अंगाला दरदरून घाम सुटला. आपण, आपली पत्नी व आपला लाडका बाब्यासुद्धां या भयानक आपत्तींतून सुटणार नाहीं या कल्पनेनें त्यांच्या अंगावर शहारे आले. जीवनांतील वैफल्याच्या अत्यंत कटु सत्याचें दर्शन एकवार फिरून त्यांना झालें. छे! छे! त्यापेक्षां हे सारे मोहपाश तोडून जंगलांत कां जाऊं नये? असें त्यांना वाटलें. संसार असार आहे हें त्यांनीं अनेक वेळां ऐकलें होतें. पण पटलें मात्र आतांच होतें. अशाश्वत जीवनाची त्यांना अनिवार उबग आली. कशाचा कशाला आधार नव्हता तर! वेळ आल्यावर सारेजण आपापल्या रस्त्यानें जाणार होते—ते मरणार होते. तेव्हां सुमतीबाई त्यांना कांहीं साथ करणार नव्हत्या. बाब्या कांहीं त्यांचें बोट धरून येणार नव्हता. त्यांच्या घरांतील सारा पैसा, सारे दागिने, साऱ्या वस्तू तेथल्या तेथें टाकून त्यांना जावें लागणार होतें. अन् अशा प्रकारें एके दिवशीं जर खरोखरीच जायचें आहे तर मोह तरी कशाचा बाळगायचा? रोजच्या मरेमरेतोंवर कष्ट करण्याचे पर्यवसान पुन्हा जर मरणांतच होणार असेल तर मग जगावें तरी कां? पुन्हा कशाची म्हणून निश्चिती नाहीं. जगण्याची नाहीं तशी मरण्याची नाहीं. आतां हा अनंतराव आज मेला होता त्याला कुठें काय धाड भरली

होती ! पण पूर्वसंकेतानुसार त्याची घटका भरली व भरल्या संसारांतून सुखी सहजीवनांतून त्याला जावें लागलें ! त्याची ती गत तर त्याच्या प्रिय पत्नीची दुसरीच ! अवघ्या दोन वर्षांचें सुख तिनें संसारांत उपभोगलें अन् त्यानंतर असा हा भयानक भोग भोगणें आतां तिच्या भाळीं आलें ! या जगांत येऊन पुरता महिनाहि न उलटलेल्या त्यांच्या छोटचा अविनाशला तर आपल्यावर केवढें प्रचंड दुःख कोसळलें आहे, याची सुतराम् कल्पना नव्हती ! दैवाच्या या चमत्कारिक खेळानें भगवंतराव अगदीं खचून गेले. घरीं परत जावेंसें त्यांना अगदीं वाटेना.

पण इतक्यांत मंडळी परतली. वीरेश्वर भगवंतराव बसले होते तेथें आला व म्हणाला, ' उठा भगवंतराव, मंडळी घरीं निघाली. '

' मी कांहीं येणार नाहीं वीरेश्वर ', भगवंतराव निग्रहानें म्हणाले.

' वेडचासारखें करूं नका भगवंतराव. वेळ आली कीं प्रत्येकजण येथें न चुकतां वास करायला येणार आहे, हें खरं आहे ! पण म्हणून आत्तांच गळून जाण्याचें कारण नाहीं. तुम्हीं येथें असे उदासवाणे बसून राहिलांत तर अनंतरावांच्या आत्म्यालाच तें बरें वाटणार नाहीं. '

' असें म्हणतोस वीरेश्वर ! ' व्याकूळ स्वरांत भगवंतराव उद्गारले व मग खडबडून उठत वीरेश्वरचा हात घट्ट पकडून परत निघाले. चालतांना त्यांचीं पावलें जड पडत होतीं आणि मन मात्र मागेंच रेंगाळत होतें.

ते घरीं आले तेव्हां रात्रीचे आठ वाजले होते. घरांत ते शिरले तेव्हां मोठमोठचानें बाब्या किंचाळत होता व त्याच्या आवाजाशीं जणूं स्पर्धा करीत सुमतीबाई त्याच्यावर खेंकसत होत्या. क्षणभर येथें थांबूं नये असा उद्वेगजनक विचार त्यांच्या मनांत आला व त्यांनीं आंत टाकलेलें पाऊल खरोखरीच मागें घेतलें.

इतक्यांत सुमतीबाईंची त्यांच्याकडे दृष्टी गेली. भगवंतरावांच्या थबकण्याचा अर्थ त्यांनीं दुसराच घेतला. घरांत शिवाशिव होऊन विटाळ होऊं नये म्हणून भगवंतराव बाहेरच उभे आहेत असें त्यांना वाटलें. ' थांबा हं, पाणी उपसून देतें आंघोळीला, ' असें म्हणत त्यांनीं दोन मोठाल्या बादल्या भरून ऊन ऊन पाणी भगवंतरावांसाठीं उपसून मोरीच्या कट्टचावर ठेवलें.

अंघोळ आटोपून भगवंतराव स्वयंपाकघरांत आले अन् आतां त्यांच्या लक्षांत आलें कीं, सबंध दिवसांत आपल्या पोटांत अन्नाचा कण गेलेला नाहीं. त्या विचारासरशी त्यांच्या पोटांत अचानक भुकेचा आगडोंब उसळला. सुमतीबाईंनीं स्वयंपाक सिद्ध केला होता. पानें वाढल्यावर भगवंतराव जेवावयास बसले.

'कुसूमताई आतां आपल्या माहेरीं रहायला जाणार आहेत.' वाढतां वाढतां त्यांच्या पत्नीनें त्यांना अनंतरावांच्या घरचें ताजें वृत्त सांगितलें; पण भगवंतराव कांहीं बोलले नाहींत. मुकाटयानें ते भराभर जेवत होते. कधीं नव्हे इतकी सणसणीत भूक त्यांना लागली होती. पानांत जें जें पडलें त्यावर ते तुटून पडले व तसेच मुकाटयानें बाहेरच्या आरामखुर्चींत येऊन विसावले.

अजूनहि त्यांच्या मनांतील विचारांची भुतावळ मुकाट बसली नव्हती. इतक्यांत त्यांना सिगारेटची आठवण झाली. खुर्चीतून उठून त्यांनीं सिगरेट काढली व ती शिलगावल्यावर मोठमोठे दोनचार झुरके त्यांनीं लागोपाठ घेतले.

परंतु याहि औषधाचा परिणाम त्यांच्या खिन्न विचारांवर मुळींच झाला नाहीं. सिगरेट जळत होती अन् त्यांचे विचारहि धगधगत होते. सिगारेट संपत आल्यावर त्यांनीं ती खुर्चीच्या लांकडी हातावर घासली व थोटूक दूर झुगारून दिलें. पलीकडे पडलेल्या त्या उपेक्षित थोटकाकडे पाहून त्यांना वाटलें कीं, मानवी आयुष्याचाहि शेवट या थोटकाप्रमाणेंच नाहीं का ?' सिगारेट जळते तसेंच मानवी जीवित जळतें, जगतें ! जगण्याची क्रिया मंदावली कीं एके दिवशीं मृत्यु या जीविताला चुरडतो व दूर झुगारून देतो. आपल्या परम मित्राचें जीवित आतां अर्ध्या जळून गेलेल्या त्या थोटकाप्रमाणेंच आहे, अशी कल्पना येतांच त्यांच्या कपाळांतून वेदनेच्या झिणझिण्या उठल्या. कपाळावर जोरजोरानें बुक्क्या मारून घेत त्यांनीं मान मागें टाकली व पाय पुढें लांबवले.

भगवंतराव जागे झाले तेव्हां आपण अद्याप खुर्चींतच आहोंत असें त्यांना दिसून आलें. खूप वेळ आपल्याला झोप लागली असावी असें वाटून ते खडबडून उठले. पण घड्याळांत अवघे साडेदहा वाजत होते. स्वयंपाकघरांत सर्वत्र आवराआवर झालेली दिसत होती. पलीकडच्या खोलींत भगवंतरावांनीं

डोकावून पाहिलें तों त्यांच्या पत्नीनें आंथरूणें वगैरे नीटनेटकीं घातलीं होतीं व मुलाला जवळ घेऊन ती गाढ झोपीं गेली होती. आपल्याप्रमाणेंच तिलाहि आज फार दगदग झाली आहे, याची आठवण झाल्यावर त्यांना आपल्या पत्नीचा अभिमान वाटला. पुन्हा बाहेरच्या खोलींत येऊन त्यांनीं फेऱ्या घातल्या. आतां त्यांना खूप बरें वाटत होतें. बरीचशी हुषारी अंगांत आली होती. बाहेरचें दर्शनी दार अजून उघडें होतें तें त्यांनीं लावून घेतलें व मग ते आंतल्या खोलींत आले.

दिवा तसाच जळत ठेवून त्यांची पत्नी झोपली होती. तिच्या चेहऱ्याकडे भगवंतरावांनीं पाहिलें. श्रांत झालेल्या तिच्या गौरमुखमंडलावर चारदोन घर्मबिंदू मण्यांप्रमणें चमकत होते. भगवंतराव हंसले. क्षणापूर्वीं त्यांना पत्नीबद्दल वाटलेला अभिमान आतां दुणावला. थोडा वेळ ते तसेच स्थिर नजरेनें तिच्याकडे पहात होते. कांहीं विचार निश्चित करून त्यांनीं आपल्या पत्नीजवळून बाब्याला उचलून घेतलें. त्याची झोप चाळवूं नये म्हणून त्याच्या पाठीवर थोपटीत त्याच्या गालांचा मुका घेतला व मग त्याला त्यांनीं कोपऱ्यांतील पाळण्यांत ठेवलें. नंतर भगवंतराव वळले. पुनश्च एकवार त्यांनीं आपल्या पत्नीकडे पाहिलें व त्याच वेळीं त्यांनीं दिवा मालवला.

—कीर्तन आटोपल्यावर अकराचे सुमारास भगवंतरावांच्या बिऱ्हाडासमोर रहाणाऱ्या सीताकाकू जिना चढून वर आल्या. भगवंतरावांच्या बंद दाराकडे निषेधाचा एक नेहमींचा कटाक्ष त्यांनीं टाकला व तोंडांतल्या तोंडांत कांहीं पुटपुटत त्या आपल्या खोलींत शिरल्या !

अनुक्रम ३००७८
विभाग
क्रमांक २२१८
नों.

## ८ .... कुठें हो असतील आक्का आतां ?

कांहीं म्हणतां कांहीं आक्कांना कमी नव्हतं. त्यांचं दैवच असं बलवत्तर होतं कीं, उभ्या आयुष्यांत कांहीं म्हणून कांहीं त्यांना कमी पडलंच नाहीं मुळीं. खरोखरच अशा भाग्याचा स्त्री जातीलाच नव्हे तर पुरुष वर्गालाहि हेवा वाटला असता. आक्कांनीं जन्म घेतांना जें घर शोधलं तें म्हणजे अगदीं लाखांतील एक. लक्षाधिशांनीं मान खालीं घालावी एवढ्या इतमामाचं आप्पासाहेब ओकांचं कूळ होतं. आप्पा ओक म्हणजे केवढा प्रचंड माणूस. प्रचंड अनेक दृष्टीनं--देहानं प्रचंड, धनानं प्रचंड, मानानं प्रचंड, अधिकारानं प्रचंड आणि हृदयानंहि प्रचंड ! आप्पा हा असा अनेक अर्थानं प्रचंड होता. कर्जत तालुक्यांतील तांबे गांवच्या गांव यांच्या मालकीचं. एका टोकाला उभं राहून दुर्बिणींतूनहि नजर पोचणार नाहीं इतकी आडवी उभी जमीन आप्पासाहेब पुरुषोत्तम ओक या व्यक्तीच्या नांवें सरकारदरबारांत नोंदलेली होती. दसरा--दिवाळीच्या सुमारास ही मैलोंगणती जमीन हिरवीगार दिसायची. कापणी झोडणी झाली कीं डोंगराएवढी रास उभी रहायची पिवळ्या जर्द भरदार भाताची. गिरणींत भात भरडलं कीं स्फटिकासारख्या शुभ्र तांदुळांनीं गोणीच्या गोणी टरटरून भरायच्या. पेंढ्यांचे माचच्या माच आवारांत उभे रहायचे. आप्पांच्या घराचं आवार म्हणजे एक मोठं संस्थान होतं. त्या आवारांत नव्हतं काय ? आधीं एवढं मोठं आवारच कुठं पहायला मिळण्यासारखं नव्हतं. आठी दिशांनीं तें इतकं मागं सरकलं होतं कीं अर्ध

गांव त्या आंवारानेंच गिळलं होतं. आंत एक सोडून दोन मोठीं घरं होतीं. दगडी घरांना जुन्या काळचीं सुंदर कलाकुसर शोभून दिसत होती. त्या घरांच्या पायऱ्याचे दगडच इतके गुळगुळीत व एकसंध होते कीं चार माणसांनीं एकेका पायरीवर खुशाल आडवं तिडवं झोपावं. घरांच्या भिंती तर जणूं पोलादाच्या घडविलेल्या होत्या. गोडच्या तेलांत चुना मळून आप्पांच्या पणजानें त्या भिंती बनविल्या होत्या. पहार हाणली कीं खाण्कन आवाज करून पहार उलटायची व उलट्या बाजूनें मारणाऱ्याच्या छातीवर धडकायची !

या घराला आणि आप्पांच्या एकंदर इतमामाला साजेशी अशी आप्पांची एक खास टपाल गाडी होती. टपाल गाडी म्हणजे डोक्यावर अर्ध-वर्तुळाकार छप्पर असलेली हलकी पण मजबुत बांधणीची बैलगाडी. आप्पांची 'टपाल पेशल' म्हणजे पंचक्रोशींतील एक खास आकर्षण होतं. 'धर्म्या, 'टपाल पेशल' तयार ठेव.' असा आप्पांचा हुकूम झाला कीं धर्माची एकच धांदल उडत असे. या पेशलसाठीं काळचा ढवळचा ही बैलजोडी निवडलेली होती. गाईला जुळीं वासरं फार क्वचितच होतात. परंतु आप्पांच्या वडिलांच्या वेळीं त्यांच्या कपिला गाईला एकाच वेळीं दोन खोंड झाले. दोनहि खोंड असले तयार होते ! ते मोठे झाले तशी असे कांहीं माजले कीं त्यांच्या नजरेला नजर भिडविणं मुष्किल झालं. हाडापेरानं तसे हे दोनहि बैल मोठाड नव्हते. पण म्हणून काय झालं ? लहानपणापासून घमेलीं घमेलीं उडीद पचविलेलीं हीं जनावरं अफाट ताकदीचीं झालीं. 'पेशल तयार ठेव' असा हुकूम सुटला कीं धर्माची उगीच गाळण उडत नसे ! या काळ्या–ढवळ्याला जोखडाखालीं आणणें म्हणजे एक दिव्य होतं. बरं मोठ्या कष्टानं वेसणी खेचून गाडीला जुंपले कीं, क्षणभर उभे रहाण्याची त्यांतील एकाचीहि तयारी नसे. कळ दाबल्यावर यंत्र सुरूं व्हावं तसं जोखडाच्या मधल्या दांड्यापुढून धर्मा दूर झाला रे झाला कीं गाडी जी दौडूं लागे ती थेट कर्जत स्टेशनाच्या धक्क्याला येऊन आदळे. अधेमध्यें गाडी थांबविण्याची वेळ आली तर कोण यातायात पडे. दुरून ही गाडी येतांना दिसली कीं माणसांप्रमाणें जनावरंहि भयानं उड्या मारून रस्त्यांतून दूर होत. आप्पा ओकांची ही टपाल गाडी अगदीं खास स्पेशल गाडी होती ! उगाचच ते ही गाडी वापरत नसत. त्यांची स्वारी या गाडींतून निघाली कीं पहाणाऱ्याला त्याचा अर्थ तात्काळ कळे.

रेशीमकाठीं तलम धोतर, पिवळा शर्ट, तपकीरी कोट व डोईला मंदिल बांधून आप्पा या गाडींतून कर्जतला निघाले कीं पहाणारे सांकेतिक अर्थाच्या माना डोलावीत. आप्पासाहेब आपल्या खास कामासाठीं पुण्यास निघाले ही गोष्ट कांहीं कुणाला सांगावी लागत नसे !

तसं म्हटलं तर आप्पांना सारीं सुखं होतीं. चार मुलं व दोन मुली होत्या. सारीं अपत्यें देखणीं व सुदृढ प्रकृतीचीं होतीं. त्यांची बायकोहि साक्षात लक्ष्मी होती. तिचं नांवहि लक्ष्मीच होतं. दिसायला आप्पांची बायको हजारांतील एक होती. स्वभावानंहि फार सरळ व गोड होती. गावांतील इतर लोकांप्रमाणंच तिलाहि आप्पांचा धाक वाटे आणि म्हणूनच आपल्या नवऱ्याच्या पुण्याच्या फेरीबद्दल चकार शब्दानं तिला विरोध करतां येत नसे.

पुण्याला आप्पा कुणाला भेटायला जातात हें गांवाप्रमाणंच तिलाहि माहीत होतं. आप्पांनीं पुण्याला पारशी वाण कसं हुडकलं हें कुणाला माहीत नव्हतं पण त्याबद्दलची बित्तंबातमी गांवांत होती. चार दोन विशेष रसिक गांवकरी तर दोन रुपये सात आणे गुणिले दोन इतके, म्हणजे पुण्याच्या परतीच्या प्रवासाचे पांच रुपये खर्चून आप्पांची निवड महाप्रयत्नानें पाहून आले होते व त्याबद्दल साऱ्यांनीं आप्पांचं मनांतल्या मनांत कौतुकच केलं होतं.

आप्पांचं पुण्याचं तें पारशी ‘पात्र’ म्हणजे कांहीं नदींतील वहाती पंचपात्री नव्हती. मोठ्या घराण्यांतील ती चांगली सुस्वरूप व सुखवस्तू बाई होती. आप्पांवर तिचा खरोखरीचा जीव होता. आप्पांच्या पैशापेक्षां त्यांच्या तब्येतीवर ती बया खूष होती. तिच्याच तोलामोलाचा हा उमदा गडी होता ना !

आप्पांशिवाय या पेशल गाडींत आणखी एकाला बसण्याचा हक्क होता. आप्पांच्या सर्वांत धाकट्या मुलीला तो हक्क जन्मानेंच प्राप्त झाला होता. आक्कानें, ‘टपालींत बसायचें’ असं नुसतं म्हणण्याचा अवकाश, गाडी तत्काळ सज्ज करण्यांत येत असे. तसं सर्वंच पोरांवर आप्पा प्रेम करीत पण लहानग्या आक्कावर तर ते स्वतःच्या जिवापेक्षा अधिक जीव टाकीत.

मागें एकदा आक्का साध्या किरकोळ तापानें आजारी होती. आणि त्याच दुपारीं पुण्याहून आप्पांना 'तिकडे' निघून येण्याचा तांतडीचा निरोप आला. पण आप्पांनीं त्या निरोपाला उलट निरोपहि पाठवला नाहीं कीं त्याची जरासुद्धां दखल घेतली नाहीं. चार दिवसांनंतर आक्का बरी झाली तेव्हां मग आप्पांनीं ओरडून सांगितलें, 'धर्मा, आज टपाली तयार ठेवायची!'

आप्पांची एवढी ही एक भानगड सोडली तर एरवी त्यांचें उभें आयुष्य धुतल्या तांदळासारखं होतं. आप्पांची ही भानगड माहीत असूनही कोणीहि त्यावद्दल नाकं मुरडत नसत. कारण त्यांच्या ऊंच्यापुऱ्या धिप्पाड शरिराप्रमाणेंच त्यांचे अन्य गुणहि तितक्याच उंचीचे होते.

दरवर्षी शेतीभातीच्या उत्पन्नाची रास दोहों हातांनीं आप्पा घरांत आणीत आणि मग वर्षभर अडल्या पडल्याला हें धन दोन्ही मुठींनीं उधळीत रहात. 'आप्पासाहेब, अवंदा भाताची चणचण हाय.' कोणी गरजू कूळ आप्पांना म्हणे.

'बरं, मग म्हणणं काय ?'

'काई नाई. मण दोन मण...'

'समजलों. गाडी आणलीस का ? जा मग गाडी घेऊन ये. दोन मणांचं पोतं ओसरीवर पडलंय्, जा पळ आता लवकर.'

आप्पांच्या बोलण्यावर तो बापडा शेतकरी उपकाराच्या भरानें असा कांहीं खचून जाई कीं तो थेट आप्पांच्या पायांवरच पडे. पण जरा वेळानें मुंडी उचलून बघतो तर आप्पा कांहीं जागेवर नसत. 'असला बामण पुन्हां व्हायाचा नाहीं. बामना तुला काय नाई पडणार कमी.' असलं कांहीं बाहीं पुटपुटत तो शेतकरी संतुष्ट मनानं बाहेर पडे.

आणि आप्पांचे हें औदार्य गांवांतील श्रीमान शुक्रवार पाटलाच्या कृपणतेवर मोठें उठावदार दिसे. असेंच एकादें कुळ भात मागायला कधीं नव्हे तें शुक्रवार पाटलाकडे गेलें कीं पाटील म्हणत,—

'काय रे बाबा, कशासाठीं पायधूळ झाडलीस ?'

'गरिबाची काय थट्टा करताय्! पायधूळ कशाची आलेय्? वाईच मणभर भात होवं होतं–'

'अरे मणभर कां ? पांच मण ने कीं' पाटील म्हणत.

'छ ! इतकं कशापाई ? दोन मण पुरंल...'

'ब ऽऽऽ रं ! दोनच मण पाहिजे ना ? ठीक ठीक ! बरं, गाडीहि घेऊन जा माझी. ल्हान्याला पाठवितों गाडीवर.'

'चालेल !'

'—आणि माझी बायकोहि घेऊन जा बरोबर चालेल ?'

पाटलाचं हें असल उपरोधिक बोलणं ऐकलं कीं शेतकरी बुडाखालचा पटका झटकून उठे अन् तडक चालूं लागे. दुःखी कष्टी झालेल्या जखमी हृदयावर आप्पांच्या परोपकारी थोर स्वभावाची मलमपट्टी अगदीं हटकून व्हायची आणि मग या उपचारांनीं टवटवीत झालेलीं हळुवार मनं आप्पांच्या या गुणांची तारीफ करीत असायचीं.

अशा या आप्पा ओकांची आक्का ही लाडकी सुकन्या. ही जन्मली अन् मग आप्पांच्या घरांत फिरून पाळणा हलला नाहीं. आक्का म्हणजे ओकांच्या बड्या घराण्याचा एक मानबिंदूच होता. आक्काच्या पहिल्या वाढदिवशीं आप्पासाहेबांनीं साऱ्या गांवाला बांसुदीपुरीचं जेवण दिलं.

'माय, आक्काबाईचं काय चाललंय ?' हा प्रश्न निरनिराळ्या रचनेनं कितीतरी जणं किती प्रकारें विचारीत याला कांहीं सुमार नव्हता. 'आक्का, आक्का,' अशा हांका आप्पा दिवसांतून किती-वेळा उंच आवाजांत पुकारीत याचा हिशेब नव्हता. सुवर्णाचं बोंडलं तोंडांत धरून जन्मलेल्या या पोरीचं आप्पांना अपरंपार कौतुक होतं. ती हळूहळू मोठी होऊं लागली तशी आप्पा म्हणायचे, 'काय आक्काबाई, हल्लीं हूडपणा कमी झाला तुमचा. मोठेपणा अंगीं धरलाय कीं काय आज काल ?'

यावर पांच वर्षांची आक्का डोळे मोठाले करायची व उजव्या हाताचें बोट नाचवीत म्हणायची, 'हे हो काय आप्पा, मला जन्मापासून आजीबाई बनवलंय तुम्हीं. नांव काय तर म्हणे आक्का ! सांगून ठेवतें. हें असलं नांव मला मुळींसुद्धा खपायचं नाहीं. हुं: !'

आपल्या अवखळ लेकीच्या या सहज सुंदर उद्गारांनीं आप्पांचा ऊर अभिमानानें भरून यायचा. एकदम पोरीला कडेवर घेऊन तिला ते म्हणायचे,

'आम्हीं तुला आक्काबाईच म्हणणार. कशी शहाण्या आजीबाईसारखं बोलतेस ? हं ! तर काय आक्का--'

'ऊं: हुं: ! मी नाहीं जा-' फुरंगटून आक्का म्हणायची व आप्पांच्या कडेवरून उतरूं लागायची.

तिला हलकेच खालीं ठेऊन आप्पा म्हणायचे, 'अग आक्का, पण तुझं पाळण्यांतलं नांव कित्ती कित्ती गोड आहे-'

'माहीत आहे मला-'

'काय तें ?'

'सांगेन. पण त्याच नांवानं हाक मारीन असं कबूल करा पहिल्यांदा.'

'आणि नाहीं कबूल केल तर ?

'तर मुळ्ळींच नाहीं सांगायची. माझं पाळण्यांतलं नांव--'

'नक्कोच सांगूस मुळ्ळींच. तुझं पाळण्यांतलं नांव माहीत आहे आम्हांला आम्हींच ठेवलंय तें.' आप्पा म्हणायचे व तिला आणखी चिडवायचे.

'नाहींच मुळीं माहिती तुम्हांला. सांगा बघूं मला—'

'काय देशील ? '

'पापा.'

'अगदीं गोड गोड ?'

'हं.'

'माझी लाडकी कुंदा ती.' असं म्हणत आप्पा तिला फिरून कडेवर घ्यायचे व पटापट तिचे मुके घ्यायचे.

आक्काला सहावं वर्ष लागलं. सातवं लागलं. दिसामास ती वाढत होती. अंगापिंडानं भरत होती. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षींच आक्काचं सौंदर्य-पुष्प असं कांहीं फुललं कीं साऱ्या गांवच्या लोकांच्या डोळ्यांतील ती फूल बनली. डोळ्यांत फूल पडलं कीं डोळा जसा चुरचुरतो त्याचप्रमाणें आक्का दृष्टीस पडली कीं पहाणाऱ्याचं हृदय हुळहुळायचं. पुरुष असो वा स्त्री असो, वृद्ध असो, वा मूल असो तिच्याकडे एकदां पाहिलं कीं पाहाणाऱ्याला आपली दृष्टी तिच्यावरून काढणं मोठं कठीण होऊन बसे.

तिला कुणाची दृष्ट पडूं नये म्हणून लक्ष्मीबाई तिला किती जपायच्या !

आक्का पंधरा वर्षांची झाली पण तिच्या अंगांतील अवखळपणा कधींच लुप्त झाला नाहीं. इतके दिवस जास्वंदी रंगाचं परकर पोलकं तिला शोभत असे. आतांहि तें तिला विशोभित मुळींच दिसत नसे उलट या पोषाखांत तिचं वहरणारं सौंदर्य विशेषच डोळयांत भरत असे. आणि म्हणूनच मुठं-मुटीत परकर पोलक्यानिशीं आक्का बाहेर पडली कीं आई तिला हटकायची; म्हणायची—'

'अक्के, शोभतं कां ग तुला आतां हें ?'

तारुण्याच्या सीमारेषेवर उभ्या असलेल्या त्या मुग्ध किशोरीला आईच्या म्हणण्यांतील गूढार्थ कसा समजणार ? तिच्या प्रश्नांतील चिंतातूर स्वर तिला अपरिचित वाटायचा. यांत चिंताजनक परिस्थिती आहे कुठें अशा संभ्रमानें ती उसळून म्हणायची–

'न शोभायला ग काय झालं आई ?'

'नाहीं तुला कळायचं तें. चल तूं कशी आपली घरांत.' असें म्हणत आई तिला बळेंबळेंच आंत न्यायची. या साऱ्या सावधगिरीचा अर्थ कळायला अजून तिला थोडा आवकाश होता !

तो अर्थ तिला ज्या दिवशीं कळला त्या दिवसापासून आक्का अबोल झाली. पूर्वीं ती धावायची काय, हुंदडायची काय. पण आता चालतांना ती पावलं मोजून टाकायची. घरांत असली अथवा घराबाहेर पडली तरी दृष्टी आपली जमिनीकडे लावायची पूर्वींचा अल्लडपणा, खेळकरपणा पार पळून गेला. लोकांसमोर यायला आतां ती टाळूं लागली पण लोकांना टाळणें तिला दिवसेंदिवस अशक्य होऊं लागलं. सारें जगच आपल्याकडे औसुक्यानं पहात आहे हें नजर वर न उचलतांहि तिला समजूं लागलें. व याची जाणीव होतांच तिच्या उभ्या शरीरांतून एक गोड शिरशिरी उसळूं लागली.

आपली लेक आतां लग्नाला योग्य झाली हें लक्ष्मीबाईनीं ओळखलें. त्यांनीं आप्पांना एक दिवस म्हटलें, 'लेकीला पंधरावं संपून सोळावं वर्ष लागेल म्हटलं आषाढांत...'

'लागेना का ?' निष्काळजीपणाच्या स्वरांत आप्पासाहेब म्हणाले. 'लग्नाची कशाला घाई करायची पोरीला ? त्यांतून सोळावं म्हणजे कोवळंच वय झालं...'

'कोवळं कशानी ? हेंच अगदीं ठीक वय आहे, लग्नाचं. त्यानंतर मुली जून दिसूं लागतात. घोडनवऱ्या होतात. आपलं लग्न झालं त्या वेळीं मी किती वर्षांची होतें ?'

'नुकतंच तुला नहाण आलं होतं. असशील बारा वर्षांची.'

'झालं तर मग. आक्काला आहे आतां सोळावं वर्ष चालू. माझ्या आई–वडिलांनीं मला बारा वर्षांचंहि पुरतं होऊं दिलं नाहीं.'

'अग, ती झाली बत्तीस वर्षांपूर्वींची गोष्ट ! झालंच तर तुझ्या आई वडिलांनीं कांहीं घाई नव्हती केली लग्नाची. आमच्याच तीर्थरूपांनीं आमच्यासाठीं तुम्हांला मागणी घातली. आठवतं का ?'

कित्येक वर्षांपूर्वींचा तो सुखपर्यवसायी चित्रपट लक्ष्मीबाईंच्या डोळयांपुढें जशाचा तसा उभा राहिला व लाजेनें त्या अगदीं चूर होऊन गेल्या.

त्या वेळीं बोलतांना जरी आप्पासाहेबांनीं आपल्या लेकीच्या लग्नाचा विषय उडवून लावला तरी तो केवळ वरकरणींच. आक्काच्या लग्नाचा विषय कधीं मधीं त्यांच्या डोक्यांत येत असे पण 'काय घाई आहे त्याची एवढी' असा विचार करून ते तो विषय चटकन् विसरूनहि जात--

० ० ०

पण त्या वर्षीं काय झालं कीं, आप्पासाहेबांचे द्वितीय चिरंजीव बाबूराव कॉलेजला सुटी पडल्यावर आपल्या गांवीं जे आले ते कांहीं एकटे आले नाहींत. त्याला उतरवून घेण्यासाठीं कर्जत स्टेशनवर जी गाडी पाठविली होती ती दारांत येतांच बाबूराव उडी टाकून खालीं उतरला व उंच आवाजांत ओरडला, 'आप्पा, अहो आप्पा, अग ए आई, पाहुणे आले आहेत बघ माझ्याबरोबर पुण्याहून.'

आप्पा त्या वेळीं घरांत नव्हते पण बाबूच्या गलक्यानें लक्ष्मीबाई मात्र हातांतील काम टाकून स्वयंपाकघरांतून बाहेरच्या दरवाजांत आल्या व कोण पाहुणे आले आहेत तें पाहूं लागल्या. त्याच वेळीं त्यांना बाजूस सारून आक्का धावतच बाहेर आली. बाबूच्या हांका तिला मागील दारीं ऐकूं आल्या होत्या व म्हणूनच झोपाळयावरून उडी टाकून ती तिकडे धांवली होती. पुण्याहून आपली आत्या बाबूबरोबर आल्याचा तिनें अंदाज केला. कारण गेल्या वर्षीं

बाबू कॉलेजच्या प्रथम वर्षाची परीक्षा आटोपून असाच उन्हाळयाच्या सुट्टींत घरीं आला होता व येतांना त्यानें पुण्याच्या आपल्या आतेलाहि बरोबर आणलें होतें.

'ओळखलं कोण आलंय् तें.' असें म्हणत आक्का धांवतच गाडीपाशीं आली व दुसऱ्याच क्षणीं एकदम थबकून उभी राहिली. लाल आलवणाचा शेव डोक्यावरून घेतलेली आपली प्रेमळ आत्या बैलगाडींतून सांवरत उतरत असणार हें चित्र होतं तिच्या डोळयासमोर. पण त्याऐवजीं चित्रासारखा दिसणारा एक उमदा पोरसवदा तरुण मोठ्या विनयशीलपणें गाडींतून उतरत असतांना दिसला तिला.

मोठ्या आचंब्यानें जगन्नाथ पाहूं लागला. विस्मयचकित झालेली आक्का त्याच्या नजरेस पडली. क्षणभर दोघंहि अवाक् नजरेनें परस्परांना निरखीत होती. पण मग लागलीच आक्का लाजली. तिनें दृष्टि खालीं वळवळी. '...मला वाटलं...' असं कांहींसं ती बोलूं पहात होती. पण मग ती मुळीं तेथें थांबलीच नाहीं. खारीच्या गतीनें ती बाहेर आली होती. ती आतां हरिणीच्या वेगानें आंत पळाली.

'ही माझी धाकटी बहीण आक्का—म्हणजे कुंदा' बाबूराव जगन्नाथच्या पाठीवर थोपटत त्याला सांगत होता. पण त्याची थाप पाठीवर बसतांच जगन्नाथ कोण चमकला—'अं? काय?' असं कांहींसं पुटपुटत तो गोंधळून पाहूं लागला.

'कांहीं नाहीं रे. म्हटलं तुझी बॅग घेतलीस कीं नाहीं गाडींतली?' त्याच्या चर्येवरील संभ्रमाचा अर्थ समजून बाबू उत्तरला.

'असं म्हणतोस होय? मला वाटलं...हं बॅग ना, नाहीं, आहे, ती गाडींतच आहे '

'असूं दे! असूंदे! धर्मा घेऊन येईल ती. चल आंत.' असं म्हणत बाबूनें जगन्नाथचा हात पकडला व त्याला तो आंत नेऊं लागला.

○ ○ ○

यंदाचे वर्षीं इंटरच्या परीक्षेच्या दिव्यांतून पार पडल्यावर बाबूरावनें जगन्नाथला आपल्या गांवीं चार दिवस चलण्याचा आग्रह केला होता.

जगन्नाथनेहि त्याच्या बेताला नेहमींप्रमाणें मोडता घातला नाहीं. कारण त्याला-सुद्धां पुणं सोडून मोकळचा खेडेगांवात जावेंसें वाटलें होतें. आतांपर्यंतचं त्याचं सार आयुष्य पुण्यास गेलं होतं. पुणें सोडून जरा दुसरीकडे फेरफटका करून यावें असें जगन्नाथला आज बरेच दिवस वाटत होतं. पण तसं करायचं म्हणजे मग वडिलांना घरीं एकटेंच रहावें लागेल ह्या विचारानं दरखेपेस पुणें सोडायचा त्यानें बेत रहित केला होता. त्याला आई नव्हती अन् इतर कुणी भावंडंहि नव्हतीं म्हणून त्याच्या वडिलांचा त्याच्यावर भारीच जीव होता. जगन्नाथ कुठें बाहेरगांवीं गेला कीं त्यांना आपल्या एवढचा थोरल्या विस्तीर्ण बंगल्यांत अगदींच एक्कलकोंडचासारखं वाटे. परंतु या वेळीं मात्र आग्रह करून त्यांनींच जगन्नाथला बाबूबरोबर त्याचे गांवीं चार दिवस मोकळेपणानं घालविण्यासाठीं धाडून दिलं होतं.

परंतु चार दिवसांचे झाले आठ दिवस, आठांचे पंधरा दिवस झाले पण जगन्नाथ कांहीं परतला नाहीं. बरें त्याचें पत्र सुद्धां नाहीं. आणखी दोन दिवस वाट पाहून त्याचे वडिलांनीं त्याला पत्रांतून लिहिलें,...जगन्नाथ, बरेच दिवसांत तुझं कुशल कळलें नाहीं म्हणून सहज लिहिलें. एरवीं तसें कांहीं विशेष कारण नाहीं. बाबूचें गांव तुला बरेंच आवडलेलें दिसतें व म्हणून बाबूरावनें तुला फारच आग्रहानें ठेवून घेतलेलें असावें. परंतु माझी कांहीं त्याला हरकत नाहीं. तूं नसल्यामुळें कांहींसें चुकल्यासारखें वाटतें परंतु एकटें रहायला आतांपासून शिकलेंच पाहिजे. हो, उद्यां तुझें लग्न झालें म्हणजे तुम्हां दोघांत ह्या म्हाताऱ्याचो अडचण कशाला ? तेव्हां सांगायचें म्हणजे बाबूचा तुला फारच आग्रह असेल तर आणखीं रहायला माझी ना नाहीं. परंतु झाले हेहि काहीं थोडे दिवस झाले नाहींत.'

जगन्नाथनं वडिलांचं पत्र बाबूला मुद्दाम दाखविलं. त्याच्या अपेक्ष-प्रमाणंच बाबूनं त्याला आणखीन रहाण्याचा आग्रह केला. 'बघ, तुझ्या तात्यांची घाई नाहीं तुला परत येण्याची.' बाब त्याला पुन्हां पुन्हां म्हणूं लागला.

'तें खरं. पण पुष्कळच दिवस झाले रे मला.' जगन्नाथ त्याला धोरणी-पणानं म्हणाला.

बाबू कॉलेजच्या प्रथम वर्षाची परीक्षा आटोपून असाच उन्हाळ्याच्या सुट्टींत घरीं आला होता व येतांना त्यानें पुण्याच्या आपल्या आतेलाहि बरोबर आणलें होतें.

'ओळखलं कोण आलंय् तें.' असें म्हणत आक्का धांवतच गाडीपाशीं आली व दुसऱ्याच क्षणीं एकदम थबकून उभी राहिली. लाल आलवणाचा शेव डोक्यावरून घेतलेली आपली प्रेमळ आत्या बैलगाडींतून सांवरत उतरत असणार हें चित्र होतं तिच्या डोळ्यासमोर. पण त्याऐवजीं चित्रासारखा दिसणारा एक उमदा पोरसवदा तरुण मोठ्या विनयशीलपणें गाडींतून उतरत असतांना दिसला तिला.

मोठ्या आचंब्यानें जगन्नाथ पाहूं लागला. विस्मयचकित झालेली आक्का त्याच्या नजरेस पडली. क्षणभर दोघंहि अवाक् नजरेनें परस्परांना निरखीत होती. पण मग लागलीच आक्का लाजली. तिनें दृष्टि खालीं वळ-वळीं. '...मला वाटलं...' असं कांहींसं ती बोलूं पहात होती. पण मग ती मुळी तेथें थांबलीच नाहीं. खारीच्या गतीनें तो बाहेर आली होती. ती आतां हरिणीच्या वेगानें आंत पळाली.

'ही माझी धाकटी बहीण आक्का--म्हणजे कुंदा' बाबूराव जगन्नाथच्या पाठीवर थोपटत त्याला सांगत होता. पण त्याची थाप पाठीवर बसतांच जगन्नाथ कोण चमकला–'अं ? काय ?' असं कांहींसं पुटपुटत तो गोंधळून पाहूं लागला.

'कांहीं नाहीं रे. म्हटलं तुझी बॅग घेतलीस कीं नाहीं गाडींतली ?' त्याच्या चर्येवरील संभ्रमाचा अर्थ समजून बाबू उत्तरला.

'असं म्हणतोस होय ? मला वाटलं...हं बॅग ना, नाहीं, आहे, ती गाडींतच आहे '

'असूं दे ! असूंदे ! धर्मा घेऊन येईल ती. चल आंत.' असं म्हणत बाबूनें जगन्नाथचा हात पकडला व त्याला तो आंत नेऊं लागला.

० ० ०

यंदाचे वर्षी इंटरच्या परीक्षेच्या दिव्यांतून पार पडल्यावर बाबूरावनें जगन्नाथला आपल्या गांवीं चार दिवस चलण्याचा आग्रह केला होता.

जगन्नाथनेहि त्याच्या बेताला नेहमींप्रमाणें मोडता घातला नाहीं. कारण त्याला-सुद्धां पुणं सोडून मोकळ्या खेडेगांवात जावेंसें वाटलें होतें. आतांपर्यंतचं त्याचं सार आयुष्य पुण्यास गेलं होतं. पुणें सोडून जरा दुसरीकडे फेरफटका करून यावें असें जगन्नाथला आज बरेच दिवस वाटत होतं. पण तसं करायचं म्हणजे मग वडिलांना घरीं एकटेंच रहावें लागेल ह्या विचारानं दरखेपेस पुणें सोडायचा त्यानें बेत रहित केला होता. त्याला आई नव्हती अन् इतर कुणी भावंडंहि नव्हतीं म्हणून त्याच्या वडिलांचा त्याच्यावर भारीच जीव होता. जगन्नाथ कुठें बाहेरगांवीं गेला कीं त्यांना आपल्या एवढ्या थोरल्या विस्तीर्ण बंगल्यांत अगदींच एक्कलकोंड्यासारखं वाटे. परंतु या वेळीं मात्र आग्रह करून त्यांनींच जगन्नाथला बाबूबरोबर त्याचे गांवीं चार दिवस मोकळेपणानं घालविण्यासाठीं धाडून दिलं होतं.

परंतु चार दिवसांचे झाले आठ दिवस, आठांचे पंधरा दिवस झाले पण जगन्नाथ कांहीं परतला नाहीं. बरें त्याचें पत्र सुद्धां नाहीं. आणखी दोन दिवस वाट पाहून त्याचे वडिलांनीं त्याला पत्रांतून लिहिलें,...जगन्नाथ, बरेच दिवसांत तुझं कुशल कळलें नाहीं म्हणून सहज लिहिलें. एरवीं तसें कांहीं विशेष कारण नाहीं. बाबूचें गांव तुला बरेंच आवडलेलें दिसतें व म्हणून बाबूरावनें तुला फारच आग्रहानें ठेवून घेतलेलें असावें. परंतु माझी कांहीं त्याला हरकत नाहीं. तूं नसल्यामुळें कांहींसें चुकल्यासारखें वाटतें परंतु एकटें रहायला आतांपासून शिकलेंच पाहिजे. हो, उद्यां तुझें लग्न झालें म्हणजे तुम्हां दोघांत ह्या म्हाताऱ्याची अडचण कशाला ? तेव्हां सांगायचें म्हणजे बाबूचा तुला फारच आग्रह असेल तर आणखीं रहायला माझी ना नाहीं. परंतु झाले हेहि कांहीं थोडे दिवस झाले नाहींत.'

जगन्नाथनं वडिलांचं पत्र बाबूला मुद्दाम दाखविलं. त्याच्या अपेक्षे-प्रमाणंच बाबूनं त्याला आणखीन रहाण्याचा आग्रह केला. 'बघ, तुझ्या तात्यांची घाई नाहीं तुला परत येण्याची.' बाब त्याला पुन्हां पुन्हां म्हणूं लागला.

'तें खरं. पण पुष्कळच दिवस झाले रे मला.' जगन्नाथ त्याला धोरणी-पणानं म्हणाला.

‘पंधरा दिवस म्हणजे पुष्कळ होय ? तें कांहीं नाहीं ऐकणार मी तुझं. रहाच तूं आठवडाभर आणखीन. ऐकणार ना माझं ? ’

यावर चेहरा थोडा वेडा–वाकडा करीत काळजीच्या स्वरांत जगन्नाथ म्हणे,...‘ पण बाबू, वडील एकटे आहेत रे तिकडे. ’

‘असूं देत, ’ बाबू फिरून आग्रह करी. ‘आणखी आठ दिवस तुला सोडणारच नाहीं आतां मुळीं. ’

‘मग काय ! बोलणंच खुटलं... ’ असं हताश सुरांत म्हणत जगन्नाथ मोठ्या कष्टानं आपण त्याच्या बेतास संमती देत असल्याचं आपलं नाटक मोठ्या कौशल्यानें तडीस नेई.

आपला येथील मुक्काम व ढवावा असं जगन्नाथलाहि मनोमन वाटत होतं. त्याला अनेक अर्थांची अनेक कारणं होतीं. अप्पासाहेबांच्या घरीं कशाला कांहीं कमतरता नसल्यामुळं त्याचे येथील दिवस मोठ्या मजेंत जात होते. उच्च दर्जाच्या रहाणीचा त्याला अनुभव नव्हता असं नव्हे. तसा तोसुद्धां एका श्रीमंताच्याच पोटीं जन्माला आला होता. पण त्याचा इथला मुक्काम वाढावयाला लावणारं एक मोठं जबरदस्त कारण त्याच्या दररोज नजरेस पडत होतं. आप्पासाहेब ओकांच्या धाकट्या सुकन्येमुळंच आपला येथील मुक्काम वाढला आहे व कदाचित् आणखीनहि वाढेल हें आपल्या मनाशीं कबूल करण्याइतका तो खचित प्रामाणिक होता. आक्काच्या सौंदर्यानं तर तो मोहित झालाच होता पण तिच्या स्वभावावरहि तो लुब्ध झाला. खेड्यांतील सारींच माणसं फार बोलकीं व मोकळ्या स्वभावाचीं असतात हें त्याला प्रत्यहीं दिसत होतं. आक्काशीं त्याचा परिचय नव्हता तेव्हां ती त्याला लाजत असे ही गोष्ट खरी पण मग हा बाबूचा मित्र आहे व आपल्याच घरीं उतरला आहे ही गोष्ट समजल्यावर त्या दोघांमधील दूरत्व कमी झालं व मग अवघ्या दोनच दिवसांत त्या दोघांत चांगलें सख्य निर्माण झालें.

जगन्नाथ येथें आला त्याच रात्रीं जेवतांना आक्काच्या शेजारीं त्याचं पान मांडलेलं होतं व दुसऱ्या बाजूस बाबू बसला होता. एका तरुण मुलीच्या शेजारीं जगन्नाथ यापूर्वीं कधीं जेवायला बसला नव्हता. आक्कालाहि फार अवघडल्यासारखं वाटत असावं. कारण तिनं सुरवातीपासून जी खालीं मान घातली होती ती अगदीं शेवटपर्यंत. न रहावून बाबू तिला म्हणाला.

'आक्काताई, आज जेवत नाहींस ती. ?'

'वा ! जेवतें ना,' मान वर न करतां आक्का उतरली.

'वा ! याला काय जेवणं म्हणतात ?'

'आज भूकच नाहीं. पोट भरलंय–'

'कशानं ?'

अन् या प्रश्नानं आक्का पुरती गोंधळली. आपल्याकडे सारीं जणं कांहीं विशिष्ट अर्थानं टक लावून बघत आहेत, हें वर न पहातांहि आक्काच्या लक्षांत आलं.

पण समोर बसलेल्या अप्पांनीं तिला या वेळीं मदत केली. बाबूला उद्देशून ते हंसत म्हणाले, 'अरे, आज किनई लहान्या पाटलानं शेतावरून पायरीची एक पाटी आणली होती अन् तेव्हांपासून आक्काची त्या आंब्यांकडे कृपादृष्टि आहे दिवसभर !'

'मग ठीक !' असं म्हणत बाबू नंतर जगन्नाथकडे वळून म्हणाला, 'अन् तुम्ही हो पाव्हणे ? तुमची कशाकडे कृपादृष्टि वळल्ये ? तुला कमी जेवायला काय झालं ? अरे आपण दमून आलों. भूक लागल्यामुळें मी बघ कसा आडवा हात मारतोंय तो. अन् तूं मात्र हात आखडून जेवतोंयस्. काय ? लाजतोस कीं काय ?'

'छे रे ! लाजायचं काय कारण ? मलाहि भूक नाहीं !'

'कां बावा, तुझं कशानं पोट भरलं ?'

यावर जगन्नाथ काय बोलणार ? लाजून बिचाऱ्याला ताटाकडे टक लावून पहावं लागलं.

जेवणं आटोपल्यावर बाबू जगन्नाथला घेऊन शाळेच्या पायरीवर बसायला गेला. आप्पांच्या घरापलीकडे एका शाळेची इमारत होती. त्याच्या दगडी पायरीवर आसन ठोकल्यावर बाबूनं सरळच विचारलं.

'जगू, तूं आमच्या आक्काला लाजतोस होय ?'

'छे छे ! मी कशाला लाजूं तिला ?'

'पण ती तर तुला लाजते–'

'स्त्रिया लज्जाशील असतात. बाबू, तुझं आपलं कांहींतरीच. पुण्याचा आहें म्हटल मी. ती तुझी बहीण तशी–'

'तशी तुझी कांहीं ती बहीण नाहीं–'
'मग कोण ?'
'मित्राची बहिण ती मैत्रीण!'
'पण मैत्री जुळायला दिवसगत व्हावी लागते...'
'मग होऊं दे कीं...मिस्किलपण हसत हंसत बाबू म्हणाला.

० ०

आणि बाबूचं म्हणणं अगदीं खरं ठरलं. दिवस सरूं लागले आणि या दोघांत परस्परांबद्दल प्रेम निर्माण झालं. मनमोकळेपणानं दोघं परस्परांशीं बोलूं लागलीं. संध्याकाळीं बाबू, जगन्नाथ व आक्का उंच डोंगरमाथ्यावर जाऊन बसत त्या वेळीं गप्पा विनोदाला ऊत येई. आक्काचं शिक्षण वेतासबातच होतं पण तिच्या स्वभावांतील चतुराई तिच्या प्रत्येक वाक्यांतून व्यक्त होत होती. जगन्नाथनं यापूर्वीं पुष्कळ मुली पाहिल्या होत्या पण सतेज देहाची व सरळ स्वच्छ आणि मोकळ्या मनाची आक्कासारखी सुलक्षणी मुलगी प्रथमच त्याच्या आयुष्यांत प्रवेशत होती. ह्या साऱ्यामुळं तिच्याविषयीं त्याला ओढ न वाटली तरच नवल होतं.

पण मग पुण्यास जायचा दिवस जसा जवळ आला तशी हीं दोनहि तरुण मनं अवाक् झालेलीं बाबूला दिसूं लागलीं. प्रत्यक्ष निरोपाची वेळ आली तशी आक्काच्या डोळ्यांच्या कडा ओलसर झालेल्या बाबूला दिसल्या. कर्जतवरून गाडी हलली तशी या दोघांचींहि हृदयं विरहव्यथेनं हलवून सोडलीं.

आक्कावर त्याचं मनोमन प्रेम बसलं होतं ही गोष्ट कांहीं खोटी नव्हती. आक्काचंहि आपल्यावर मन जडलं आहे हें त्याला समजलं होतं. पण इतरांना हे सारं समजलं किंवा काय याची मात्र त्याला दाद नव्हती.

पुण्यास आल्यावर दोन दिवसांचे आंतच अचानक आप्पासाहेब ओक टिळक रोडवरील 'जगन्नाथ' बंगल्यांत शिरले. जगन्नाथ त्या वेळीं घरीं नव्हता. पण तात्या होते. आप्पांना पाहून त्यांना कांहीं आश्चर्य वाटलं नाहीं. आधीं ठरल्याप्रमाणेंच जणूं कांहीं ते आले होते. क्षेमकुशल आटोपल्यावर तात्यांच्या खोलींत दोघेहि बराच वेळ बोलत बसले. जगन्नाथ घरीं आला तो सरळ माडीवर गेला, पण पलीकडच्या तात्यांच्या खोलींतून एक ओळखीचा

स्वर त्याच्या कानावर आला. कोणीतरी तात्यांना म्हणत होतं,

'मग हें ठरलं तर एकूण! शक्यतोंवर पहिल्याच मुहूर्तावर उरकून घेऊ.'

'ठीक आहे. बाकी जितकं लवकर होईल तितकं बरंच. पण बरीक मला जगन्नाथच्या शिक्षणाचे बाबतींत मात्र काळजी वाटते. लग्नानंतर पोरं शिकत नाहींत.'

म्हणजे ? जगन्नाथ थबकून ऐकूं लागला. लग्न कोणाचं ठरवाहेत तात्या ? आपलं अन् कोणा मुलीशीं ? लग्न नाहीं करायचं बुवा आपल्याला. आणि केलंच तर एकाच मुलीबरोबर—

'तर मग अक्का–जगन्नाथचं लग्न निश्चित ठरलं ! बरं का तात्या-साहेब. तुमचा शिक्षणाचा मुद्दा रास्त आहे पण एक विसरतां तुम्ही—'

'काय तें ?'

'अहो, कधीं कधीं लग्नानंतर मोठी स्फूर्ति येते अभ्यास करायची ! अहो, भूक भागल्यावरच माणूस कामास लागतो. पोटं बांधून कामं होत नसतात—'

'पाहूं या कशीं काय कामं होतात तीं. सध्या या दोघांचे चार हात करून देण्याचं महत्त्वाचं कार्य पार पाडायचंय् आपल्याला—'

'त्याची अजीबात काळजी तुम्ही करूं नका तात्या. तें सारं काम माझ्याकडे लागलं'

दारांत पावलं वाजलीं. तशी जगन्नाथ घाईघाईनं आपल्या खोलींत शिरला. हातांतील अभ्यासाचीं पुस्तकं त्यानें टेबलावर टाकलीं व दार लोटून तो कॉटवर आडवा झाला उजव्या अंगच्या खिडकींतून चंद्रकिरणं आत येत होतीं. त्याकडे पहातां पहातां जगन्नाथच्या डोळ्यापुढं भावी जीवनाचीं सुदर सुखस्वप्नं चमकूं लागलीं.

० ० ०

ठरल्याप्रमाणें एका सुमुहूर्तावर आक्का जगन्नाथाचं लग्न धुमधडाक्यात पार पडलं. गोरा गोमटा पोरसवदा जगन्नाथ नवरदेव म्हणून झकास सजला होता. आक्काचा थाट तर केवळ अपूर्व होता. हिरवी साडी चोळी व बुटचाचा

शालू पांघरलेली लख्ख गोऱ्या वर्णाची अक्का तर दृष्ट पडावी इतकी डोळ्यांत भरत होती. तिच्या सतेज चर्येवर विनय व लज्जा यांचा जो सुरेख संगम झाला होता त्यामुळंच कीं काय ती अधोमुख होऊन जगन्नाथाच्या पावलांकडे चोरट्या नजरेनं पहात होती. शेरभर वजनाचे सुवर्णालंकार ल्यायल्यामुळं तिची देहलतासुद्धां थोडी वाकून गेली होती. लग्नाच्या अक्षता पडल्या तशी साऱ्या मंडळींनीं समाधानानं माना डोलावल्या. ‘ दोघं परस्परांना किती अनुरूप आहेत ! ’ हाच भाव त्यांतून स्पष्टपणं व्यक्त होत होता. लग्न-सोहळ्यानंतर फलशोभन थाटांत उरकलं गेलं अन् ऋतुशांतीचा विधीहि यथासांग पार पाडण्यांत आला.

तो दिवस संपला नि मग रात्र झाली. सजवलेल्या शय्यागृहांत चांदीचं तांब्याभांडं घेऊन आक्कानं प्रवेश केला. जगन्नाथ टेबलासमोरच्या दिव्यापाशीं एक पुस्तक उघडून बसला होता. अगदीं आवाज न करतां हळू पावलांनीं आक्का खोलींत आली होती. आपली चाहूल जगन्नाथला लागली नसेल अशीच तिची समजूत होती. पण ती आंत शिरली त्याचवेळीं दरवाजांतून शीतल झुळुक आंत शिरली होती. आक्काच्या आगमनाचा निरोप कळविण्याचं आपलं काम तिनं पार पाडलं होते. चमेलीच्या फुलांचा सुगंध नाकांत शिरतांच जगन्नाथनं कान टवकारले व हलकेच वळून पाहिलं. दारांत जणूं लावण्याची जिवंत मूर्तीच उभी होती !

‘ कुंदा—’ असं धोगऱ्या आवाजांत हांक मारीत जगन्नाथनं तिच्या दिशेनं दोन पावलं टाकलीं पण मग तो अडखळला. सारे शब्दसुद्धां तसेच ओठाच्या उंबरठ्याला अडखळले. तिच्याशीं तो यापूर्वीं पुष्कळ मोकळेपणानें बोलला होता. पण तेव्हां शब्द बोलके होते आणि भावना मूक होत्या...

...आतां भावना बोलक्या होत होत्या अन् शब्दाला ध्वनि उरला नव्हता.

जगन्नाथ–आक्काचा सुखी संसार सुरू झाला.तात्यांना–त्याच्या वडिलांना –वरकरणी वाटणारं भय खोटं ठरलं होतं. अभ्यासांतील जगन्नाथाची गती कायमच होती. उलट पूर्वीपेक्षांहि अधिक उत्साहानं तो अभ्यासावर तुटून पडायचा. रात्रीं तो पुस्तक लवकर मिटवणार असं दिसलं तर आक्का त्याला तसं करूं देत नसे. मालवलेला दिवा पुन्हा लावून ती विचारी,

‘ किती वाजले हो...? ’

‘ अकरा वाजून गेले असतील. ’

‘ अजून दहा वाजायचे आहेत म्हटलं. तें कांहीं नाहीं–इतक्यांत थांबवायचा नाहीं अभ्यास––’

‘ कां म्हणून ?

‘ कां म्हणजे ’ किंचित् कृतककोपानं आक्का म्हणे, ‘ तुम्ही अभ्यास टाळलात अन् नापास झालांत तर तुमचे तात्या काय म्हणतील, माहीत आहे ? ’

‘ म्हणतील बायकोच्या नादानं पोरगा फुकट गेला—’

‘ हो ! अन् हेंच त्यांनीं म्हटलेलं मला नाहीं आवडायचं...’ ती असं कांहीं म्हणाली कीं एकदम तिला जवळ ओढून घेत जगन्नाथ म्हणे. ‘ अग, पण मी कांहीं दुसऱ्या कुणाच्या नादीं तर लागलों नाहीं ना ? लग्न झाल्या-नंतर बायकोच्या नादीं नाहीं लागायचं तर मग कुणाच्या––? ’

पण त्याच्यापासून दूर होत आक्का पुस्तक फिरून उघडी अन् तें त्याच्या हातांत देत म्हणे, ‘ हें बघा, अजून चांगलं तास दोन तास वाचत बसायचं–हवीं तर मीहि जागत बसतें–’

पण तिचं न ऐकतां जगन्नाथ दिवा मालवून टाकी व पुस्तक भिरकावून गंभीरपणें म्हणे, ‘ पण आतां आराम करूं दे कीं जरा. पहांटे उठेन अभ्यासाला. –नक्की...’ आत्तां हें असं जाग्रण केल्यावर तो कसला पहाटे उठतोय ? याची अक्काला पुरेपुर जाणीव असायची––पण मग अधिक ताणून न धरतां ती दिवा मालवी आणि म्हणे–‘ फक्त आजच हं–रोज नाहीं असा हट्ट करायचा –खुळ्यासारखा...’

असे कांहीं अपवाद सोडले तर एरवीं मात्र तो रात्रों अगदीं नियमित अभ्यास करी. कधीं कधीं तो अभ्यास करीत बसला कीं समोरच्या खुर्चीवर सहज वाचत आक्का बसत असे. त्या वेळीं मधूनच मान वर करून जगन्नाथ हंसून म्हणे,

‘ राणीसाहेब ’ आपण किती वेळ तें मासिक वाचत बसणार आहांत ? ’

‘ कां ? बसेन तासभर ! ’

'मग तेथपर्यंत मी एक झोपेचा प्रवेश आटोपून घेतों' असं म्हणत जगन्नाथ उठून कॉटकडे जाऊं लागे, म्हणे, 'हे बघ, तूं निजशील तेव्हां मला उठवायला विसरूं नकोस हं! नाहीं तर आमची एकदां का समाधी लागली कीं...'

'पण तुम्ही बसा कीं सोशॉलॉजीच्या लठ्ठ ग्रंथांत डोकं खुपसून. माझ्यामुळें तुम्हांला काय असा व्यत्यय येतोय महाराज?'

'तें मला कसं कळणार? जावें त्यांच्या वंशा तेव्हां कळे--'

'काय तें?'

'राणीसरकार, राज्यावर येऊन व अधिकारसूत्रं ताब्यांत घेऊन आपणाला दोन वर्षं होत आलीं. अजून कसं आपल्या लक्षांत येत नाहीं? तुम्हीं समोर बसल्यावर माझा अभ्यास चालू असतो पण तो समाजशास्त्राचा नव्हे तर सौंदर्यशास्त्राचा--'

'कांहींतरीच-भारीच बाई थट्टेखोर स्वभाव' असं लाजून पुटपुटत आक्का उठून कॉटकडे जाई-म्हणे, 'हं, प्रोफेसरसाहेब, सुरू करा आपली अभ्यासाची गिरणी. आतां पहांटेच्या सुमारास भोंगा देऊन आम्हांला जागं करणार ना?'

'पाहूं या कसं काय जमतंय तें'-असं म्हणून जगन्नाथ मग मनःपूर्वक अभ्यास सुरू करी. कांहीं वर्षें आपणांस असाच मनोनिग्रह केला पाहिजे, ही आपली जबाबदारी तो ओळखून होता.

क्वचित् कधीं एका झोपेवर आक्का जागी होत असे त्या वेळीं जगन्नाथ दिवा तसाच टेबलावर जळत ठेवून डुलक्या घेत असतांता तिला दिसत असे. 'अगबाई' असें म्हणत ती दचकून उठायची. जगन्नाथला हलवून जागें करीत म्हणायची, 'अहो स्कॉलर, उठा आतां. तीन वाजताहेत. कधीं झोंप लागली?'

'हुं?' असा हुंकार देऊन जगन्नाथ खडबडून जागा झाल्यावर चार दोन जांभया देत असे व डोळे चोळून पुन्हां पुस्तकांत पाहूं लागे. अशा वेळीं आक्का दिवा मालवायची. म्हणायची, 'हें पहा, आतां पुरे हं अभ्यास. थोडा उद्यांसाठी ठेवा. चला पाहूं आतां, झोपा थोडा वेळ' व मग त्याला बिछान्याकडे न्यायची. अंथरुणाला पाठ लागल्याबरोबर जगन्नाथ श्रमामुळें

चटकन् निद्रावश होत असे. अशा वेळीं त्याच्या कपाळावरील मऊ केस मागें सारीत व तोंडावरून मायेनं हात फिरवीत आक्का तशीच त्या अंधारांत त्याच्याकडे एकटक नजरेनं पहात बसे.

असे एक ना दोन. लग्नानंतर संसारसुखाचे कितीतरी रम्य क्षण आक्का अनुभवीत होती. तात्यांची मर्जीसुद्धां तिनें उत्तम संपादन केली होती. सुनेच्या स्वभावांतील विविध गुणांचें दर्शन तात्यांना झालें होतें. जगन्नाथ तर काय, स्वतःच्या भाग्याचा स्वतःच हेवा करीत होता !

बी. ए ची परीक्षा झाली व पहिल्या वर्गांत जगन्नाथ उत्तीर्ण झाला

'राणीसाहेब, आमच्या कष्टाचं फळं मिळालं म्हटलं आज ! ' आपल्या यशाची बातमी सांगून वर्तमानपत्री घडी आक्काच्या अंगावर फेकीत जगन्नाथ म्हणाला.

पतीच्या यशानें आक्काचा चेहरा आनंदानें फुलून गेला. मग कसल्याशा आठवणीनें एकदम हंसून पहात ती म्हणाली.

' आपल्या दुसऱ्याहि कष्टाचं फळ आपणांस लवकरच मिळेल. '

' म्हणजे ? ' चटकन् अर्थ न उमजून जगन्नाथनें तिच्याकडे पाहिलें. अन् मग तिचा लज्जेनें आरक्त झालेला चेहरा पाहून तो काय ते चटकन समजला.

' असं म्हणतेस ? ' तिच्या हनुवटीला स्पर्श करीत जगन्नाथ म्हणाला. आणखीच लाजून आक्का अधोमुख झाली तिच्या खांद्यावर थोपटीत जगन्नाथ तिच्या कानांत म्हणाला, ' वा ग ? तें कांहीं कष्टाचं फळ नाहीं, सौख्याचं फळ ! बरं पण आतां मला सांग, आपले युवराज कधीं येतील ? '

' इश्श ! तें नाहीं बाई इतक्यांत सांगतां येत. पण मामंजींना नका हं सांगू ही बातमी. '

' अग, अशा बातम्या कांहीं लपत नसतात. आजना उद्यां समजायच्याच त्या साऱ्यांना. या प्रकारच्या बातम्या नुसत्या कानावर पडत नाहींत. डोळ्यांना दिसतात म्हटलं बाईसाहेब...'

' चला ! कांहींतरीच ' तिर्यक् नजरेनं त्याच्याकडे पहात ती पुटपुटली— लाजली अन् त्याच्या खट्याळपणाला तोंड देणें आपल्याला जमणार नाहीं या जाणीवेनं झटकन् स्वयंपाक घरांत पळाली.

विनायकचें त्या दोघांच्या संसारांत आगमन झालें अन् त्यानंतर एकूण संसारसुखाला मोठा बहरच आल्यासारखें झालें. त्याच्याच पाठीवर मग अशोक आला. यापूर्वी बंगला कसा ओका बोका दिसे. तो पोरांच्या गडबडीनें जागता वाटूं लागला.

आणखी दोन वर्षांनीं जगन्नाथ एम्. ए. झाला अन् त्याच कॉलेजांत प्रोफेसरची जागा त्याला मिळाली. आपल्या मुलाचा भरला संसार पहायला तात्या मात्र फाच दिवस जगले नाहींत. त्यांनीं या जगाचा निरोप घेतला त्या वेळीं ते अगदीं समाधानी होते. 'बाळांनों, माझी कांहींसुद्धां इच्छा उरली नाहीं. मी अगदीं सुखानें जात आहें. आनंदांत संसार करा.' हे त्यांचे अखेरचे शब्द नंतर कितीतरी दिवस आक्काच्या कानांत घोळत होते.

तात्यांच्या मृत्यूमुळें कांहीं दिवस जगन्नाथ–आक्काच्या संसारावर शोकाची सावट पसरली होती. त्यांची आठवण चटकन् विसरतां येण्यासारखी नव्हती. पण तात्या गेले होते ते कांहीं अकालीं नव्हेत. बहात्तरावं वर्ष म्हणजे कमी वय नव्हतं. बरं ते गेले तेहि शांत समाधानी वृत्तीनें, अगदीं कसल्याहि प्रकारचा त्रास न होतां. इतकं सुंदर मरण साऱ्यांनांच कांहीं येत नसतं. तात्यांना तें आलं होतं आणि म्हणूनच ती वाईट गोष्ट नव्हती. वर्षामागून वर्ष पळूं लागलीं. आतां तात्यांची त्यांना आठवण आली तरी दुःख वाटत नसे; जुन्या स्मृतीची उजळणी करतांना उलट सुखाच्याच संवेदना काय त्या उरत.

अशोकानंतर दोन वर्षांनीं आक्काच्या पोटीं जें कन्यारत्न जन्मास आलें तें म्हणजे अगदीं आपल्या आईची प्रतिकृति होती. लहानपणीं आक्का जशी दिसत असे अगदीं तश्शी ही चिमुरडी अलका दिसूं लागली. अधूनमधून आप्पासाहेब लेकीचें क्षेमकुशल विचारण्यासाठीं पुण्यास तिच्या बिऱ्हाडीं येत. त्यांचंहि नेमकं हेंच मत पडलं. 'पोरगी थेट आक्काच्या वळणावर गेल्ये' खांद्यावर बैठक मारून आलेल्या अलकाचा गोड गोड पापा घेत आप्पा म्हणत.

अलका आली तेव्हांपासून आक्काचा संसारसुखानें अगदीं शिगोशिग भरला. तिचं लग्न झाल्याला आतां सहा वर्षें उलटून गेलीं होतीं. जगन्नाथचें वय असेल त्या वेळीं सव्वीस सत्तावीस वर्षांचं अन् आक्कांचं त्याच्यापेक्षां

पांच वर्षांनीं कमी. किती झराझर हा काळ सरला होता. आयुष्याच्या मार्गावरील सौख्याच्या कालखंडातून जातांना लांब लांब टांगा टाकीत काळपुरुष कसा अगदीं वेगानें धावत असतो ! दुःखाच्या कालखंडातून प्रवास करतांना मात्र तो दहा ठिकाणीं थांबतो, हजारदां अडखळतो, अगदीं रेंगाळत जागोजागीं धापा टाकीत व उसासे टाकीत जातो.

आक्काच्या संसारांत अशींच आणखीं दहा वर्षं पुढल्या दारानं आलीं आणि मागीलदारानें चोरपावलानें निघून गेलीं. आक्का आतां कांहीं पोर राहिली नव्हती. पुरंध्री झाली होती. हो ! बत्तिसावं वर्ष म्हणजे प्रौढ वयांतील मध्यकाळच असतो ना ! या वयांतल्या स्त्रीला का कोणी तरुण म्हणतं ! आक्का आतां केवढी पोक्त बाई दिसूं लागली होती. मूळची रूपवान असल्यामुळें व संसारसुख लाभल्यामुळें अजूनहि ती सरस दिसत असे ही गोष्ट निराळी. या प्रौढ वयांतीलहि तिचें स्निग्ध सौंदर्य भुरळ पाडणारें होतें. तिच्या चर्येवरील तेज आणि टवटवी अजून जशीच्या तशीच होती. बदल झाला होता तो फक्त तिच्या अंगकाठींत ! पण तो बदलहि कांहीं कमी आकर्षक नव्हता. पूर्वीं तिचं सौंदर्य बिजलीप्रमाणें होतें, आतां ते समईप्रमाणें शांत–गंभीर झालें होतें. पण सौंदर्य होतें तें होतेंच !

थोरला विनायक तर आतां चांगला सोळा वर्षांचा तरणाताठा जवान झाला होता. यंदांच मॅट्रिक होऊन तो कॉलेजांत दाखल झाला होता. त्याच्या पाठचा अशोक आणखी वर्षभरानें मॅट्रिक होणार होता. चिमुरडी अलका आतां पातळ नेसूं लागली होती. इंग्रजी शाळेंत पोरटी नुकतीच गेली होती म्हणून काय झालं ? आईशीं बोलतांना इंग्रजीशिवाय बात करायला तयार नसे. बाप एवढा मोठा प्रोफेसर ! पण म्हणून काय झालं ? त्याच्याशीं प्रथम 'यस्' 'नो' ची सलामी झडल्याशिवाय चकार शब्द बोलायला पोरगी तयार नसायची !

किती सरळ गेलं होतं आक्काचं येथपर्यंतचं आयुष्य ! फार क्वचित् इतक्या सरळपणें तें चालतं. असं संचित साऱ्यांच्याच गाठी नसत. किती वळणं एरवी ओलांडावीं लागतात माणसाच्या आयुष्याला ? कितीदां तें खड्डयांत पडतं. खाचखळग्यांतून ठेंचकाळत चाचपडत त्याला जावं लागतं, धांप लागून नैराश्यानें थबकावं लागतं. आयुष्याच्या क्षणांची वाळू कितीदां

पायांखालून सरकते. फार चमत्कारिक प्रसंग माणसाच्या आयुष्यांत घडत असतात. बरे आणि वाईट, कडू आणि गोड साऱ्यांची झळ त्याला लागते. कांहीं म्हणतां कांहीं चुकवितां येत नाहीं. नाकासमोर चालण्याइतकं आयुष्य शहाणं नसतं. तें इकडे पहातं, तिकडे डोकावतं, कधी या बाजूला झुकतं, कधीं दुसऱ्या बाजूस वळतं. छे ! छे ! ! वर्षानुवर्ष आयुष्य इतकं सरळ कधींच चालत नाहीं. आक्काच्या बाबतींत पण तसं तें चाललं आहे हें तिच्याप्रमाणें साऱ्यांनाच दिसत होतं. पण जेथपर्यंत तें तसं चालणार होतं तेथपर्यंत त्यांच्यांतील सरळपणा, सलगपणा कोणास कळणार नव्हता. जरा त्याला वळण मिळायला हवं होतं. मग त्याचा यापूर्वीचा सरळपणा साऱ्यांना कळणार होता. आक्काला तो समजणार होता, जाणवणार होता, आठवणार होता ! तिचं आयुष्य इतके दिवस नाकासमोर चाललं, हें एक खरच फार मोठं आश्चर्य होतं. आणि म्हणूनच आतां तें वळण घेणार होतं. त्यांत आश्चर्य वाटण्यासारखं कांहीं नव्हतं. एरवीं ते अपूर्ण कसं राहिलं असतं ?

आत्ता, आक्काचीच गोष्ट बघा ना ! तिचं सारं जीवन बघितलं ना तुम्हीं ? होता त्यांत कांहीं उणेपणा ? कांहीं वाकडेपणा ? साऱ्या गोष्टी किती सरळपणें घडत गेल्या होत्या ! एकीची दुसऱ्याला किती संगती लागत गेली होती.

'आक्काचा संसार किती सुखाचा चालला आहे !' असंच सारीं शहाणीं माणसं म्हणत. आणि असं म्हणत होतीं म्हणूनच तीं शहाणीं ठरत होतीं. पण या शहाण्या सुरत्या माणसांचीच तिला दृष्ट लागली म्हणावं कां? हो. नाहीं तर तिच्या नेटक्या चालणाऱ्या संसाराला अकस्मात् धक्का बसला नसता आणि तृप्तीच्या धुक्यांत वावरणारं सुखाचं विश्व असं उव्वस्त झालं नसतं !

त्याचं असं झालं. अंग मोडून आलंय–डोकं दुखतंय म्हणून त्या दिवशीं जगन्नाथ जरा लौकरच कॉलेजमधून घरीं आला. घरीं येऊन अंग बिछान्याला टेकदेस्तो सारं अंग तापानं फणफणलं. या अकल्पित मळभानं आक्का गोंधळल्यासारख्या, खचल्यासारख्या झाल्या. या सुखाच्या संसारावर चिंतेची, दुःखाची सावली ही अशी पहिल्यांदांच पडत होती. जगन्नाथचं दुखणं दोपी तापावर गेलं. नऊ, एकवीस, चाळीस असे दिवसांचे नुसते तर्क केले जात होते.

आक्कांचा जीव नुसता उलून गेला होता. डॉक्टर वैद्य आपआपल्याकडन उपचारांची पराकाष्ठा करीत होते. आक्कांना धीर देत होते. परंतु त्यांची आपुलकी, त्यांचं सांत्वन हे सारं सारं आक्कांच्या मनाला स्वस्थता द्यायला थिटं पडत होतं. आक्का आक्रंदून मनाला पुन्हां पुन्हां प्रश्न करीत होत्या कीं देवाच्या घरीं मी असा काय अपराध केला कीं त्यानं मला ही अशी शिक्षा द्यावी ? त्याच्या प्रश्नाला कुठूनच उत्तर मिळत नव्हतं. कसलाच दिलासा त्या तगमगणाऱ्या मनाला लाभत नव्हता.

तीन आठवड्यांवर काळ लोटला होता. आक्कांशीं धड दोन शब्द नीट बोलण्याइतपतहि जगन्नाथाला शुद्ध आलेली नव्हती आणि 'यांच्या तोंडची हांक ऐकल्याखेरीज मी इथून हलणार नाहीं' अशा निग्रहानं त्या त्याच्या उशाशीं नुसत्या बसून राहिल्या होत्या. त्यांनीं अन्नपाणी वर्ज्य केलं होतं. जगन्नाथापलीकडे त्यांना कसली कसली म्हणून शुद्ध उरलेली नव्हती.

आक्कांचा पराजय व्हायचा होता. जगन्नाथाचे प्राण कांहीं कोणाला वांचवतां आले नाहींत. तापाच्या गुंगींत जगन्नाथाचं देहावसान केव्हां झालं ह्याचा कोणालाच पत्ता लागला नाहीं. आक्का एखाद्या काष्ठपुतळी सारख्या नुसत्या बसून होत्या. रडू फुटत नव्हतं की त्यांचे डोळे पाणावत नव्हते.

'आक्का, आक्का, तुझं नशिब फुटलं ग' असा कोणीसा आक्रोश केला. त्याची आर्तता जाणवण्यापलिकडे आक्कांचं मन बधिर झालं होतं. कोणीतरी त्यांचं कुंकू पुसलं. मंगळसूत्राला हात घातला. त्या कशालाच प्रतिकार करण्याची शक्ति आतां आक्कांत उरली नव्हती. जणू त्यांची सारी वाचाच ह्या आघातानं नष्ट झाली होती.

सारं यथासांग झालं. जडश्वास तिथं रेंगाळत होते. हलक्या आवाजांत बोलणीं होत होतीं. 'आक्काची काय दशा झालीय. सांभाळायला हवं ह्यापुढें त्यांना नीट' कोणीतरी म्हणत होतं. त्या कशा कशाची त्यांना जाण नव्हती. खोलींत एका कोपऱ्याला घुरंगटून त्या निपचित पडून होत्या. पणती जळत होती.

✦ ✦ ✦

सकाळीं आक्कांना चहा नेऊन देण्यासाठीं म्हणून कोणीसं त्यांच्या त्या खोलीत गेलं पण आक्का तिथं नव्हत्या. कुठं गेल्या आक्का ? वर

माडीवर ? परसदारी ? पलीकडच्या खोलींत. ? सारं घर धुंडलं. शोधाशोध सुरू झाली. शोधाचं क्षेत्र विस्तार पावलं. परसांतले आड. चव्हाटयावरची विहीर, नदीचा कांठ, रेल्वेलाईन, तारा केल्या. तारा झाल्या. हरद्वार, प्रयाग, बनारस, नासिक, मथुरा, ठिकठिकाणीं माणसं शोधाला गेलीं. आक्का कांहीं पुन्हां कोणाला दिसल्या नाहींत.

कुठं हो गेल्या असतील आक्का ? कुठं असतील हो आज आक्का ? त्यांचा जगन्नाथ गेला तिथं—? सुखाच्या शोधांत ? दुःखाचा तडाखा सहन होणार नाहीं ह्या भयानं ? आक्का गेल्या आणि आक्कानं आपल्या भोवतीच्या विश्वाला एक जीवघेणी चुटपुट, एक कुरतडणारी खंत लावून ठेवली.

० ० ०

# ५ .... घोटाळा

निळूभाऊ आंत डोकावले व स्वयंपाकघराला उद्देशून म्हणाले, ‘ ऐकलंत का, मला परत यायला दोन तीन वाजतील आपण माझ्यासाठीं थांबूं नका. जेवणखाण उरकून घ्या. ’ नंतर अंमळ थांबून आवाज चढवीत त्यांनीं पुन्हां विचारलें, ‘ ऐकूं आलं ना तुम्हांला ?’

स्वयंपाकघरांत थोडी हालचाल झाली. यमुनाकाकू मोजून पावलें टाकीत माजघराच्या उंबरठ्याशीं आल्या. डाव्या हाताच्या पंजाला एकाद्या कर्ण्याप्रमाणें आकार देऊन त्यांनी तो कानावर ठेवला व किलकिल्या डोळ्यांनीं निळूभाऊंकडे बघत त्या म्हणाल्या, ‘ आँ ?’

‘ नाहीं, म्हटलं, जेवणासाठीं माझी वाट पाहूं नका. मला माघारीं यायला उशीर होईल. ’ निळूभाऊंनीं ओरडून सांगितलें.

पक्ष्यानें फांदीवर चोंच घासली कीं जो आवाज कानीं पडतो, तसाच आवाज यमुनाकाकूंच्या कर्णेंद्रियांत शिरला. त्याचा कांहींच अर्थबोध न झाल्यामुळें त्यांनीं पुन्हा विचारलें, ‘ आँ ? काय म्हणलांत ?’

आतां मात्र निळूभाऊंच्या रागाचा पारा चढला. तरी पण संयमानें आवाजाची उंची रोखून ते पुटपुटले, ‘ कपाळ म्हणालों माझं ! तुझे कान फुटले आहेत कीं काय !’

नि काय आश्चर्य ! हलक्या स्वरांत उच्चालेलें निळूभाऊंचें हें वाक्य मात्र यमुनाकाकूंना ऐकूं आलें. ऐकूं आलें म्हणण्यापेक्षां निळूभाऊंच्या चर्येवर

त्यांना तें जाणतां आलें. त्यामुळें चिडून जाऊन त्या म्हणाल्या, 'मी कांहीं बहिरी नाहीं. पण तुम्ही असं तोंडांतल्या तोंडांत पुटपुटल्यावर मला कसं ऐकू येणार ? थोडं मोठ्यांदां बोला ना ? उद्यां एकादशी आहे म्हणून अदपाव दूध जास्त घेण्याबद्दल सांगत होतां ना ?'

निळूभाऊंनीं कपाळाला हात लावला. आपण जें सांगितलें त्यावर साफ पाणी पडल्याचें त्यांच्या लक्षांत आलें. सातव्या पट्टींत स्वर चढवून त्यांनीं बराच वेळ मोठमोठ्यांदा आडराओरड केल्यावर त्यांच्या म्हणण्याचा सारांश यमुनाकाकूंच्या कानांत शिरला. त्याचा भावार्थ आणखी थोड्या अवधीनंतर त्यांच्या डोक्यांत शिरला. कमरेवर हात ठेवून त्या वळल्या. परत स्वयंपाकघरांत जातां जातां त्या पुरपुटल्या होत्या, 'किती हळू आवाजांत बोलायचं ! कसं ऐकू यावं माणसाला ? कुजबुजल्यासारखं बोलायचं का आतां हें वय ?'

निळभाऊ बाहेरच्या खोलींत परत आले. यमुनाकाकूंचा त्यांना फार राग आला होता. पण तशा त्या त्यांच्या क्रोधाधीन मनांतहि एक विचार चटकन् येऊन टपकला. आपली बायको बहिरी झाली यांत तिचा कुठला दोष ? गेलें वर्षभर तिचे कान ठणकत होते, तेव्हां आपण कुठें तिच्यावर उपचार केले ?

अर्थात् या विचाराला निळूभाऊंनीं आपल्या मनांत फार काळ थारा दिला नाहीं. बैठकीच्या खोलींत आल्यावर त्यांनीं त्यांचा एकुलता एक कोट अंगावर चढविला. तेवढ्यांत त्यांचा धाकटा मुलगा दामू तेथें आला व त्यांचा कोट ओढीत म्हणाला, 'भाऊ, तुमचा हा कोट फाटलाय् किती बघा--'

'कुठला फाटतोय्' निळूभाऊंनीं दामूला दूर ढकललें, 'चार दोन ठिगळं लागलीं असतील. अशीं वर्षं किती झालीं आहेत कोट शिवल्याला ?'

'कां भाऊ,' दामू त्याच्या पोरबुद्धीप्रमाणें प्रतिपादूं लागला, 'तुमच्या लग्नाच्या वेळचा ना हा कोट ? मग मोजा वर्षं ! आपला दादाच आतां पंचवीस वर्षांचा आहे !'

दामूचें बोलणें बिनतोड होतें. तथापि लहान मुलांनीं दाखविलेल्या मोठ्यांच्या चुका खऱ्या असल्या तरी मोठीं माणसें त्या कबूल करण्याचा मोठेपणा दाखवीत नसतात ! निळूभाऊंनीं दामूला झिडकारलें. कोट अंगांत

घातला, वहाणांचे आंगठे तुटलेले होते, परंतु त्या घालण्यावांचून गत्यतर नव्हतें. दोन वर्षांमागें घेतलेला तो वहाणांचा जोड ते अद्याप वापरत होते. अजून वर्ष दोन वर्षं तो जोड काम देईल याबद्दल त्यांची खात्री होती.

निळूभाऊ घराच्या पायऱ्या उतरूं लागल्याचें पाहतांच एकदम दामू त्यांच्याजवळ आला. 'भाऊ' त्यांना हांक मारून तो मोठ्या धीरानें बोलूं लागला. 'मला दोन आणे देतां ?'

'कशाला ?' निळूभाऊ खेंकसले.

'सरांनीं वही आणायला सांगितली आहे एक चाळीस पानी, भूगोलासाठीं !'

'मग त्याला दोन आणे कशाला गाढवा ? माझ्या पुष्टिपात्रांतले कागद घे मोठे दहा बारा व शीव त्यांची वही--'

'पण भाऊ...'

'आतां आणखीन् काय ?' निळूभाऊंनीं कंटाळलेल्या स्वरांत पृच्छा केली.

'पण भाऊ ते सगळे सरकारी कागद आहेत. त्याच्यावर सरकारी शिक्के आहेत. ते मी कसे वापरूं ?'

दामूच्या तोंडापुढें दिवा ओवाळल्यासारखा आविर्भाव करीत निळूभाऊ उत्तरले, 'दाम्या गाढवा, इतकं तुला नाहीं समजत ? अरे, शिक्क्यांचे भाग कापून टाक व बाकी पानांच्या वह्या कर, चल जा--'

'भाऊ--'

० ० ०

पण आतां निळूभाऊ थांबणार नव्हते. तालुका कोर्टांत ते दावा हरले होते व तत्संबंधीं न्याय मागण्यासाठीं ते जिल्ह्याच्या गांवीं वकील महाशयांची गांठ घेण्यास निघाले होते. अवघ्या बारा मैलांवर जिल्ह्याचें गांव असल्यामुळें आगगाडींतून तेथें पोहोंचण्यास पुरता अर्धा तासहि लागणार नव्हता. तथापि वकिलांची कोर्टांत गाठ घेण्यापेक्षां सकाळींच त्यांना त्यांच्या घरीं जाऊन भेटणें बरें, असा खोल विचार करूनच निळूभाऊ गडबडीनें घराबाहेर पडले होते.

नाक्यावर येतांच टांगेवाल्यानें त्यांना हटकलें, 'रावसाहेब, चलणार काय ?'

निळूभाऊंनीं तांतडीनें मान हलविली. परंतु टांगेवाल्यानें प्रश्न त्यांना विचारला असला तरी त्याची सराईत दृष्टि इतर सावज शोधण्यांत गुंतली होती. तेव्हां निळूभाऊंचा कृतिशील नकार त्याच्या नजरेस पडलाच नाहीं. रावसाहेबांची सवारी गृहीत धरून त्यानें अश्वरथ निळूभाऊंजवळ आणून उभा केला व मागोल बैठकीच्या जागीं हातानें थाड् थाड् आवाज करीत त्यानें गर्दीत साफसफाईचा कार्यक्रम आवरला. रावसाहेबांच्या वजनानें टांगा कधीं हलतोय याची तो वाट पाहूं लागला. पण एक मिनिट झालें, दोन झालीं, तिसरें उलटलें म्हणून त्यानें मागें वळून पाहिलें. पण तेथें रावसाहेब होते कोठें ? समोर पुन्हां दृष्टि टाकतांच झपाझप पावलें टाकीत स्थानकच्या रोखानें निघालेले रावसाहेब त्याला दिसले व काय समजायचें तें समजून आशीर्वचनात्मक चार दोन शब्द तो मनाशींच पुटपुटला.

निळूभाऊ स्टेशनाच्या अगदीं जवळ आले असतांनाच कुणीतरी एकदम त्यांच्या पाठीवर हात ठेवला. आपल्याच तंद्रींत चालत असलेले निळूभाऊ त्या अगांतुक स्पर्शानें दचकले व 'काय हो ?' असें विचारून त्यांच्याजवळ उभ्या असलेल्या गृहस्थाकडे अनोळखी दृष्टीनें बघूं लागले.

'मला ओळखलं नाहींस तूं भाऊ ?' त्या नवागतानें सलगीच्या सुरांत पृच्छा केली.

त्याला त्यांनीं ओळखलें नव्हतेंच. परंतु तसें कबूल केलें असतें तर त्या पाहुण्यानें निळूभाऊंच्या स्मरणशक्तिबद्दल शंका प्रदर्शित केली असती. कांहीं केल्या ओळख पटेना. तेव्हां मग निळूभाऊंनीं त्यांच्या कल्पनेप्रमाणें एक मखलाशी केली.

एकदम अघळपघळ हंसून त्यांनीं त्या गृहस्थाचा हात पकडला व ते म्हणाले, 'अरे, न ओळखायला काय झालं तुला ? माझी चाळिशी मी केव्हांच ओलांडली असली तरी डोळ्यांवर बरीक चाळिशी चढविलेली नाहीं. महाराज दृष्टि शाबूत आहे आमची.'

तो गृहस्थ मिष्किलपणें हंसला. 'तर मग नांव सांगूं बघूं--'

निळभाऊ गोंधळले. गडबडून गेले. आपण आपल्या परीनें केलेली मखलाशी वांयाच गेली म्हणायची! या गृहस्थानें चांगलेंच पेचांत पकडलें कीं! आतां काय करावें...?

भीत भीत ते पुटपुटले, 'अरे बाबा, तूंहि बाकी कमाल करतोस बघ, म्हणे नांव सांग—देवा, देवा, आतां मात्र हद्द झाली!'

त्या गृहस्थाची चर्या एकदम पालटली, 'शेवटीं ओळखलेंस तूं निळू मला. अरे हा बाबा देव, तुझा लंगोटीमित्र. त्या मला तूं ओळखलें नसतेंस तरच आश्चर्य!'

हा बाबा देव कोण, याचाच विचार अजून निळुभाऊ मनाशीं करीत होते. कावळा बसायला व फांदी मोडायला गांठ पडली असल्याचें त्यांच्या लक्षांत आलें होतें. बाबा देवचें म्हणणें ते मुकाटयानें ऐकून घेऊं लागले.

'तुला कदाचित् माहोत नसेल पण मी हल्लीं मुंबईला असतों. एक 'प्रायव्हेट लिमिटेड' मध्यें नोकरीला आहें.'

'पगार काय मिळतो?' निळूभाऊंचा व्यवहारी स्वभाव लागलीच प्रकट झाला. पण मनुष्य आपलें खरें वय कदाचित् सांगेल पण आपल्या पगाराचा आकडा सांगणार नाहीं. बाबा देव अर्थातच या नियमाला अपवाद नव्हता. 'मिळतात पोटापुरते,' तो उत्तरला. 'तुझी काय हालहवाल आहे?'

'हाल आहेत—'

'अरे, ते तर तुझ्या जन्मालाच पुरले आहेत. 'मजेंत आहें' असें उत्तर तूं कधीं दिलें होतेंस?'

यावर निळूभाऊ काय बोलणार? मग एकदम आठवल्यासारखें करून बाबा देव म्हणाला, 'अरे हो, बरी आठवण झाली. तुझा मुलगा मला काल भेटला होता मुंबईत. शेजारीं गिरगांवाला आठवले रहातात. त्यांच्याकडे तुझा मुलगा रहातो वाटतं पुष्कळ दिवस बघत होतों. सहज नांवगांव विचारलें. तुझाच तो मुलगा हें मला माहीत नव्हतें. फार वाळलंय् पोरगं—'

निळूभाऊंनीं घसा साफ केला. 'अरे बाबा, पहिल्यासून कुडीच त्याची तशी. वाळतोय कशानें?'

बाबा देवनें अविश्वासदर्शक चर्या केली. 'लहानपणीं त्याला मी

पाहिलेलें होतें. तब्येतीनें चांगला गुंड होता तुझा मुलगा. काल त्यानें सारें कांहीं मला सांगून टाकलें कॉलेजमध्यें जाऊन नांव कमावण्याची त्याची मोठी उमेद होती. मॅट्रिकला सबंध जिल्ह्यांत पहिला येऊनहि तूं त्याच्या कॉलेज-शिक्षणाला मोडता घातलास निळू. बिचारा हल्लीं सकाळचें कॉलेज करून दुपारीं दिवसभर टायपिंगचें काम करतो. इतक्या कोवळ्या वयांत ढोर मेहनत केल्यावर मुलगा वाळणार नाहीं तर मग काय होणार ?'

चूक असतांनाहि ती कुणी दाखविली कीं अकारण चिडण्याचा माणसाचा स्वभावधर्म आहे. निळूभाऊंनीं अकस्मात् आवाज चढविला. हातवारे करीत ते तावातावानें समर्थन करूं लागले, 'नोकरी करून विद्या करणारा माझा एकटाच मुलगा मुंबईंत नाहीं. असे शेंकडों नोकरदार विद्यार्थी मुंबईंत आहेत कीं जे--'

'त्यांची गोष्ट वेगळी आहे निळू. तुझ्या मुलाची वेगळी ? पहिलें म्हणजे तुझ्या मुलाला चारचौघांसारखी सुखाची नोकरी मिळालेली नाहीं. टाइपिंगचें खाजगी काम मिळवून तो मोठ्या कष्टानें रुपया दोन रुपये दिवशीं मिळवतो आहे व आपलें शिक्षण चालू ठेवतो आहे. दुसरें म्हणजे असले काबाडकष्ट करण्याची त्याला वास्तविक काहीं जरुरी नाहीं. तुझ्यासारख्या पैसेवाल्या घरंदाज माणसानें तरी आपल्या मुलावर असा प्रसंग पडूं द्यावयास नको होता. चामडी घालवून दमड्या गाठीं लावण्याचा तुझा स्वभावच चमत्कारिक आहे निळूभाऊ.'

० ० ०

स्टेशनांत येऊन निळूभाऊंनीं तिकिट काढलें व ते गाडींत जाऊन बसले. गाडी धावू लागली व निळूभाऊंच्या मनांतदेखील विचारांचें मोहळ एकदम डिवचलें गेलें. त्यांच्या बालपणींच्या मित्रानें थोड्या वेळापूर्वी जें कांहीं त्यांना ऐकविलें होतें तें निखालस चूक म्हणण्याचें साहस निळूभाऊंच्या मनाला होत नव्हतें. आपण जपून वागतों, काटकसरीने रहातों याबद्दल अनेकजण अनेक प्रकारें आपणावर टीका करतात, आपणांस निंदतात ही गोष्ट वेळोवेळीं त्यांच्या ध्यानीं आली होती. आपल्या या व्यवहारी वागणुकीला खूळ म्हणून आपला उपहास केला जातो हा कांहीं त्याचा आजचा

पहिला अनुभव नव्हता. पण लोक कांहींहि बोलले म्हणून निळूभाऊ बदलतील कसे ? त्यांनीं कां म्हणून बदलावें ?

निळूभाऊ बसले होते त्या डब्यांत एक याचक शिरला. खांद्यापासून त्याचे हात तुटलेले होते. त्याची दृष्टिहि बरीच अधु असावी, कारण त्याच्या किलकिल्या डोळ्यांच्या कोपऱ्यांतून सारखें पाणी वाहत होतें. त्यानें आपल्या कमरेंभोंवतीं एक जीर्ण वस्त्र बांधलें होतें व त्यालाच एक जस्ताची वाटी अडकविली होती. हात न पसरतां त्याला भीक मागावी लागत असल्यामुळें त्याच्याबद्दल सहजच करुणा निर्माण होत होती. पै पैसा त्या याचकाच्या वाटींत पडत होता. निळूभाऊंच्या बाकाच्या दिशेनें तो बापडा जसजसा सरकू लागला तसतसें जणूं एकादें संकटच आपल्या दिशेनें चाल करून येत असल्याचा निळूभाऊंना भास झाला. याचना करण्याच्या मिषानें गाडींतल्या उतारूंच्या चोऱ्या करण्यांत येतात हे माहीत असल्यामुळें निळूभाऊ अंग चोरून बसले प्रस्तुत याचकाजवळ चोरी करण्यास आवश्यक असलेल्या हाताचाहि अधार नसल्याची गोष्टसुद्धां त्यांच्या लक्षांत आली नाहीं !

तो दुबळा फारच जवळ आला तेव्हां त्याचा प्रतिकार करण्यास निळूभाऊ सज्ज झाले. बिनहातांच्या त्या याचकाला ते नुसतेच रिक्तहस्त पाठविणार नव्हते; तर भीक मागणें हा गुन्हा कसा आहे हें त्याला नीट पटवून देणार होते--सारे भिकारी एकजात मातले आहेत !

पण निळूभाऊंचा वायबार वांयाच गेला. भीक मागण्याच्या का होईना पण याहि कलेचें एक शास्त्र आहेच कीं, नुसत्या चर्येवरून, देणारा गृहस्थ कोण, झिडकारणारा गृहस्थ कोण तें जातिवंत याचक ओळखत असतो. या कलेंत दीर्घ अनुभव संपादिलेले याचक तर 'दाते' मडळींपैकीं कोण किती देणार, काय देणार हेदेखील बिनचूक ओळखतात. निळूभाऊंच्या चेहऱ्यावरून त्या याचकानें तेव्हांच तांडलें कीं, शिव्यांशिवाय हा मज्जन दुसरें कांहींच देणार नाहीं. त्यांच्या वाऱ्यालाहि उभा न राहतां तो दीन माघारी वळला. डब्याच्या टोकाला निघाला.

तिकिटावर दर्शविलेलें मुक्कामाचें स्थानक येतांच निळूभाऊंनी गडबडीनें हातांतील पिशवी सावरली. नुकत्याच हरलेल्या दाव्यांतील कागद-

पत्रांच्या नकला व इतरहि अनेक तर्जुमे त्या पिशवींत शिगोशीग भरले होते. पिशवीचा एक बंद केव्हां तुटला होता कोण जाणे! ती पिशवी तिच्या गळ्याशीं दोन्ही हातांच्या मुठींत पक्की धरून ठेवावी लागत होती. कष्ट-पूर्वक फलाटावर उतरणाऱ्या निळूभाऊंकडे लक्ष जातांच फाटक्या अंगाचें एक पोर त्यांच्या दिशेनें मदतीसाठीं धांवलें. निळूभाऊंच्या हातांतील पिशवी त्यानें स्वतःच्या हातीं घेतली. जिना चढून व फलाट ओलांडून त्यानें ती पिशवी स्टेशनबाहेर सुरक्षितपणें आणून दिली. वयस्कर मंडळींना मदत करणारीं मुलें या जगांत आहेत म्हणायचीं!

पण हें काय! निळूभाऊ हें काय पहात होते? तें फाटके पोरगें निळूभाऊंपुढें चक्क हात पसरून उभे होतें. या पोराला पैसे हवे होते कीं काय? त्याच्या या कृतीचा अर्थ तरी काय करायचा? निळूभाऊंना कांहींच कळेना.

'काय रे, काय म्हणतोस मला?' निळूभाऊंनीं विचारलें.

त्या पोरट्याला आश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. कुणाचीहि पिशवी फलाटापासून पूल ओलांडून स्टेशनपार करून दिल्यावर त्याच्या हातांत त्याबद्दल मोबदला पडत असे, नि हे गृहस्थ मात्र त्याला विचारीत होते, 'मुला, तूं काय म्हणतोस?'

'साहेब, माझी हमाली?..'

निळूभाऊंच्या भुवया वक्र झाल्या. तर मग मुलगा पैसे मागत होता!

पण पैसे न देतांच त्या मुलाला हाकलून लावल्यावर निळूभाऊ वकिला-कडे जाण्यास निघाले. एकाद्या भिंगाप्रमाणें त्यांनीं उजव्या हाताची पोकळ मूठ डोळ्यांवर धरली व स्टेशनाच्या आवारांतील विजेच्या मोठ्या घड्याळा-वर नजर टाकली. बापरे! नवाचें घर ओलांडून तासकाटा दहाच्या जवळपास येत होता कीं! बराच उशीर झाला म्हणायचा. आतां काय करावें?

जिल्ह्याच्या या शहरांत टांग्याची वर्दळ तर होतीच. पण अलीकडेच 'सिटी बस सर्व्हिस'हि सुरू झालेली होती. 'येथें रांगेंत उभे रहावें' असा छोटा फलक स्टेशनजवळच्या बस स्टॉपवर लागला होता व तेथें बरेच लोक बसची वाट बघत उभे होते. गांवांत जाण्यास टांग्याचा दर दोन आणे होता तर 'बस'चा दर केवळ नवीन पांच पैसे होता. 'बस' फार महाग नाहीं. ही

गोष्ट निळूभाऊंच्या मनानेंहि कबूल गेली. त्यांनीं हेंहि मान्य केलें कीं, चढत्या उन्हांत दीड दोन मैल स्वत:ला व सोबतच्या या कामाच्या पिशवीला रखडत नेणें सोपें नाहीं. पण किती का कठीण असेना, जी गोष्ट पैशाविना शक्य होती ती गोष्ट पैसे खर्च करून करणें व्यवहारीपणाचें कसें असूं शकेल? छे, छे, तो केवळ मूर्खपणा ठरावा!

० ० ०

पिशवीच्या गळ्याभोंवतालची पकड घट्ट करून निळूभाऊ वेगानें पावलें उचलूं लागले. एकसष्टीचा त्यांनीं समारंभ केला नसला तरी तिचा उंबरठा त्यांनीं ओलांडला असल्यामुळें गांवांत जाणाऱ्या रस्त्यावरून जलद चालतांना त्यांना फार श्रम होत होते, ठायीं ठायीं दम लागत होता. धापा टाकण्याची वेळ येत होती. घामानें त्यांच्या अंगांतील केवळ सदराच नव्हे तर चामड्यासारखा चिवट असलेला जाड कोटहि पाझरूं लागला होता. ते असे चालत जात असतांना माणसांनीं गच्च भरलेली सीटी बस आंचके देत फुरकुरत निळूभाउंच्या अंगावरून पुढें निघून गेली. तिच्याकडे पहातां पहातां निळूभाऊंना हळूच वाटलें, ' काय हरकत होती पांच पैसे खर्च करायला?'

घामानें डबडबून गेलेलें तोंड धोतराच्या सोग्यानें पुसल्यावर निळूभाऊंनीं अधिक झपाट्यानें चालण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्येक क्षणीं त्यांचा थकवा वाढत होता. ऊन आतां सारखें चढत असल्यामुळें थोड्या श्रमानेंसुद्धां फार गळल्यासारखें वाटत होतें. एक टांगा त्यांच्यापुढून गेला. दुसरा, तिसरा चवथाहि गेला. सर्व टांगे 'फुल्ल' होते. रंगीबेरंगी ऐटबाज पोशाख केलेली तरुण मंडळी टांग्याच्या बैठकीवर आरामांत रेलून मजेंत गांवांत जात होती. त्यांच्याकडे बघत निळूभाऊंनीं नाक मुरडलें. उधळे कुठचे!'

मागून येणारी एक टॅक्सी निळूभाऊंच्या जवळून जाऊं लागली. चालण्याच्या कष्टानें व्याकुळ झालेल्या निळूभाऊंनीं मोठ्या काकुळतेनें त्या काळ्या पिवळ्या टॅक्सीकडे पाहिलें. नि काय आश्चर्य! ती टॅक्सी निळूभाऊंजवळ येऊन अचानक उभी राहिली. आपल्या इच्छाशक्तीनें धांवती मोटारगाडी थांबूं शकते, याचा अचंबा करीत निळूभाऊ बघतास तों त्या टॅक्सीचें दार उघडलें गेलें. 'भाऊसाहेब' म्हणून कुणीतरी हांक मारली आणि...

सर्वांत अप्रिय माणसाचें आपल्याला येथें दर्शन होईन, याची शंका-सुद्धां निळूभाऊंना नव्हती. पण त्यांचा जांवईच त्यांना हांक मारीत होता, टॅक्सीचें दार उघडून त्यांना आंत येण्यास सांगत होता.

निळूभाऊंचा चेहरा उन्हानें लालसर झालाच होता. आतां जांवयाला पहातांच त्यांचें तोंड अधिकच लाल झालें. संताप शिगेला पोंहचल्यामुळें काय बोलावें व काय बोलूं नये हेंच त्यांना कळेना. दांत ओठ खात ते थरथरत तसेंच उभे राहिले.

'भाऊसाहेब, तुम्ही इकडे कुठें ?' जामातांनीं श्वशुरांना प्रश्न केला.

पण तितक्यांत निळूभाऊच्या चर्येकडे लक्ष जातांच जामात नरमले. अपराधी मुद्रेनें त्यांनीं अत्यंत मऊ शब्दांत विचारलें, 'तुम्हीं गांवांतच चालला आहांत तेव्हां या मोटारींत बसा ना !'

परंतु निळूभाऊ जागचे मुळींच हलले नाहींत. 'हे पहा, तुमच्या या मोटारींत मी कांहीं बसणार नाहीं.आपण आपले जा कसे—' निळूभाऊ कडाडले!

निळूभाऊसमोर आपण आणखी एक मिनिटभर जरी उभे राहिलों तरी त्यांच्या संतापाचा स्फोट झाल्यावांचून राहणार नाहीं, याची खात्री पटतांच त्यांचा जावई माघारीं वळला. टॅक्सींत बसल्यावर त्यानें दार फाट्कन लावून घेतलें.

दुसऱ्याच क्षणीं गाडी सुरू झाली व सरपटत निळूभाऊंच्या पुढून निघून गेली. रागारागानें मुठी वळून निळूभाऊ दूर जाणाऱ्या त्या मोटारीच्या काळ्या ठिपक्याकडे बघत उभे होते त्या धांदलींत त्यांचा हातांतील पिशवीवरचा तावा सुटला व ती खालीं पडून तिच्यांतील कागद पत्रावळीप्रमाणें इस्तस्तत: विखुरले.

जावयाला लक्ष शिव्या मोजीत निळूभाऊंनीं कागदपत्रें गोळा करून पिशवींत कोंबलीं. कोटाच्या खिशांतून साखळीचें घड्याळ काढून त्यांनीं पाहिलें तो त्यांत साडेनऊ वाजत होते. घड्याळ मागें तर पडलेलें नाहीं ना, अशी शंका येऊन त्यांनीं पुन्हा एकवार निरखून बघितलें. आपलें घड्याळ बंद पडलें आहे, हें लक्षांत येण्यास त्यांना आणखी तीन मिनिटें लागलीं.

पिशवीची मानगूट डाव्या हातांत घट्ट पकडून निळूभाऊ त्वरेनें चालूं लागले. अजूनहि जावयाबद्दलचा त्यांचा राग मुळीच शांत झाला नव्हता. ऊन

आतां चांगलेंच चढलेलें असल्यामुळें त्यांच्या अंगाची लाहीलाही होत होती पण त्याहिपेक्षां त्यांच्या अंतरंगांत त्यांच्या जावयाबद्दलचा राग अंगाराप्रमाणें धुमसत होता. बाबूराव गद्रे या गृहस्थाला आपली मुलगी देण्याचा निर्णय जेव्हां निळूभाऊंनीं जाहीर केला होता, तेव्हांच अनेकांनीं त्यांना भेटून सांगितलें होतें, कीं निळूभाऊ एक वेळ तुम्हीं तुमची मुलगी विहिरींत ढकला पण या गद्र्याला देऊं नका. तो श्रीमंत आहे, देखणा आहे पण बिनकाळजाचा आहे. किती मुलींच्या जीवनाची पशूनें राखरांगोळी केलेली आहे, माहीत आहे तुम्हांला निळूभाऊ ?

पण कुणाचें कांहींच न ऐकतां सिंधूचें लग्न निळूभाऊंनीं बाबूरावांशींच लावून दिलें. हुंड्यापोटीं एक पैसाहि न देतां, लग्नकार्याच्या खर्चाचा पदराला मुळींच खार न लागतां आपल्याला बाबूरवांसारख्याचें सधन, सुंदर स्थळ मिळालें याच समाधानांत निळूभाऊ होते.

त्यांचें हें समाधान त्यानंतरच्या दिवसांत वाढतहि गेलें. कारण, सिंधूचा संसार मोठ्या आनंदांत चालला असल्याच्या वार्ता अधूनमधून त्यांच्या कानावर येत होत्या. सिंधूला त्यानें दिल्ली दाखविली. झालंच तर बंगलोर, म्हैसूर इत्यादि ठिकाणीं हिंडवून आणलें. मुलीच्या लग्नाच्या व्यवहारांत आपण जिंकली, हा निळूभाऊंचा समज पक्का दृढ झाला.

पण जेव्हां एके दिवशीं सिंधू एकटीच माहेरीं आली, तेव्हां निळूभाऊंच्या लक्षांत आलें कीं, त्यांच्या जावयानें तिला घरांतून हाकलून लावलें होतें. तिला घराबाहेर काढण्याचें कारण ? ती सर्वच हकीकत कमालीची दुःखदायक होती. जावयाची भेट घेऊन निळूभाऊंनीं त्याची परोपरीने विनवणी केली. सिंधूला त्याच्या घरीं पोंहचल्यावर ते परत आले. पण त्यानंतर तिसऱ्याच दिवशीं त्यांच्या मागोमाग ती भयंकर बातमी धांवत आली. कपड्यावर रॉकेल ओतून सिंधूनें स्वतःला जाळून घेतलें होतें. पण ही बातमी खरी नव्हती. सिंधूनें स्वतःला जाळून नव्हतें घेतलें; तिला जिवंत जाळण्यांत आले होतें !

o o o

निळूभाऊ जिना चढून वकीलांच्या बंगल्यावर आले तेव्हां पेठे वकील

त्यांच्या फिरत्या खुर्चीत बसून ‘ लॉ रिपोर्टस् ’ वाचत होते.

’ हं बोला--’ विधिज्ञांनीं डोळ्यावरील चष्मा काढून हातांत धरला. त्यांनी पृच्छा केली, ‘ काय काम आहे सांगा—’

‘ त्याचं असं आहे ’, निळूभाऊ काय सांगावयाचें आहे त्याची मनातल्या मनांत जुळवाजूळव करीत म्हणाले, ‘ टेनन्सीची केस आहे. तालुका कोर्टांत निकाल आमच्याविरुद्ध गेला. आमच्या वकीलांनीं तुमचें नांव सुचविलें म्हणून मुद्दाम तुमच्याकडे आलों. ’

निळूभाऊंनीं गेल्याच वर्षी, ते भाड्याच्या ज्या घरांत रहात होते त्याच्या नजीकचा ‘ प्लॉट ’ विकत घेऊन स्वतःच्या मालकीचें नवें घर बांधलें होतें. वास्तुशांत केल्यावर स्वतः निळूभाऊ कांहीं त्या नवीन घरांत रहावयास गेले नाहींत. आठ रुपये भाड्याच्या तीन खणी घरांत ते तसेच रहात होते. नवीन घरांत प्रत्येकीं पस्तीस रुपयें भाड्याचीं तीन बिऱ्हाडें त्यांनीं भाड्यानें दिलीं. निळूभाऊंनीं भाड्याची जागा खालीं करावी, असा आग्रह त्यांच्या मालकानें कधींपासून धरला होता. नवीन घर बांधल्यावर तरी निळूभाऊ आपली जागा सोडून त्यांच्या मालकीच्या घरांत रहावयास जातील अशी मालकाची अटकळ होती. पण निळूभाऊ ऐकेनात. तेव्हां स्वतःला वापरावयास जागा अपुरी पडते, या सबबीवर मालकानें निळूभाऊना नोटीस दिली. परिणामतः ही केस कोर्टांत जाऊन दुर्दैवानें निकाल मात्र निळूभाऊंच्या विरुद्ध पडला होता !

निळूभाऊंचें म्हणणें निश्चल मनानें ऐकून घेतल्यावर पेठे वकिलांनीं हात पुढें केला. निळूभाऊंनीं आणलेलीं कागदपत्रें झरझर डोळ्यांखालून घातलीं व मग ते म्हणाले, ‘ केस मीं समजून घेतली आहे. या कामाला दोनशें रुपये खर्च येईल. ’

निळूभाऊ सुन्न होऊन गेले. काय करावें हेंच त्यांच्या लक्षांत येईना. मुकाट्यानें त्यांनीं वकिलाचें म्हणणें मान्य केलें.

० ० ०

शरिराचें ओझें कसेंबसें घरापर्यंत ओढून आणल्यावर निळूभाऊंनीं सुटकेचा निश्वास सोडला. आज त्यांना बराच त्रास झाला होता यांत शंका नाहीं. घरी जाऊन चार घास खाल्ल्यानंतर आडवें होईपर्यंत आपला श्रमपरिहार

होणार नाहीं, असा विचार करीत ते घराच्या पायऱ्या चढूं लागले. ओसरीवर पोस्टमन उभा असून त्यांच्याभोंवतीं शेजारची व घरांतील मंडळी उभी असलेली त्यांना दिसली. निळूभाऊ आलेले पाहून ती चटकन बाजूला झालीं. निळूभाऊंनीं पुढें होऊन विचारलें, 'काय आहे पोस्टमन ?'

'रजिस्टर आहे.'

कलकत्त्याच्या स्टेट बँकेनें लिहिलेल्या त्या पत्रांतील अक्षरांवरून निळूभाऊंचे डोळे जसजसे फिरूं लागले तसतसे आयुष्यांत कधींहि बसले नसतील असे विलक्षण आश्चर्याचे धक्के त्यांच्या मनाला बसूं लागले. आपल्याला कुठलेहि नातलग नाहींत असेंच निळूभाऊ आजपर्यंत समजत होते. पण या पत्रावरून त्यांना खूप दूरचा, चुलत चुलत चुलता होता, हें स्पष्ट होत होतें. असामांत त्याच्या मालकीचे चहाचे मळे होते. आजूबाजूच्या प्रदेशांत कित्येक एकर शेतजमीन होती. शिवाय कलकत्त्यांत फार मोठ्या प्रमाणावर घाऊक चहाचा व्यापार होता. असा हा निळूभाऊंचा काकानुकताच निवर्तून त्यानें ही आपली प्रचंड मालमत्ता व बँकेंतील लक्षावधि रुपयांची रोकड एकुलत्या एक पुतण्याच्या नांवावर, निळूभाऊंच्या नांवावर, करून ठेवली होती !

पत्र वाचून निळूभाऊ गोंधळून गेले. हातवारे करून त्यांनीं बाहेरच्या लोकांना घरांत जावयास सांगितलें. मग त्यांनीं पायांतील तुटक्या वहाणा कोपऱ्यांत नेहमींच्या जागीं काढून ठेवल्या. अंगांतील विरलेला फाटका कोट काढून खुंटीवर अडकवला व हातांतील पत्र डोळ्यांसमोर धरून भांबावलेल्या मनांत ते बिनहाताच्या खुर्चींत बसून राहिले. गेल्या साठ पासष्ट वर्षांचा आपला जीवनपट त्यांना आठवला. मोजून मापून त्यांनीं आयुष्यभर वाटचाल केली होती, ती वांया गेली होती. मन व शरीर मारून, अपरंपार काटकसर करून त्यांनीं पै पैसा जमा केला होता व कष्टपूर्वक कांहीं हजारांची माया उभी केली होती. पण हें सारेंच व्यर्थ गेलें होतें. लक्षावधि रुपयांची जी मालमत्ता आतां त्यांच्या अलगद हातीं पडत होती. त्यामुळें ते आश्चर्यचकित होत होते, पण त्याहिपेक्षां अधिक विस्मय त्यांना याचा वाटत होता कीं, या बातमीनें त्यांना आनंद होत नव्हता ! सुख वाटत नव्हतें ! एकच एक भावना त्यांच्या मनांत सारखी दाटून येत होती. ती म्हणजे, आपलें सारेंच चुकलें आहे ! साराच घोटाळा झाला आहे ! !

० ० ०

# १० .... बढती

त्या आरामशीर ऐसपैस खुर्चीत श्रीयुत पोंक्षे भेदरलेल्या उंदराप्रमाणें बुजून बसले होते. फार मोठा मान आपल्याला मिळावा, परंतु त्या मानास आपण सत्पात्र असूं नये, अशा वेळीं त्या माणसाला जो एक भीतियुक्त आनंद वाटत असतो, तशाच आनंदाचा आस्वाद पोंक्षेमहाशय आत्तां घेत होते. ते बसले होते ती खुर्चीच इतकी मऊमऊ होती कीं, जन्मांत प्रथमच आज ते तिच्यावर बसले असतील. त्यांच्या समोरच एक लांब रुंद भव्य मेज होतें. हिरव्या रंगाच्या लोकरी कापडाचें त्यावर अच्छादन असून त्याच्याहिवर सहा फूट लांब व चार फूट रुंद अशी नितळ गुळगुळीत कांच ठेवलेली होती. त्या कांचेवरच हात फिरवीत पोंक्षे जागच्या जागीं चुळबुळत बसले होते. त्या कांचेच्या गुळगुळीत स्पर्शानें आपल्या हाताला गुदगुल्या होऊन एक प्रकारचा सुखद कंप सुटला आहे, हें लक्षांत आल्यावर त्यांनीं घाईघाईनें आपले हात दूर केले. तेवढ्यांत त्यांच्या पुढ्यांतल्या स्टेनलेस स्टीलच्या चकचकीत घंटीवर त्यांचा उजवा हात पडून 'किण्' असा जोराचा नाद झाला. आपण उगाचच घंटी वाजविली हें लक्षांत येतांच पोंक्षांची घाबरघुंडी उडाली. दोन्ही हातांनीं ती घंटी पकडून कधींच विरलेला तींतील आवाज थांबविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पण त्याच वेळीं त्यांच्या टेबलासमोर शिपाई येऊन उभा राहिला.

'काय रे मानकामे, काय हवंय?' फार सावधपणें पोंक्षांनीं विचारलें.

मानकामेच्या चेहऱ्यावर आश्चर्य पसरलें. तो कांहींसा रागावलेलाहि दिसला. पोंक्षाबद्दल आधीच त्याचें चांगलें मत नव्हतें. आतां तें अधिकच वाईट झालें. कुचेष्टेनें हंसून तो उत्तरला.

'हाच प्रश्न मी तुम्हांला विचारणार होतों! घंटी वाजवून आपणच मला बोलाविलें. काय हवंय आपल्याला ?'

पोंक्षांचा चेहरा खर्रकन् उतरला. आपण सावध असतांना सुद्धां एवढें घसरलों, बेसावध असतों तर—?

मनाचा गोंधळ उडाला कीं डोळे मिचकावण्याची त्यांना संवय होती. आपणांला तें तंत्र चांगलेंच जमतें असा त्यांना आतांपर्यंत विश्वास वाटत असल्यामुळें बळेंच हंसून ते म्हणाले, 'अरे मानकामे, असा चिडतोस काय एकदम ? साहेब आलेत का तें बघून ये बघूं. जरा महत्त्वाचें काम आहे—'

त्यांना महत्त्वाचें कोठलेंहि काम नाहीं. हें मानकामेला माहीत होतें, म्हणून धूर्तपणें हंसत तो म्हणाला—

'साहेब रोज बाराच्या पुढें येतात हें तुम्हांला माहीतच आहे आणि आतां तर कुठें ११–२५ वाजत आहेत. त्यांतून खोलींत जातांना ते आपल्यासमोरूनच जाणार असल्यामुळें तुमच्या तें लक्षांत येईलच. माझ्या हिशोबाप्रमाणें अजून त्यांना यायला चांगला तासभर अवकाश आहे.' आपल्या डाव्या मनगटावरील मळकट खादीच्या डगल्याची बाही वर सारीत घड्याळाकडे बघत तो पुन्हां हंसला.

त्याच्या मनगटावरील सोनेरी 'लेडीज वॉच' कडे बघून आपल्या हातावर घड्याळ नसल्याची जाणीव पोंक्षांना झाली. त्यांचें डावें मनगट एकदम हुळहुळल्यासारखें झालें. उजव्या हातानें तें जोरांत रगडीत त्यांनीं आजच्या आज संध्याकाळीं एक हातावरचें घड्याळ विकत घेण्याचा निश्चय केला; पण तेवढ्यांत त्यांच्या नेहमींच्या विचारी मनानें घड्याळाची खरेदी महिनाअखेर पगार झाल्यानंतर व तेव्हांहि नच जमल्यास सावकाश सवडीनें करण्याची दुरुस्ती त्यांच्या आधींच्या उतावळ्या निश्चयांत केली.

त्यानंतर मग रोजच्याप्रमाणें ऑफिस सुरू झालें. कुणाला उकडत होतें

म्हणून पंखे सुरू करण्यांत आले. कुणाला त्याच हवेनें थंडी लागून पडसें होऊं लागल्यानें तेच पंखे बंद करण्यांत आले. पंखे बंद झाले तशी उष्ण प्रकृतीच्या जोशीचें पित्त खवळलें. बिचारा कल्याणहून रोज मुंबईला येत असे आणि कल्याणला बहिणीच्या घरीं विजेचे तर सोडाच पण साधे हातपंखेहि नव्हते. दहा बाय् दहाच्या दोन खोल्यांतून त्याच्या बहिणीच्या बिऱ्हाडांतलीं अकरा माणसें कशीं काय दिवसरात्र रहात होतीं, हें तीं अकरा माणसें जाणोत ! रात्रभर उकाड्यामुळें आधींच उष्ण प्रकृतीचा असलेला जोशी अक्षरशः तळमळत वळवळत पडलेला असे. त्यांतून पुन्हां कल्याण ते मुंबई असा गाडीच्या पायफळीवरच्या प्रवासाचा व्यायाम रोज नियमित चालूच असल्यामुळें ऑफिसांत जाऊन आपल्या खुर्चीवर बसणें म्हणजे ताजमहाल हॉटेलमध्यें जाऊन तेथल्या एखाद्या भारीपैकीं कोचांत लोळण्याइतकें त्याला सुखद वाटत असे. परंतु आतां पंखे बंद केल्याचें पाहून तो चरफडत खुर्चीवरून उठला व पंख्याची कळ फिरवीत रागानें, खेकसला, 'करमकर, तुम्हांला पडसें होतें तर ॲस्प्रो घ्या, पंखे कशाला बंद करतां ? येथें आधींच कामाखालीं जीव पिजून चाललाय्, त्यांत उकाड्यानें काय पुरता खिमा करून टाकावयाचाय् कीं काय ?'

जोशीच्या बोलण्यावर करमरकरांना एक जबरदस्त शिंक आली व दोन मिनिटांपूर्वीं नाकपुड्यांतून कोंबलेले तपकीरीचे घास आतां द्रवरूपानें सुमारें पांच फुटांच्या परिसरांत सर्वत्र विखुरले.

आणि वासंती भोसले करमरकरांच्या पलीकडच्याच टेबलापाशीं बसलेली असल्यामुळें द्रवरूप तपकीरीचे शितोडे तिच्या अंगावर उडणें साहजिकच होतें. पण तसे ते उडतांच वासंती ताडकन् आपल्या खुर्चीवरून उठली व करमरकरांसमोर येऊन उभी रहात किंचाळली, 'हें बघा करमरकर, तुम्ही काय करून ठेवतांय् तें. माझी साडी साफ खराब करून टाकलीत तुम्ही--'

'नाहीं तर काय ? सव्वा रुपया देऊन ठेवा आतां धुलाईसाठीं करमरकर. महिनाभर विड्या बंद--'

पण गोपाळ साठेच्या या कोपरखळीनें सुद्धां करमरकर स्थितप्रज्ञच राहिले. आपल्या नायलॉनच्या पारदर्शक साडीचा पिसारा समोर उचलून धरलेल्या वासंतीकडेच अद्याप ते पहात होते. त्यांच्या त्या तसल्या पहाण्यानें वासंती अधिकच संतापली व पाय आपटीत सुपरिंटेंडंटच्या टेबलासमोरं जाऊन उभी राहिली.

महाशय पोंक्षे इतक्या वेळ समोर घडणारी ही एकांकिका फार सावध-पणें पहात बसलेले होते. इतक्या वेळपर्यंत त्यांनीं आपल्या लांबरुंद टेबलावर सर्वत्र फायली पसरून ठेवल्या होत्या. वासंती भोसले टेबलापाशीं येऊन उभी राहिल्यावर आपण कामांत गढून गेलों होतों व घडलेला प्रकार पाहिला नव्हता असें दाखविण्यासाठीं त्यांनीं टेबलावरील एक फाईल घाईघाईनें उघडी करून व डोळ्यांवर 'कांचा' चढवून तींत एकदम डोकें खुपसलें. आतां दुरून त्यांच्याकडे पहाणाऱ्यास ते एका फार सीरियस केसचा 'स्टडी' करीत आहेत हें चटकन् पटण्यासारखें होतें.

वासंती त्यांच्यासमोर उभी राहिली तेव्हां उलटचा बाजूनें पोक्षे फाईल वाचीत असलेले तिला दिसले. पोंक्षांची तिला एकदम कींव आली व तिचा राग तेवढ्यापुरता पार उतरला. न बोलतां तिनें ते वाचीत असलेली फाईल सुलट फिरवून त्यांच्यासमोर धरली.

आपण फाईल उलटचा बाजूनें वाचीत होतों ही गोष्ट आतां कुठें पोक्षांच्या लक्षांत आली व तत्क्षणींच त्यांच्या अंगाला दरदरून घाम सुटला. आजपासूनच प्रमोशन मिळून ते सुपरिंटेन्डन्ट झाले होते, नि त्यानंतर अवघ्या तासा दोन तासांत चारपांच गफलती त्यांच्या हातून घडल्या होत्या--आणि त्यांतून ते पूर्ण सावध असतांना! जर ते बेसावध असते तर मग?

पोक्षांच्या गोंधळलेल्या चर्येकडे एकवार हंसून पाहिल्यावर वासंतीनें मूळ मुद्दा पकडून म्हटलें,--

'सर, करमरकरांबद्दल माझी एक तक्रार आहे. दररोज ते माझे कपडे

खराब करतात. एक तर त्यांची खुर्ची तरी बदला, नाहीं तर माझें टेबल तरी हलवा,--

'पण झालें काय ?' सर्व कांहीं नीट पाहिलेलें असतांहि प्रत्येक गोष्टीच्या तळापासून सुरवात करण्याच्या 'हेडक्लार्की' पद्धतीनुसार त्यांनीं उलट विचारलें. आधींच सावध असलेल्या आपल्या मनाला त्यांनीं अधिक जागें केलें.

'तुम्ही तर तें सर्व पहातच होता कीं, कोपरापाशीं बांधलेलें आपलें चिमुकलें घड्याळ अधिक वर घेत वासंती उत्तरली.

पुन्हां एकवार आपण घसरलों, याची जाणीव पोंक्षांना होतांच त्यांच्या मनाला एकदम वैताग प्राप्त झाला. या वेळपर्यंत त्यांच्यासमोर दोन्ही अंगाला बसलेल्या आठ अधिक आठ म्हणजे सोळा कारकुनांच्या नजरा आपल्याकडे लागल्या असल्याचें दिसतांच ते अधिकच कावरेबावरे झाले. गोंधळून त्यांनीं डोळे वर उचलून वासंतीकडे बघितलें--

पण, त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांवर भिंगांचा चष्मा असल्यामुळें एरवीं दिसणारा वासंतीचा गोंडस चेहरा त्यांना एकदम अक्राळ विक्राळ दिसूं लागला. तिचे पाणीदार बारीक डोळे त्यांना दगडी कोळशाच्या दोन प्रचंड तुकड्यासारखे दिसूं लागले. तिचें चाफेकळी नाक तर पुढें निमुळतें होत गेलेल्या रेल्वेच्या फलाटासारखें त्यांना वाटलें. त्याशिवाय तिच्या कपाळावर पुढें आलेल्या काळ्या केसांच्या दोन बटा तर त्यांना दोन प्रचंड प्रश्नचिन्हांसारख्या वाटल्या. ही बाई आपल्याला खाणार तर नाहीं ना ? या शंकेनें त्यांनीं त्वरेनें आपल्या नाकावरील चष्मा खालीं ओढला. त्या झटापटींत चष्म्याची उजवी काडी एखाद्या वाळलेल्या काटकीसारखी मोडून खालीं पडली. 'बाबू चष्मेवाला एक काडी बसविण्याचें काय घेतो,' याची चिंता त्यांचें सुप्त विचारी मन त्या तशाहि परिस्थितींत वाहूं लागलें.

चष्म्याचा काडीमोड झाल्याचें पाहून आपल्यामुळें बिचाऱ्या पोंक्षांच्या

खिशाला कातर लागली, या विचारानें वासंतीला स्त्रीसुलभ हळहळ वाटल्या वांचून राहिली नाहीं. आपलें गाऱ्हाणें पोंक्षांना सांगून किती खंबीर न्याय आपणांस मिळणार आहे हें ती ओळखून होतीच. अधिक कांहीं न बोलतां परत जावें, असेंहि तिला वाटलें. पण पोंक्षांकरवीं करमरकांना दम भरतां आल्यास बरें, या विचारानें तिनें चिंतातूर आवाजांत फिरून एकवार विचारलें, 'मग काय हलवणार ना करमरकरांना त्यांच्या जागेवरून ?'

चटकन् हो म्हणावें व या बयेला वाटेला लावावें असा एक विचार पोंक्षांच्या मनांत अवतरला, पण दुसऱ्याच क्षणीं त्यांच्या विचारी मनानें इषारत दिली. कांहीं झालें तरी करमरकर त्या सेक्शनमधले सर्वांत 'सिनियर' होते. केवळ सहा दिवसांच्या फरकानें पोंक्षाना हे प्रमोशन मिळूं शकलें होतें, नाहींतर खरोखर तें करमरकरांनाच मिळायचें ! करमरकर पोंक्षांपेक्षां कितीतरी अधिक कार्यक्षम होते. त्यांच्या कामाच्या दांडग्या उरकाबद्दल त्यांच्या शत्रूनेंहि त्यांना बोल लावला नसता. आपल्या थंड प्रकृतीला अनुसरून न बोलतां सदैव ते कामांत मग्न असत. तेवढें एक पंख्याचें प्रकरण सोडलें तर करमरकर सर्वांनाच हवेहवेसे वाटत. कोणाला आपलें काम जमत नसलें अथवा तें करण्याचा कंटाळा आला तर बेलाशक कोणीहि करमरकरांवर तें काम सोपवावें. मोठ्या संतोषानें व तत्परतेनें आपलें काम बाजूला सारून ते इतरांचें काम करून देत. त्यासाठीं नियमितपणें लवकर येऊन नित्य उशिरानें ते घरीं जात असत. आवश्यक वाटल्यास रविवारींहि ते एकटेच येऊन ऑफिसांत बसत. 'काम करतां करतां करमरकर एकादे दिवशीं खपणार,' असें सारे विनोदानें म्हणत, तें अक्षरशः खरेंहि ठरण्याची शक्यता होती कारण अतिश्रमानें त्यांची तब्येतहि आतांशा खालवत चालली होती. पंख्याची थंड हवा त्यांना अजिबात सोसत नसे. वासंतीसारख्या काल आलेल्या नाचऱ्या पोरीच्या शब्दाला भुलून करमरकरांसारख्या नेमस्त सरकारी सेवकाला उणाअधिक शब्द बोलणें पोंक्षेंच्या विचारी मनाला बरें वाटेना. वासंतीला

न्याय देणें म्हणजे पर्यायानें करमरकरांवर अन्याय करण्यासारखेंच होतें. बरें, वासंतीसारख्या गोड गोंडस मुलीला नाराज करणेंहि त्यांच्या मोठें जिवावर आलें. काय करावें, तें त्यांना अगदीं सुचेना.

पण तेवढ्यांत आणखी एक व्यक्ति आपल्या टेबलासमोर येऊन उभी राहिल्याचें पोंक्षांच्या लक्षांत आलें. ती व्यक्ति दुसरी तिसरी कोणी नसून मानकामे हीच आहे, हें सत्य पटल्यावर त्यांचा मूळचा गोंधळ कित्येक पटीनें वाढला. 'काय रे, काय पाहिजे ?' मोठ्या धाडसानें त्यांनीं प्रश्न तर केला.

'साहेबांनीं ताबडतोब बोलावलाय्–' गुरकावत मानकामे उत्तरला. इतरांचें काम न मानणारा मानकामे साहेबांच्या शब्दाची तत्काळ अंमलबजावणी करण्याचें धोरण मात्र व्यवस्थित सांभाळीत असे.

साहेबांनीं बोलावल्याचें कळतांच आगींतून फुफाट्यांत पडल्यासारखी पोंक्षांची स्तिति झाली. वासंतीच्या भानगडींतून सुटलों, या समाधानापेक्षां साहेबांच्या भानगडींत गुंतलों या विचाराचें दुःख शतपटीनें अधिक होतें. 'मिस् भोसले, तुम्ही आतां जा. मग बघतों मी काय तें—' असें मोघम म्हणत ते जागेवरून उठले त्या मऊमऊ खुर्चीवरून उठतांना त्यांच्या अगदीं जिवावर आलें होतें. पण करणार काय ? ते आजपासून भले सुपरिन्टेंडंट झाले असले, तरी अखेर सरकारी नोकरच होते. बाजूच्या खुंटीवरचा काढून ठेवलेला कोट अंगावर चढवितांना त्यांचे हात थरथरत होते. डोक्यावर टोपी ठेवून साहेबांच्या खोलीकडे जातांना त्यांचीं पावलें कमालीचीं जड जड पडत होतीं.

पोंक्षे आलेले पहातांच नजरेनेंच साहेबानें त्यांना समोरच्या खुर्चींत बसण्यास सुचविलें पण ती सूचना ध्यानांत आली नाहीं म्हणून म्हणा, अथवा येऊनहि तसें बसणें बरें दिसणार नाहीं असें वाटल्यावरून म्हणा, पोंक्षे आपले तसेच साहेबांच्या टेबलासमोर उभे राहिले. ते तसेच ताटकळत उभे असलेले पाहून साहेबांच्या कपाळावर आंठी पडली. कांहींशा रागानेंच तो

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

म्हणाला, ' एक मिनिटांत सुटका होणार नाहीं पोंक्षे. बसा तेथं–'

तरीसुद्धां पोंक्षे आपण होऊन खुर्चीत बसले नाहीत. साहेबांच्या शब्दाच्या जरबेनें ते आपोआप खुर्चीत कोसळले. ते खुर्चीत बसले, असें म्हणण्यापेक्षां खुर्चीनें ओढून त्यांना आंत बसविलें, असेंच म्हटलें पाहिजे.

' हे पेपर्स पहा. कुणी ही केस ' सब्मिट् ' केली ?'

पोंक्षांच्या अंगांतील शर्ट या वेळपर्यंत कधींच चिंब भिजून गेला होता. आतां त्यांचा कोटहि पाझरूं लागण्याच्या बेतांत आला होता. आंवढा गिळून त्यांनीं साहेबानें पुढ्यांत ठेवलेल्या कागदांकडे पाहिलें; पण पांढऱ्या शुभ्र कागदावर पुसट काळसर ओळीशिवाय त्यांच्या डोळ्यांना कांहींच दिसेना. चष्म्याच्या कांचा भुरकटलेल्या असाव्यात, या शंकेनें त्यांनीं डोळ्यांकडे हात नेला. पण चष्मा तेथें नव्हता. भराभरा त्यांनीं कोटाचे खिसे चाचपले; पण त्यांचे प्रतिनेत्र त्यांच्या हाताला लागेनात. आपल्या सेक्शनमध्यें आपल्या टेबलावरच चष्मा राहिला हें लक्षांत आल्यावर ते अजिजीच्या स्वरांत साहेबांना म्हणाले, ' सर, जरा माझे ग्लासेस घेऊन येतों एक मिनिटांत; एक्स्क्यूझ मी–'

' नि शक्य झाल्यास येतांना अक्कलहि घेऊन या–' खोलीबाहेर धांवतच निघालेल्या पोंक्षांकडे रागानें पहात साहेब खेकसले.

खरें तर साहेबांचें वाक्य बाहेर निसटणाऱ्या पोंक्षांच्या कानांत नीटपणें घुसलें होतें; पण तसें कांहीं साहेब बोलला नव्हता, तसें कांहीं तो बोलणेंच शक्य नव्हतें, इत्यादि गोष्टी ते स्वतःलाच पुन्हां पुन्हां ठासून पटवून देत होते.

पोंक्षे गेल्यावर साहेबानें हात वर उडवून मनगटावरच्या घड्याळाकडे दृष्टि टाकली. साडेतीनवरून कांटा चाराच्या दिशेनें धांवत होता. एवढ्या अवकाशांत पोंक्षांनीं कांहींसुद्धां काम केलेलें नाहीं, हें त्यांच्या लक्षांत आलें होतें. सुपरिन्टेंडंटच्या कामाला पोंक्षे लायक नाहींत हे त्याला कधींपासूनच

ठाऊक होतें. साधे क्लार्क म्हणूनहि त्यांना आपलें काम धड उरकत नसे, हें तर साहेब कित्येक वर्षें पहात आलाच होता. या माणसाला नोकरीवरहि ठेवूं नये इतका संताप कधीं कधीं त्याला आला होता. म्हणून सुपरिन्टेंडंटची जागा रिकामी झाली तशी त्यानें करमरकरांचें नांव सुचविलें; पण 'स्ट्रिक्टली अँकॉर्डिंग टु सिनिऑरिटी' हें त्या सरकारी कचेरीचें ब्रीदवाक्य असल्यामुळें कामाचीं अधिक वर्षें पाठीं टाकलेल्या श्रीयुत पोंक्षांना अपरिहार्य-पणें बढती मिळाली होती.

कांपऱ्या हातानें दार लोटून आंत येणाऱ्या पोंक्षांकडे तिरस्काराची दृष्टि टाकून साहेबानें विचारलें, 'काय मग पोंक्षे, मिळाला का आपला चष्मा?'

कोटाच्या खिशांतून एक मळकट फडकें काढून पोंक्षांनीं आपली मान, कपाळ व डोकें खसखसा पुसून काढलें पण त्यांचा तो घरगुती रुमाल इतका चिंब भिजला होता कीं, घाम पुसण्याचें आपलें काम करण्यास तो असमर्थ ठरत होता. अर्थात् तशा त्या ओलेत्या रुमालाला तोंडावरून फिरविल्यामुळें त्यांचा चेहरा घामानें अधिक निथळूं लागला. नाइलाजानें मग त्यांना आपल्या धोतराची मदत घ्यावी लागली.

पोंक्षांच्या त्या दयनीय अवस्थेकडे पाहून साहेबांचा राग जाऊन उलट त्याला त्यांची कींव वाटली. 'घाबरूं नका पोंक्षे. मी कांहीं तुम्हांला बोलत नाहीं. बघता ना तेवढे पेपर्स—'

'सर' खजील झालेल्या स्वरांत शब्दांची शोधाशोध करीत पोंक्षे उत्तरले 'सर, चष्मा कांहीं बाहेर सांपडत नाहीं—'

साहेब हंसला. 'पोंक्षे' तो गमतीनें म्हणाला, 'चष्म्याशिवाय नुसत्या डोळ्यांनीं चष्मा कसा सांपडणार? तो शोधण्यासाठीं आधीं डोळ्यांवर चष्मा हवा.'

'हो ना—' बेसावधपणें पोंक्षे म्हणाले. साहेबाच्या प्रत्येक म्हणण्याला अनुमोदन द्यायच्या भरांत पोंक्षे फिरून एकवार घसरले. घाईघाईनें त्यांनीं

गुंडया सोडून कोटाचे दोन्ही पंखे हातानें दूर केले.

तेवढयांत साहेबाची नजर पोंक्षांच्या अंगांतील शर्टाच्या खिशाकडे गेली. घामानें भिजल्यामुळें त्यांच्या शर्टाचें कापड पारदर्शक बनलें होतें. खिशांतील त्यांचा चष्मा स्पष्टपणें आतां दिसत होता.

येणारें हंसूं आवरून साहेब बोलला, 'पोंक्षे, तुमचा चष्मा सांपडून दिल्यास तुम्ही काय हराल ?'

त्यांच्या त्या प्रश्नानें पोंक्षे लज्जित झाले. आयुष्यभर तर ते सारखे पराभवच पचवीत आले होते. आतां आणखीन हरण्यासारखें त्यांच्यापाशीं होतें काय ?

'तो पहा आपला चष्मा. चला आतां, लवकर हे कागद नजरेखालीं घाला बघूं. चार वाजून गेले—'

बापानें मुलाला धीर देऊन प्रेमळपणें एक एक गोष्ट करून घ्यावी, तशी साहेबाची आपल्याशीं वर्तणूक आहे हें लक्षांत आल्यावर पोंक्षांचा जीव एवढा झाला. चष्मा काढून तो डोळयांवर चढवीपर्यंत त्याची एक काडी मोडल्याची आठवण त्यांना झाली नव्हती. एरवीं ती वस्तुस्थिति त्यांनीं साहेबापासून लपवून ठेवली असती, परंतु या क्षणापर्यंत लपवून ठेवण्यासारखें मुळीं पोंक्षांपाशीं कांहीं राहिलेंच नव्हतें. हातानेंच चष्मा डोळयांसमोर धरून त्यांनीं पुढयांतल्या कागदांकडे नजर टाकली. पण एक अक्षर त्यांच्या लक्षांत येईल तर शपथ !

साहेबानें पोंक्षाची असमर्थता ओळखली. गंभीरपणें तो त्यांना म्हणाला, 'पोंक्षे, एक गोष्ट मी तुम्हांला सांगतों. पटते का बघा. सुपरिन्टेंडंटचा जो चार्ज असा तुम्हीं घेतला तो फार कठीण आहे. मी तुमचा वरिष्ठ असूनहि तुम्हांला सांगतों कीं, एक वेळ ऑफिसरचें काम जमूं शकेल, पण सुपरिन्टेंडंटचें काम व्यवस्थित बजावणें फार अवघड गोष्ट आहे. विलक्षण कार्यक्षमता, चटकन् निर्णय घेण्याचें सातत्य व हाताखालील लोकांवर योग्य तो वचक

ठेवण्याची कुवत त्यासाठीं अंगांत असावी लागते. तुमच्याशीं या सर्व गोष्टी अजिबात नाहींत, असें मीं स्पष्टपणें सांगितलें तर तें आपणांस पटतें का बघा—— '

साहेब म्हणाला ती गोष्ट पोंक्षांना मनोमन पटल्यामुळें नकळतच त्यांची मान संमतिदर्शक हलली. साहेब पुढें म्हणाला,

' तेव्हां अशा परिस्थितींत तुम्हीं थोडा विवेक केला पाहिजे. तुमच्या बढतीमुळें मला मत्सर बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं. पण हें सरकारी काम आहे. याच जबाबदारीच्या जागेवर काम करतांना तुमच्या हातून जर कांहीं चूक झाली, तर फार मोठा ठपका पदरांत पडल्याशिवाय रहाणार नाहीं. तुम्हांला भिवविण्याचा माझा हेतु नाहीं, पण स्पष्टच सांगतों कीं, हें कठीण काम तुमच्यानें होणें नाहीं. मी सांगतों तें तुम्हांला पटत असलें व तुमची मान्यता असली, तर या जबाबदारीच्या कामांतून मी तुम्हांला मोकळें करतों. आतां तुमचीं अशीं वर्षं तरी किती राहिलीं ? आपल्या पूर्वींच्याच जागेवर बसून तुम्ही आपलें जुनें काम संभाळा. त्यानें तुमचें थोडें आर्थिक नुकसान होईल हें खरें, पण दोन वाईट गोष्टींतून उजवें-डावें पाहिल्यावांचून गत्यंतर नसतें. मी काय म्हणतों, त्याचा तुम्ही विचार करा—— '

साहेबाचें बोलणें पोंक्षे लक्षपूर्वक ऐकत होते. साहेब म्हणतोय् तें खरेंच आहे, हें त्यांना पटत होतें. एवढ्या कळवळ्यानें खरं म्हणजे सांगणारा तरी कोण आहे, या विचारामुळें साहेबाबद्दल पोंक्षांना आदर वाटला. त्यांची भीडहि आतां बरीच चेपली होती. मान वर न उचलतां ते बोलूं लागले–' तुम्ही म्हणतां तें खरें आहे. सर, माझ्या मर्यादा मी ओळखतों. मिळालेलें प्रमोशन मी स्वीकारलें तें पैशाचा मोह मला आंवरेना म्हणून परंतु आपल्या शब्दाबाहेर मी नाहीं– '

त्यांच्या बोलण्यावर साहेबाच्या नजरेंत सहानुभूतीचें पाणी चमकलें: ' आपला निर्णय तुम्हीं सावकाश घ्या पोंक्षे. माझें म्हणणें मी तुमच्यावर लादत नाहीं. चार दिवसांनीं, आठ दिवसांनीं वाटल्यास महिन्यानें आपला

मनोदय तुम्हीं कळवा. माझी कांहीं हरकत नाहीं.–'

'पण माझी आहे सर' निर्धारानें पोंक्षे मध्येंच उत्तरले. 'माझा निर्णय मी आत्तांच सांगितला तो अखेरचाच समजा. मला सवड देऊन उगाच मोहांत गुंतवूं नका. उद्यांपासून मी माझ्या पूर्वींच्याच जागीं जाऊन माझें काम पाहीन––'

साहेब हंसला व म्हणाला, 'पोंक्षे इतके उतावीळ होऊं नका. एका दिवसांत अशा गोष्टीं घडत नाहींत. मी प्रयत्न करतों; कमींत कमी आठ पंधरा दिवस लागतील. पण तितके दिवस मी तुम्हांला सांभाळून घेईन. अच्छा, बराय्. माझ्या हेतूचा विपर्यास करूं नका–'

एवढें म्हणून साहेब उठला. साडेपांच वाजून गेले होते. आपल्या सेक्शनमध्यें आल्यावर पोंक्षे पहातात तो सारेजण कधींच निघून गेले होते. रोज उशीरापर्यंत काम करीत बसणाऱ्या करमरांचीहि खुर्ची आज रिकामी दिसत होती.

पण तेथें कोणी नसल्याचें बघून पोक्षांना हायसें वाटलें. पूर्वीं ते ज्या मोडक्या खुर्चीवर बसून काम करीत, तिकडे त्यांनीं दृष्टि टाकली. तिच्या तिच्या दिशेनें चालत असतां त्यांना मनोमन हर्ष वाटत होता. त्या जुन्या खुर्चींत बसल्यावर 'कर्र कर्र' आवाज झाला व त्यांच्या मांडीला त्या मोडक्या खुर्चीमुळें चिमटा बसला. परंतु त्यांना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. मोठ्या समाधानांत ते कितीतरी वेळ त्याच खुर्चीवर बसून राहिले.

ते घरीं आले तेव्हां घरच्या कुटुंबीय मंडळींनीं त्यांच्याभोवतीं गराडा घातला. आजपासून त्यांना बढती मिळाल्याचें त्या सर्वांस आधींच ठाऊक असल्यामुळें त्यांच्याबद्दल साऱ्यांना आदर वाटत होता. नवरा आज अतिशय आनंदात घरीं आलेला पाहून त्यांच्या बायकोनें मोठ्या अगत्यानें त्यांचें चहा-पाणी उरकलें. मग ती कौतुकाच्या स्वरांत म्हणाली, 'आजपासून इकडचा मानमरातब वाढला म्हणून सत्यनारायणाची पूजा करण्याचें मनांत आहे. त्या निमित्तानें माझ्या माहेरच्या माणसांना तरी चार आठ दिवस रहायला बोलवितां येईल'–'

इतका वेळ आनंदांत असलेले पोंक्षे आतां मात्र एकदम दचकले.

क्र. ८५८३ ता. दि. लि.

भांबावून त्यांनीं आपले डोळे मिटले. तों काय, त्यांच्या दृष्टीसमोर त्यांच्या बायकोचीं कोकणांतील माहेरचीं झाडून सारीं माणसें आपल्या घराच्या दिशेनें धांवत येत असल्याचें दृश्य दिसलें ! त्या मंडळींत पोक्षांना आपले सासू-सासरे दिसले. त्यांचीं मुलंबाळं दिसलीं. झालंच तर त्यांचीं नातवंडं पंतवडं--कमींत कमी पंधरा--वीस तरी माणसें असावींत.

पण तेवढ्यांत त्यांची समाधि उतरली; कारण त्यांची सर्वांत थोरली मुलगी तिथें हजर झाली होती. आपल्या हातांतील दोन झुळझुळीत साड्यांच्या घड्या त्यांच्या अंगावर फेंकीत ती म्हणाली, 'किती छान आहेत नाहीं हो आप्पा, या साड्या ! फार नाहींत, फक्त आठरा आठराला पडली एक एक. झालंच तर आपल्या छोट्या वत्सीला नायलॉनचा फ्रॉक आणलाय. पंधराला कुठ्ठे मिळणार नाहीं इतका झकास फ्रॉक--'

परंतु तिला पुढें बोलूं न देतां त्यांचा कॉलेजांत शिकणारा मधु तेथें येऊन टपकला व हातांतील छोटें पिवळें चिटोरें आप्पांच्या हातांत देत हात-वारे करीत म्हणाला, 'आप्पा ही घ्या नाटकाचीं तिकिटं.' 'तुझें आहे तुजपाशीं' चा खेळ आहे. पहिल्या रांगेंतील पांच पांच रुपयांचीं सहा तिकिटें घेऊन आलोंय. पैशाची काळजी नको. पुढल्या महिन्यांत दिले तरी चालतील, असें दिनकर म्हणाला. संस्थेच्या मदतीसाठीं खेळ लावलाय. पण असा मस्त आहे आप्पा, काकाजींचें काम तर दाजीबा असें वठवतात कीं, यंव--ओ: ! यार, तूने तो पीही नहीं--'

आपल्या सुपुत्राच्या अवताराकडे पोंक्षे भेदरून पहात होते. तोंच दार ढकलून श्री. बक्षी आंत आले. त्यांच्या हातांत कसलेसे फॉर्म्स होते. पोंक्षां-समोर धरीत बक्षी म्हणाले, 'करा सही त्यावर आप्पासाहेब. फक्त हजारांची पॉलिसी आहे. प्रमोशन मिळालं कीं विमा उतरीन असं वचन दिलं होतं तुम्हीं मला-'

आणि आतां मात्र पोंक्षांचा साराच धीर गळून गेला. त्यांच्या ओठांना कोरड पडून डोळ्यांसमोर अंधेरी आली. विमा उतरण्यापूर्वीच आपलें 'हार्ट-फेल' होणार नाहीं, या भीतीनें त्यांनी आपले दोनहि हात छातीवर घट्ट दाबून धरले !

ο ο ο

वि.भाग क्रमांक २२१८ नों. दि.

# आमचेकडे मिळणारीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १) प्रेमाचा गुलकंद | ले. दत्तू बांदेकर | किं. ३–५० |
| २) चिरीमिरी | ले. ,, | किं. ३–५० |
| ३) आंवळयाभोपळयांची मोट | ले. ,, | किं. ३–५० |
| ४) पेंचप्रसंग | ले. ,, | किं. ३–५० |
| ५) प्यारी | ले. ,, | किं. ३–५० |
| ६) चोरपावलें | ले. ,, | किं. ३–५० |
| ७) बहुरूपी | ले. ,, | किं. ३–५० |
| ८) आडपडदा | ले. ,, | किं. ३–५० |
| ९) न पुजलेली देवता | ले. मामा वरेरकर | किं. ३–०० |
| १०) फाटकी वाकळ | ले. ,, | किं. ३–२५ |
| ११) गोदू गोखले | ले. ,, | किं. १–५० |
| १२) तरतें पोलाद | ले. ,, | किं. ३–२५ |
| १३) मी राम जोशी | ले. ,, | किं. ३–५० |
| १४) आघात | ले. ,, | किं. १–०० |
| १५) शिपायाची बायको | ले. ,, | किं. ३–५० |
| १६) विकारी वात्सल्य | ले. ,, | किं. १–५० |
| १७) गीता | ले. ,, | किं. १–०० |
| १८) वेणू वेलणकर | ले. ,, | किं. १–५० |
| १९) कुलदैवत | ले. ,, | किं. १–५० |
| २०) अवघाची संसार | ले. वि. वि. बोकील | किं. ३–५० |
| २१) रुसवे आणि फुगवे | ले. ,, | किं. ३–५० |
| २२) एक होता नवरा | ले. ,, | किं. ३–७५ |
| २३) झिमझिम | ले. ,, | किं. ३–२५ |

| | | |
|---|---|---|
| २४) पाखर | ले. शिरोडकर | कि. १-२५ |
| २५) नवें जहाज | ले. ,, | कि. १-२५ |
| २६) मातीचें घर | ले. ,, | कि. २-०० |
| २७) गालबोट | ले. ,, | कि. २-५० |
| २८) किमया | ले. ,, | कि. १-०० |
| २९) रुतणारे कांटे | ले. उपाध्ये | कि. २-५० |
| ३०) अभिसारिका | ले. ,, | कि. २-०० |
| ३१) निखारा | ले. ,, | कि. १-७५ |
| ३२) मदनमंदिर | ले. आठवले | कि. २-७५ |
| ३३) अब्रूसाठीं | ले. ,, | कि. २-५० |
| ३४) बाँबगोळे | ले. ,, | कि. १-२५ |
| ३५) प्राणविसांवा | ले. ,, | कि. ३-०० |
| ३६) कीर्ति | ले. शांताबाई नाशिकक | कि. ३-५० |
| ३७) वाळूंतील सरोवर | ले. ,, | कि. २-०० |
| ३८) मालगाडी | ले. शामराव ओक | कि. ३-०० |
| ३९) भिडस्त माणूस | ले. ,, | कि. ३-०० |
| ४०) दुराचारी | ले. राजरत्न जोशी | कि. ८-०० |
| ४१) नसत्या उठाठेवी | ले. सौ. कुमुदिनी रांगणे | कि. ३-७५ |
| ४२) विरलेलें वस्त्र | ले. ,, | कि. १-७५ |
| ४३) सौंदर्याचा फुलबाग | ले. वि. वा. हडप | कि. ५-०० |
| ४४) निरभ्र चंद्र | ले. ,, | कि. ४-०० |
| ४५) बाईलवेडा | ले. ,, | कि. ४-०० |
| ४६) भविष्यकाळ | ले. ,, | कि. ३-५० |
| ४७) मास्तरीण काकू | ले | कि. ३-५० |
| ४८) रूढीच्या वणव्यांत | | कि. ४-०० |

IRBK-0108783

IRBK-0108783

| | | |
|---|---|---|
| ४९) बहकलेली तरुणी | ले. वि, वा. हडप | किं. ४-०० |
| ५०) गौरी–शंकर | ले. ,, | किं. १–५० |
| ५१) फापटपसारा | ले. वि. आ. बुवा | किं. ३–५० |
| ५२) तुका म्हणे त्यांतल्या त्यांत | ले. ,, | किं. ३–७५ |
| ५३) मरण कीं लग्न | ले. सावरकर | किं. १–५० |
| ५४) संन्यस्त खड्ग | ले. ,, | किं. १–०० |
| ५५) गोमांतक (कविता) | ले. ,, | किं. ४–०० |
| ५६) माधवानुज | ले. श्री. म. माटे | किं. ५–०० |
| ५७) राणी चंद्रावती (नाटक) | ले. शं. ना. सहस्रबुद्धे | किं. १–०० |
| ५८) त्यागसम्राट ,, | ले. वि. ग. देशपांडे | किं. १–०० |
| ५९) सवता सुभा ,, | ले. गुप्ते | किं. ०–७५ |
| ६०) छेडलेला छावा ,, | ले. वि. ना. कोठीवाले | किं. १–०० |
| ६१) स्वराज्याचा पुनर्जन्म | ले. ,, | किं. ०–७५ |
| ६२) गिरणीवाला ,, | ले. ,, | किं. ०–७५ |
| ६३) रणदुंदुभी ,, | ले. वामन गोपाळ जोशी | किं. १–२५ |
| ६४) सैरंध्री (नाटिका) | ले. गोविंद गोखले | किं. ०-७५ |
| ६५) मुलींची सीता | ले. कृ. गो. किनरे | किं. १–२५ |
| ६६) काजवे | ले. शंकर साठे (कराची) | किं. १–०० |
| ६७) नवा मोर | ले. गजानन बाळ | किं. १–५० |
| ६८) रसेल–नीति | ले. अनंत काणेकर | किं. २–२५ |
| ६९) महात्मा गांधी | ले. सीताकांत | किं. २–२५ |
| ७०) मृत्यूच्या मांडीवर | ले. भोपटकर | किं. १–७५ |
| ७१) कुठें ? | ले. सौ. कमलाबाई सोहनी | किं. १–०० |
| ७२) भावनांचे खेळ | ले. सौ. कमलाबाई शिर्के | किं. २–५० |
| ७३) विनोदी लेखसंग्रह | ले. कॅप्टन लिमये | किं. १–५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७४) | विषारी फुलें | ले. भावे | किं. १–२५ |
| ७५) | दैवदर्पण ( ज्योतिष ) | ले. भानू | किं. ३–०० |
| ७६) | सख्याशास्त्र | ले. ,, | किं. १–०० |
| ७७) | अचानक द्रव्यनिधी | ले. न. प. महाजन | किं. २–०० |
| ७८) | पौर्णिमा | ले. कवी साधुदास | किं. ५–०० |
| ७९) | जत्रा | ले. शं. ना. नवरे | किं. ३–७५ |
| ८०) | पदर | ले. कृ. ज. दिवेकर | किं. ३–७५ |
| ८१) | तुळशीपत्र व इतर गोष्टी | ले. य. गो. जोशी | किं. ३–५० |
| ८२) | भांडारकर (लेख व व्याख्यानें) | | किं. ५–०० |
| ८३) | स्वामी रामतीर्थ भाग २,४,५ व ६ | ले. बर्वे व फडके | किं. (प्रत्येकीं) २–५० |
| ८४) | राक्षसी रणसंग्राम | ले. | किं. ३–०० |


# शेठ भगवानदास हिरजी

ग्रंथप्रकाशक व ग्रंथविक्रेते

केशव नाइकाची चाळ नं. १ खोली नं. २

**कांदेवाडी, मुंबई ४**